
१९९५
म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. क्र. १२९२



# तो रशियासाठी लढला!

REFBK-0014480

૪૦૦૧૧૯
ચારિત્ર -
૨૮.૧૨.૯૬
૨૧.૨॥
૧૨૬૨

અનુક્રમાંક ૪૦૦૧૧.૯ વિ: ચારિત્ર
ક્રમાંક ૧૨૬૨ તા: ૨૮-૧૨-૯૬

# तो आमच्यासाठीं लढला

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ...... विः चरित्र
क्रमांक ...... नों दि: 22·12·65

लेखक :

कॅथरीन ओवेन्स पिअर

ग्रं. क्र. 90880

: अनुवाद :

विजय तेंडुलकर

REFBK-0014480

नवलेखन, मुंबई ४.

*Marathi Translation of*
**THE FDR STORY**
*By* **Catherine Owens Peare**

•

© *1962 by Catherine Owens Peare*

•

प्रकाशक :
**वसंतकुमार सराफ**
'नवलेखन',
ई ५, मॉडेल हाऊस,
प्रॉक्टर रोड, मुंबई ४.

मुद्रक :
न. वा. लिमये
महाराष्ट्र मुद्रणालय,
४६१/१ सदाशिव पेठ,
टिळक रोड, पुणें २.

•

किंमत ३ रुपये

# तो आमच्यासाठीं लढला

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ४०.०.३१९ ........ वि: ...चरित्र........
क्रमांक ...९२६२........................ नोंद दि: २८.१२.६५

## फ्रँकलीन डी रुझवेल्ट
## यांचें जीवनचरित्र

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ७०००२२९ वि: चरित्र
ता: २८.१२.६३
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अ. क्र. १४४८०

# हाईड पार्कमधील बालपण

हडसन नदी बर्फामुळें काळवंडली होती; तिच्या कांठचे वृक्ष अगदीं निष्पर्ण होऊन उभे होते. हिंवाळ्यांतल्या त्या प्रातःकालीं फ्रॅंकलिन डिलॅनो रूझवेल्ट याचा जन्म झाला. नदीकडे उतरणाऱ्या टेकडीवरच्या मोठ्या घरांत या नवजात अर्भकाचे कुटुंबीय अगदीं कोऱ्या मनानें आणि स्वस्थचित्त मुद्रांनीं वावरत होते. मुलाचे वडील, डॉक्टर, नर्स, नोकरचाकर खालच्या आवाजांत कुजबुजत होते.

नर्सनं मिस्टर जेम्स रूझवेल्ट यांच्यापाशीं कबुली दिली, " पोर जिवंत हातीं लागेल असं वाटलं नव्हतं मला. "

एका प्रशस्त दालनांत, तितक्याच प्रशस्त आणि वजनदार लांकडी पलंगावर बाळंतीण गुंगींत पडून विश्रांति घेत होती. तिला क्लोरोफॉर्मचा जादा डोस देण्यांत आला होता. आणि त्यामुळें मध्यंतरीं मामला जरा बेभरंवशाचाच होता. पण आतां धोका टळला होता, मूल आणि आई दोघंही सुखरूप हातीं लागलीं होतीं. ३० जानेवारी १८८२ हा तो दिवस. त्या दिनीं जन्म घेतलेलं तें बालक आईप्रमाणंच स्वस्थ, शांत पडून होतं.

मिस्टर रूझवेल्ट आतां आपली रोजनिशी लिहिण्यासाठीं बसले. " आज बरोबर पावणे नऊ वाजतां माझी पत्नी सॅली प्रसूत होऊन तिला एक

सुरेखसं बाळसेंदार बाळ झालं. गुलामाचं वजन कपडे काढून दहा पौंड भरलं."

आधींच्या पत्नीपासूनचा त्यांचा मुलगा 'रोजी'–त्याच्यासाठीं मि. रुझवेल्टनीं तारेच्या एका कोऱ्या कागदावर लिहिलं, "सॅलीला गुटगुटीत मुलगा झाला...तिला फार त्रास झाला."

हा निरोप तारेनं पाठवला गेला नाहीं. कारण 'रोजी'–पूर्ण नांव जेम्स रूझवेल्ट—दक्षिणेकडल्या लगतच्याच एक वाडीवर रहात होता. पफूकीप्सीला परत जातांना डॉक्टरांनीच हा लेखी निरोप 'रोजी'च्या घरीं पोंचवला.

नव्या बाळाची आई सारा डिलॅनो रूझवेल्ट ही मि. डिलॅनो रूझवेल्ट यांची द्वितीय पत्नी. या बाळंतपणांत ती फक्त सत्तावीस वर्षांची होती; म्हणजे तिच्या सावत्र मुलाइतक्याच वयाची. जेम्स डिलॅनो स्वत होते पंचावन्नाव्या वर्षाशीं पोंचलेले. या आपल्या दुसऱ्या मुलाचं कौतुक पहायला आपण किती जगूं याबद्दल त्यांच्या मनीं शंका होती.

हिंवाळ्याचा कडाका ओसरूं लागला. वसंताची चाहूल उमटूं लागली. जमिनीवरचा बर्फ वितळूं लागला. निचरूं लागला. त्याचे उरले सुरले लहान-मोठे खडे हडसन नदींतून वहात निघाले. सारा डिलॅनो रूझवेल्ट आतां अगदीं टुणटुणीत झाली होती. कामाला लागली होती. तिचा जीव अष्टौप्रहर गुंतलेला असे–तिच्या एकुलत्या एका आणि पहिल्या वहिल्या 'छोन्या'भोंवतीं.

"कसा बाळसेदार आहे, नाहीं ? कांति पण कशी गुलाबी आहे बघा गुलामाची ! आणि दंगा तरी बाई केवढा करतो-!" ती एकसारखी सर्वांना सांगत असायची. बाळाला न्हाऊंमाखूं ती स्वतः घालायची, स्वतः त्याला अंगडंटोपडं करायची. खरं म्हणजे तशीं घरांत चाकर माणसं होतीं, त्याशिवाय बाळासाठीं एक वेगळी आयाच घरांत आणलेली होती. पण साराला त्यांचं करणं पसंत पडत नव्हतं. तिला त्यांच्या संगोपनांत पदोपदीं चुकाच दिसायच्या. म्हणून तिनं स्वतःकडे सगळं घेतलं होतं, जातीनं सारं कांहीं ती करीत होती.

मुलाच्या आईवडिलांना त्याच्यासाठीं पहिलंवहिलं नांव सुचलं तें वॉरेन. साराच्या वडिलांचं नांव हेंच होतं, गंमत म्हणजे तिच्या भावाचंही तेंच नांव होतं ; आणि त्याच्या मुलाचं तेंच नांव त्यानं ठेवण्याचं ठरवलं होतं आणि तें पोर दगावलं. आतां सारा तिच्या मुलाला हें नांव ठेवते म्हटल्यावर तो पत्रांत

इतकंच म्हणाला कीं, " बाबांचं नांव तुम्ही तुमच्या मुलाला ठेवलंत तर मला मात्र माझ्या मेलेल्या मुलाची आठवण सदैव येत राहील."

तसं म्हटलं तर त्याच्या या स्पष्टोक्तीनं साराची नि तिच्या वडिलांची थोडी फार निराशा झालीच; परंतु त्यांना आश्चर्य मात्र वाटलं नाहीं. आणि मग अर्थातच 'त्यांनी ठरवलेलं नांव रद्द केलं आणि फ्रँकलिन असं नवं नांव निवडलं. साराच्या काकांचं हें नांव. फ्रँकलिन पावणे दोन महिन्यांचा झाला तशी दोघांनीं त्याला पायघोळ, तलम नक्षीचं भरतकाम केलेलं अंगडं घातलं, त्या अंगड्याची बटनंसुद्धां किती नाजूक नि मऊ मऊ होतीं;- आणि मालकीच्या उघड्या बग्गींत बसून हाइड पार्कमधल्या सेंट जेम्स चर्चमध्यें दोघं मुलाला घेऊन गेलीं. एपिस्कोपल पंथाच्या विधीनिशीं मुलाचं बारसं इथं व्हायचं होतं.

मार्चचा सुमार. सडक राडीनं भरलेली होती. पण अलबानी पोस्ट ऑफिसावरून त्या छोट्या चर्चपर्यंतचा पल्ला कसा हां हां म्हणतां पार पडला. खुद्द बारशाचा सोहळाहि झटपट उरकला. मग बग्गी जी परत फिरली ती थेट घराच्या पूर्व आणि पश्चिम बाजूंनीं पसरलेल्या आवारांतच जाऊन थांबली. मालक-मालकीण आणि त्यांचं मूल उतरलं, तिकडे घरांत बारशाच्या समारंभानिमित्त जमलेल्यांच्या गप्पांना आणि हास्यविनोदाला उधाण आलेलं होतं.

फ्रँकलिनचे बाबा आतां म्हणाले, " कुणी सांगावं; आपला बाळ कदाचित् उद्यां राष्ट्राध्यक्ष होईल ! "

आईनं यावर विरोध दर्शवित म्हटलं, " नाहीं नाहीं—नको ! त्यानं सार्वजनिक कामांत उतरणं मला नाहीं आवडणार, सांगून ठेवत्यें."

आईकडून आणि बाबांकडून भरपूर कौतुक मिळण्याचं भाग्य घेऊन फ्रँकलिन जन्माला आला होता. तो पांच वर्षांचा झाला आणि प्रथमच त्यानं एवढ्या सगळ्या कौतुकाबद्दल, काळजीबद्दल, कडेकोट पहाऱ्याबद्दल, देखण्या कपड्यांबद्दल, आणि मुलीसारख्या लांब कुरळ्या केसांबद्दल नापसंती नोंदविण्याला सुरुवात केली. बालहट्टच तो; शेवटीं त्यापुढें सारा नमली. येऊं पहाणारे हुंदके गळ्यांतल्या गळ्यांत दाबत त्या माउलीनं मुलाचे लांब रुळते केंस कापले, त्याला ती तुमान घालूं लागली. तरीहि कांहीं दिवस स्कॉटिश फॅशनचीं 'किल्टस्', झोळणा असलेले रेशमी शर्ट, व्हेल्व्हेटचे सूट, असले लाड तिनं केलेंच, पण फ्रँकलिननं याहिविरुद्ध बंडाळी माजवली. त्याला हें

सारं नामंजूर होतं, अप्रिय होतं. त्याच्या निळ्याशार डोळ्यांवाटें त्याचा खंबीर विरोध साराला समजूं लागला. फ्रँकलिनला हवा होता खलाशाचा पोषाख, त्याला आवड होती बोटींची !

ही बोटींची आवडहि अगदीं सहाजिकपणें त्याच्यांत निर्माण झाली होती. त्याचे पणजोबा डिलॅनो आगबोट वहातुकींतले मोठे मातब्बर गृहस्थ होऊन गेले होते. चीनपर्यंत त्यांच्या बोटींची वहातूक चाले. न्यू बेडफर्ड, मॅसाच्युसेट्स इथं त्यांची ही कंपनी होती. फ्रँकलिनची आई सारा केवळ आठ वर्षांची असतांना यांतल्या एका बोटीनं चीनची सफर करून आलेली होती. केप ऑफ गुड होपला वळसा घालून केलेल्या या सफरीला पुरे चार महिने लागले होते. आणि अजूनहि मुलाला त्या सफरीची गोष्ट सांगतांना साराची मुद्रा उजळून उठे, डोळे लकाकत, जिवणीवर स्मित खेळें. जणूं ते चार महिने, त्यांतले क्षण आणि प्रसंग पुन्हा भेटायला येत.

घराच्या माळ्यावर फ्रँकलिनला आजोबांची एक पेटी सांपडली होती. त्या पेटींत १८१२ सालची खलाशाची टोपी होती, एका जहाजाची छोटी प्रतिकृति होती, जहाजांवरच्या जुन्या नोंद वह्या होत्या, पितळेची एक छोटी तोफ होती. पण सर्वांत मौज म्हणजे ती पेटी उघडली कीं, येई तो वर्षानुवर्षांचा समुद्राचा खारा वास. छोट्या फ्रँकलिनला तो फार आवडे.

वयाच्या मानानं फार लौकर त्यानं स्वतः छोट्या छोट्या बोटी बनवायला सुरुवात केली. प्रत्येक बोट आधींच्या बोटीपेक्षां समुद्राला सोयीची होत होती. दर वर्षी उन्हाळ्यांत घरचीं सारीं कॅंपो बेलो बेटावर रहायला जात तेव्हां त्या बोटी जिवापाड जपत फ्रँकलिन पॅसामॅकोडीच्या समुद्रकिनारीं नेई. त्या समुद्रांत सोडी. आगगाडीनें प्रथम ईस्टपोर्ट, मेनला आणि तेथून बोटीनें कॅंपोबेलो बेटावर जावं लागे. हा प्रवास लांबचा होता, दगदगीचा होता, पण फ्रँकलिन जसजसा मोठा होत होता तसतसे हे समुद्रकिनारींचे दिवस त्याला जास्त जास्त आवडत होते. इतिहासांत गाजलेल्या त्या कॅनडियन बेटावर रहाणाऱ्या म्हाताऱ्या माणसांना गांठून त्यांच्याकडून त्या बेटावरल्या, अंगावर रोमांच उभे करणाऱ्या, एकेक हकिकती ऐकण्याचा, तुफानांमध्यें बुडालेल्या जहाजांचे, चांच्यांचे किस्से ऐकण्याचा फ्रँकलिनला नादच लागला होता.

घराच्या चार भिंतींबाहेरच्या या जगांत फ्रँकलिनचं आणि त्याच्या बाबाचं

उत्तम जमे. दोघांनाहि बोटींची, समुद्राची सारखीच ओढ. कित्येकदां दोघं एकत्र बसून नवनव्या बोटी बनवीत. कधीं कधीं छोट्या फ्रँकलिनला घेऊन थोरले रूझवेल्ट त्यांच्या 'हाफमून' या शिडाच्या बोटींतून भर समुद्रावर सहलीला जात. ही बोट चांगली मोठी, एकावन्न फूट लांबीची होती. ही कशी चालवावी याचं शिक्षण फ्रँकलिनला वडिलांकडून मिळे.

परंतु बाप मुलांचं खरं जमे ते हाइड पार्कला. हिंवाळ्यांत स्केटिंग, टोबो-गॅनिंग, आइसबोटिंग; उन्हाळ्यांत मासे गळवणं आणि शिकार करणं हे त्या दोघांचेहि आवडते उद्योग. स्प्रिंगवुडची ती वाडी केव्हांतरी मुलाच्या हातीं जाईल तेव्हां तिची देखभाल कशी करावी तें त्यानं आपल्याकडून शिकून घ्यावं ही बापाची उत्कट इच्छा. दोघं मिळून बागांची पहाणी करीत, फळ-झाडांची, फुलझाडांची निगा ठेवीत, तबेल्यांतल्या घोड्यांवर नजर टाकत, बग्गीचं हवं नको पहात.

घराबाहेर वडील तशी घरांत फ्रँकलिनला आई संगतीसोबतीला मिळे. साराच्या आवडीनिवडी, अभिरुचि विशेष प्रकारची होती. संगीतांत तिला चांगली गति होती. फ्रँकलिनला ती गाणीं म्हणून दाखवी, त्याला गाण्याचे धडे देई, संध्याकाळची त्याला गोष्टी वाचून दाखवी, प्रकृतीच्या एक ना एक तक्रारीनें तो आजारी असला म्हणजे त्याची शुश्रुषा करी. भरपूर नोकरचाकर असलेलं मोठं घर कसं चालवावं, त्याचा कारभार कसा हांकावा याचे धडे अजाणतेपणीं फ्रँकलिननं आईकडून घेतले. हेंहि शिक्षण त्याला मिळणं आव-श्यकच होतं.

हें कुटुंब सभोंवतालच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांत खूप प्रिय होतं. त्यांचं कधीं कोणाशीं भांडण नसे, कांडण नसे, सदा गोडी. उत्तरेकडची लगतची वाडी होती न्युबोल्ड कुटुंबाची. नदीपेक्षां ही सडकेलाच जवळ होती. त्यापलिकडे रॉजर्स मंडळींचं वास्तव्य होतं. त्या घरीं चार मुलगे आणि दोन मुली होत्या. त्यांतल्या एडमंड रॉजर्सची आणि फ्रँकलिनची फार लहानपणापासूनच दोस्ती जमली. दोघहि सारख्याच वयाचे; अगदीं आवळेजावळे वाढावेत असे. एका मोठाल्या झाडावर दोघांनीं मिळून प्रथम एक घर बांधलेलं होतं आणि त्याला बोट मानलं होतं. या बोटीनं आपण चीन-बोर्निओला जाणार असं ते म्हणत. त्यांनीं पुढची बोट बांधली ती खरोखरीची पाण्यावर तरंगणारी

होती, तराफ्यासारखी होती. कांठावरनं मासे गळवण्याचा त्यांना कंटाळा आला होता, आणि खोल पाण्यांत जाण्यासाठीं हा तराफा त्यांनीं, कोवळीं झाडं तोडून, एकत्र पक्कीं जखडून तयार केलेला होता. पण तो पाण्यांत ढकलून त्यावर चढतांच कांहीं बुडबुडे काढून तो तळाशींच गेला. दोघंहि कमरेपर्यंत पाण्यांत बुडाले. त्यांची समजूत अशी कीं, ओझं असो कीं नसो, कुठलंहि लांकूड पाण्यावर तरंगतं.

रॉजर्स कुटुंबांतलीं मुलं सोडलीं तर फ्रँकलिनला त्या पोरवयांत सारे सांगाती प्रौढच मिळाले. बहुतेक सारे त्याच्या नात्यांतले होते. चांगला चौदा वर्षांचा होईतोंवर फ्रँकलिननं शाळेचं तोंड पाहिलं नाहीं. कारण, त्या काळांत मोठ्या घरच्या मुलांना घरींच शिकवण्या ठेवीत.

अधूनमधून बरेच नातेवाईक एकदमच रूझवेल्ट कुटुंबाकडे पाहुणे येत. त्यांत कांहीं मुलं असत. उदाहरणार्थ, फ्रँकलिनच्या काकांना, एलिअट रूझवेल्टना फ्रँकलिनहून जवळ जवळ तीन वर्षांनीं लहान मुलगी होती. ती रहायला आली म्हणजे फ्रँकलिन घोडा होऊन हातापायांवर धांवे; आणि ती मुलगी याच्या पाठीवर बसून 'इर्यक इर्यक' करी, तिचं नांव होतं एलिनॉर.

येत्या जात्या पाहुण्यांत आणि पत्रांत मिळून एवढे रूझवेल्ट आणि डिलॅनो असत कीं, कुणाचं नातं नक्की काय तें फ्रँकलिनच्या अनेकदां लक्षांतसुद्धां येत नसे. तो विचारी, "एलिनॉर माझी किती नंबरची पुतणी?"

घरीं येणारीं मुलं शेजारपाजारचीं असोत, कीं नात्यागोत्यांतलीं असोत, फ्रँकलिनकडे त्यांचं नेतृत्व निर्विवादपणें येई. अशा अधिकारानं तो इतर मुलांना हुकूम फर्मावी कीं, कांहीं वेळां त्याच्या आईला त्याला याबद्दल ताकीद द्यावी लागे. ती सांगे, "सारखा काय रे सर्वांना हें करा, तें करा, सांगत असतोस? अधनं मधनं त्यांनाहि काय करायचं तें ठरवूं दे ना.!"

फ्रँकलिन म्हणे, "अग पण ममी, मी त्यांना काय करायचं तें सांगितलं नाहीं तर कुणी कांहींच करणार नाहीं."

फ्रँकलिनवरचे संस्कार तसे चांगलेच होते तरीहि तो एखादी वाईट खोड, प्रवृत्ति तर उचलत नाहीं ना, याविषयीं त्याचे आईवडील फार दक्ष असत. कांहीं आप्त तर म्हणत कीं, "तुम्हीं त्या मुलाला फार शिस्तींत धरतां." पण सारा आणि जेम्सला जाणीव होती कीं, या आपल्या एकुलत्या एका मुलावर एवढी

अनुक्रम........ वि: ........
क्रमांक 7262 ......

नजर ठेवली नाहीं तर कदाचित् तो फार लाडावेल, वहावेल, अनिष्ट प्रवृत्ती अंगीं लावून घेईल.

फ्रॅंकलिनला पत्त्यांच्या डावांत हरणं आवडत नसे. एक दिवस मायलेक पत्त्यांचा डाव मांडून बसलीं असतां फ्रॅंकलिन एकसारखा हरूं लागला. त्याच्या रागाचा पारा डावागणिक चढूं लागला. आईनं चालविलेल्या थट्टेनं त्यांत भर पडत गेली आणि फ्रॅंकलिननं संतापातिशयानं अक्षरशः धिंगाणा घातला. दुसऱ्या दिवशीं 'स्टीपलचेज 'चा खेळ आईबरोबर खेळत असतां आईचा खेळांतला घोडा जिंकला. त्यासरशीं फ्रॅंकलिन पुन्हा बिथरला. आतां मात्र सारानं खेळ आवरला आणि फ्रॅंकलिनला असं बजावलं कीं, "तूं हरायला शिकेपर्यंत मी तुझ्याशीं पुन्हा खेळणार नाहीं." ही शिक्षा लागू पडली. कारण, फ्रॅंकलिनला 'स्टीपलचेज' खेळणं फार आवडे.

फ्रॅंकलिनचं पुस्तकी शिक्षण बरंच लौकर सुरू झालं होतं. त्याची शिक्षिका किंवा शिक्षक एखाद्या युरोपीय देशांतून आलेला असे. त्यामुळें इंग्रजीव्यतिरिक्त दुसरी एखादी, म्हणजे बहुशः फ्रेंच किंवा जर्मन भाषा फ्रॅंकलिनला शिकायला मिळे. पुढें थोड्या वर्षांतच फ्रॅंकलिनच्या शिक्षणाला चांगलीच शिस्त लागली. सकाळीं सातला तो झोपून उठे. आठला न्याहारी करी. नऊ ते बारा शिकवणीला बसे. मग एक तासभर खेळायला मिळे. जेवण याच वेळांत होई. कीं पुन्हा चारपर्यंत शिकवणी चाले. त्याच्या जातीच्या धडपड्या, गडबड्या मुलाला हीं बंधनं काचूं लागलीं असलीं तर मुळींच नवल नाहीं. तो कुढा होऊं लागला. चिडाचिडा बनला, सदा उदास राहूं लागला. तो बदलत चालला. अखेर त्याची आई एके दिवशीं यामागचं कारण शोधायला बसली. या पोराला झालंय् तरी काय तें त्या माउलीला जाणून घ्यायचं होतं.

"तुला कशाचा त्रास होतो का ?" तिनं विचारलं.

"हो, मला त्रास होतो."

"कशाचा त्रास तुला होतो ?"

"मला नकोत तुमचे ते नियम!" फ्रॅंकलिन उफळला, "मला माझ्या मनासारखं वागायचंय् , जा !"

दुसऱ्या दिवशीं एकत्र बसून, ठरवून त्याच्या आईबापांनी याला शिस्तीच्या

कांचांतून खुषीनं मोकळा केला. त्यांनीं त्याला सांगून टाकलं कीं, " आजपासून तुझ्या मनाप्रमाणं वाग. सगळे नियम संपले. "

नियम संपले ! मनाप्रमाणं वागायचंय् ! फ्रँकलिननं भरारा कोटटोपी चढविली आणि वाऱ्यासारखा तो बाहेर पळाला. सगळी टेकडी उतरून नदीशीं गेला. नदीकांठानं पुढं जात रानांतून वाट काढीत दुसऱ्या एका टेकडीवर पोंचला. पक्षांचे विचित्र आवाज त्यानं कानांत भरून घेतले. त्यांचे मागोवे घेत मूळ पक्षी हेरले. आज तो स्वतःचा मालक होता. राजा होता, राजा ! आतां भूक लागेस्तंवर जेवायला जाण्याचाही प्रश्न उरला नव्हता. त्याला आतां हवी होती संगत; रॉजर्स कुटुंबांतल्या एकाद्या मुलाची. पण ते तर त्यांच्या शिक्षकांचे कैदी होते. ते स्वतंत्र नव्हते. फ्रँकलिननं ठरवलं कीं, आज रात्रीं आपल्या त्या मित्रांना गांठून आपलं नवं सुख, आनंद, स्वातंत्र्याचा नवा अनुभव रसभरितपणें सांगायचा. आपल्या छान छान आईबाबांच्या चांगुलपणाचे पोटभर गोडवे गायचे.

सूर्य अस्ताचलावर पोंचला. रानांत गारठा शिरला. पाय शिणले, ठणकूं लागले. पण फ्रँकलिन चालत होता. त्याला स्वातंत्र्य मिळालं होतं आणि त्याचा पुरेपूर उपभोग घ्यायलाच हवा होता.

अखेर तो थकला. घरांतल्या धगधगत्या शेकोटीच्या शेजारीं घरांतली सगळीं माणसं जमून गप्पा करीत तें त्याला आठवलं. तो घराकडं निघाला. त्याचं स्वातंत्र्य अद्यापि अबाधित होतं, असं त्याला समजून आलं. तो कुठं गेला होता हें त्याला कुणी विचारलं नाहीं. त्याला कसल्याच सूचना केल्या नाहींत. आपण मळलेले आहोंत असं त्याचं त्यालाच वाटलं आणि अंघोळ करावी असं त्यानं ठरवलं. त्याला भूक लागली होती आणि त्यानं खायला मागितलं. खातां खातां त्याला भरल्या ताटावर डुलक्या येऊं लागल्या आणि घरांतल्या रीतीप्रमाणं अद्यापि झोंपायची वेळ झाली नसली तरी त्यानं झोंपीं जायचं ठरविलं. दुसऱ्या दिवशीं न्याहरीनंतर, त्याचं स्वातंत्र्य अद्यापि अबाधित होतं तरीही, अगदीं वरच्या मजल्यावरच्या खोलीच्या पायऱ्या तो चढून गेला. आणि गुरुजींच्या पुढ्यांतल्या खुर्चीवर अभ्यासासाठीं बसला.

घराच्या एका टोकाला मनोऱ्यासारखा उंच गेलेला भाग होता. त्या भागांतली अगदीं वरची खोली त्याची होती. तिथं तो अभ्यास करी, खेळ

खेळे, आणि आपल्या आवडत्या वस्तू जतन करी. प्रारंभीं त्या वरच्या खोलींत एकट्यानं शिकतां शिकतां फ्रँकलिन दहा वर्षांचा झाला. इतर मुलांबरोबर शिकूं लागला. पुढें दोन वर्षं तो, त्याचा भाऊ एडमंड आणि सेंट जेम्स चर्चच्या रेक्टरांचीं दोन मुलें अशीं एका शिक्षकांकडे शिकूं लागलीं. एका गोलाकार खोलीमध्यें तीं शिकवणींसाठीं जमत.

फ्रँकलिनला अभ्यासांत पुष्कळ गोडी लागली होती. अभ्यासाच्या बाबतींत तो फार तत्पर होता. त्याचं लिहिणं वाचणं खूप मनापासून चाले आणि दिलेल्या अभ्यासाच्या तो नेहमीच पुढें असे. त्याच्या वडिलांचं मोठं ग्रंथालय होतं आणि त्यांतलं हवं तें पुस्तक घेऊन वाचण्याची परवानगी त्याला होती. भूगोल आणि इतिहास, विशेषतः नोदलाचा इतिहास त्याला आवडत असे. त्याच्यांतल्या प्रत्येक गुणाला वाव मिळावा म्हणून त्याच्या सुस्थितींतल्या आई वडिलांची सातत्यानं खटपट चाले. कांहीं काळ पियानो आणि चित्रकलेच्या शिकवण्या-देखील त्याला घ्याव्या लागल्या. परंतु हें त्याच्या मनाविरुद्ध होतं आणि यांत त्याला फारशी गति नाहीं असं लौकरच दिसून आलं. त्याचा पिंड या प्रकारच्या कलांपेक्षां घराबाहेरच्या मर्दानी गोष्टींना अनुकूल होता. रॉजर्स बंगल्या-नजिकच्या तळ्यांतील बर्फावर स्केटिंग करायला त्याला आवडे. वेल्श-जातीची घोडी 'बेबी' त्याच्या आवडीची होती. आणि तिच्यावर बसून किंवा पायीं 'मार्क्समन' नांवाच्या आवडत्या कुत्र्याच्या सोबतींत उन्हाळ्यांत रानांवनांतून भटकायला त्याला आवडे. रानांतला एक एक पक्षी, त्याचीं वैशिष्ट्यें, यांच्याविषयीं बऱ्याच आधीपासून त्याच्या मनांत एक ओढ निर्माण झालेली होती आणि वडिलांच्या उत्तेजनानं हे पक्षी ओळखण्याच्या कामीं तो खूप वाकबगारही झालेला होता. त्याच्या स्वतःच्या पुस्तकांत पक्षीजीवनावरच्या पुस्तकांचा भरणा आतां मोठा राहूं लागला.

अकराव्या वाढदिवसाला वडिलांनीं प्रथमच त्याला शिकारीची बंदूक बक्षीस दिली, आणि फ्रँकलिनच्या आनंदाला सीमा राहिली नाहीं. आतां त्याला ती वापरायला शिकायचं होतं, ती सुरक्षितपणें सांभाळायला शिकायचं होतं, नेमबाजींत 'हाइड पार्क' मध्यें याला जोड नाहीं' असं स्वतःविषयीं बोललं जावं असं त्याला वाटूं लागलं होतं. आतां रानावनांतून मैलोंगणती त्याला पायपीट करायची होती. त्याला जें हवं होतं तें त्याला सांपडलं होतं. स्वतःचे

पक्षी–संग्रहालय तो आतां चालू करणार होता, त्यानं आईवडिलांना सांगितलं, 'आपल्याकडं खालच्या मजल्यावर पुस्तकांचीं कपाटं आहेत. त्यांतील एकांत मला थोडी जागा हवी. तिथं मी माझे भुसा भरलेले पक्षी ठेवणार आहे.' आईवडिलांनीं याला आनंदानं संमति दिली.

आतां फ्रॅंकलिन पक्षांच्या शिकारीमागं रानावनांतून हिंडूं लागला. कावळा, रॉबिन, सुतार, आणि ह्यापेक्षांदेखील मोठमोठे, जंगली पक्षी नवशिक्या शिकाऱ्याला टिपणं सोपं जाई. फ्रॅंकलिननं या पक्षांच्या शिकारी चालविल्या. परंतु जेव्हां या मारलेल्या पक्षांची साफसफाई, ते पक्षी भरणं आणि मांडणं हीं कामं तो शिकूं लागला, तेव्हां त्याला कळूं लागलं कीं, आपल्याकडं हें कौशल्य पुरेसं नाहीं, आपल्याला हें मानवणारही नाहीं. हीं कामं करतांना त्याच्या पोटांत कळमळून येई. मग त्याला वाटे कीं, हीं कामें चांगल्या प्रकारें करणारालाच तीं कां सांगूं नयेत ? त्या भागाची त्याला फार चांगली ओळख होती आणि त्याच्या ओळखीच्या माणसांत या प्रकारचा, पक्षी भरणारा एक कारागिर होता.

फ्रॅंकलिन त्याच्या दुकानीं गेला, तेव्हां तो त्याची बंदूक हाताळत म्हणाला "फार चांगली आहे तुझी ही बंदूक! आतां दिसेल तो प्रत्येक पक्षी मारणार आहेस कीं काय ?"

फ्रॅंकलिन म्हणाला, "छे, छे ! मला फक्त एकएका प्रकारचा एकच पक्षी हवा आणि त्यांच्या अंडीं घालण्याच्या काळांत पक्षी मारायचे नाहींत असं मीं ठरवलंय्."

भरण्यासाठीं फ्रॅंकलिन या माणसाकडं पक्षी आणूं लागला आणि या दोघांची मैत्री वाढूं लागली. त्या माणसानं पक्षी भरून दिला कीं, फ्रॅंकलिन अतिशय काळजीपूर्वक तो घरीं घेऊन येई, हॉलमधल्या कांचेच्या कपाटांत मांडून ठेवी.

भरलेल्या पक्षांचा त्याच्याकडचा संग्रह वाढूं लागला आणि त्याविषयींचा व्यासंगदेखील. कुठंही गेला तरी तिथल्या स्थानिक पक्षांच्या विषयींची माहिती तो गोळा करी, अगदीं परक्या देशांतदेखील त्याचा मुख्य उद्योग तो असे. घरचीं माणसं अनेकदां सुट्या घेऊन युरोपमध्यें जात. त्यामुळं वेगवेगळ्या नैसर्गिक इतिहासाच्या संग्रहालयांना फ्रॅंकलिनला भेटी देतां येत. त्या त्या देशांतल्या पक्षांची माहिती त्याला गोळा करतां येई. कधीं त्याच्या कानीं येई कीं,

अमूक एका स्थानिक माणसाकडं भरलेल्या पक्षांचा संग्रह आहे आणि अक्षरशः भारल्या-ओढल्यासारखा फ्रँकलिन तिथं पोचे.

रुझवेल्ट–परिवार हा तसा नामवंत होता. अमेरिका आणि अमेरिकेबाहेर मोठमोठ्या प्रसिद्ध कुटुंबांतून त्यांची स्नेहीमंडळी विखुरलेली होती. फ्रँकलिन या प्रकारच्या जीवनांत चपखल बसला.

त्याचे सारे नातेवाईक जगाच्या जवळ जवळ प्रत्येक कोपऱ्यांतून प्रवास करीत, आणि हाईडपार्कला घरी येणाऱ्या टपालांत कितीतरी प्रकारची चित्र-विचित्र, चित्तवेधक, टपालांचीं तिकिटें होतीं. या तिकिटांमध्यें फ्रँकलिनचं मन रमूं लागलं आणि हाही एक नाद त्याला जडला, आयुष्यभर टिकला.

फ्रँकलिनप्रमाणं मित्रांबरोबर किंवा मित्रांशिवाय आयुष्यांत एवढा रस घेणारा दुसरा आपण कोणी कधीं पाहिला नाहीं, या विषयीं फ्रँकलिनच्या आईवडिलांचं आतां एकमत होऊं लागलं. माणूस, पक्षी, प्राणी, मासे, बोटी, टपालांचीं तिकिटें, ग्रंथ, खेळ, हेच फ्रँकलिनचे मित्र होते. भेटणाऱ्या माणसांना सांगण्यासारखं, त्याची उत्सुकता चाळवावी असं फ्रँकलिनकडे नेहमीच कांहीं तरी असूं लागलं. आतां फ्रँकलिनशीं होणाऱ्या संभाषणांत क्षणाचादेखील कंटाळा येत नसे. फ्रँकलिननं जसे कुमार वयांत पदार्पण केलं तसा तो अधिक मनमिळाऊ, मित्रांचा आवडता, आत्मविश्वासानं भारलेला माणसांत चटदिशी मिसळणारा, आणि एकंदरीनं कुणालाही हवासा वाटणारा ठरूं लागला. त्याच्या वडिलांना आतां एकच काळजी होती. स्वतः विषयीं भलत्याच कल्पनांनीं फ्रँकलिननं चढून जाऊं नये. पण फ्रँकलिनची आई त्यांना म्हणे, 'तो फार देखणा आहे. आतां वयांत आला आहे. मुलींच्या नजरेंत तो आतां पटदिशीं भरतो. तुम्हीं किती केलं तरी त्या त्याला चढविणार !'

त्याचा चुलतभाऊ थिओडोर रुझवेल्ट सार्वजनिक जीवनांत मोठा माणूस ठरत होता; परंतु फ्रँकलिनला कोणत्याही प्रकारें आपण कमी आहोंत असं वाटत नव्हतं. दुसरा चुलतभाऊ 'टेडी' तर न्यूयॉर्क राज्याच्या विधिमंडळाचा सदस्य झालेला होता; इतकंच नव्हे तर न्यूयॉर्क शहराच्या मेयर पदासाठीं त्याच्या रिपब्लिकन पक्षानं त्याला उमेदवार म्हणून उभंदेखील करण्याचं ठरवलं होतं. फ्रँकलिन तेरा वर्षांचा होईतों वॉशिंग्टनमध्यें टेडीची युनायटेड

स्टेट्स सिव्हिल सर्विस कमिशनर पदावरची सहा वर्षं पुरीदेखील झालीं होतीं, आणि न्यूयॉर्क शहराचा पोलीस कमिशनर म्हणून तो नियुक्त झालेला होता.

आपला मुलगा स्वत:विषयीं भलत्या कल्पना करून घेईल म्हणून फ्रँकलिनचे वडील काळजींत होते. परंतु फ्रँकलिनला या प्रकारच्या दोषाचा वाराही लागलेला नव्हता. आईनं म्हटल्याप्रमाणं मुलींच्या नजरेंत तो आतां भरूं लागलेला होता आणि त्यालाही त्यांच्यांत बोलणं, त्यांच्याशीं मिसळणं, आवडूं लागलं होतं. जवळपासची राहणारी मेरी न्युबोल्ड आतां त्याची जिवलग मैत्रीण झालेली होती. तिच्याबरोबर तो दुचाकीवरून भटकायला जाई, हडसन नदींत नौकाविहार करी आणि मेरीच्या घरामागच्या टेनिस कोर्टावर दोघांच्या अटीतटीच्या लढती चालत.

फ्रँकलिन छोटा असतांना त्याच्या पाठीवर 'घोडा घोडा' करणारी त्याची चुलत बहीण 'एलिनॉर—ॲना एलिनॉर रूझवेल्ट' ही आतां हडसन नदीच्या खोऱ्यांत 'हॉल' आडनांवाच्या तिच्या आजीकडे येऊन राहिली होती. टिव्होलीपासून सुमारें वीस मैलांवर हें ठिकाण होतं. एलिनॉरची आई तिच्या आठव्या वर्षी देवाघरीं गेली होती, आणि दहाव्या वर्षी वडिलही निवर्तले. त्यामुळं एलिनॉरला आजीकडं येऊन रहावं लागलं होतं. आजीचं कुटुंब हें देखील पूर्वापार हडसन रिव्हर व्हॅलीच्या भागांतच रहात आलं होतं आणि न्यूयॉर्क शहरांतल्या वरिष्ठ समाजांत त्यालादेखील प्रतिष्ठा होती. अशा प्रकारें फ्रँकलिनचीं सारीं निकटवर्ती माणसं हडसन नदीच्या भागांत पूर्वापार राहणारीं होतीं. अमेरिका वसवली गेली त्या काळापासून त्यांचे पूर्वज इथं राहिलेले होते. जेम्स रूझवेल्टचे पूर्वज मूळचे डच ; न्यूयॉर्क शहरांत येऊन ते स्थाईक झाले. आणि फ्रँकलिनचे खापर--पणजोबा हाईडपार्क भागांत १७६० मध्यें येऊन स्थायिक झाले. सारा डेलॅनो रूझवेल्टचे पूर्वज 'मेफ्लॉवर' नंतर वर्षभरांतच प्लिमथला येऊन स्थायिक झाले होते. व्यापारउदिमांत पैसा केल्या-नंतर तिच्या वडिलांनीं हडसन नदीपलीकडं घर घेतलं. तेव्हां सारा खूप लहान होती. हाईड पार्कपासून सुमारें वीस मैलांवर हें घर होतं. म्हणजे रूझवेल्ट कुटुंबाचं 'हाईडपार्क' चं घर आणि दुसरीकडे हॉल कुटुंब यांच्या जवळ जवळ मधोमध होतं. तथापि, बग्गीनं केवळ एक दिवसाचा प्रवास असूनदेखील फ्रँकलिनची जा–ये हॉल कुटुंबाकडं फारशी नव्हती. वाढत्या वयांत फ्रँकलिन

आणि एलिनॉर यांच्या क्वचितच भेटी होत. याचं मुख्य कारण म्हणजे शिक्षणाचे वेगवेगळे मार्ग त्यांनीं पत्करले होते. एलिनॉरनं कौमार्यांत पदार्पण केलं तेव्हां तीन वर्षं इंग्लंडमधल्या एका शाळेंत तिला पाठविण्यांत आलं होतं. फ्रँकलिन चवदा वर्षांचा झाला तेव्हां मॅसाच्युसेटस्‌मधल्या ग्रोटोन येथील राहण्याची सोय असलेल्या मुलांच्या शाळेंत त्याला पाठविण्यांत आलं.

आतां फ्रॅंकलिन चांगलाच उंच वाढला होता. घराबाहेरच्या भटकंतीमुळें, शिकारीमुळें, खेळामुळें त्याची शरीरयष्टी चांगली भरली होती आणि तो रसरशीत दिसूं लागला होता. ग्रोटोनला किती वेळ चार भिंतींत आपल्याला काढावा लागेल याची कल्पना त्याला येत नव्हती. कारण आयुष्यांत प्रथमच तो रीतसर शाळेंत जाऊं लागला होता, घरापासून दूर राहिला होता. आयुष्यांत प्रथमच ओळखपाळख नसलेल्या मुलांमध्यें त्याला रहावं लागत होतं. याआधीं अमुक एक शिक्षक आपल्याला आवडत नाहीं असं त्यानं सांगितलं कीं, पगार चुकता करून त्या शिक्षकाची रवानगी होई. आतां तें घडणार नव्हतं. रॉजर्स कुटुंबांतील डएमंड देखील याच काळांत ग्रोटोनच्या या शाळेंत आलेला होता. एवढंच त्यातल्या त्यांत फ्रॅंकलिनच्या दृष्टीनं बरं होतं.

फ्रॅंकलिनमध्यें एक प्रकारचा संकोचीपणा, मागें मागें राहण्याची प्रवृत्ति दिसून येई. त्याच्या आईवडिलांना हीही एक काळजीच होती. आतांपर्यंतच्या त्याच्या आयुष्याची कित्येक वर्षं त्याच्याहून मोठ्या मित्रांमध्यें, ज्येष्ठ आप्तनातलगांमध्यें गेलीं होतीं. या सर्वांनीं अननुभवी फ्रॅंकलिनला संभाळून घेतलं होतं. आतां बरोबरच्या मुलांशीं संबंध होता. फ्रॅंकलिनला ही संगतच रुचणार नाहीं, नकोशी वाटेल, कठोर वाटेल, अशी भीति त्याच्या आईवडिलांना वाटत होती.

नव्या शाळेचे वेध लागले असतांना, हडसन रिव्हर व्हॅलीमधल्या पक्षांपेक्षां मॅसाच्युसेटस्‌मधील पक्षी किती वेगळे असतील, याचा विचार फ्रॅंकलिन आपल्या पक्षीसंग्रहाकडे बघत करीत असे. हा संग्रह आतां मागें ठेवून निघावं लागणार होतं. पण एकच बरं कीं, सुटीमध्यें घरीं यायला मिळणार होतं.

# शाळकरी मुलगा

फ्रँकलिन घर सोडून निघाला तो एक सोहळाच होता. १८९६ मधल्या सप्टेंबरचा तो दिवस. वातावरण कुंद होतं. रूझवेल्ट कुटुंबांतील सहा माणसं प्रवासाला निघालीं. बग्गीला मुद्दाम पॉलिश करण्यांत आलं होतं. घोड्यांची उत्तम काळजी घेण्यांत आली होती. लांबच्या रेल्वेस्टेशनकडे मंडळी पोंचली. आल्बनीची गाडी घेतली. त्यानंतर बोस्टन आणि आल्बनी रेलरोडनें मॅसाच्युसेटस्‌मधल्या एयर जंक्शनला ही मंडळी आली. यांमध्यें मिस्टर आणि मिसेस् रॉजर्स आणि त्यांचा मुलगा एडमंड, आणि मिस्टर आणि मिसेस् रूझवेल्ट आणि त्यांचा मुलगा फ्रँकलिन इतकीजणं होतीं.

मुलांना आवर्जून सांगण्यांत आलं होतं कीं, पुढें कॉलेजमध्यें जाण्याच्या दृष्टीनं अमेरिकेंत ग्रोटोनच्या शाळेच्या तोडीची दुसरी शाळा नव्हती.

फ्रँकलिनच्या पुरतं कॉलेज एकच होतं. हार्वर्डचं कॉलेज. जायचं तर हार्वर्ड-लाच याबाबत त्याचं आणि त्याच्या वडिलांचं एकमत झालेलं होतं. हें कॉलेज अमेरिकेंतील सर्वांत जुनं कॉलेज होतं इतकंच केवळ नव्हे तर याच्या माजी विद्यार्थ्यांमध्यें रूझवेल्ट कुटुंबांतील अनेक व्यक्तींचीं नांवं विखुरलेलीं होतीं. फ्रँकलिनचे वडील हार्वर्डमध्यें शिकून कायद्याचे पदवीधर झालेले होते. फ्रँकलिनचा चुलत भाऊ, टेडी, हार्वर्डचा पदवीधर होता.

आणि या खेपेला ग्रोटोनला फ्रँकलिनचं स्वागत करण्यासाठीं एक रूझवेल्ट हजर होता. फ्रँकलिनचा सावत्र भाऊ रोझी, याचा हा मुलगा, टेडी. फ्रँकलिनचा हा पुतण्या वयानं त्याच्याहून मोठा होता आणि त्याच्यापेक्षां वरच्या वर्गांत होता. हें जरा फ्रँकलिनच्या दृष्टीनं चमत्कारिकच होतं !

घराचा वियोग हलका वाटावा म्हणून मॅसाच्युसेटस्‌मधले रूझवेल्ट कुटुंबाचे अनेक आप्त व स्नेही उपयोगी येणार होते. फेअर हॅव्हनचं घर अद्यापि डेलॅनो मंडळींच्या मालकीचं होतं. ग्रोटोनच्या शाळेची जागा मिस्टर आणि मिसेस् जेम्स लॉरेन्स आणि मि. लॉरेन्स यांचे बंधू यांनी धर्मादाय दिलेली होती. हेही रूझवेल्ट कुटुंबांचे स्नेही. शाळेनजिकच यांचं स्वतःचं घर होतं.

ग्रोटोनच्या शाळेची वास्तु फ्रँकलिननं पाहिली आणि त्याचं हृदय उचंबळलं. कॉलेजच्या पटांगणासारखं पटांगण या शाळेला होतं. लाल विटांच्या जुन्या पद्धतीच्या इमारती विस्तीर्ण हिरवळीकडं तोंड करून शिस्तीनं उभ्या होत्या. उजवीकडं चर्चची दगडी इमारत होती. युरोपमध्यें पाहिलेल्या गॉथिक पद्धतीच्या इमारतींची आठवण या इमारतीनं फ्रँक्लिनला करून दिली. विशेषतः इंग्लंडमध्यें या प्रकारच्या इमारती दिसत. या चर्चचा उंच चौकोनी निमुळता मनोरा ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीच्या मॅग्डोलन मनोऱ्यासारखा दिसत होता, आणि हें साहजिकच होतं. अमेरिकेंतील एपिस्कोपल चर्च इंग्लंडमधीलच चर्चच्या अनुषंगानं चालत आणि वाढत आलेलं होतं आणि ग्रोटोनची शाळा ही एपिस्कोपल चर्चची शाळा होती.

उत्तरेच्या बाजूला 'ब्रुक्स हाऊस' होतं. हें मुलांचं वसतिगृह. दक्षिणेकडं, या इमारतीच्या समोरच "हंड्रेड हाऊस" होतं. हें दुसरं वसतिगृह. इथं शंभर मुलांची सोय होती म्हणून याला 'हंड्रेड हाऊस' म्हणत. पटांगणाच्या पश्चिमेकडं टोकाला शाळेची इमारत होती. बाजूला आणखीही इमारती होत्या परंतु त्यांच्या ओळखी त्याला नंतर पटणार होत्या.

त्यांच्या भोंवतीं टेकड्यांचे उतार पसरलेले होते. दाट झाडीनं हें आच्छादिलेले होते. पाहावी तिकडं हिरवीगार झाडीच झाडी, आणि यांतल्या एका टेकडीच्या उतारावर शाळेची ही वास्तु उभी होती. फ्रँक्लिनच्या मनांत प्रथमच आलं तें हें कीं, या मैलोगणती रानांत किती प्रकारचे पक्षी रहात असतील बरं ? आणि त्यांचा शोध लावण्यासाठीं आपल्याला वेळ कसा आणि किती

# शाळकरी मुलगा

फ्रॅंकलिन घर सोडून निघाला तो एक सोहळाच होता. १८९६ मधल्या सप्टेंबरचा तो दिवस. वातावरण कुंद होतं. रूझवेल्ट कुटुंबांतील सहा माणसं प्रवासाला निघालीं. बग्गीला मुद्दाम पॉलिश करण्यांत आलं होतं. घोड्यांची उत्तम काळजी घेण्यांत आली होती. लांबच्या रेल्वेस्टेशनकडे मंडळी पोंचली. आल्बनीची गाडी घेतली. त्यानंतर बोस्टन आणि आल्बनी रेलरोडनें मॅसाच्युसेटस्‌मधल्या एयर जंक्शनला ही मंडळी आली. यांमध्यें मिस्टर आणि मिसेस् रॉजर्स आणि त्यांचा मुलगा एडमंड, आणि मिस्टर आणि मिसेस् रूझवेल्ट आणि त्यांचा मुलगा फ्रॅंकलिन इतकीजणं होतीं.

मुलांना आवर्जून सांगण्यांत आलं होतं कीं, पुढें कॉलेजमध्यें जाण्याच्या दृष्टीनं अमेरिकेंत ग्रोटोनच्या शाळेच्या तोडीची दुसरी शाळा नव्हती.

फ्रॅंकलिनच्या पुरतं कॉलेज एकच होतं. हार्वर्डचं कॉलेज. जायचं तर हार्वर्ड-लाच याबाबत त्याचं आणि त्याच्या वडिलांचं एकमत झालेलं होतं. हें कॉलेज अमेरिकेंतील सर्वांत जुनं कॉलेज होतं इतकंच केवळ नव्हे तर याच्या माजी विद्यार्थ्यांमध्यें रूझवेल्ट कुटुंबांतील अनेक व्यक्तींचीं नांवं विखुरलेलीं होतीं. फ्रॅंकलिनचे वडील हार्वर्डमध्यें शिकून कायद्याचे पदवीधर झालेले होते. फ्रॅंकलिनचा चुलत भाऊ, टेडी, हार्वर्डचा पदवीधर होता.

आणि या खेपेला ग्रोटोनला फ्रंकलिनचं स्वागत करण्यासाठीं एक रूझवेल्ट हजर होता. फ्रँकलिनचा सावत्र भाऊ रोझी, याचा हा मुलगा, टेडी· फ्रँकलिनचा हा पुतण्या वयानं त्याच्याहून मोठा होता आणि त्याच्यापेक्षां वरच्या वर्गात होता. हें जरा फ्रँकलिनच्या दृष्टीनं चमत्कारिकच होतं!

घराचा वियोग हलका वाटावा म्हणून मॅसाच्युसेटस्मधले रूझवेल्ट कुटुंबाचे अनेक आप्त व स्नेही उपयोगी येणार होते. फेअर हॅव्हनचं घर अद्यापि डेलॅनो मंडळींच्या मालकीचं होतं. ग्रोटोनच्या शाळेची जागा मिस्टर आणि मिसेस् जेम्स लॉरेन्स आणि मि. लॉरेन्स यांचे बंधू यांनी धर्मादाय दिलेली होती. हेही रूझवेल्ट कुटुंबांचे स्नेही. शाळेनजिकच यांचं स्वतःचं घर होतं.

ग्रोटोनच्या शाळेची वास्तु फ्रॅंकलिननं पाहिली आणि त्याचं हृदय उचंबळलं. कॉलेजच्या पटांगणासारखं पटांगण या शाळेला होतं. लाल विटांच्या जुन्या पद्धतीच्या इमारती विस्तीर्ण हिरवळीकडं तोंड करून शिस्तीनं उभ्या होत्या. उजवीकडं चर्चची दगडी इमारत होती. युरोपमध्यें पाहिलेल्या गॉथिक पद्धतीच्या इमारतींची आठवण या इमारतीनं फ्रॅंक्लिनला करून दिली. विशेषतः इंग्लंडमध्यें या प्रकारच्या इमारती दिसत. या चर्चचा उंच चौकोनी निमुळता मनोरा ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीच्या मॅग्डोलन मनोऱ्यासारखा दिसत होता, आणि हें साहजिकच होतं. अमेरिकेंतील एपिस्कोपल चर्च इंग्लंडमधीलच चर्चच्या अनुषंगानं चालत आणि वाढत आलेलं होतं आणि ग्रोटोनची शाळा ही एपिस्कोपल चर्चची शाळा होती.

उत्तरेच्या बाजूला 'ब्रुक्स हाऊस' होतं. हें मुलांचं वसतिगृह. दक्षिणेकडं, या इमारतीच्या समोरच "हंड्रेड हाऊस" होतं. हें दुसरं वसतिगृह. इथं शंभर मुलांची सोय होती म्हणून याला 'हंड्रेड हाऊस' म्हणत. पटांगणाच्या पश्चिमेकडं टोकाला शाळेची इमारत होती. बाजूला आणखीही इमारती होत्या परंतु त्यांच्या ओळखी त्याला नंतर पटणार होत्या.

त्यांच्या भोंवतीं टेकड्यांचे उतार पसरलेले होते. दाट झाडीनं हें आच्छादिलेले होते. पाहावी तिकडं हिरवीगार झाडीच झाडी, आणि यांतल्या एका टेकडीच्या उतारावर शाळेची ही वास्तु उभी होती. फ्रॅंक्लिनच्या मनांत प्रथमच आलं तें हें कीं, या मैलोगणती रानांत किती प्रकारचे पक्षी रहात असतील बरं? आणि त्यांचा शोध लावण्यासाठीं आपल्याला वेळ कसा आणि किती

मिळेल ! हिंवाळ्यांत इथं किती बर्फ पडत असेल ? हिंवाळ्यांत किती प्रकारचे पक्षी दिसत असतील ? इथून 'नाशुआ' नदी किती लांब असेल आणि तिच्यावर नौकाविहार किंवा स्केटिंग करायला जमेल का ?

आलेली ही सर्व मंडळी हेडमास्तरांच्या कचेरींत शिरली तेव्हां बाहेर चर्चच्या घड्याळानं पंधरा-पंधरा मिनिटांच्या अंतरानं देतात तसे मंजुळ टोले दिले. फॅंक्लिननं हेडमास्तरांकडं पाहिलं. घरी वडिलांचा तसा इथं यांचा अधिकार त्याच्यावर चालणार होता. त्याचं उधळलेलं मन पाहतां क्षणींच दबून गेलं. हेडमास्तर रेव्हरंड एण्डिकॉट पीबॉडी हे बांध्यानं उंच रुंद, असे वजनदार गृहस्थ होते. फुटबॉलच्या संघांतील आघाडीच्या खेळाडूसारखा त्यांचा बांधा होता. ते आज्ञा करीत ती फक्त एकदांच आणि तिची ताबडतोब तामिली होत असे. ते जितके उग्र तितक्याच त्यांच्या पत्नी फॅंक्लिनला प्रेमळ वाटल्या. दोन्हीही मुलांच्या आईवडिलांना त्या बाईनीं धीर दिला, दिलासा दिला, आणि या नव्या आलेल्या विद्यार्थ्यांची मायेनं चौकशी केली.

हेडमास्तर पीबॉडी यांचं शिक्षण इंग्लंडमध्यें झालेलं होतं, आणि शिकून मॅसाच्युसेट्सला ते परत आले होते. ग्रोटोनची शाळा त्यांनीं स्थापन केली तेव्हां इंग्लंडमधल्या शाळेसारखं शिक्षण तिथं मिळावं तसे संस्कार तिथं व्हावेत अशी महत्त्वाकांक्षा त्यांनीं ठेविली होती. शाळेच्या 'टर्म्स' ना ते 'फॉर्म्स' म्हणत आणि विद्यार्थ्यांहातीं कारभार हांकण्याच्या पद्धतीला 'प्रिफेक्ट्स'ची पद्धति असं 'तिकडलं' नांव त्यांनीं दिलं होतें. प्रत्येक वर्गातून ते मोजकेच विद्यार्थी निवडीत आणि त्यांच्याकडं इतर मुलांवर देखरेख ठेवण्याचं काम सोपवीत. मुलांच्या दृष्टीनं हा मोठा सन्मान समजला जाई. या पद्धतींतील सर्वांत उच्च पद 'सीनियर प्रिफेक्टचं' असे.

मुलांच्या राहण्याच्या जागा त्यांच्या आईवडिलांनीं नजरेखालीं घातल्या आणि त्यांचा निरोप घेऊन तीं माणसं बग्गींतून परत निघून गेलीं. आयुष्यांत प्रथमच फॅंक्लिनला आणि एडमंडला आतां आपल्या माणसांपासून असं लांब एकटं राहवं लागणार होतं. परंतु दोघांपैकीं एकाच्याहि डोळ्यांत अश्रू दाटले नाहींत, कीं ओठांवाटें गहिंवराचा उमाळा फुटला नाहीं.

फॅंक्लिनच्या खोलीला 'क्युबिकल' असं म्हटलं जाई आणि तें सार्थच होतं. ही खोली सहा फूट लांब नि नऊ फूट रुंद अशा आकाराची होती. एक

निरुंद पलंग तिच्यांत टाकलेला होता, एक टेबल होतं, खुर्ची होती. दरवाज्या-ऐवजी पडदे लावलेले होते आणि भिंतीवरच्या खुंट्यांचा उपयोग कपड्यांच्या कपाटासारखा करावा लागणार होता. तसा तो आतां तिसऱ्या इयत्तेंत होता; ग्रोटोनचा सर्व अभ्यासक्रम मिळून सहा वर्षांचा होता; परंतु ' हंड्रेड हाऊस '-मध्यें त्याला प्रथम खोली देण्यांत आली. इथं सगळीं लहान मुलेंच राहत.

इथले कार्यक्रम कांटेकोरपणानें आंखण्यांत आलेले होते. आणि तितक्याच कांटेकोरपणानें ते अंमलांत येत. सकाळीं साडेसातपर्यंत त्याला उठून न्याहरी करून तयार व्हावं लागे. आंघोळ थंड पाण्याची असे. न्याहरीनंतर इतर मुलां-बरोबर चर्चकडे प्रार्थना करण्यासाठीं तो जाई. बरोबर साडेआठला वर्ग भरत ते दुपारीं जेवणापुरतेच तात्पुरते स्थगित होत. संध्याकाळच्या वेळीं खेळाच्या मैदानावर जात. जेवणाच्या वेळीं विशिष्ट पोषाखाचाच आग्रह असे. कडक कॉलरीपासून संध्याकाळच्या वेळीं घालण्याच्या काळ्या स्लीपर्सपर्यंत पोषाखांची पद्धत आंखून देण्यांत आलेली होती. ही शाळा इतरांहून वेगळी होती. खर्चिक होती. आणि मुलांना केवळ शिकवण्याव्यतिरिक्त त्यांना सभ्य आणि सुसंस्कृत नागरिक बनविणें हीहि शाळेची जबाबदारी मानण्यांत आलेली होती. रात्रीच्या जेवणांनंतर थोडा वेळ गृहपाठासाठीं देण्यांत येई. तो संपला म्हणजे एका शिस्तबद्ध रांगेनं हेडमास्तरांना आणि त्यांच्या पत्नीला ' गुड नाईट ' म्हणण्या-साठीं मुलें जात आणि तशीच परतून येऊन आपआपल्या खोल्यांत झोंपण्या-साठीं जात.

घरापासून लांब शाळेंत गेलं म्हणजे पहिले कांहीं दिवस कठीण; आणि त्याहून पहिला दिवस तर फारच कठीण. नवं वातावरण, नव्या रीती, नवे चेहेरे, नव्या जबाबदाऱ्या, असं सारं नवं नवं दिवसभर पाहिल्यानंतर, केल्या-नंतर थकून फ्रँकलिन रात्रीं एकदांचा बिछान्यावर पडला. थकवा अतिशय जाणवत होता; परंतु त्याहूनहि जाणवत होती ती भूक. ती फार लागली होती. घरच्या जेवणाच्या मानानें या शाळेंतलं जेवण फारच कमी होतं आणि पोट भरलं नाहीं म्हणून नोकरांना एकीकडे नेऊन दमदाटी करून अधिक खायला मागण्याचीहि इथं सोय नव्हती. इथं कांहीं तो ' छोटा धनीसाहेब ' नव्हता. अशीं एक नव्हे, दोन नव्हे, चार वर्षे काढायची होती. हीं कशी जाणार

होतीं! त्या रात्रीं आणि नंतरच्या प्रत्येक रात्रीं जगांतल्या साऱ्या अर्धपोटी माणसांविषयी फ्रँकलिनला आतां एक जवळीक भासूं लागली.

मधून मधून श्रीमती जेम्स लॉरेन्स त्याला घरीं बोलावीत आणि तो आनंदानं हें आमंत्रण स्वीकारी. कारण या निमित्तानं उपासमारीचं दुःख जरा विसरतां येत असे. घरच्या पत्रांतून वारंवार तो आतां लिहूं लागला. "इथल्या अनेक मुलांना घरून फळें पाठविण्यांत येतात. तीं फळांच्या कपाटांत ठेवलीं जातात. आणि आठवड्यांतून तीन–चारदां तीं मुलांना देण्यांत येतात. मला द्राक्षें किंवा त्यासारखीं छोटीं फळें पाठवाल काय? तसं झालं तर फारच छान होईल." पुन्हां थोड्या दिवसांनीं आणखी एका पत्रांत त्यानं लिहिलं होतं. "मिसेस् मिंटर्न (त्याच्या वडिलांची चुलत बहिण) इथं आलेल्या आहेत आणि काल संध्याकाळीं मी त्यांच्याकडे जेवायला गेलों होतों. रोज शाळेंतल्या त्याच त्या अन्नाची चव चाखल्यानंतर कालचं जेवण फार फार रुचकर लागलं. गेले तीन दिवस शाळेंत एकसारखीं सॉसेजिस् किंवा सॉसेज क्रॉकेटस् जेवणांत वाढण्यांत येतात; पण मी तीं पचवायला शिकलों आहें." या सूचनांसरशी घरून खाण्याच्या वेगवेगळ्या पदार्थांनीं भरलेल्या पेट्या फ्रँकलिनकडे येऊं लागल्या आणि फ्रँकलिनच्या पत्रांतून त्याविषयीं तत्परतेनं कृतज्ञतेचे शब्द लिहिले जाऊं लागले. तुम्ही पाठविलेलीं 'कॅन्डी' आणि 'प्रून्स' पोचलीं. छान होतीं! मीं निम्मी संपविलींदेखील आहेत.

हेडमास्तरीणबाईंना स्वतःचीं बरींच मुलें होतीं. या वयांतल्या वाढत्या भुकेची कल्पना त्यांना होती आणि गटागटानं वसतिगृहांतल्या मुलांना त्या स्वतःकडे जेवायला बोलावीत. कधीं न्याहरीलादेखील बोलावीत. आरंभीं फ्रँकलिनची आणि एडमंडची कल्पना अशी होती कीं, आपण एकत्र राहूं. परंतु त्यांची फारकत झाली. जेवणाच्या हॉलमध्येंदेखील वेगवेगळ्या टेबलांशीं ते आतां बसूं लागले; मात्र फुटबॉलपुरतें ते एकाच गटांत होते आणि शाळेच्या धार्मिक गीतगायनाच्या पथकांत दोघांचाहि समावेश होता. आपल्याहून मोठ्या आणि आपल्याहून पुढें असलेला आपला पुतण्या आपल्याला बराच जड जाणार अशी प्रारंभीं फ्रँकलिनची भीति होती. परंतु संवयीनं फ्रँकलिनला याचं विशेष कांहीं वाटेनासं झालं. मुलें थट्टेनं त्याला 'अंकल फ्रँकलिन' म्हणूनच हांक मारीत.

इतर मुलांमध्यें मिसळतांना फ्रँकलिन आरंभीं फार जपून मिसळे. कुणाचं शत्रुत्व नको म्हणून तो इतरांच्या मनासारखे वागे. मनमिळाऊपणानं राही, कांहींसा अबोल राही. परंतु लौकरच या नव्या माणसांत आणि वातावरणांत त्याचे गुण इथंहि प्रकर्षानं प्रकट झाले. त्याचं मित्रमंडळ झपाट्यानें वाढूं लागलं. या शाळेंतल्या मुलांमध्ये त्रासदायक मुलांची पीडा मिटविण्याच्या अनेक दांडगट पद्धती होत्या. कुणाला बुटांनीं मारण्यांत येई. कुणाला तालीमखान्यांतील छोट्या कपाटांत कोंडण्यांत येई, कुणाला आंघोळीच्या खोल्यांत नेऊन अंतर्बाह्य भिजवण्यांत येई. शाळेंतील मोठीं मुलें यांत उत्साहानं भाग घेत. फ्रँकलिनच्या वांट्याला यांतली कोणतीच शिक्षा आली नाहीं.

त्याच्या शिक्षकांना तो आवडूं लागला. वर्गांत साधारणतः हुशार विद्यार्थ्यांमध्यें त्याचा समावेश होत असे. सप्टेंबरच्या सुमाराला घरीं लिहिलेल्या पत्रांत त्यानं लिहिलं होतं, "कुठल्याहि विषयांत मी नापास झालेलों नाहीं. काल सकाळच्या बीजगणिताच्या परिक्षेंत मला सर्वांत अधिक गुण मिळाले. तसेंच परवां इंग्रजी 'कांपोझिशन' मध्यें मला सर्वांत अधिक गुण मिळाले होते. ग्रीक भाषा मला आवडूं लागली आहे." घरच्या शिक्षकांच्या शिकवण्यामुळें आणि युरोपांतल्या सफरींमुळें फ्रेंच भाषा त्याला फारशी कठीण वाटली नाहीं. शाळेकडून घरीं आलेल्या प्रगतिपुस्तकांत हेडमास्तर पीबॉडी यांचा विशेष शेरा नमूद होता, 'फार छान, मुलगा हुशार वाटतो, अभ्यासू वाटतो. वर्तन चांगलें.'

आतां घरीं येणारीं फ्रँकलिनचीं पत्रं उत्साहानं अधिकाधिक भरलेलीं असूं लागलीं होतीं. ग्रोटोनच्या शाळेंत तो आतां चांगलाच रुळला होता. एका पत्रांत त्यानं लिहिलं होतं, "काल संध्याकाळीं ब्रुकलिन हायस्कूलच्या संघाबरोबर आमच्या शाळेच्या संघाचा सामना झडला. विरुद्ध संघांतलीं मुलें थोराड नि आडदांड होतीं; परंतु आम्हीं त्यांना चांगलाच मार दिला. ओरडून माझा घसा बसला आहे. त्यामुळें आज गायनाच्या तासाला गप्प बसावे लागले." इथं टपालाचीं तिकिटें जमवण्याच्या नादासाठीं त्याला सवड सांपडूं लागली आणि याचं त्याला फार बरं वाटूं लागलं.

ग्रोटोनच्या शाळेंत जाण्यापूर्वी त्याला एक गंमतीदार शोध लागला होता. त्याचं नांव उलटीकडून वाचलं असतां त्याचा उच्चार विलक्षण होई. शाळेंतून

आरंभी लिहिलेल्या पत्रांत तो अशीच सही करी. ती सही, ' Nilknarf ' आतां तर तो ग्रीकलिपींतच सही करूं लागला होता.

पहातां पहातां डिसेंबर आला. ज्यांच्याविषयीं विद्यार्थ्यांमध्यें भीति असे त्या परीक्षाहि झाल्या होत्या. आणि सुट्टी पडली. आतां एकदांचं घरीं जायला मिळणार होतं.

फ्रँकलिन हाईडपार्कला घरीं आला तेव्हां ख्रिसमस जवळ आलेला होता. सप्टेंबरमध्यें घरून गेला तो फ्रँकलिन हा नव्हता; हा फ्रँकलिन तरणाबांड आणि आत्मविश्वासानं भरलेला होता. घराच्या उबेंत तो शिरला. सुटींत घरीं जमलेली पुष्कळशी मंडळी, ड्रेस्डनंचीं कांचेचीं सुंदर सुंदर भांडीं, घरच्या बागेतल्या गुलाबांनीं तुडुंब भरलेली चिनी घडणीची नाजुकशी पुष्पदाणी, मधुचंद्राहून परततांना त्याच्या आईवडिलांनीं आणलेलं जुन्या पद्धतीचं ' ग्रँड फादर ' घड्याळ, वेगवेगळ्या रुचकर पदार्थांनीं भरलेले सकाळ-संध्याकाळच्या जेवणाचे ' मेन्यू ', बागेंतली तरारून फुललेलीं झाडें आणि विशेष म्हणजे त्याच्या आवडत्या 'रेड सेटर" कुत्र्याचं ओलं ओलं नाक, या साऱ्यानं फ्रँकलिन फार फार सुखावून गेला. त्याचे आईवडिल त्याच्याभोंवतीं जमले, कौतुकाच्या शब्दांनीं फ्रँकलिनचे कान धुंद झाले. शाळेविषयीं बडबडून त्याचं तोंड दुखून गेलं, ग्रोटोनची हवा कशी मानवली, जेवण कसे मानवलें, मित्र कोणकोण होते, शिक्षक कसे काय होते, इत्यादि प्रश्नांवर प्रश्न, विषयांमागून विषय निघत होते, बोलले जात होते. शाळेंतल्या एकेक गोष्टी सांगतांना, वक्तृत्वामध्येंहि आपण भाग घेतों, असं फ्रँकलिननं सांगितलं आणि त्याच्या आईनं त्याबद्दल नापसंती दाखविली. तिच्या मतें न पेलण्यासारख्या इतक्या साऱ्या अवांतर गोष्टी फ्रँकलिन स्वतःच्या अंगावर उगीच घेत होता. फ्रँकलिन म्हणाला, " नाहीं आई. तुला माहीत नाहीं. मी हें सारं मौजेनं करतों. शिवाय आम्ही वक्तृत्व शिकावं अशी अपेक्षाहि असते. आईनं विचारलं, " ग्रोटोन गांवांत तूं वारंवार जातोस का? फ्रँकलिन म्हणाला, " नाहीं, वारंवार नाहीं. दोन मैलांचं अंतर चालावं लागतं आणि अलिकडे तिथली हवादेखील भारी थंड होती. "

घरच्या एक एक सोहाळ्यांनीं कांहीं दिवस ग्रोटोनच्या आठवणी मागं पडल्या आणि ५ जानेवारीला पुन्हां आगगाडीमध्यें पाऊल ठेवतांना फ्रँकलिन खूप टवटवला होता. निम्म वर्ष इतकं चांगलं गेल्यानंतर उरलेलीं साडेतीन

वर्षं वाईट जातील असं समजण्याचं कांहीं कारण उरलेलं नव्हतं. पोंचल्या दिवशींच संध्याकाळीं त्यानं आपण सुखरूप पोंचल्याचं पत्र घरीं लिहिलं आणि आणखी कांहीं नवीन मुलं शाळेंत दाखल झाल्याचं त्यांत कळविलं. यांत रॉबर्ट आर. मॅक्‌कॉर्मिक हा होता.

हा शिकागोहून आला होता. नवीन आलेल्या मुलांमुळें आतां त्याच्या जेवणाच्या टेबलाशीं दाटी होऊं लागली आणि लहान मुलांच्या वसतिगृहांतून मोठ्या मुलांमध्यें जाण्यासाठीं तो उतावीळ होऊं लागला. जेवणाच्या वेळीं उंच व्यासपीठावर रेक्टर, मिसेस् पीबॉडी आणि प्रिफेक्टस मुख्य टेबलाशीं बसत. त्या उंच जागीं पक्षांच्या विशेष प्रकारच्या भरलेल्या नमुन्यांप्रमाणें शोभणाऱ्या प्रिफेक्ट्सकडे फ्रँकलिन हेव्यानं पाही.

पुढचा काळ त्याला वाटला होता तितका सरळ गेला नाहीं. जानेवारींतच त्याला ताप आला. डोळे पाणावले आणि काविळीचं निदान ठरून वसतिगृहाच्या रुग्णालयांत त्याची रवानगी झाली. अल्लाउद्दिनानं दिवा घासल्यानंतर त्याला हवं तें मिळावं तशीच जणूं जादू होऊन त्याची आई त्याच्या बिछान्याशीं धांवून आली आणि फ्रँकलिनला जरा बरं वाटतांच त्याला तिनं घरीं नेलं. फेब्रुवारीच्या मध्यापर्यंत मग फ्रँकलिन घरीं होता. नंतरदेखील, ग्रोटोनला आलेल्या काविळींसारख्या साथींची अगाऊ कल्पना त्याच्या आईला येती तर तिनं त्याला परत ग्रोटोनला जाऊंच दिलं नसतं.

यांतल्या कुठल्याच साथीची बाधा फ्रँकलिनला झाली नाहीं. दिसणाऱ्या पक्षांविषयीं सरकारच्या शेतकी-खात्याशीं जोराचा पत्रव्यवहार करण्यांत तो लौकर गढून गेला. शाळेंतल्या वादविवादाच्या पहिल्या कार्यक्रमासाठीं त्यानं जोराची तयारी चालविली. तो बोलणार होता फार तर दोनच मिनिटं, पण त्या कल्पनेनंहि त्याला घाम फुटत होता. पुष्कळ माणसांसमोर बोलण्याची तशी त्याला संवय नसली तरी ती करून घ्यायची याविषयीं त्याचा निश्चय झालेला होता. या निश्चयी वृत्तीचा प्रत्यय अलीकडे त्याला वारंवार येऊं लागला होता. वरवरच्या सौम्य मनमिळाऊ वृत्तीखाली ही निश्चयी वृत्ति वाढूं लागली होती. येत्या वादविवादाचा विषय 'निकारागुअन कॅनॉल बिल' हा होता. या विषयांतल्या राजकीय गुंतागुंतीनं त्याचं मन भरून गेलं होतं. मध्य अमेरिकेचा नकाशा तो पाही, चीनला जाण्यासाठीं केप ऑफ गुडहोपला वळसा घालून

आरंभी लिहिलेल्या पत्रांत तो अशीच सही करी. ती सही, ' Nilknarf '
आतां तर तो ग्रीकलिपींतच सही करूं लागला होता.

पहातां पहातां डिसेंबर आला. ज्यांच्याविषयीं विद्यार्थ्यांमध्यें भीति असे त्या परीक्षाहि झाल्या होत्या. आणि सुट्टी पडली. आतां एकदांचं घरीं जायला मिळणार होतं.

फ्रँकलिन हाईडपार्कला घरीं आला तेव्हां ख्रिसमस जवळ आलेला होता. सप्टेंबरमध्यें घरून गेला तो फ्रँकलिन हा नव्हता; हा फ्रँकलिन तरणाबांड आणि आत्मविश्वासानं भरलेला होता. घराच्या उबेंत तो शिरला. सुटींत घरीं जमलेली पुष्कळशी मंडळी, ड्रेस्डनचीं कांचेचीं सुंदर सुंदर भांडीं, घरच्या बागेतल्या गुलाबांनीं तुडुंब भरलेली चिनी घडणीची नाजुकशी पुष्पदाणी, मधुचंद्राहून परततांना त्याच्या आईवडिलांनीं आणलेलं जुन्या पद्धतीचं ' ग्रँड फादर ' घड्याळ, वेगवेगळ्या रुचकर पदार्थांनीं भरलेले सकाळ-संध्याकाळच्या जेवणाचे ' मेन्यू ', बागेंतली तरारून फुललेलीं झाडें आणि विशेष म्हणजे त्याच्या आवडत्या 'रेड सेटर " कुत्र्याचं ओलं ओलं नाक, या साऱ्यानं फ्रँकलिन फार फार सुखावून गेला. त्याचे आईवडिल त्याच्याभोंवतीं जमले, कौतुकाच्या शब्दांनीं फ्रँकलिनचे कान धुंद झाले. शाळेविषयीं बडबडून त्याचं तोंड दुखून गेलं, ग्रोटोनची हवा कशी मानवली, जेवण कसे मानवले, मित्र कोणकोण होते, शिक्षक कसे काय होते, इत्यादि प्रश्नांवर प्रश्न, विषयांमागून विषय निघत होते, बोलले जात होते. शाळेंतल्या एकेक गोष्टी सांगतांना, वक्तृत्वामध्येंहि आपण भाग घेतों, असं फ्रँकलिननं सांगितलं आणि त्याच्या आईनं त्याबद्दल नापसंती दाखविली. तिच्या मतें न पेलण्यासारख्या इतक्या साऱ्या अवांतर गोष्टी फ्रँकलिन स्वतःच्या अंगावर उगीच घेत होता. फ्रँकलिन म्हणाला, " नाहीं आई. तुला माहीत नाहीं. मी हें सारं मौजेनं करतों. शिवाय आम्ही वक्तृत्व शिकावं अशी अपेक्षाहि असते. आईनं विचारलं, " ग्रोटोन गांवांत तूं वारंवार जातोस का ? फ्रँकलिन म्हणाला, " नाहीं, वारंवार नाहीं. दोन मैलांचं अंतर चालावं लागतं आणि अलिकडे तिथली हवादेखील भारी थंड होती. "

घरच्या एक एक सोहाळ्यांनीं कांहीं दिवस ग्रोटोनच्या आठवणी मागं पडल्या आणि ५ जानेवारीला पुन्हां आगगाडीमध्यें पाऊल ठेवतांना फ्रँकलिन खूप टवटवला होता. निम्म वर्ष इतकं चांगलं गेल्यानंतर उरलेलीं साडेतीन

वर्षं वाईट जातील असं समजण्याचं कांहीं कारण उरलेलं नव्हतं. पोंचल्या दिवशींच संध्याकाळीं त्यानं आपण सुखरूप पोंचल्याचं पत्र घरीं लिहिलं आणि आणखी कांहीं नवीन मुलं शाळेंत दाखल झाल्याचं त्यांत कळविलं. यांत रॉबर्ट आर. मॅक्कॉर्मिक हा होता.

हा शिकागोहून आला होता. नवीन आलेल्या मुलांमुळें आतां त्याच्या जेवणाच्या टेबलाशीं दाटी होऊं लागली आणि लहान मुलांच्या वसतिगृहांतून मोठ्या मुलांमध्यें जाण्यासाठीं तो उतावीळ होऊं लागला. जेवणाच्या वेळीं उंच व्यासपीठावर रेक्टर, मिसेस् पीबॉडी आणि प्रिफेक्टस मुख्य टेबलाशीं बसत. त्या उंच जागीं पक्षांच्या विशेष प्रकारच्या भरलेल्या नमुन्यांप्रमाणें शोभणाऱ्या प्रिफेक्ट्सकडे फ्रँकलिन हेव्यानं पाही.

पुढचा काळ त्याला वाटला होता तितका सरळ गेला नाहीं. जानेवारींतच त्याला ताप आला. डोळे पाणावले आणि काविळीचं निदान ठरून वसतिगृहाच्या रुग्णालयांत त्याची रवानगी झाली. अल्लाउद्दिनानं दिवा घासल्यानंतर त्याला हवं तें मिळावं तशीच जणूं जादू होऊन त्याची आई त्याच्या बिछान्याशीं धांवून आली आणि फ्रँकलिनला जरा बरं वाटतांच त्याला तिनं घरीं नेलं. फेब्रुवारीच्या मध्यापर्यंत मग फ्रँकलिन घरीं होता. नंतरदेखील, ग्रोटोनला आलेल्या काविळीसारख्या साथींची अगाऊ कल्पना त्याच्या आईला येती तर तिनं त्याला परत ग्रोटोनला जाऊंच दिलं नसतं.

यांतल्या कुठल्याच साथीची बाधा फ्रँकलिनला झाली नाहीं. दिसणाऱ्या पक्षांविषयीं सरकारच्या शेतकी–खात्याशीं जोराचा पत्रव्यवहार करण्यांत तो लौकर गढून गेला. शाळेंतल्या वादविवादाच्या पहिल्या कार्यक्रमासाठीं त्यानं जोराची तयारी चालविली. तो बोलणार होता फार तर दोनच मिनिटं, पण त्या कल्पनेनंहि त्याला घाम फुटत होता. पुष्कळ माणसांसमोर बोलण्याची तशी त्याला संवय नसली तरी ती करून घ्यायची याविषयीं त्याचा निश्चय झालेला होता. या निश्चयी वृत्तीचा प्रत्यय अलीकडे त्याला वारंवार येऊं लागला होता. वरवरच्या सौम्य मनमिळाऊ वृत्तीखाली ही निश्चयी वृत्ति वाढूं लागली होती. येत्या वादविवादाचा विषय 'निकारागुअन कॅनॉल बिल' हा होता. या विषयांतल्या राजकीय गुंतागुंतीनं त्याचं मन भरून गेलं होतं. मध्य अमेरिकेचा नकाशा तो पाही, चीनला जाण्यासाठीं केप ऑफ गुडहोपला वळसा घालून

जाण्याचे त्याच्या आईचे मोठ्या सफरींतले अनुभव त्याला आठवत आणि इस्थमसच्या आसमंतांतून जाणाऱ्या कालव्याचं महत्त्व अमेरिकेच्या दृष्टीनं किती मोठं आहे हें त्याला उमजून येई.

मार्चअखेरीं आणखी एका वादसभेच्या तयारींत तो बुडून गेला. 'अमेरिकेचं आरमार वाढविण्यांत आले पाहिजे' या बाजूनें तो बोलणार होता. तें वाढलं पाहिजे याविषयीं त्याची बालंबाल खात्री पटलेली होती. त्या काळीं नव्यानं निवडून आलेले अध्यक्ष मॅक्किनले यांनीं नौदलाचे उपमंत्री म्हणून फ्रँकलिनचे चुलत भाऊ टेडी यांची नेमणूक केली होती आणि नौदलाच्या सज्जतेविषयीं टेडी रूझवेल्ट त्या काळीं अतिशय प्रभावी वक्तव्य करीत होते. टेडी रिपब्लिकन असले तरी त्यांचे विचार पुष्कळच प्रगल्भ होते.

आतां फ्रँकलिन घरच्या पत्रांत 'फ्रँकलिन डी. रूझवेल्ट' अशी सही करूं लागला होता. कांहीं वेळां 'एफ. डी. आर.' अशीं नुसतींच आद्याक्षरें तो लिही.

सहामाही परीक्षेनंतर न्यूयॉर्कमध्यें आईवडिलांच्या बरोबर जाऊन राहायला त्याला कांहीं दिवसांची रजा मिळाली. फिफ्थ ॲव्हेन्यु, फॉर्टी थ्री स्ट्रीट येथील हॉटेल रेनेसान्समध्यें एक जागा घेऊन ही मंडळी राहिली होती. लवकरच आपले आईवडिल परदेशीं जाणार असं त्याला इथं कळलं आणि तो थोडा खट्टू झाला. हृदय–विकारानं जेम्स रूझवेल्ट यांची तब्बेत बिघडली होती आणि पश्चिम जर्मनींतल्या बाड नाउहेम इथल्या झऱ्यांत कांहीं दिवस नियमानं स्नान केलं असतां ती सुधारेल, अशा कल्पनेनं ते आणि सारा रूझवेल्ट तिकडे जाणार होतीं.

फ्रँकलिननं त्यांना म्हटलं, "तुम्हीं लांब गेलात म्हणजे मला फार एकटं एकटं वाटेल. पण आठवड्यांतून निदान दोनदा तुम्हीं मला पत्रें लिहा आणि मी नेहमीप्रमाणें रविवारीं आणि गुरुवारीं तुम्हांला उत्तरें टाकीन." टपालाचीं नवीं तिकिटें आढळल्यास तीं पाठविण्याचं स्मरणदेखील त्यांना त्यानं देऊन ठेवलं.

पुढें त्याचे आईवडिल जर्मनींत गेले. आणि कांहीं काळ एकमेकांच्या काळजीनं पत्रांमागून पत्रें त्यांनीं आणि फ्रँकलिननं एकमेकांना लिहिलीं. एका पत्रांत "फ्रँकलिननं लिहिलं होतं." ग्रोटोनमधील ईस्टर विशेष कांहीं न

घडतां संपला होता. धार्मिक गीत गायनाच्या पथकानं विशेष प्रभाव पाडलेला नव्हता.'' पुढें पुढें आपल्या भटकंतीच्या आणि खेळांच्या हकीगती तो पत्रांतून विस्तारानं कळवूं लागला. गोल्फचा खेळ त्याला नव्यानं आवडूं लागला होता. टेडीबरोबर तो नौकाविहार करी, मुष्टियुद्धाच्या एका सामन्यांत लॅथ्रॉप ब्राउननं त्याचा गुडघा निखळविला होता. फ्रँकलिन आणि लॅथ्रॉफ यांच्या दरम्यान या निमित्तानं एक नवी दोस्ती वाढूं लागली. याशिवाय टेनिस होतं आणि बेसबॉल तर होताच होता.

फ्रँकलिनला बेसबॉल आवडे; परंतु कितीहि सराव केला तरी त्याला तो फारसा चांगल्याप्रकारें खेळतां येत नव्हता आणि खरं म्हणजे त्याच्या हेड-मास्तरांनीं नंतर म्हटल्याप्रमाणें "फ्रँकलिनला खेळ आवडत; परंतु शाळेच्या संघांतून खेळण्याइतपत तगडा बांधा त्याला नव्हता."

मेच्या मध्याला नदींत पोहण्याइतकी ऊब हवेंत आली. आतां लवकरच आईवडिलदेखील युरोपांतून परतणार होते. मग उन्हाळयासाठीं सर्व मिळून कॅम्पोबेलोला जाणार होते. तिथं बे ऑफ फंडीच्या पाण्यांत आपली 'हाफ-मून' ही नौका घेऊन फ्रँकलिन मनसोक्त भटकणार होता.

चार जुलै मात्र एकट्यानंच काढावा लागणार होता. त्या दिवशीं त्यानं आपल्याकडे यावं असं टेडी रूझवेल्ट यांची बहीण मिसेस डब्ल्यू. शेफिल्ड कौल्स हिनं फ्रँकलिनला लिहिलं आणि फ्रँकलिननं तें तात्काळ स्वीकारलंहि. ही लाँग आयलंड इथं राहत होती. याविषयीं त्यानं आईला कळविलं आणि तिच्याकडून सरळ सरळ नकार मिळतांच तो कांहींसा चकरून गेला. त्या नकारा-वरच्या त्याच्या उत्तरानं त्याच्या आईलाहि चांगलाच धक्का बसला. कांहीं झालं तरी ४ जुलैचा दिवस मिसेस् शेफिल्ड कौल्स हिच्या घरींच तो घालवणार होता. आणि त्यानं या पत्रांत आईला सरळ सरळ कळवून टाकलं कीं, "माझ्या सुखासाठीं तुम्ही सगळ्या गोष्टी आंखून ठरवणं बस्स झालं. मी स्वतःच तें या-नंतर ठरवीत जाईन."

याच वेळीं, टेडी रूझवेल्टनीं ग्रोटोनच्या शाळेला भेट दिली. ही त्यांची भेट खळबळजनक आणि वादळी ठरली. न्यूयॉर्क शहराच्या पोलीसखात्यांतले त्यांनीं आपल्या भाषणांत सांगितलेले अनुभव विद्यार्थ्यांना स्फूर्तिदायक वाटले. टेडीनीं ४ जुलैला फ्रँकलिनला लाँग आयलंडच्या 'ऑयस्टर बे' च्या आपल्या

घरीं येऊन राहण्याला आमंत्रण दिलं. फ्रँकलिननं हेंहि स्वीकारलं आणि दोनहि ठिकाणीं मिळून ही सुट्टी घालविण्याचं त्यानं ठरविलं.

आपल्या नव्या स्वतंत्रबाण्याचं दर्शन त्यानं आपल्या आईवडिलांना घडविलं. त्याविषयीं आईवडिल युरोपांतून परततांच त्याला बरंच ऐकूनहि घ्यावं लागलं. परंतु वर्षाअखेरची त्याची शाळेंतली प्रगति बघितल्यानंतर त्यांना पुष्कळच समाधान वाटलं. सतरा विद्यार्थ्यांच्या वर्गांत त्याचा चवथा क्रमांक आला होता. ग्रीकचा पेपर त्यानं दिलाच नव्हता, आणि भूमितींत तो कसाबसा कांठावर उत्तीर्ण झाला होता. परंतु इतर विषयांतल्या गुणांनीं त्याला चांगलाच हात दिला होता.

'रेनेसान्स' हॉटेलांत पुन्हां हीं तिघं एकत्र राहूं लागलीं आणि आपल्या आई-वडिलांचं आपल्यावरं किती गाढ प्रेम आहे याचं प्रत्यंतर फ्रँकलिनला मिळालं. आगगाडीच्या त्यांच्या खाजगी डब्यांत ईस्ट पोर्टला जाण्यासाठीं त्याची आई चढली तेव्हां तिचा रुबाब आणि थाट पाहून फ्रँकलिनचं मन खूप उचंबळून आलं. आतां ती चाळिशीची झालेली होती. अद्याप तिचं रूप मोठं उठून दिसत होतं आणि आपला पायघोळ झगा हातमोजांच्या हातानं सांवरीत डब्याच्या पायऱ्या चढली तेव्हां कोणी राजघराण्यांतलीच स्त्री वाटली ! त्या मानानं वडिलांच्या अवस्थेनं त्याला अस्वस्थ केलं. तसं म्हटलं तर त्यांचं वय एकूण–सत्तरचंच होतं. परंतु हृदयविकारानं ते खूपच जर्जर झालेले होते.

आगगाडीचा प्रवास लांबचा होता, तसाच त्रासाचाहि होता. प्रवासांत फ्रँकलिन अस्वस्थच होता. एकाएकीं डब्याला मोठा हिसका बसला आणि वरची कोठली तरी लोखंडी दांडी जागची सुटून त्याच्या कपाळावर आदळली. त्याची आई तें पाहतांच कमालीची घाबरून गेली. परंतु त्याहि अवस्थेंत फ्रँकलिन तिला म्हणाला, "बाबांना समजलं तर त्रास होईल, तूं उगीच रडूं नकोस." ती म्हणाली, "जखम झाली आहे. मी ती बांधतें, थांब." तिनं जखम बांधली. फ्रँकलिननं ती जखम दिसणार नाहीं अशा प्रकारें डोक्यावर टोपी ठेवली आणि तो डब्याच्या बाहेरच्या 'ऑबझर्व्हेशन' प्लॅटफॉर्मवर जाऊन घोटाळत राहिला. झाली गोष्ट वडिलांना कळूं नये हाच त्यामागचा हेतु होता.

त्याच्या आईला हें सारं जाणवलं. ती त्याला म्हणाली, "फ्रँकलि , न

पहिल्यापासूनच फार विचारी आहेस. कॅम्पोबेलोला आपण होतों आणि कांहीं तरी धडपडींत तुझा दांत पडला, तें तुला आठवतं ? मला त्रास होऊ नये म्हणून तें मला न सांगण्याचा प्रयत्न तूं चालविला होतास. "

फ्रँकलिन हंसून म्हणाला, " आई, मला ते विसरतांच येणार नाहीं. माझ्या तोंडांत नंतर बसविलेला हा खोटा दांत मला सारखा त्रास देतो आणि तो तसा देतच राहणार. "

ती जुनी आठवण होतीहि फार त्रासदायक. घरांत फ्रँकलिनची कांहींतरी दंगल धडपड चालली होती. आणि एक काठी त्याच्या तोंडावर जोरानें बसली. पुढचाच दांत जागचा उखडला गेला. ती वेदना निमूटपणें सोसण्याची शिकस्त त्यानं त्याच्याकडून केलीहोती. परंतु त्या गोष्टीच्या आठवणीनंदेखील अद्यापि त्या वेदनेची जाणीव होत असे.

१८९७ च्या त्या उन्हाळ्यांत मात्र असा कोठलाच अपघात घडला नाहीं. कॅम्पोबेलोला शेजाऱ्यापाजाऱ्यांबरोबर या रूझवेल्ट मंडळींनीं दुचाकयांवरून भ्रमंति केली, ती पोहली, नौकेनून फिरली, त्यांनीं पायीं लांबलांबच्या रपेटी मारल्या, आणि पुष्कळ गोल्फदेखील खेळली. कॅनडांतल्या सागरकांठच्या त्या छानदार उन्हाळ्यांतल्या विश्राव्यानंतर उत्साहानें ओथंबणाऱ्या मनानं तीं तिघं घरीं परतलीं.

आतां फ्रँकलिन चांगलाच उंच वाढला होता. ग्रोटोनच्या शाळेंत तो परतला तो चवथ्या इयत्तेंत बसण्यासाठींच. आतां त्याला लहान मुलांच्याबरोबर रहावं लागणार नव्हतं. कसं रहावं आणि कसं वागावं हें त्याला आतां चांगल्या प्रकारें कळूं लागलेलं होतं. ग्रीकच्या परीक्षेसाठीं आतां त्याची तयारी झालेली होती, आणि राष्ट्रीय प्रश्नांवरच्या वादसभांत तो आतां मागें हटणार नव्हता. अद्यापहि समुदायांसमोर बोलतांना त्याचे पाय कांहींसे लटपटत. पुढचा वांकडा दांत सरळ करण्यासाठीं सर्व दांत बांधून घेण्याची कल्पना त्यानं आतां पत्करली होती. त्याचा आवाज फुटला होता, गाणं बंद पडलं होतं. आणि मोठ्या 'बाप्या' सारखं बोलतां यावं ही त्याची मनीषा आतां साकार झाली होती.

पुढच्या वादविवादाचा विषय होता, 'अमेरिकेनें हवाई बेटें आपल्या राज्याला जोडून घ्यावींत काय,' तीं तशीं जोडून घेऊं नयेत असं फ्रँकलि-नचं म्हणणं होतं. या विषयासंबंधीचं त्याचं भाषण फार सुसंबद्धपणें लिहिलेलं

होतं. त्यांत विचार होता. आणि दोन मिनिटांपेक्षां बराच अधिक वेळ त्यानं या भाषणाला घेतला. ज्यांचं संरक्षण करणं फार खर्चाचं आहे अशा लांबलांबच्या वसाहती अमेरिकेनं आपल्या कच्छपी वागविण्याला त्याचा विरोध होता. त्याच्या मतें मन्रो डॉक्ट्रिनचा तो भंग होता. त्यापेक्षां न्यूयॉर्क, बोस्टन आणि सॅनफ्रॅन्सिस्को या शहरांना अधिक संरक्षण देण्यासाठीं सरकारी पैशाचा व्यय करावा असं त्याला वाटत होतं. अमेरिकेनं नौ-दलाला अतिशय सोयीस्कर असं कोळसा भरून घेण्याचं ठिकाण म्हणून या बेटांचा पुष्कळ उपयोग होऊं शकेल, या विरुद्ध युक्तिवादावर त्याचं म्हणणं असं होतं कीं, या बेटांपैकीं ' पर्ल हार्बर ' हें एक बंदर आधींपासून अमेरिकेचं आहे हें या युक्तिवादाच्या पुरस्कर्त्यांना बहुधां माहित नसावं.

ग्रोटोनच्या दुसऱ्या वर्षी याहूनहि चित्तवेधक प्रश्न या वादविवादांसाठीं उपलब्ध होऊं लागले. सुमारें तीन वर्षांपासून क्यूबांतल्या जनतेनं स्पॅनिश अंमलाविरुद्ध बंड चालविलं होतं आणि अमेरिकेनं त्यांत हस्तक्षेप करावा कीं नाहीं, हा प्रश्न खूपच वादग्रस्त होऊन राहिलेला होता. बेजबाबदार वृत्तपत्रांतून क्यूबांतल्या या बंडाचा खरा खोटा भडक वृत्तांत एकसारखा प्रसिद्ध होत होता. अमेरिकन सरकार मोठ्या शिकस्तीनं तटस्थ राहिलेलं होतं, तरीहि स्पेन आणि अमेरिका यांचे संबंध वाढत्या प्रमाणांत ताणले जात होते. वॉशिंग्टनमध्यें टेडी रुझवेल्ट नौ-दलाचे उपमंत्री होते. त्यांनीं ' नौ-दल सुसज्ज ठेवले पाहिजे ' ' कोणत्याहि अनपेक्षित घटनेसाठीं अमेरिकेनं तयार राहिले पाहिजे ' असा प्रचार अप्रतिहतपणें चालविलेला होता. परंतु अधिक शांत माथ्यांची आणि धिम्या वृत्तीचीं माणसं स्पॅनिश मुत्सद्यांशीं या प्रश्नाबाबत चर्चा करीत होतीं. क्यूबाला स्वतःचं सरकार देण्याबाबतींत स्पेन अनुकूलता दर्शवित आहे, तेवढ्यांतच हॅवानाच्या बंदरांत असलेली अमेरिकेची ' मेन ' नांवाची युद्ध नौका सुरुंग मारून बुडवण्यांत आली. खलाशी आणि अधिकारी मिळून २६० माणसं मृत्युमुखीं पडलीं. हें कुणी केलं, कसं घडलं, हें खरोखरी कुणाला सांगतां येत नव्हतं. परंतु या प्रकारानं अमेरिकेंत संतापाची लाट उसळली, वातावरण तापलं, आणि वाटाघाटी संपुष्टांत आल्या. आतां युद्धाशिवाय गत्यंतर दिसत नव्हतं. ग्रोटोनमधलं सारं वातावरण या प्रश्नानं भरून गेलेलं होतं. मुलांना एवढा एकच विषय चर्चेला पुरत होता.

ही युद्धनौका १८९८ च्या मध्यांत बुडविण्यांत आली आणि एप्रिलमध्यें अमेरिकेनं स्पेनविरुद्ध युद्ध जाहीर केलं. यानंतर अफवांना खराखुरा ऊत आला आणि ग्रोटोनमधल्या मुलांना या घोळघोळून सांगतांना तोंड थोडीं होऊं लागलीं. फ्रँकलिननं घरच्या एका पत्रांत इशारा दिला होता कीं, " असं ऐकतों कीं स्पेननं ५० ते ६० युद्धनौकांचा ताफा न्यूयॉर्कवर पाठविला असून कोठल्याहि क्षणीं तो प्रकट होईल आणि आपल्याला स्पेनच्या कैदखान्यांत खितपावं लागेल ! "

अमेरिकेच्या कॉंग्रेसनं घोडदळाचीं तीन पथकं संभाव्य युद्धस्थानाकडे रवाना केलीं होतीं. लवकरच टेडी रूझवेल्टनीं जाहीर केलं कीं, युद्धकाळांत ते वॉशिंग्टनमध्यें राहणार नव्हते. ते जातीनं क्यूबाकडे जाणार होते, घोडदळाचे उपप्रमुख म्हणून. त्या पथकाचे प्रमुख राहणार होते जनरल एस. बी. एम. यंग. फ्रँकलिन आणि त्याचा जिगरदोस्त लॅथ्रॉप ब्राऊन यांना याविषयीं बोलतांना दिवस थोडे होऊं लागले. अमेरिकेच्या या युद्धासाठीं कानाकोपऱ्यांतून माणसं स्वखुषीनं सैन्यांत दाखल होत होतीं हें त्यांना माहीत होतं. टेडी रूझवेल्ट यांच्याबरोबर हार्वर्डला पूर्वी शिकलेले कित्येकजण युद्धांत दाखल होण्यासाठीं अर्ज करीत होते. अशावेळीं कोणत्याहि पुरुषाला देशसेवेची स्फूर्ति होणं अगदीं सहाजिक होतं आणि हे सारे पुरुष होते; मर्द होते; आणि फ्रँकलिनला वाटे कीं, आपण आणि लॅथ्रॉपदेखील मर्दच आहोंत. नाहीं काय ? आपल्याला यावेळीं देशसेवेचा कांहीं मार्ग नाहीं काय ? युद्धावर जाण्याला ग्रोटोनच्या शाळाचालकांनीं परवानगी दिली नसती आणि घरची परवानगी मिळणं तर सर्वथा अशक्यच होतं. एक म्हणे, " आपण आतां पुरेसे मोठें झालों आहोंत. " दुसरा म्हणे, " हो तर, झालोंच आहोंत. आपल्या आवाजावरून आपण आतां काय लहान वाटतों ? "

" आपल्या उंचीवरून आपण अठरा वर्षांचे ठरूं. तूं तर अठरा वर्षांचाच दिसतोस. "

" तू सुध्दां. अठरापेक्षां तूं थोडा जास्तच वाटतोस. "

आणि मग अतिशय काळजीपूर्वक शाळेंतून सुटका साधून घेण्याची योजना दोघांनीं मिळून आंखली. एकदां शाळेच्या पिंजऱ्यांतून सुटलों कीं सैन्यभरतीचं नजिकचं केंद्र शोधून काढणं सोपं होतं. आणि एकदां अंगावर लष्करी गणवेष

चढविला आणि रणांत पदार्पण केलं म्हणजे मग कोण अडवूं शकणार होतं ?

परंतु योगायोग असा कीं, तालीमखान्यामध्यें एका शिक्षकांनीं एके दिवशीं त्यांच्याकडे येऊन त्यांच्या अंगावरच्या चमत्कारिक डागांची चौकशी केली. आणि ते म्हणाले, " प्रथम रुग्णालयांत जा, मुलांनो. "

" आम्हांला तर कांहींहि होत नाहीं. " मुलांनीं उत्तर दिलं.

" आत्तांच्या आत्तां. "

ग्रोटोनच्या शाळेंत ' आत्तांच्या आत्तां ' याचा अर्थ ' आत्तांपासून दहा मिनिटांच्या आंत ' एवढाच असे. रुग्णालयांत फ्रॅंकलिनला आणि लॅथ्रॉप ब्राऊनला तपासलं आणि स्कार्लेट फिव्हरचे रोगी म्हणून निदान केलं. सांथ भडकण्याआधीं खबरदारी म्हणून या दोघांना एका स्वतंत्र खोलींत अलग ठेवण्यांत आलं. आणि तूर्त तरी इतकीच देशसेवा त्या दोघांपुरती निश्चित ठरली !

पुन्हां एकदां फ्रॅंकलिनची आई त्याच्या शय्येशीं धांवून आली. परंतु तिला त्याची भेट घेतां येणार नाहीं असं सांगण्यांत आलं. आईला स्वतःच्या मुलाला भेटण्याची बंदी ! वरवरच्या सौम्य स्नेहार्द्रवृत्तीखालीं लपलेली फ्रॅंकलिनची हट्टी वृत्ति मुळांत कोठली तें ग्रोटोनच्या शाळेच्या अधिकाऱ्यांना या निमित्तानं कळून चुकलं. अधिकाऱ्यांनीं परवानगी नाकारतांच रूझवेल्टबाईनीं एक मोठी शिडी शोधली, रुग्णालयाच्या एका खिडकीपाशीं ती लावली आणि त्या शिडीवरून त्या आपल्या आजारी मुलाकडे रोज जाऊं लागल्या ! रोज या शिडीवरून त्या आपल्या आजारी मुलाची लांबूनच भेट घेत. हवा बरी असल्यानं खिडकी उघडीच असे आणि शिडीशींच बसून रूझवेल्टबाई चांगल्या तास दोन तास आपल्या आजारी मुलाला त्याचीं आवडतीं पुस्तकं वाचून दाखवीत. घरीं नेण्याइतका तो बरा होईतोंवर हें असं चाललं.

दुबळा-नेबळा झालेला फ्रॅंकलिन आणि लॅथ्रॉप ब्राऊन रोज नव्या युद्धवार्ता ऐकत होते. जनरल यंग क्यूबामध्यें तापानं फणफणले होते आणि टेडी रूझवेल्टनीं त्यांची जागा घेतली होती. स्पेनविरुद्धच्या युद्धांत विजयी होऊन ' सानवान हिलच्या ' लढाईतला वीर म्हणून लॉंग आयलंडच्या मॉनटॉउक पॉइंटवर टेडी रूझवेल्ट त्यांच्या युद्धवेषांत प्रथम उतरले तेव्हा फ्रॅंकलिन त्याच्या हाइड पार्कच्या घरीं होता. टेडी रूझवेल्ट यांच्या लोकप्रियतेला अमेरिकेंत

अक्षरशः उधाण आलेलं होत. न्यूयॉर्कच्या गव्हर्नरपदासाठीं त्यांना उभं करण्यांत यावं अशी सूचना हां हां म्हणतां सर्व देशभर पसरली. नोव्हेंबरमध्यें गव्हर्नर म्हणून ते निवडूनदेखील आले, आणि फ्रॅंकलिन ग्रोटोनच्या शाळेंत असेपर्यंत ते न्यूयॉर्कचे गव्हर्नर म्हणून कारभार हांकीत होते. फ्रॅंकलिन आतां पांचवींत गेला होता. त्याला सोळावं वर्ष संपलं होतं. सतरावं लागलं होतं. ज्याच्या आई वडिलांपाशीं पुष्कळसा पैसा आणि प्रतिष्ठा आहे, एका उंची दर्जेदार शाळेंत तीन वर्षं जो शिकतो आहे, आणि ज्याचा चुलत भाऊ न्यूयॉर्क राज्याचा गव्हर्नर आहे, असा मुलगा जसा वागेल, बोलेल, विचार करील, तसा फ्रॅंकलिन आतां झाला होता. वयानुरूप आलेल्या अतिआत्मविश्वासाबरोबरच समोरच्या माणसाविषयींची तुच्छता वृत्ति देखील आतां वाढली होती. नकळत तो आतां मान वर करून आणि खालीं बघून समोरच्याशीं बोले.

शाळेचं नियतकालिक ' ग्रोटोनियन ' याच्यासाठीं हल्लीं तो नियमितपणें लिहीत असे. पूर्वीच्या खेळांत त्याला आतां रस वाटेनासा झाला होता. आतां त्याला जडलेले नवे छंद आयुष्यभर त्याला पुरतील असे होते. आतां तो टेनिस फार चांगला खेळे. आणि त्याचं गोल्फदेखील सुधारूं लागलं होतं.

समारंभ आणि मेजवान्यांच्या प्रसंगीं उपस्थितांचं लक्ष वेधून घ्यावं म्हणून तो आतां मेंडोलिन वाजवायला शिकूं लागला होता. आणि ख्रिस्तमसच्या काळांत, शाळा कॉलेजांत शिकणारीं तरुण मुलं घरोघर येत तेव्हां हमखास असे सोहळे झडत. १८९८–९९ ची सुट्टी कुठं घालवायाची याविषयी आई–मुलांमध्यें बराच पत्रव्यवहार झाला. नृत्याचे कित्येक समारंभ आंखलेले होते. त्यांतला एक न्यूयॉर्कमध्यें होता, दुसरा न्यूजर्सीमधील ऑरेन्ज इथं होता. ऑरेन्जमधल्या नृत्यासाठीं लॉरा नांवाच्या एका मुलीला त्यानं आपली सोबतीण म्हणून बोलावलं होतं; परंतु न्यूयॉर्कमधल्या नृत्यासाठीं मात्र त्यानं आईला लिहिलं, " या समारंभासाठीं माझ्याकरतां तूंच एखादी चांगलीशी जोडीदारीण शोधून काढ. म्हणजे माझी आतांच काय ती व्यवस्था झालेली असेल आणि आयत्या वेळीं कोणाबरोबर स्वतःची धिंड काढण्याची पाळी माझ्यावर येणार नाहीं. "

दांतांमधील दोष आणि तो दूर होण्यासाठीं त्यानें लावलेल्या तारा अद्यापि

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ......... दि: ......

कायमच होत्या. पण आतां लौकरच तें सारं दुरुस्त होणार होतं. स्वतःच्या रूपाविषयीं फ्रँकलिनला वाटणारा अभिमान तसा वाजवीच होता. त्याच्या रूपवती आईशीं त्याच्या चेहऱ्याचं लक्षांत यावं इतकं साम्य होतं. याविषयीं आई-वडिलांच्या पाहण्यांबोलण्यांत व्यक्त होणारं कौतुक त्याला प्रत्यहीं जाणवत असे. नोकरमाणसं त्याचे पुष्कळ लाड करीत. त्याचीं बोलणीं मोठ्या आनंदानं ऐकून घेत. त्याच्या कुटुंबांतल्या पुरुषांप्रमाणें आतां तो चांगला सहा फुटांचा ताडमाड उंच पुरुष वाढला होता, आणि आणखी उंच होण्याचाहि संभव दिसत होता. कैकदां घरून नवे कपडे आले कीं त्याला ते, अंगाला येत नाहींत म्हणून परत करावे लागत. सुट्टी जवळ येत होती आणि शेवटीं ऑरेंज कंट्री क्लबच्या नृत्य-सोहाळ्याला तो उपस्थित झाला तेव्हां त्याची जय्यत तयारी झालेली होती.

या सोहोळ्याला बरीच रुझवेल्ट मंडळी उपस्थित होती आणि तसं अपेक्षितहि होतंच. संध्याकाळीं गेल्या गेल्याच यांतली एक व्यक्ति फ्रँकलिनच्या नजरेंत भरली. ती खूप लहान होती त्यानंतर प्रथमच कित्येक वर्षांनीं तो तिला पाठीवर घेऊन तो 'घोडा घोडा' खेळला होता. टेडी रूझवेल्ट यांच्या भावाची ही मुलगी, एलिनॉर रूझवेल्ट. हीहि आतां उंच वाढली होती.

कांहींशी नको तेवढी उंच वाढली होती. आणि जणु मनाविरुद्धच कोणी-तरी तिला तिथं ओढून आणलं असावं असं तिचं तिथलं संकोचलेलं वागणं होतं. फ्रँकलिनमधला उमदेपणा तिच्या दर्शनानं जणु उचंबळला आणि खोली ओलांडून त्यानं तिलाच आपल्याबरोबर नृत्य करण्याबद्दल विचारलं. कांहींसे बावरून आणि कृतज्ञतेनं भरलेल्या स्वरांत तिनं बोलावण्याचा स्वीकार केला.

तक्रारीच्या स्वरांत ती म्हणाली, "खरं म्हणजे, लांब स्कर्टस् घालण्या-इतकी मी आतां मोठी झाले आहे; पण आजी मला हे आंखूड स्कर्टस्च वापरायला लावते."

फ्रँकलिननं तिला धीर दिला, "त्याचं कांहीं विशेष नाहीं. या गर्दीत तें कोणाच्या लक्षांतहि येणार नाहीं."

गंमत म्हणजे तिचेदेखील पुढचे दांत सदोष होते. तारेनं बांधलेले होते. फ्रँकलिननं अंदाज घेतला कीं, तिला साधारणपणें पंधरावं वर्ष चालू असावं. तिचे केंस दाट आणि सोनेरी रंगाचे होते. तिच्या चेहऱ्याला आणि त्या चेहऱ्यावरच्या टपोऱ्या गर्द निळ्या डोळ्यांना महिरपीसारखे ते केंस शोभत होते.

तिची जिवणा कांहींशी रुंद होती. आणि त्यामानानं हनुवटी अपुरी होती. पण फ्रँकलिनला तशी ती बरी वाटली.

ती फ्रँकलिनला सांगत होती, " आतां लौकरच माझी सुटका होणार आहे. आजी मला शिकण्यासाठीं इंग्लंडला पाठवीत आहे." मग तिनं फ्रँकलिनला विचारलं, " ग्रोटोनची शाळा तुला आवडते कां ? "

फ्रँकलिनला एवढं पुरलं. हा त्याच्या आवडीचा विषय होता.

या विषयावर तो अस्खलितपणें बोलूं लागला. हें सारं ती लक्षपूर्वक ऐकत आहे असं त्याला जाणवूं लागलं. नृत्य संरलं आणि जिथं ती प्रथम भेटली तिथं त्यानं तिला पुन्हां आणून सोडलं. त्याच्या मनाशीं खूणगांठ पटली होती कीं, मुलगी गोड आहे !

समारंभाच्या नंतरच्या भाऊगर्दीत ही थोडकीच भेट हरवून गेली. त्यांत सुट्टींतली धांवपळ, उनाडक्या.

दुथडी वाहणाऱ्या नदीच्या पाण्याप्रमाणें ग्रोटोनच्या शाळेंतलं पांचवं आणि अखेरचं वर्षहि वाहून गेलं. अभ्यास, परीक्षा, वादविवाद, नियतकालिकासाठीं लेखन, घरचीं आलेलीं पत्रें वाचणें-लिहिणें आणि शाळेच्या जगांतल्या तशात शाळेच्या जगाबाहेरच्या अन्य चळवळींत दिवस कसे गेले तें कळलंच नाहीं. आतां आई मुलाचा पत्रव्यवहार चाले तो मोठा माणूस आणि लहान मुलगा अशा नात्यानं नव्हे; तर दोन बरोबरीच्या मित्रांसारखा. घरीं आपल्याला जाणवणाऱ्या नोकरांचाकरांच्या एकेक कटकटी ती त्याला लिहीत असे. त्यांची ' हाफ मून ' नौका आग लागून बुडाली तेव्हां पत्रांतून त्यांनीं एकमेकांचं सांत्वन केलं. ' ड्रेफस ' प्रकरणाचा समग्र वृत्तांत आपल्याला पाठव, असं त्यानं तिला एका पत्रांत स्मरण दिलं होतं. त्याच्या वडिलांच्या हृदयविकाराच्या अद्ययावत् बातम्या ती त्याला कळवी. आतां आईवडिल युरोपच्या प्रवासाला गेले तेव्हां फ्रँकलिनला पूर्वीप्रमाणे परक्यासारखं वाटलं नाहीं. आतां तो मोठा झाला होता. पक्ष्यांचा छंद आतां ' ऑर्निथॉलॉजी ' झाला होता. टपाल तिकिटें जमविण्याचा छंद ' फायलेटली ' झाला होता. परीक्षा उत्तमप्रकारें उत्तीर्ण झाला तेव्हां आपल्याला मिळालेले गुण त्यानं आईला उत्साहानं कळविले. त्याला माहीत होतं कीं, याचा तिला खूप आनंद होणार होता. पांच विषयांत

'बी' ग्रेड मिळाली होती, भूमिति, जर्मन, आणि धार्मिक विषयांत तो पहिल्या श्रेणींत उत्तीर्ण झाला होता.

धार्मिक अभ्यास हें ग्रोटोनच्या शाळेच्या अभ्यासक्रमांतलं महत्त्वाचं वैशिष्ट्य होतं. फ्रँकलिनचा पिंड घडण्याला याची फार मोठी मदत झाली. आयुष्यभर आपल्या धार्मिक श्रद्धा त्यानं जपल्या, जोपासल्या. इतर मुलांच्या बाबतींत ग्रोटोनच्या विद्यार्थ्यांच्या जबाबदाऱ्या काय हें ठरवून देण्यांत आलेलं असें. अतिशय कांटेकोरपणानें या जबाबदाऱ्या फ्रँकलिन पार पाडीत असे. ग्रोटोनच्या शाळेची स्वतःची एक मिशनरी सोसायटी होती. न्यूहॅम्पशायर नजिकच्या लेक आसक्वामधल्या एका बेटावर गरिबांच्या मुलांसाठीं एक उन्हाळी छावणी घेण्यांत येई, आणि नियुक्त सल्लागार आणि कार्यकर्ते म्हणून ग्रोटोनच्या मुलांना विशिष्ट वेळ या छावणीसाठीं द्यावा लागे. या कामीं आपला क्रम केव्हां येतो याची कांहींशा उतविळीनं फ्रँकलिन वाट पहात राही. ज्यांचा विचार अगत्यानं आणि जिव्हाळयानं होणं आवश्यक आहे असे त्या भागांतला एकेक प्रश्न मुलांना वांटून देण्यांत येई. एकदां फ्रँकलिनला आणि त्याच्या वर्ग-सोबत्यांना त्या भागांतल्या मिसेस् फ्रीमन नांवाच्या बाईची गांठ घ्यावी लागली. याविषयीं घरच्या पत्रांत त्यानं नंतर लिहिलं होतं, "बऱ्याच वयस्कर अशा या निग्रो बाई आहेत. त्या एकट्या राहतात. उमर चौऱ्याऐंशी वर्षांची झालेली आहे. आज आम्ही त्यांची गांठ घेतली. त्यांच्याशीं जवळजवळ तासभर बातचीत केली. आठवड्यांतून निदान दोनदां आम्ही त्यांना भेटायचं आहे, त्यांच्या घरीं कोळसा, पाणी इत्यादि गोष्टी आहेत कीं नाहीं हें पाहायचं आहे, त्यांच्या कोंबड्यांची निगा जरूर वाटल्यास राखायची आहे आणि बर्फाचं वादळ आल्यास बर्फ उकरून त्यांना बाहेर काढून त्यांची योग्य ती सोय करावी लागेल."

या प्रकारचीं कामं सहजगत्या फ्रँकलिनच्या हातून पार पडत. कारण हाईड पार्कच्या रूझवेल्ट कुटुंबाच्या राहत्या भागांत त्याच्या वडिलांना या प्रकारचीं कामं पूर्वापार करावीं लागलीं होतीं. त्या भागांतले ते एक सुप्रतिष्ठित नागरिक मानले जात. स्थानिक शाळेचे ते एक विश्वस्त होते. हडसन रिव्हर स्टेट हॉस्पिटल आणि त्या प्रकारच्या इतर धर्मादाय संस्थांचे ते एक पदाधिकारी होते. आपल्या बगींतून ते त्या भागांतल्या रुग्णांच्या गांठी जातीनं घेण्यास

जात, गरजूंना मदत करीत, बरोबरीच्या व्यापारी मंडळींत औदार्याबद्दल, कनवाळूपणाबद्दल त्यांची प्रसिध्दी होती. रेल्वेमार्ग व नदीवरची वाहतूक, खाणींचा शोध या नि असल्या कामांच्या बाबतींत त्यांचा उपयोग त्यांच्या सहकाऱ्यांना अतिशय होत आलेला होता. त्यांच्या दृष्टीनं असा जणूं दंडकच ठरून गेला होता कीं, एखाद्या माणसाकडे पुरेशी कुवत असेल, पुरेसा मोकळा वेळ असेल आणि पुरेसें द्रव्य असेल तर त्यानं समाजकार्यात कोणता ना कोणता वांटा उचललाच पाहिजे.

परंतु शाळेच्या अखेरच्या वर्षी फ्रँकलिनच्या मनांत प्रामुख्यानं विचार चालला होता तो पुढच्या कॉलेजच्या शिक्षणाबद्दल. केंब्रिजचं गांव आणि तेथली हार्वर्ड युनिव्हर्सिटी तशी फार लांब नव्हती. केवळ तीस मैलांचं तर अंतर! परंतु फ्रँकलिनच्या दृष्टीनं तें अगदीं वेगळं, अनोळखी जग असणार होतं. हें खरं कीं, ग्रोटोनच्या फूटबॉल संघानं हार्वर्डच्या संघाशीं सामना देऊन त्याला एकदां चांगला मऊ केला होता. परंतु हेंहि विसरतां येत नव्हतं कीं, ग्रोटोनच्या वतीनं उपस्थित होतीं तीं 'मुलं' होतीं आणि हार्वर्डच्या वतीनं आलेलीं होतीं तीं मुलें 'बाप्ये' होतीं. दिसायला आणि वृत्तीनेंदेखील.

गोल्ड कोस्ट या नांवानं निर्देशिल्या जाणाऱ्या एका महागड्या वसतिगृहांत फ्रँकलिन आतां रहात होता आणि हिवाळ्यांत अगदीं आरंभीं आरंभीं त्यानं एका पत्रांत आईला लिहिलं, "पुढल्या वर्षी निश्चितपणें एक खोली घेऊन एकत्र राहण्याचं मी आणि लॅथ्रॉपनं ठरविलंय् !"

पुढें स्वतःच्या रूपाविषयींच्या कल्पना जरा बाजूस ठेवून त्यानं आईला लिहिलं, "हें पत्र मी लिहितो व तें डोळ्यांवर चष्मा ठेवून ही कल्पनासुध्दां चमत्कारिक वाटते आहे. परंतु आज सकाळींच हा चष्मा माझ्या डोळ्यांवर चढला. याबरोबर बिन-काड्यांचा नुसता नाकावर ठेवला म्हणजे राहणारा 'पिन्सनेझ' नांवाचा चष्माहि घेतला आहे. आतां पुढल्या वेळीं तूं मला बघशील तेव्हां मला ओळखणारसुध्दां नाहीस." हा चष्मा पुढें आयुष्यभर फ्रँकलिन रूझवेल्ट यांच्या व्यक्तिमत्त्वाचं एक वैशिष्ट्य होऊन राहिला.

सहाव्या इयत्तेतल्या मुलांबरोबरीनं फ्रँकलिननं वार्षिक परीक्षा दिली आणि तिच्यांत तो उत्तीर्णहि झाला. आतां आपले हात स्वर्गाला लागल्यासारखं वाटलं असेल तर नवल नव्हे, आजवर शाळेंतल्या विद्यार्थीदशेंतून कशीतरी

३

सुटका साधून एकदांचं उघड्या जगांत उड्या घेण्याची या मुलांची वृत्ति होती, परंतु आतां शाळेच्या जगांतून बाहेर पडतांना त्यांनीं मागें वळून बघितलं आणि या जगाविषयींच्या प्रेमानं सर्वांचीं मनं उचंबळून आलीं. कृतज्ञतेनें जडावलीं.

१९०० सालच्या जून महिन्याच्या २५ तारखेला फ्रँकलिननं घरीं लिहिलं, "माझ्या आवडत्या आई आणि बाबा, आजचा दिवस केवढा आनंदाचा आणि तरीसुद्धां किती दुःखाचा ! आतां यानंतर या शाळेंत आम्हीं वावरणार नाहीं. इथं अभ्यास करणार नाहीं, हुंदडणार नाहीं, आणि मैत्रींत रहाणार नाहीं. आमच्यांतील प्रत्येकालाच वाटतंय् कीं, पुन्हां पहिल्या इयत्तेदाखल व्हावं, जें जें केलं तें सारं सारं मनापासून करावं ! आज अखेरच्या धार्मिक परीक्षे-पैकीं एक परीक्षा चालू असतां, तिचं रूपांतर रेक्टरांच्याशीं बातचीत करण्यांत झालं. आज सहाव्या इयत्तेंतलीं आम्हीं सारीं मुलं वर्गाबाहेर आलों आणि आमची जेवणाची खोली सजविण्यासाठीं सुमारें तासभर फुलंच फुलं जमविलीं. दुपारीं १ वाजतां आम्हीं जेवायला गेलों, हात मारून जेवलों आणि रेक्टरनीं सहज म्हणून असं सुरेख भाषण आम्हांला उद्देशून केलं म्हणुन सांगू ! लॅटिनच्या बक्षिसासाठीं माझं नांव पुकारलं गेलं तेव्हां मला कांहींसा धक्काच बसला. शेक्स-पिरच्या नाटकाचे चाळीस खंड मला बक्षिस देण्यांत आले. तुमच्याकडे आहेत ते आहेत...आतां मला केव्हां एकदां तुम्हांला भेटतो असं झालंय्; पण इथून निघायचं म्हणजेहि नकोसं वाटलं."

अठरा वर्षांचा झालेला फ्रँकलिन डेलॅनो रूझवेल्ट आई–वडिलांना येऊन भेटला, तेव्हां त्यांच्या डोळ्यांत मात्र भावनावेगानं अश्रू दाटले होते. आईच्या गालावर ओठ टेकण्यासाठीं म्हणून त्यानं आपले बाहू तिच्याभोंवतीं गुंफले नि त्याच्या लक्षांत आलं कीं, तिच्यापेक्षां चांगलें वितीनें आपण उंच वाढलेले आहोंत !

# कॉलेज-विद्यार्थी

ग्रोटोनची शाळा आणि हार्वर्डचे कॉलेज यांत दिवस आणि रात्र इतका, किंवा पूर्व आणि पश्चिम इतका, किंवा त्याहिपेक्षां उन्हाळा आणि हिवाळा यांच्या इतकाच फरक होता. ग्रोटोनची शाळा जगापासून वेगळी पडलेली होती नि खेडवळ वातावरणांत होती. आणि हार्वर्डची युनिव्हर्सिटी बोस्टन शहरापासून जवळच चार्ल्स नदीपलीकडे होती. ग्रोटोनला तो वसतिगृहात राही; पण एखाद्या छोट्या खोलीमध्ये. हार्वर्डला त्यानं आणि लॅथॉपन रहायला सुरुवात केली ती अतिशय उंची सामानानें भरलेल्या तीन खोल्यांच्या एका प्रशस्त जागेत. ग्रोटोनला ठरलेल्या अभ्यासक्रमांतलाच अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना निवडावा लागे हार्वर्डमध्यें जवळ जवळ सर्व विषय ऐच्छिक होते. ग्रोटोनला दिवसाच्या प्रत्येक मिनिटाचा हिशेब विद्यार्थ्याला द्यावा लागे कारण स्वतंत्र्याला योग्य असं वय त्या मुलाचं झालेलं आहे असं मानलं जात नसे. परंतु हार्वर्डमध्यें विद्यार्थी स्वतंत्र होते, मुखत्यार होते, स्वतःचा निर्णय ते स्वतः घेऊं शकत होते. ते प्रौढ होते, पुरुष होते.

१९०० च्या सप्टेंबरमध्ये २५ तारखेला फ्रँकलिननं लिहिले,

" माझ्या लाडक्या आई आणि बाबा, हें पत्र मी केंब्रिजहून लिहित आहें. आणखी बारा तासांत १९०४ च्या वर्गाचा मी रीतसर अधिकृत विद्यार्थी

होईन. " कॉलेज सुरू होण्यापूर्वीच थोडे दिवस लॅथ्रॉप त्राऊन इथं येऊन पोहोंचलेला होता. फ्रेशमन फुटबॉल संघाच्या व्यवस्थापकाच्या पदासाठीं तो स्पर्धेत उतरला होता आणि त्याला तें मिळालं. फ्रँकलिनची नजर आणखी एका वेगळ्याच गोष्टीवर लागलेली होती. ग्रोटोनच्या शाळेच्या नियतकालिकाच्या निमित्तानं वृत्तपत्र व्यवसायाची चव त्यानं चाखली होती. आतां येथल्या 'हार्वर्ड क्रिमन' या नियतकालिकाच्या संपादक मंडळावर आपल्याला जागा मिळावी म्हणून सर्वप्रकारें खटपट करण्याचा त्याचा इरादा होता. हें नियतकालिक म्हणजे खरोखरीचं वर्तमानपत्र होतं. त्याची स्वतःची मोठी कचेरी होती.

आतां त्याला वाटणारा दुर्दम्य उत्साह आणि उमेद पाहिल्या वर्षाच्या, त्याच्या अभ्यासक्रमाला पुरून उरणारी होती. त्याचे विषय होते फ्रेंच, लॅटिन, जिऑलॉजी, इंग्लिश, इतिहास आणि राज्ययंत्रणा. पहिल्या वर्षाच्या विद्यार्थ्यांना अभ्यासाव्यतिरिक्तच्या कित्येक गोष्टींत प्रवेश दिला जात नसे. परंतु जें जें म्हणून करण्याची संधी मिळेल तें करण्याचा फ्रँकलिनचा निर्धार होता. इतर सत्तर विद्यार्थ्यांबरोबरीनं त्यानं 'क्रिमसन'च्या संपादकीय कामासाठीं प्रयत्न केला आणि उमेदवार वार्ताहर म्हणून त्याची नियुक्ति झाली. आतां तो अव्याहतपणें कॉलेजच्या कानाकोपऱ्यांत फिरता राहून बातम्या गोळा करूं लागला.

आतां फ्रँकलेन डिलॅनो रूझवेल्ट ही एक असामीच दिसू लागली होती. सहा फुटांवर सुमारें दीड इंच अशी उंची, देखणें रूप, उच्चवर्गीय सडपातळ व्यक्तिमत्व आणि अंगावर ब्रुक्स ब्रदर्सनीं शिवलेला अतिशय उंची पोषाख, यामुळें फ्रँकलिन सर्वांच्या नजरेंत भरे. त्यानं आतां एक डर्बी हॅट विकत घेतली आणि आपल्याला एक 'पाईप' हवा अशी मागणी घरीं केली. कारण, हार्वर्डच्या विद्यार्थ्यांचं हें वैशिष्ट्य गणलं जाई. 'वरून आलेला पाईप आपण ओढणार नाहीं' असं वचनहि त्यानं घरीं दिलं. कारण फुटबॉल संघांतून खेळण्याचीहि त्याची इच्छा होतीच आणि त्यासाठीं छाती भक्कम असणं अवश्य होतं.

परंतु प्रत्यक्षांत त्याला असं दिसून आलं कीं, त्याचा सडपातळपणा, केवळ १४६ पौंड वजन इत्यादींमुळें फ्रेशमन संघाच्या राखीव गड्यांमध्यें समवेश होण्यापलीकडे अधिक उजवी अशी संधी या खेळांत त्याला मिळूं शकत

नव्हती. आंतरविश्वविद्यालयीन खेळांत नांव मिळविण्याची त्याची कल्पना कधींहि मूर्त स्वरूपाला येणार नव्हती. नावा वल्हविण्याच्या संघांत त्याचा समावेश झाला; परंतु दुसऱ्याच वर्षी त्याचं मन त्यांत रमेनासं झालं. आतां गोल्फ आणि टेनिस एवढेच त्याचे आवडते खेळ उरले.

कॉलेजच्या जगांत विद्यार्थ्यांसाठीं कितीतरी क्लब्स चालविण्यांत येत होते. यांपैकीं एखाद्यांत आपला समावेश व्हावा, असं फ्रँक्लिनला वाटत होतं. पोर्सलिअन, हेस्टी पुडींग, आणि फ्लाय ( अल्फा, डेल्टा, फी ) हें त्यांतल्या त्यांत 'खास' क्लब्स मानले जात. यापूर्वी रूझवेल्ट–परिवारांतील अनेक माणसं त्या क्लब्सचे पदाधिकारी म्हणून कामं करून गेलेलीं होतीं. परंतु फ्रँकलिन कॉलेज विश्वांत अद्याप नवखा होता, 'फ्रेशमन' होता, आणि म्हणून त्याला जरा धीरानंच घेणं भाग होतं.

तिथं राजकीय स्वरूपाचे क्लब्स देखील होते आणि फ्रँक्लिन त्यांतल्या एकांत होईल तितक्या लवकर दाखल होणार होता. हार्वर्डला येऊन दाखल होतांच सगळं सोडून आधीं तो रिपब्लिकन क्लबचा कर्तृत्वशील सभासद बनला. मौज म्हणजे त्याचे वडील, डचेस कौंटीमधल्या डेमॉक्रॅटिक पक्षाचे एक ठळक नेते म्हणून कित्येक वर्षांपासून ओळखले जात होते. परंतु फ्रँकलिननं हार्वर्ड-मध्यें प्रवेश मिळविण्याआधीं थोडेच दिवस रिपब्लिकन पक्षाच्या मेळाव्यानं वुइल्यम मॅक्‌किन्ले यांच्याबरोबर उपाध्यक्षपदासाठीं उमेदवार म्हणून टेडी रूझवेल्ट यांचा पुरस्कार केला होता, आणि फ्रँकलिन यानं प्रभावित झालेला होता. टेडी हे त्याचा 'देव' होते. कॉलेज विश्वांतल्या राजकारणांत उतरतांना फ्रँकलिनच्या मनांत अशाप्रकारें आतां कोणताहि संभ्रम नव्हता; अनिश्चितपणा नव्हता. मतदानाचा हक्क प्राप्त होण्याइतके केव्हां एकदाचे आपण मोठे होतो असं त्याला झालं होतं.

यापूर्वी बालपणांत आणि कुमार वयांत बरोबरीच्या मुलांना हुकूम फर्मावण्याची आणि त्यांच्याकडून कामं करवून घेण्याची फ्रँकलिनची संवय; हार्वर्डच्या जगांत अधिक भारदस्त आणि सौम्य स्वरूपांत नव्यानं उमटूं लागली; उपयोगी येऊं लागली. हार्वर्डमधील प्रौढ वातावरण आणि स्वातंत्र्य यामुळें फ्रँकलिनचा मूळचा आक्रमक पिंड पोसला जाऊं लागला. व्यक्तिमत्वांतील मोहकतादेखील आतां वाढली होती आणि देशाच्या उपाध्यक्षपदासाठीं

त्याचा खुद्द चुलत भाऊ उभा होता. यानं त्या विश्वांत नवागताला सहसा लाभत नसे असं महत्त्व आणि प्रतिष्ठा फ्रँकलिनला प्राप्त झाली होती.

अशाप्रकारें एका वेळीं अनेक गोष्टी करण्याच्या आणि त्या साऱ्या उत्तम प्रकारें करण्याच्या त्याच्या हातोटीनुसार त्यानं आतां अभ्यासांतली प्रगति कायम ठेवून स्थानिक नियतकालिकाच्या वार्ताहराचं आपलं काम, कायम स्वरूपाचा शिरकाव त्या नियतकालिकाच्या कचेरींत मिळावा या जिद्दीनें, तासन् तास चालविलं. त्याचबरोबर अध्यक्षीय निवडणुकीच्या मोहिमेंतदेखील तो हिरीरीनं उतरला.

निवडणुकीआधीं प्रचारमोहीम आणि वार्ताहराचं काम, या एकाच कामाच्या जणूं दोन शाखा असत. त्या कॉलेज विश्वांत एकच प्रश्न आतां प्रकर्षानं विचारला जात होता, " हार्वर्डचे अध्यक्ष मि. इलियट कोणाला मत देणार ? " हे चार्लस डब्ल्यु. इलियट १८६९ पासून हार्वर्डच्या अध्यक्ष-स्थानीं होते. हार्वर्डला प्राप्त झालेली मोठी प्रतिष्ठा त्यांच्याच प्रयत्नांनीं प्राप्त झालेली होती. त्या १९०० सालांत अध्यक्ष इलियट ही केवळ व्यक्ति उरलेली नव्हती, ती विभूति मानली जाऊं लागली होती. अशा असामीची मुलाखत 'क्रिमसन' नियतकालिकाच्या मोठ्या संपादकालादेखील केवळ अप्राप्य होती.

वरचा संपादक देखील जिथं पाऊल ठेवूं धजणार नाहीं तिथं डोक्यांत वारा शिरलेला नवखा कॉलेज विद्यार्थी फ्रँकलिन धडाक्यानं घुसला. घरीं आणि परदेशीं मोठ्या माणसांबरोबर बोलण्या–वागण्याची संवय त्याला पूर्वीपासून होतीच. त्यानं अध्यक्ष इलियट यांना गांठलं आणि 'येत्या निवडणुकींत आपण कोणाला मत देणार ?' असा सवाल टाकला. त्यांची मुलाखत त्यानं मिळवली अणि तसाच धांवत 'क्रिमसन'च्या कचेरीत तो गेला. पुढच्याच अंकांत, ठळक शीर्षकांनिशीं ही मुलाखत प्रसिद्ध झाली. तिचं शीर्षक होतं, 'अध्यक्ष इलियट, मॅककिन्ले यांनाच मत देणार !'

निवडणुकीआधींची रात्र. वार मंगळवार. हार्वर्ड आणि मॅसाच्युसेटस इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजीचे रिपब्लिकन पक्षाचे पुरस्कर्ते विद्यार्थी एकत्र जमले आणि पलित्यांची एक प्रचंड मिरवणूक त्यांनीं काढली.

घरच्या पत्रांत फ्रँकलिननं याविषयीं लिहिलं होतं, 'आम्ही लाल टोप्या आणि झगे परिधान केले होते. वर्गावर्गांच्या गटानं बोस्टनच्या साऱ्या प्रमुख

रस्त्यांतून—म्हणजे सुमारें आठ मैल—आम्हीं फिरलों. आमची ही ' फेरी ' पाहण्यासाठीं तुफान गर्दी झालेली होती. ती संपली तेव्हां थकव्यानं आम्हीं पार गळून गेलों होतों. '

न्यूयॉर्क शहरांतलं ' रेनेशॉन्स ' हॉटेल हेंच पुढला कांहीं काय रूझवेल्ट कुटुंबाचं निवासस्थान झालं. फ्रॅंकलिनच्या, रुग्ण शय्येवरच्या वडिलांची सेवा त्याची आई सारा इथं राहून करीत होती. नोव्हेंबरच्या सुरुवातीला कॅरोलिनांतील आइकेन इथं तिनं एक छोटेसं घर भाड्यानं घेतलं. हेतु हा कीं, पतीला घेऊन त्या सौम्य हवेवर जाऊन रहावं. परंतु ती तिथं कधींच पोहोंचली नाहीं. नोव्हेंबरच्या मध्याला जेम्स रूझवेल्ट यांना हृदयविकाराचा आणखी एक झटका आला. फ्रॅंकलिननं आईला लिहिलं, " बाबांना विश्रांति घ्यायला लाव. "

डिसेंबरमध्यें आई—वडिलांपाशींच जाऊन राहाण्याचं त्यानं ठरवलं. त्याचा सावत्र भाऊ रोझीदेखील तिथं येऊन राहणार होता. १९०० च्या ८ डिसेंबरला ही सर्व मंडळीं एकत्र जमलीं असतां त्या दिवशीं जेम्स रूझवेल्ट निवर्तले. त्यांचं वय तेव्हां बाहात्तर वर्षांचं होतं.

या निमित्तानं पुष्कळ वर्षांनीं फ्रॅंकलिन आणि त्याची आई एकमेकांच्या खूपच जवळ आलीं. आणि केंब्रिजला जाण्यासाठीं निघतांना फ्रॅंकलिनचं आणि त्याच्या आईचं ठरलं होतं कीं, पहिल्या वर्षाची परीक्षा होतांच फ्रॅंकलिननं आईला घेऊन युरोपची सफर करायची. तिच्या दुःखी मनाला विरंगुळा वाटावा हा यांतील हेतु होता.

तो केंब्रिजला परतला, मागें पडलेला अभ्यास त्यानं बरोबरीनं आणला. करायची राहिलेलीं कामं पुन्हां सुरू केलीं. आतां त्याला कळविण्यांत आलं कीं, ' क्रिमसन 'च्या संपादकीय मंडळावर त्याला कायम स्वरूपांत नियुक्त करण्यांत आलेलं होतं. यासाठीं अनेकांच्या बरोबर त्याला मोठी स्पर्धा करावी लागलेली होती. यांतूनच हेव्यादाव्यांना जन्म मिळाला होता, आणि यांतच राजकीय मोहिमेंतली पक्ष-प्रचाराची हिरीरी त्याला शत्रू निर्माण करण्याला कारणीभूत झालेली होती. आतां आयुष्याचं सगळं स्वरूपच भराभर बदलूं लागलेलं होतं. निरागसतेचा काळ संपलेला होता. आपल्याला काय वाटतं तें ओळखण्याचा आणि निश्चितपणें ठरविण्याचा काळ आलेला होता. आपली बाजू, आपला पक्ष, आतां पक्का होणं आवश्यक होतं आणि आपली बाजू ठरविल्यानंतर

साऱ्यांनींच त्या बाजूनं असावं, अशी अपेक्षा करावी हेंदेखील योग्य ठरणार नव्हतं. हार्वर्डमधल्या जीवनाविषयीं आतां नव्यानं एक गोष्ट त्याला उमजूं लागली होती. साऱ्याच विद्यार्थ्यांना त्याच्यासारखी उंची राहणी परवडत नव्हती. बरेचसे वसतिगृहाच्या जुन्या इमारतींतून रहात. या भागाला ' यार्ड ' असं नांव होतं. आणखी कित्येक कॉलेजच्या आवाराबाहेरील स्वस्तांतल्या जागांतून रहात. आणि अभ्यासाव्यतिरिक्तची आपली शक्ति, जी फ्रॅंकलिन कॉलेजांतल्या अवांतर चळवळींमध्यें वापरीत असे, ते हार्वर्डमध्यें शिकतां यावं यासाठीं अर्थार्जन करण्यांत कारणीं लावीत. यांतील कित्येक मुलें वृत्तीनं अतिशय चांगली आणि स्वभावानं उमदीं होतीं. कोण कसा राहतो आणि त्याचा दर्जा काय, असल्या गोष्टींचा विचार त्यांना शिवत नसे. शक्य असतं तरी तीं स्वतः अशाप्रकारचं चैनी जीवन जगलीं नसतीं. नियतकालिकाचा वार्ताहर या नात्यानं फ्रॅंकलिनची यांतल्या कित्येकांशीं जानपहेचान झाली, आणि या निमित्तानं उच्चवर्गीय संपन्न आणि संरक्षित अशा सामाजिक पातळीपलीकडे जीवन असूं शकतं, हें त्याला नव्यानंच समजून आलं. कुणा विद्यार्थ्यांना तर जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठीं उपासतापास काढावे लागत हें कळतांच त्याच्या अंगावर कांटा उभा राहिला.

वार्ताहर म्हणून त्याच्या पहिल्याच वर्षी तो या कॉलेजविश्वांत वारंवार नजरेंत भरत होता. नवीन एक खळबळजनक बातमी त्यानं नियतकालिकाला मिळवून दिली. अमेरिकेचे उपाध्यक्ष टेडी रूझवेल्ट केंब्रिजला आले होते आणि हार्वर्डचे सरकारी प्राध्यापक ॲबट लॉरेन्स लोवेल यांच्याकडे त्यांचा मुक्काम होता. ॲमी लोवेल यांचे हे बंधू, आणि परलोकवासी जेम्स रसेल लोवेल यांचे आप्त. पुनश्च एकदां आत्मविश्वासानं उफाळणाऱ्या निमुळत्या हनुवटीच्या, नाकाच्या शेंड्यावर बिन-काड्यांचा चष्मा रुबाबशीरपणें मिरवणाऱ्या या उत्साही वार्ताहरानं टेलिफोन उचलला. प्रोफेसर लोवेल यांच्या घरीं फोन केला आणि आपल्या चुलत भावाशीं बोलण्याची इच्छा व्यक्त केली. उपाध्यक्ष थिओडोर रूझवेल्ट तात्काळ फोनवर आले आणि वार्ताहार रूझवेल्टनं मुलाखतीची विनंती केली. उपाध्यक्ष रूझवेल्ट उत्तरले, " कां नाहीं, कां नाहीं ? उद्यां सकाळीं प्रोफेसर लोवेल यांच्या तासानंतर लागलीच मी तुझी भेट घेईन. त्यांच्या तासाला मी ' राज्ययंत्रणे 'वर भाषण करणार आहे. "

ते असं कांहीं करणार होते हें कुणालाच कळलेलं नव्हतं. या विषयीं अतिशय गुप्तता राखण्यांत आलेली होती. फ्रँकलिन तसाच वायुवेगानं नियत-कालिकाच्या कचेरींत पोहोंचला आणि त्यानं सकाळच्या अंकासाठीं बातमी लिहिली, ' उपाध्यक्ष थिओडोर रूझवेल्ट हे आज सकाळीं ९ वाजतां सँडर्स थिएटरमध्यें राज्ययंत्रणेवर विद्यार्थ्यांसाठीं भाषण करणार ! न्यूयॉर्कचे गव्हर्नर या नात्यानं आलेल्या अनुभवांविषयीं या वेळीं मि. रूझवेल्ट हे बोलतील. ''

आणि सकाळीं नऊपूर्वींच कितीतरी वेळापासून सँडर्स थिएटरांत विद्यार्थ्यांची नुसती भाऊगर्दी उसळून राहिली.

आईला लिहिलेल्या एका पत्रांत अतिशय विजयी सुरांत फ्रँकलिननं हा प्रसंग वर्णन केला होता, आणि नंतर युरोपच्या सफरींत दोघांना पुरेशीं उसंत लाभतांच पत्रांत लिहिणं जमलं नव्हतं असा हार्वर्डविषयक सारा वृत्तांत त्यानं तिला ऐकविला. राज्ययंत्रणा आणि अर्थशास्त्र हे विषय त्याला आतां आवडूं लागले होते. यानंतर या विषयांचा विशेष अभ्यास करण्याचा मनसुबा त्यानं आंखला होता.

तो म्हणाला, " आतां थोड्या काळांतच हार्वर्ड युनियन तयार होईल. ''

आईच्या भुंवया उंचावल्या. तिनं विचारलं, " हार्वर्ड युनियन ! हें आणखी काय ? ''

तेव्हां त्यानं आईला सांगितलं तें आपल्या उच्चवर्गीय प्रवृत्ति कटाक्षानं जपणाऱ्या त्या बाईला अनपेक्षित होतं. त्यानं सांगितलं कीं, हार्वर्डमध्यें विद्यार्थ्यांच्या जाती पडलेल्या होत्या. त्यांचे वर्ग निर्माण झालेले होते. आणि याबाहेर संमिश्र आणि विशुद्ध लोकशाहीवृत्तीचं असं जीवन जवळजवळ अशक्य होतं. या परिस्थितींत या हार्वर्ड युनियनच्या इमारतीसाठीं मेजर हेन्री ली हिगिन्सन यांनीं आर्थिक सहाय्य केलं होतं आणि क्वीन्स स्ट्रीटवर ही हार्वर्ड युनियनची इमारत उभी राहणार होती. हा एक क्लब असणार होता. इतर कोणत्याहि क्लबचे सदस्य नसलेल्या विद्यार्थ्यांना, विशेषतः पहिल्या वर्षाच्या विद्यार्थ्यांना, इथं प्रवेश देण्यांत येणार होता. इथं कुणालाहि सभा घेतां येणार होत्या, समारंभ करता येणार होते. अगर येथल्या लायब्ररींत बसून अभ्यास करतां येणार होता. कुणालाहि,

आईनं विचारलं, " मग तूं या क्लबमध्यें दाखल होणार आहेस कीं काय ? "

" नक्कीच. "

" पण खरं म्हणजे तुला आतां लौकरच इतर क्लबमध्यें प्रवेश मिळूं शकेल ! "

फ्रॅंकलिन मनापासून आणि मोठ्यानं हंसला. आईला त्यानं सांगितलं कीं, " तूं मुळीच काळजी करूं नकोस. या नव्या क्लबचा सदस्य मी मोठ्या आनंदानंच होत आहे. "

सागरी प्रवासाच्या या आरंभीच्या टप्प्यांतच त्याची तब्येत या खुल्या हवेंत नवा जोम धरूं लागली होती. समुद्र त्याला आवडूं लागला होता. जहाजं, बोटी आवडूं लागल्या होत्या. या अशा प्रकारच्या मोठ्या उतारवाहू बोटींचा एकच दोष त्याला जाणवूं लागला होता. तो असा कीं, ही बोट तो स्वतः चालवूं शकत नव्हता.

पुढें प्रवासाहून परतल्यावर त्याच्या एकाकी आईनं बोस्टनमध्यें घर भाड्यानं घेतलं. मुलाच्या गांठी वारंवार पडाव्यात हीच यामागची इच्छा होती. वारंवार या घरीं आईपाशीं राहूनदेखील कधीं अधल्या मधल्या काळांत फ्रॅंकलिन कॉलेजांतून आईला पत्र लिही. यांतल्या आरंभीच्या एका पत्रांत त्यानं म्हटलं होतं. " हार्वर्ड युनियनचे उद्घाटन काल रात्रीं झालं. या निमित्तानं झालेला समारंभ दृष्ट लागण्यासारखा होता. " फ्रॅंकलिन याबरोबरच उच्चवर्गीय विद्यार्थ्यांच्या ' फ्लाय ' क्लबचादेखील सदस्य झाला हें ऐकून त्याच्या आईला तेवढंच जरा बरं वाटलं.

अद्यापहि त्याची आई आणि तो हाईड पार्क आणि न्यूयॉर्क इथं सुट्ट्यांमध्यें जाऊन रहात. एव्हांना त्या वेळचे अध्यक्ष मॅककिन्ले यांचं निधन घडलेलं होतं आणि टेडी रूझवेल्ट अमेरिकेचे अध्यक्ष झालेले होते. सुट्टींत कांहीं वेळां या आईमुलांच्या फेऱ्या व्हाईट हाऊसवरदेखील होत.

पहिल्या वर्षाच्या अखेरीस, हाईडपार्कला न्यूयॉर्क सेंट्रल गाडींतून नेहमीप्रमाणें परतत असतां वरवर मामुली वाटणारी एक घटना घडली आणि ती ऐतिहासिक महत्त्वाची ठरली. एका जागीं बसून राहणं फ्रॅंकलिनला बेचैन करीत होतं. तो गाडींतून चालूं लागला आणि एका डब्यांतून असा चालत जात असतां एका चेहऱ्यानं त्याची विचार-शृंखला मध्येंच खळदिशीं तोडली. हा

चेहरा पाहतांक्षणींच त्यानं ओळखला. ही त्याची चुलत बहीण एलिनॉर रूझवेल्ट. मध्यंतरीच्या तीन वर्षांच्या काळांत केवढी बदलली होती ती! रूझवेल्ट परिवारांत शोभेल अशी तिची उंची आतां वाढली होती. आणि तिचा उंच, सडसडीत, प्रमाणबद्ध बांधा, प्रौढ स्त्रियां वापरीत त्या प्रकारच्या पायघोळ अद्ययावत् झग्यानं शोभत होता.

एलिनॉरला पाहतांच फ्रँकलिनची मुद्रा उजळली. त्याच्या चेहऱ्यावर स्मित उमललं आणि हस्तांदोलनासाठीं त्यानं हात पुढें केला. दोघांतहि त्या जुन्या पंधरा–सोळा वर्षांच्या काळांतला अवघडपणा आतां उरला नव्हता. थोडा संकोच मात्र तिच्यामध्ये जाणवत होता. ती निघाली होती घरी टिव्होलीला. तीन वर्षांचा आपला युरोपांतला शिक्षणक्रम पुरा करून.

तो तिला म्हणाला, “ आई आहे माझ्याबरोबर. तूं चल ना. आमच्या-बरोबर पुढें चल. निदान हाईड पार्क येईपर्यंत आपण गप्पातरी करूं. ”

उरलेला प्रवास गप्पागोष्टींत केव्हां संपला ते कुणाला कळलंच नाहीं. एलिनॉरनं आजवर उच्चवर्गीय प्रतिष्ठित समाजांत वावरलेल्या मिसेस् रूझवेल्टना बाहेर देशींच्या आपल्या तीन वर्षांच्या वास्तव्यांतले एकेक अनुभव सांगितले. आणि मिसेस् रूझवेल्ट अक्षरशः बावरून गेल्या. एलिनॉरनं लंडनच्या एका उपनगरांत राहून मॉयसेल सोव्हेस्ट्र यांच्या शाळेंत अध्ययन केलं होतं आणि अतिशय अभ्यासू मनानं ती युरोपांतून फिरली होती. मॉयसेल सोव्हेस्ट्र यांची समज, त्यांचा बौद्धिक आवाका आणि त्यांचीं मानवतावादी मतं फ्रँकलिनला आणि त्याच्या आईला सांगतांना एलिनॉरची मुद्रा कशी उजळून निघाली होती! एलिनॉर आणखी बडबडतच होती. तिचे आप्त आणि तिचे शिक्षक यांनीं संगीताविषयीं तिच्यांत गोडी निर्माण व्हावी म्हणून पराकाष्ठा केली होती; परंतु त्याचा कांहींएक उपयोग झालेला नव्हता. एक वर्षी तिच्या खोलींत तिची सोबतीण म्हणून एक देखणी जर्मन मुलगी राहिली होती. तसंच तिनं कित्येक सुट्ट्या फ्रान्समधल्या एका फ्रेंच कुटुंबांत काढल्या होत्या. हेतु हा कीं, तिचं फ्रेंच सुधारावं.

तिनं सांगितलं, “ दिवस फटफटतांच पॅरिसचं पहिलं दर्शन मला घडलं, तें जणूं एक स्वप्न वाटलं! ‘ आतां पॅरिस नको ’ असं चुकूनदेखील कधीं मला वाटल्याचं स्मरत नाहीं. ”

एलिनॉरचं स्वप्न तिला जगतां यावं यादृष्टीनं तिची आत्या टिसी आणि मावशी मिसेस स्टॅन्ले मॉर्टिमर या पॅरिसमध्यें राहत होत्या हें फार बरं झालं होतं.

एलिनॉरच्या शिक्षणाविषयींची ही हकीगत ऐकून सारा रूझवेल्ट यांना अतीव समाधान वाटलं. त्यांची खात्री पटली कीं, मुलांना बाहेरदेशचा प्रवास आणि इतर भाषांचा व्यासंग हा अत्यावश्यकच होता. एलिनॉरनं बेल्जियम, जर्मनी, स्वित्झर्लंड आणि इटाली याहि देशांतून भ्रमंती केली होती याचा त्यांना विशेष आनंद वाटला.

एलिनॉर म्हणाली, "सगळ्यांची इच्छा अशी कीं, मी आतां पुढारलं पाहिजे. माणसांत पुष्कळ मिसळलं पाहिजे."

"अर्थात्" फ्रँकलिनच्या आईनंदेखील यावर ठांसून म्हटलं.

एलिनॉरची आजी मिसेस् हॉल, तिचा बराचसा काळ टिव्होलीच्या घरीच व्यतीत करी. एलेनॉरनं मात्र तिची मावशी एडिथ लिव्हिंगस्टन हॉल हिच्याकडे जाऊन रहायचं ठरविलं होतं. न्यूयॉर्क शहरांत, वेस्ट थर्टिसेन्हन्थ स्ट्रीटवर ही मावशी राही. इथून माणसांमध्यें मिसळणं, त्यांच्या गांठीभेटी होणं सुलभ होतं.

फ्रँकलिननं तिला आश्वासन दिलं, "आमच्याकडच्या समारंभांना तुला आमंत्रण येत जाईलच." आणि त्याच्या आईनं मान हलवून याला दुजोरा दिला.

ज्या वेळीं हें घडत होतं तेव्हां, या घटनेला कांहीं अधिक महत्त्व आहे असं कुणालाच चुकूनहि वाटलं नसेल. हाईड पार्कला फ्रँकलिन आणि त्याची आई एलिनॉरचा निरोप घेऊन गाडींतून उतरलीं आणि कॅम्पोबेलोला जाऊन राहण्याची योजना आंखण्यांत तीं दोघं लवकरच गढून गेलीं. मृत्युपूर्वीच्या उन्हाळ्यांत जेम्स रूझवेल्टनीं विकत घेतलेली साठ फुटी 'हाफ मून, सेकंड' ही नौका मिसेस् रूझवेल्ट विकूं इच्छित होत्या. परंतु अद्याप तिला गिऱ्हाईक मिळालं नव्हतं. या नौकेंतून समुद्रावर जाणं फ्रँकलिनला एवढें आवडूं लागलं कीं, तिला गिऱ्हाईक मिळत नाहीं याचा त्याला आनंदच वाटूं लागला.

फ्रँकलिन हार्वर्डला परतला. आतां इतिहास आणि राज्ययंत्रणा या त्याच्या आवडीच्या विषयांनीं त्याचे दिवस कसे व्यापून टाकले होते. 'फ्लाय' क्लब आणि हार्वर्ड युनियन या दोहोंच्या ग्रंथालय समित्यांवर त्याची नियुक्ति

झालेली होती आणि हीं ग्रंथालये अधिक संपन्न करण्याच्या दृष्टीनं जुन्या पुस्तकांचे ढीग उकरण्याच्या कामांत फ्रँकलिनचा बराचसा मोकळा वेळ जाऊं लागला होता. एव्हांना नियतकालिकाचा तो एक संपादक झाला होता. आणि पुढल्या वर्षाभरांत 'हेस्टी पुडिंग क्लब'चा देखील त्याला सदस्य करून घेण्यांत आलं. तथापि, अतिशय उच्चवर्गीय समजल्या जाणाऱ्या 'पोलिअन' या क्लबनं मात्र त्याची उपेक्षाच चालविली होती. कदाचित् याचं कारण असं असेल कीं, "यार्ड" मधल्या गरीब विद्यार्थ्यांशीं तो फारच मिसळत होता. अधिक लोकशाही वृत्तीच्या युनियन क्लबसाठीं पुष्कळ झटत होता आणि त्याच्या स्वतःच्या सामाजिक दर्जाची जाणीव त्याच्या वागण्या वावरण्यांत कांटेकोरपणानं दिसेनाशी झाली होती.

पुढल्या हिवाळी सुटींत त्यानं आणि त्याच्या आईनं हाईड पार्क, न्यूयॉर्क शहर आणि वॉशिंग्टन अशी पुष्कळ भ्रमंती केली आणि अधूनमधून कुठेंना कुठें, कसल्या ना कसल्या समारंभाच्या निमित्तानं एलिनॉरच्या आणि त्याच्या गांठी आतां पडतच होत्या. समारंभ सोहोळ्यांना साजेशा पोषाखांत जेव्हां एलिनॉर येई तेव्हां केवढी मोहक वाटे!

राष्ट्रीय आणि जागतिक घडामोडींचा अद्ययावत् व्यासंग ही मुलगी ठेवते आणि अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाची भाची खऱ्याखुऱ्या अर्थानं शोभते असं फ्रँकलिनला दिसून आलं होतं. उच्चवर्गीय मुली ज्या प्रकारच्या गोष्टींत आपला बराचसा वेळ घालवीत त्या गोष्टींऐवजी समाजकल्याणासाठीं झटण्याची एलिनॉरची वृत्ति फ्रँकलिनला फार आवडूं लागली होती.

एलिनॉर म्हणाली, "माझी आजी आणि माझी मावशी मी जें करते आहे त्यामुळें फार अस्वस्थ होतात. त्यांचं म्हणणं योग्यसा नवरा शोधून काढण्याऐवजीं चिल्ड्रन एड सोसायटीसारख्या संस्थांच्या कामांत लक्ष घालून मी माझ्या आयुष्याचा चक्क अपव्यय करते आहे."

फ्रँकलिननं विचारलं, "अग पण, तुझ्या आजोबांनींच ना ही संस्था स्थापन केली?"

एलिनॉर म्हणाली, "छे, छे, ते तिचे फक्त एक विश्वस्त होते. पण त्यांनी वर्तमानपत्रे विकणाऱ्या मुलांसाठीं क्लब हाऊसेस् चालूं केलीं होतीं आणि 'थँक्स

गिव्हिंग डे' ला ते स्वतः जाऊन तिथल्या 'थँक्स गिव्हिंग' च्या जेवणाला हजर राहून व्यवस्था पहात असत."

"जगामध्यें भणंग माणसं पुष्कळ आहेत."

"आहेत ना! पुष्कळ आहेत. कित्येकांना तर जगण्यापुरते दोन घास मिळविण्यासाठीं सतत जणूं एक लढाई लढावी लागते. न्यूयॉर्क शहरांत 'हेल्स किचन' म्हणून एक भाग आहे. तिथं कधीं तूं गेला आहेस?"

फ्रँकलिननं नकारार्थी मान हलविली, परंतु नंतर पहिल्या संधीला न्यूयॉर्क शहराच्या खालच्या पूर्व भागांत वसलेल्या गरीबांच्या वस्त्यांमधून तो हिंडला. रिव्हिंग्टन स्ट्रीटवरच्या एलिनॉर चालवीत असे त्या गरीब मुलींच्या शाळेला त्यानं मुद्दाम भेट दिली. तो तिथं गेला तेव्हां एलिनॉर लहान लहान मुलींना नृत्य शिकवीत होती. हा नवखा पाहुणा पाहतांच त्या मुलींनीं त्याच्या भोंवतीं नुसती गर्दी केली आणि त्या त्यांच्या 'बाईना' विचारूं लागल्या, "बाई बाई, हे तुमचे 'हे' वाटतं?"

हाईड पार्कच्या घरच्या एका मेजवानीला त्याच्या आईनं एलिनॉरला बोलावलं, तेव्हां फ्रँकलिनच्या आनंदाला पारावार राहिला नाही. मात्र आपला आनंद दिसूं नये म्हणून त्यानं प्रयत्नांची पराकाष्ठा चालविली होती. तरीहि हें खरं कीं एलिनॉरविषयीं त्याच्या मनांत एक जिव्हाळा अधिकाधिक दृढमूल होत चालला होता.

त्या वर्षाअखेरीं 'बॅचलर ऑफ आर्टस्' च्या त्याच्या पदवीसाठीं आवश्यक तेवढे गुण त्यानं मिळविले होते आणि हार्वर्ड सोडून तो जाऊं शकत होता. पण त्याच्या इतर चळवळींमुळें त्याला हार्वर्डमध्यें रहावें लागलें. 'फ्लाय' क्लबचा तो प्रमुख ग्रंथपाल होता. येत्या वर्षासाठीं हेस्टी पुडिंग ग्रंथपाल म्हणून त्यालाच नियुक्त केलं होतं आणि हार्वर्डच्या नियतकालिकाचा प्रमुख संपादक म्हणून येत्या वर्षीं त्याची नेमणूक झाली होती. आईची संमति मिळवून चवथ्या वर्षासाठीं तो हार्वर्डला पुन्हां परतला आणि आतां त्यानं त्याचं सारं लक्ष नियतकालिकाच्या संपादनांतच एकवटलं. केव्हांपासून त्याला वाटत होतं कीं, या नियतकालिकाचं स्वरूप फार रूक्ष आहे, फार कोरडं आहे, अनाकर्षक आहे. आतां त्यांत तो चैतन्य आणणार होता. एकीकडे एम. ए. च्या पदवीसाठीं इतिहास आणि अर्थशास्त्राचा अभ्यास धीमें

धीमं चालूं होता, परंतु नियतकालिकाचं संपादन हाच त्याचा मुख्य ध्यास होता; हव्यास होता. खरं म्हणजे तसा मुख्य ध्यास वेगळाच होता कारण एव्हांना त्याला कळून चुकलं होतं कीं, एलिनॉरच्या प्रेमांत आपण पडलों आहोंत! आणि शक्य होईल तेव्हां तेव्हां तो आतां तिच्या गांठी घेत होता, तिचं प्रियाराधन करीत होता. अशा त ती व्हाईटलॉ रीड यांची कन्या जीन रीड हिच्याबरोबर सेटलमेंट हाऊसवर काम करीत होती. हे रीड 'न्यूयॉर्क ट्रिब्यून' या वृत्तपत्राचे धनी होते. पुढें या वृत्तपत्राचें रूपांतर 'हेरॉल्ड ट्रिब्यून' या वृत्तपत्रांत झालं. एलिनॉर मोठी मोठी डिपार्टमेंट स्टोअर्स आणि तयार कपड्यांच्या कारखान्यांत काम करणाऱ्या मुलींच्या परिस्थितीविषयीं संशोधन करण्याच्या कार्मी कंझ्युमर्स लीग या संस्थेला मदत करीत होती. फ्रँकलिनला याविषयीं फार कौतुक होतं. कारण समाजसुधारणेच्या तिच्या निर्धारामुळें स्वतःतल्या लाजाळूपणाशीं आणि संकोचीपणाशीं तिला केवढा झगडा द्यावा लागत असेल याची त्याला कल्पना होती.

या प्रकारच्या सुधारणांबाबतींत त्यालादेखील आतां एक प्रकारची हिरीरी वाटत असे आणि आतां हार्वर्डच्या 'क्रिमसन' या नियतकालिकाचा प्रमुख संपादक असल्यामुळें हार्वर्डच्या विश्वांत अत्यावश्यक अशा कांहीं सुधारणा घडवून आणण्याबाबतींत तो आतां मोहीम उघडूं शकत होता. हार्वर्डचा फुटबॉल संघ असावा तितका चांगल्या स्थितींत नाहीं याविषयीं त्यानं नियतकालिकांतून प्रखर टीका केली. या संघांतील खेळाडूंना पुरेसा पाठिंबा न दिल्याबद्दल विद्यार्थी संघाला त्यानं दोष दिला. हार्वर्ड युनियनकडे जाणारी वाट कच्ची होती. तिच्यावर चिखल होई. ही वाट पक्की झाली पाहिजे, असं प्रतिपादन त्यानं नियतकालिकांतून चालविलं. मुलांचीं कित्येक वसतिगृहें आगीचे सांपळे ठरावीत इतकीं धोक्याचीं होतीं. आणि आग लागण्याचा संभव गृहित धरून त्यांत सोई करण्यांत याव्यात अशी मागणी त्यानं केली.

नियतकालिकाच्या संपादकीय पानावर त्याला राजकीय घडामोडींविषयीं लिहावं लागे. आदल्याच जानेवारी महिन्यांत तो एकवीस वर्षांचा झाला होता आणि येत्या नोव्हेंबरमध्यें त्याला मतदान करतां येणार होतं. राजकारणावरच्या त्याच्या मतांना आतां एक नवा अर्थ प्राप्त झाला होता. अमेरिकेच्या अध्यक्षपदीं असलेल्या टेडी रूझवेल्ट यांच्या अनेक धोरणांविषयीं त्याचे आतां

गिव्हिंग डे' ला ते स्वतः जाऊन तिथल्या 'थँक्स गिव्हिंग' च्या जेवणाला हजर राहून व्यवस्था पहात असत."

"जगामध्यें भणंग माणसं पुष्कळ आहेत."

"आहेत ना! पुष्कळ आहेत. कित्येकांना तर जगण्यापुरते दोन घास मिळविण्यासाठीं सतत जणूं एक लढाई लढावी लागते. न्यूयॉर्क शहरांत 'हेल्स किचन' म्हणून एक भाग आहे. तिथं कधीं तूं गेला आहेस?"

फ्रँकलिननं नकारार्थी मान हलविली, परंतु नंतर पहिल्या संधीला न्यूयॉर्क शहराच्या खालच्या पूर्व भागांत वसलेल्या गरीबांच्या वस्त्यांमधून तो हिंडला. रिव्हिंग्टन स्ट्रीटवरच्या एलिनॉर चालवीत असे त्या गरीब मुलींच्या शाळेला त्यानं मुद्दाम भेट दिली. तो तिथं गेला तेव्हां एलिनॉर लहान लहान मुलींना नृत्य शिकवीत होती. हा नवखा पाहुणा पाहतांच त्या मुलींनीं त्याच्या भोंवतीं नुसती गर्दी केली आणि त्या त्यांच्या 'बाईना' विचारूं लागल्या, "बाई बाई, हे तुमचे 'हे' वाटतं?"

हाईड पार्कच्या घरच्या एका मेजवानीला त्याच्या आईनं एलिनॉरला बोलावलं, तेव्हां फ्रँकलिनच्या आनंदाला पारावार राहिला नाही. मात्र आपला आनंद दिसूं नये म्हणून त्यानं प्रयत्नांची पराकाष्ठा चालविली होती. तरीहि हें खरं कीं एलिनॉरविषयीं त्याच्या मनांत एक जिव्हाळा अधिकाधिक दृढमूल होत चालला होता.

त्या वर्षाअखेरीं 'बॅचलर ऑफ आर्टस्' च्या त्याच्या पदवीसाठीं आवश्यक तेवढे गुण त्यानं मिळविले होते आणि हार्वर्ड सोडून तो जाऊं शकत होता. पण त्याच्या इतर चळवळींमुळें त्याला हार्वर्डमध्यें रहावें लागलें. 'फ्लाय' क्लबचा तो प्रमुख ग्रंथपाल होता. येत्या वर्षासाठीं हेस्टी पुडिंग ग्रंथपाल म्हणून त्यालाच नियुक्त केलं होतं आणि हार्वर्डच्या नियतकालिकाचा प्रमुख संपादक म्हणून येत्या वर्षी त्याची नेमणूक झाली होती. आईची संमति मिळवून चवथ्या वर्षासाठीं तो हार्वर्डला पुन्हां परतला आणि आतां त्यानं त्याचं सारं लक्ष नियतकालिकाच्या संपादनांतच एकवटलं. केव्हांपासून त्याला वाटत होतं कीं, या नियतकालिकाचं स्वरूप फार रूक्ष आहे, फार कोरडं आहे, अनाकर्षक आहे. आतां त्यांत तो चैतन्य आणणार होता. एकीकडे एम. ए. च्या पदवीसाठीं इतिहास आणि अर्थशास्त्राचा अभ्यास धीमें

धीमें चालूं होता, परंतु नियतकालिकाचं संपादन हाच त्याचा मुख्य ध्यास होता; हव्यास होता. खरं म्हणजे तसा मुख्य ध्यास वेगळाच होता कारण एव्हांना त्याला कळून चुकलं होतं कीं, एलिनॉरच्या प्रेमांत आपण पडलों आहोंत! आणि शक्य होईल तेव्हां तेव्हां तो आतां तिच्या गांठी घेत होता, तिचं प्रियाराधन करीत होता. अशा त ती व्हाईटलॉ रीड यांची कन्या जीन रीड हिच्याबरोबर सेटलमेंट हाऊसवर काम करीत होती. हे रीड 'न्यूयॉर्क ट्रिब्यून' या वृत्तपत्राचे धनी होते. पुढें या वृत्तपत्राचें रूपांतर 'हेरॉल्ड ट्रिब्यून' या वृत्तपत्रांत झालं. एलिनॉर मोठी मोठी डिपार्टमेंट स्टोअर्स आणि तयार कपड्यांच्या कारखान्यांत काम करणाऱ्या मुलींच्या परिस्थितीविषयीं संशोधन करण्याच्या कामीं कंझ्युमर्स लीग या संस्थेला मदत करीत होती. फ्रँकलिनला याविषयीं फार कौतुक होतं. कारण समाजसुधारणेच्या तिच्या निर्धारामुळें स्वतःतल्या लाजाळूपणाशीं आणि संकोचीपणाशीं तिला केवढा झगडा द्यावा लागत असेल याची त्याला कल्पना होती.

या प्रकारच्या सुधारणांबाबतींत त्यालादेखील आतां एक प्रकारची हिरीरी वाटत असे आणि आतां हार्वर्डच्या 'क्रिमसन' या नियतकालिकाचा प्रमुख संपादक असल्यामुळें हार्वर्डच्या विश्वांत अत्यावश्यक अशा कांहीं सुधारणा घडवून आणण्याबाबतींत तो आतां मोहीम उघडूं शकत होता. हार्वर्डचा फुटबॉल संघ असावा तितका चांगल्या स्थितींत नाहीं याविषयीं त्यानं नियतकालिकांतून प्रखर टीका केली. या संघांतील खेळाडूंना पुरेसा पाठिंबा न दिल्याबद्दल विद्यार्थी संघाला त्यानं दोष दिला. हार्वर्ड युनियनकडे जाणारी वाट कच्ची होती. तिच्यावर चिखल होई. ही वाट पक्की झाली पाहिजे, असं प्रतिपादन त्यानं नियतकालिकांतून चालविलं. मुलांचीं कित्येक वसतिगृहें आगीचे सांपळे ठरावीत इतकीं धोक्याचीं होतीं. आणि आग लागण्याचा संभव गृहित धरून त्यांत सोई करण्यांत याव्यात अशी मागणी त्यानं केली.

नियतकालिकाच्या संपादकीय पानावर त्याला राजकीय घडामोडींविषयीं लिहावं लागे. आदल्याच जानेवारी महिन्यांत तो एकवीस वर्षांचा झाला होता आणि येत्या नोव्हेंबरमध्यें त्याला मतदान करतां येणार होतं. राजकारणावरच्या त्याच्या मतांना आतां एक नवा अर्थ प्राप्त झाला होता. अमेरिकेच्या अध्यक्षपदीं असलेल्या टेडी रूझवेल्ट यांच्या अनेक धोरणांविषयीं त्याचे आतां

मतभेद होते. कॉंग्रेसपेक्षां राष्ट्राध्यक्ष पद अधिक मातब्बर बनविण्याच्या प्रयत्नांत राज्ययंत्रणेचा तोल टेडी रूझवेल्ट बिघडवीत होते असं त्याचं स्वच्छ मत होतं. त्याच्या वडिलांच्या पक्षाविषयीं आतां त्याला नव्यानं आपुलकी वाटूं लागली होती आणि हाईड पार्कला जाऊन त्यानं आपलं मतदान केलं तें डेमॉक्रॅटिक पक्षाच्या उमेदवाराच्या बाजूनं.

त्याच नोव्हेंबर महिन्यांत पुन्हां एकदां 'थॅक्स गिव्हिंग' साठीं त्याला हाईड पार्कला जावं लागलं. हाईड पार्कला 'थॅक्स गिव्हिंग'चें कित्येक सोहाळे त्यानं पाहिले होते. पण त्या वर्षी त्याच्या मनांत होता तसा सोहाळा पूर्वी कधींहि घडला नसेल. त्या वर्षी या सोहळ्याची प्रमुख पाहुणी एलिनॉर असणार होती. फ्रॅंकलिन न्यूयॉर्कला गाडींत बसला तो सोबत आईला आणि एलिनॉरला घेऊनच.

हाईड पार्कला पोहोंचल्यावर पहिल्या संधीला आईला त्यानं आपला मनोदय सांगून टाकला. एलिनॉर आणि आपण प्रेमांत पडलों आहोंत. लग्नाचं वचन आपण तिला दिलं आहे आणि तीहि आपल्याशीं वचनबद्ध झाली आहे; आणि लौकरच हें लग्न व्हावं अशी आपली इच्छा आहे, असं सारं त्यानं आईला सांगितलं.

मिसेस रूझवेल्टना चांगलाच धक्का बसला. त्यांच्या आश्चर्याला पारावार नव्हता. त्यांच्या दृष्टीनं फ्रॅंकलिनचं अद्याप लग्नाचें वय झाले नव्हतें.

आणि एलिनॉर तर केवळ एकोणीस वर्षांची अजाण मुलगी होती. शिवाय त्यांच्या मनांत एक अन्य मुलगी देखील फ्रॅंकलिनसाठी होती.

अतिशय शांतपणें, काळजीपूर्वक फ्रॅंकलिननें आईशीं युक्तिवाद चालविला आणि तिची समजूत घालण्याची पराकाष्ठा केली.

एका पत्रांत त्यानं आईला लिहिलं, "प्रिय आई, आपणां दोघांना एक-मेकांविषयीं जें वाटत आलं आहे तें तसेंच वाटत राहील. त्यात कधीहि बदल घडून येणार नाहीं. फक्त आता एकच फरक होणार आहे कीं, एका ऐवजीं तुला आता दोन मुलं असतील. या दोन मुलांवर तुला प्रेम करावं लागेल आणि या दोन मुलांचं प्रेम तुला मिळेल. एलिनॉरला तुझ्याविषयीं फार फार वाटतं' आणि पुढें त्याच्याप्रमाणें त्याच्या आईला एलिनॉरचा स्वभाव कळून आला तेव्हां तसंच घडलं देखील.

सारा रूझवेल्ट रोमरोमीं एक स्त्री होत्या. त्यांनीं आपली नापसंती मनाच्या तळाशीं दडवली. आपली 'वडील' भूमिका निश्चयानं बजावली. 'थँक्स गिव्हिंग'च्या सोहळ्यांत कुटुंबांतील प्रमुख स्त्री म्हणून त्या नेहमींच्या अगत्यानं, उत्साहानं वावरल्या, मात्र एकीकडे मनाच्या एका कोपऱ्यांत, हें लग्न लांबणीवर कसं टाकतां येईल या विचारानं त्यांना पछाडून टाकलं होतं.

न्यूयॉर्कला परतल्यावर एलिनॉरनं त्यांना लिहिलेल्या विनयपूर्ण पत्रांत म्हटलं होतं, "काल माझ्याशीं इतकं चांगलं वागल्याबद्दल माझी कृतज्ञता व्यक्त करावी म्हणून या चार ओळी लिहित आहें. जें घडतं आहे त्याविषयीं आपल्या भावना काय आहेत आणि आपल्याला तें पचवणं किती कठीण जातं आहे याची कल्पना मला आहे. पण तरीहि मला वाटतं कीं, तुमच्या थोड्या तरी प्रेमाला मीं पात्र ठरावं. याची खात्री असू दे कीं, तुमच्या मना-प्रमाणं वागण्याचा मी सदैव प्रयत्न करीन. गेल्या कांहीं काळांत तुम्ही मला माझ्या आईच्या ठिकाणीं वाटूं लागलात. फ्रँकलिनविषयीं मला काय वाटतं तें शब्दांत मांडणं अशक्य आहे. पण इच्छा एकच आहे कीं, त्याची पत्नी म्हणून जगण्याला, वावरण्याला मीं योग्य ठरावं"

पुढें दोनच दिवसांनीं नियतकालिकाच्या कचेरींतून फ्रँकलिननं आईला लिहिलं, "लाडक्या आई, तुला मी किती त्रास देतोय् याची कल्पना मला आहे आणि कोणत्याहि प्रकारें शक्य असतं तर तसा त्रास देणं थांबवलं असतं. पण माझ्या मनाचा कल मला कळतो आहे. तो पक्का आहे. गेल्या बऱ्याच काळापासून त्याची जाणीव मला होत होती आणि त्याविरुद्ध वागणं मला अशक्य आहे. तसं वागण्याचा विचारहि मला असह्य होतो. परिणामीं आज मी जगांतला सर्वांत सुखी माणूस आहें आणि भाग्यवानदेखील...."

पुढल्या कांहीं दिवसांत त्याच्या आईचा निश्चय किंचितसा विरघळतो आहे अशीं चिन्हं दिसूं लागलीं, आणि पुढें एका समंजस तडजोडीला ती तयारदेखील झाली. तिनं फ्रँकलिनला लिहिलं कीं, "तूं आणि तुझ्या खोलींतला सोबती लॅथ्रॉप ब्राऊन असे दोघे कॅरिबिअन सी भागांतल्या प्रवासांत माझ्याबरोबर कांहीं दिवस रहा." या काळांत आपल्याला स्वस्थपणें साऱ्या गोष्टींचा विचार करतां येईल. फ्रँकलिननें अनुमती दिली आणि प्युएर्टोरिको, त्रिनिदाद, क्युरो-काओ, क्युबा अशा निरनिराळ्या ठिकाणीं या निमित्तानं ते तिघेजणं गेले.

तथापि मार्चला तो हार्वर्डला परतला तेव्हां त्याचा स्वतःचा निर्धार कायमच होता. किंबहुना तो अधिक दृढावला होता. एलिनॉरशींच तो लग्न करणार होता.

मिसेस रूझवेल्टनीं त्यानंतर मुलाला वॉशिंग्टनला नेलं. हेतु हा कीं लंडन-मधल्या अमेरिकन वकिलातींत सेक्रेटरी म्हणून त्याची नियुक्ति व्हावी या दृष्टीनं तिथल्या उच्च पदाधिकाऱ्यांना गांठावं आणि प्रयत्न करावा. त्याच काळांत एलिनॉर, मिसेस वुइल्यम कौल्स या तिच्या मावशीकडे वॉशिंग्टनमध्यें येऊन राहिलेली होती, आणि फ्रॅंकलिनची आई मुलाच्या संदर्भांत खटपट करण्यांत गुंतली असतांना फ्रॅंकलिन आणि एलिनॉर मात्र दिवसाचा जास्तींत जास्त वेळ एकमेकांच्या सहवासांत राहून जगत होतीं. वॉशिंग्टनमध्यें सारा रूझवेल्टना सर्वांनीं असंच सांगितलं कीं, वकिलातींत सेक्रेटरी म्हणून नियुक्ति होण्याच्या दृष्टीनं फ्रॅंकलिन अद्याप वयानें लहान आहे. हें कळल्यानंतर फ्रॅंक-लिन आणि एलिनॉर यांनीं समाधानाचा आणि सुटकेचा निश्वास सोडला.

मुलाच्या मनाप्रमाणें त्याचं लग्न करून देणं याशिवाय अन्य मार्ग मिसेस रूझवेल्ट यांना आतां उरला नव्हता. आणि त्या फ्रॅंकलिन आणि एलिनॉर एकमेकांच्या अधिक जवळ येण्यासाठीं मनापासून झटूं लागल्या. फ्रॅंकलिनच्या पदवीदानाचा सोहाळा पाहण्यासाठीं दोघी जोडीनें हार्वर्डला गेल्या. कॅम्पोवेलो बेटावर सुटींत फ्रॅंकलिनची आई आणि फ्रॅंकलिन जाऊन राहिले तेव्हां एलिनॉर त्यांच्याबरोबर गेली होती. आपला अभ्यास आपण कोठल्याहि परिस्थितींत चालूंच ठेवूं असं वचन फ्रॅंकलिननं आईला दिलं होतं आणि योग्य वेळीं कोलंबिया युनिव्हर्सिटींत त्यानं कायद्याचा अभ्यास चालू केला. एलिनॉर आणि फ्रॅंकलिन यांच्या वाङ्‌निश्चयाची रीतसर घोषणा लवकरच करण्यांत आली आणि लग्नाची तीथ देखील ठरली.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
४००११९ ...... वि: चरित्र
१२६२ ...... नों: दि: २८.१२.६५

# राज्य विधिमंडळांत

फॅंकलिन आणि एलिनॉर रूझवेल्ट यांच्या विवाहासारखा विवाह अमेरिकेंत क्वचितच झाला असेल. एलिनॉरला आई-वडील नव्हते. वडिलांकडून तिचे आप्त म्हणजे तिचे काका होते. आणि हे काका अमेरिकेचे साक्षात् राष्ट्राध्यक्ष होते. कन्यादान केलं ते राष्ट्राध्यक्ष थिओडोर रूझवेल्ट यांनीं. आणि मग विवाह सोहाळ्यांत पोलिसांचीं पथकें, गुप्तपोलिसांचें टेहेळे, साध्या पोषाखांतले डिटेक्टिव्हज समाविष्ट झाले. कारण राष्ट्राध्यक्ष जिथं जिथं जातील तिथं तिथं त्यांना संरक्षण देण्यांत यावं असा दंडक होता. एकीकडे अमेरिकेचें सरकार हा विवाहसोहळा आंखत होतें आणि दुसरीकडे सारा रूझवेल्ट या सोहळ्याचा बेत आपल्या मतानं ठरवित होत्या. या दुहेरी कांचांत वधूवरांना म्हणण्यासारखं फारच थोडं उरलं होतं.

१९०५ च्या 'सेंट पॅट्रिक्स डे' ला विवाह लागला आणि त्या निमित्तानं समारंभ घडविण्यांत आला. न्यूयॉर्क शहरांतल्या ईस्ट सेव्हण्टि सिक्स्थ स्ट्रीटवर दोन घरांत मिळून हा सोहळा पार पडला. दोन घरांचीं लगतचीं दोन मोठीं भोजनगृहें होतीं. त्यांमधील भिंत काढून जेवणावळींसाठीं तीं उपयोगांत आणण्यांत आलीं.

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांच्या हातांत हात गुंफून वधूनं विवाहस्थळीं प्रवेश

केला. आजीच्या विवाहांतला साटीनचा पांढरा स्वच्छ उंची झगा एलिनॉरनं परिधान केला होता. लॅथ्रॉप ब्राऊन हा करवला होता, आणि रेव्हरंड एण्डि-कॉट यांनीं विवाहाचं पौरोहित्य केलं.

विवाह एका घरांत लागला आणि पाहुण्यांना अल्पोपहार, पेयें आदि देण्यांत आलीं तीं दुसऱ्या घरांत. या दुसऱ्या समारंभाची गर्दी उसळली आणि वधूवरांना आयताच एकांत लाभला. लग्नमंडपांतल्या साऱ्या पाहुण्यांनीं गर्दी केली होती राष्ट्राध्यक्षांच्याभोंवती. राष्ट्राध्यक्ष मूळचेच गप्पिष्ट, आणि एवढा श्रोतृवर्ग मिळतांच वाईल्ड वेस्टमधल्या त्यांच्या एकेका धाडसाचं आणि अनुभवाचं रंगदार वर्णन करण्यांत ते देहभान देखील विसरून गेले! जिथं जात तिथं आपल्या गप्पिष्ट स्वाभावामुळं ते सर्वांना प्रिय होते. वधूवरांकडे आतां कोणाचंच लक्ष उरलं नव्हतं.

लग्नाचा ' केक ' कापण्याचा समारंभ शेवटीं एकदांचा पार पडला, आणि मिस्टर आणि मिसेस फ्रँकलिन डेलानो रूझवेल्ट हाईड पार्कला एका आठ-वड्याचा मधुचंद्र साजरा करण्यासाठीं निघून गेलीं. न्यूयॉर्कला तीं दोघं परत आलीं आणि वेस्ट फॉर्टिफिफ्थ स्ट्रीटवरच्या हॉटेल वेब्स्टरमध्यें छोटीशी जागा घेऊन राहिलीं. त्यांच्या नजीक राहतां यावं म्हणून सारा रूझवेल्टनीं २००, मॅडिसन अॅव्हेन्यू इथं एक घर भाड्यानं घेतलं. जूनमध्यें अभ्यासाचं वर्ष संपतांच युरोपच्या प्रवासाला जाण्याचा फ्रँकलिनचा मनोदय होता.

हा प्रवास खरोखरीं अत्यंत चित्तवेधक आणि बहारीचा झाला. जलप्रवास फ्रँकलिनला नेहमींच फार आवडत होता. समुद्राचा उग्रडा वारा लागतांच स्वातंत्र्याच्या भावनेनं त्याचं मन मोहरून जाई. जीवनाविषयींच्या ओढीनं त्याचं काळीज धुंद होई, मस्तक उन्नत होत असे, आणि तो खारा वारा उरांत भरून घेतां घेतां थोडा होई. बहुतेक प्रवासांत समुद्र शांत होता. बोलण्याला, एकत्र वावरण्याला रोज पुष्कळ वेळ सांपडत होता. एकमेकांचा सूर तर जमलाच होता. आतां दोघं एकमेकांना समजून घेत होतीं...

एलिनॉरचं बालपण आणि पुढचं वाढतं वय फ्रँकलिनपेक्षां वेगळ्या परि-स्थितींत गेलेलं होतं. दुःख आणि एकटेंपण यांचा काळ एलिनॉरनं पुष्कळच पाहिला होता. न्यूयॉर्क शहरांतल्या वरच्या थरांत गणल्या जाणाऱ्या घराण्यांतली

तिची आई "ॲना हॉल" होती. ॲना विलक्षण देखणी होती. खरं म्हटलं म्हणजे हॉल घराण्यांतल्या साऱ्याच स्त्रिया रूपाविषयीं प्रसिद्ध होत्या आणि आपली मुलगी इतकी साधी बगडी निपजावी, रूपानं अशी डावी रहावी, याचा सल एलिनॉरच्या आईला प्रकर्षानं आणि सतत जाणवत आला होता. ही आपली भावना तिनं एलिनॉरसमोर देखील लपवून ठेवली नव्हती. परंतु एलिनॉरच्या वडिलांचा मात्र तिच्यावर जीव होता, आणि एलिनॉरला याची जाणीव होती. एलिनॉरच्या मुद्रेवर कधीं स्मित दिसत नसे, तिची वृत्ति अतिशय संकोची आणि जात्याच गंभीर, यामुळं तिची आई तिला हांक मारी 'आजीबाई' अशी. परंतु एलिनॉरचे वडील मात्र जात्या येत्या प्रत्येक स्नेह्यापाशीं आपल्या या मुलीचं तोंडभर कौतुक करीत. एलिनॉरचे वडील रूबाबदार व्यक्तिमत्त्वाचे, वृत्तीचे सदा आनंदी असे होते आणि आपली प्रेमाची, जिव्हाळ्याची भूक भागवण्यासाठीं ती त्यांच्याकडेच पाही. तिच्या आठव्या वर्षी तिची आई निवर्तली आणि घरटं विस्कटून गेलं. तिला आणि तिच्या भावाला नंतर तिच्या आजीच्या घरीं ठेवण्यांत आलं. तिचा एक धाकटा भाऊ, एलियट, आई निवर्तली त्याच वर्षी डिप्थेरियाच्या आजारानें गेला. वडिलांपासून दूर जाणं आणि रहाणं एलिनॉरला नकोसं वाटलं. तिला वडिलां-पाशींच रहायचं होतं. परंतु तिच्यासारख्या छोट्या मुलीचा प्रतिपाळ न जमावा इतके तिचे वडील सुखविलासी होते, नादी होते, याची जाणीव तिला तेव्हां नव्हती. हिवाळ्यांत न्यूयॉर्कमधल्या हॉल कुटुंबाच्या घरीं आणि उन्हा-ळ्यांत टिव्होलीच्या घरीं वडिलांच्या आणि तिच्या गांठी पडत. या भेटीसाठीं एलिनॉर सदा आसुसलेली असे. ती दहा वर्षांची होते न होते तोंच तिचे वडीलहि गेले. या बातमीचा तिला एवढा मोठा धक्का बसला कीं, पुढें कित्येक दिवस तिला ती बातमी खरीच वाटत नव्हती, आणि नंतर मनोराज्य आणि स्वप्न हेच तिचे आधार बनले !

फ्रँकलिन प्रमाणें आईच्या आणि वडिलांच्या बाजूचे तिला असंख्य आप्त नातलग होते. यांतले सर्वांत महत्त्वाचे म्हणजे काका थिओडोर. आपल्या दिवंगत भावाच्या मुलांवर त्यांची सदैव नजर होती आणि जेव्हां जेव्हां 'ऑयस्टर बे' येथल्या त्यांच्या घरीं या मुलांना आणण्यांत येई तेव्हां तेव्हां त्यांना उचलून जवळ घेण्यासाठीं ते धांवत बग्गीकडे येत, दोघांना उचलून घट्ट

घट्ट जवळ घेत, आणि मग समुद्रकिनाऱ्यावर या दोघां 'पोरट्यां' बरोबर खेळण्यांत, हुंदडण्यांत त्यांचा सारा वेळ निघून जाई.

लग्नाच्या नीमित्तानं केलेल्या या प्रवासांत फ्रँकलिन आणि एलिनॉरला खऱ्या अर्थानं प्रौढत्व प्राप्त झालेलं होतं. आतां त्यांनी काय करायचं, कुठं जायचं हें सर्व त्यांचीं तीं ठरवायला मुक्त होतीं. प्रवास अत्यंत मौजेनं करायचा, एकमेकांच्या सहवासांत जास्तींत जास्त रहायचं, एवढंच काय तें बंधन त्यांच्यावर होतं! खर्चाचा प्रश्नच नव्हता.

तरी पण इतरांच्या बाबतींत कांहीं जबाबदाऱ्या त्यांच्यावर होत्या. उदाहरणार्थ, घरीं पत्रं लिहावीं लागणार होतीं, जागोजाग नातेवाईकांना भेटायचं होतं. इंग्लंडमध्यें एलिनॉरनं आपल्या जुन्या शाळकरी–मैत्रिणींच्या गांठी घेतल्या. तिची मैत्रिण जीन रीड त्या वेळीं आई–वडिलांबरोबर इंग्लंडमध्यें आलेली होती. डिलॅनो परिवारापैकीं फ्रँकलिनची एक मावशी पॅरिसमध्यें राहत होती. तिची भेटहि दोघांनीं घेतली. परंतु त्याचबरोबर पॅरिसमधला 'फॉलीज' हा अत्यंत लोकप्रिय रंजन–प्रकार देखील त्यांनीं कटाक्षानं पाहिला. त्यांतल्या नृत्यांगनांचे अंग उघडं टाकणारे पोषाख पाहून एलिनॉरला मनस्वी विस्मय वाटला. त्यावर ती कोणी कालची पोर असावी तसा फ्रँकलिन मोठ्यांदा हंसला आणि जणूं आपल्याला हा प्रकार पूर्वापार माहीतच होता आणि त्यांत काय मोटसं, असं त्यानं दर्शविलं. फ्रान्सहून तीं दोघं इटलीला गेलीं. फ्रन्समध्यें दहा दिवस कसे स्वप्नांसारखे गेले. व्हेनिसमध्यें वेगवेगळीं निसर्गरम्य स्थळें तीं पहात होतीं. गांडोलामधून विहार करीत होतीं. इटलींतलीं गांवांमागून गांवं त्यांनीं पाहून टाकलीं. त्यानंतर तीं स्वित्झर्लंडला गेलीं. तिथून त्यांनीं ऑस्ट्रिया पाहिला आणि ऑस्ट्रियाहून परत पॅरिस आणि तिथून लंडनला दोघं परतली. लंडनला परतल्यानंतर बऱ्याच काळापासून मनांत असलेला आणखी एक मनसुबा त्यांनीं प्रत्यक्षांत आणला. स्कॉटलंडचा प्रवास त्या दोघांनीं केला आणि हिरवळीनं फुललेल्या लो लॅण्डस् मधल्या भ्रमंतींत त्यांच्या दृष्टीनं सर्वांत मोठा भाग म्हणजे काळं कुळकुळीत असं एक स्कॉटिश टेरियर कुत्रं त्यांनीं मिळवलं. त्यावेळीं तें छोटं होतं. त्याचं नांव त्यांनीं 'डफी' ठेवलं. त्यांनीं पाळलेलं हें पहिलं स्कॉटिश कुत्रं होतं.

न्यूयॉर्कला परतायला सप्टेंबर उजाडला. गेले दिवस सुखानं चिंब भिजलेले

होते आणि दोघांत एक तिसरा जीव येऊन मिळाला होता. परतते-वेळीं प्रवासांत एलिनॉरची तब्येत असायची तशी नव्हती. बारीक-सारीक तक्रारी चालू होत्या. कारण तिला आतां दिवस गेले होते.

हीं दोघं अशा प्रकारें प्रवासांत हिंडत असतांना सारा रूझवेल्ट स्वस्थ राहिल्या नव्हत्या. न्यूयॉर्क शहरांत त्या स्वतः रहात त्या ठिकाणापासून जवळच १२५ ईस्ट थर्टि सिक्स्थस्ट्रीट वरच्या एका घरांत त्यांनीं या जोडप्यासाठीं जागा भाड्यानं घेऊन ठेवली होती. तिच्यांत सुंदर सामानसुमान भरलेलं होतं आणि नोकर देखील ठेवले होते. परतल्यानंतर फ्रँकलिन ही व्यवस्था पाहून मोहरून गेला. तो म्हणाला. "आई केवढी समंजस आहे!" आपल्या बायकोला स्वतःचं घर, त्यांतलं सामानसुमान, त्यांतले नोकर स्वतः निवडायला आवडलं असतं हें मुळीं त्याच्या लक्षांत आलंच नाहीं. नव्या घरांत हें जोडपं स्थायिक झालं. कोलंबिया युनिव्हर्सिटींत कायद्याचा अभ्यास फ्रँकलिननं पुढं चालवला. आई होण्याचा प्रथमच अनुभव घेत असलेली एलिनॉर सल्ला आणि सहाय्य या दोनहि बाबतींत सासूवर पुष्कळच अवलंबून होती. १९०६ सालच्या ३ मेला तिला मुलगी झाली. 'ॲना एलिनॉर' असं तिचं नांव ठेवण्यांत आलं आणि त्या उन्हाळ्यांत फ्रँकलिन, एलिनॉर आणि त्यांचं हें छबडं अशा तिघाजणांनीं सुटी कॅम्पोबलोला घालवली. सारा रूझवेल्ट यूरोपच्या प्रवासाला गेल्या होत्या. समुद्रकिनाऱ्याच्या मोकळ्या हवेंत फ्रँकलिनची ती मुलगी दिवसांगणिक बाळसं धरूं लागली. वाढूं लागली आणि 'हाफ-मून' वरुन छोट्याशा सागरी प्रवासाला देखील त्यांनीं तिला नेऊन आणलं.

न्यूयॉर्कमधला नंतरचा हिंवाळा आदल्या वर्षासारखाच बराचसा गेला. फ्रँकलिननं आपला कायद्याचा अभ्यासक्रम पुरा केला. 'बार' च्यापरीक्षांमध्यें तो उत्तीर्ण झाला आणि ओळखीपाळखी बऱ्याच असल्यामुळें, नोकरी मिळणं त्याला कठीण गेलं नाहीं. ५४ वॉलस्ट्रीट येथल्या कार्टर, लेड्यार्ड ॲण्ड मेलबोर्न या कायद्याच्या फर्ममध्यें उमेदवार म्हणून तो राहिला.

पुढल्या कांहीं महिन्यांतच विश्वविद्यालयाच्या वर्गांत शिकला नव्हता तें तो या नोकरींत शिकला. कायद्याचं प्रत्यक्ष स्वरूप त्याला समजूं लागलं; माणसाच्या दैनंदिन जीवनाशीं तो किती प्रकारें आणि कसा निगडित होता याची कल्पना त्याला येऊं लागली; अर्थात, त्याच्या सारख्या अननुभवी आणि नवख्या

माणलाला बारीकसारीक कामांतच प्रारंभीं समाधान मानून घेणं भाग होतं. म्हणजे, कौन्टी क्लार्कच्या कचेरींत जाऊन एखाद्या करारपत्रास 'ट्रॅन्स्फर' जमवणं, एखाद्या छोट्याशा दाव्यासाठीं स्थानिक कोर्टांत जाणं, इतपतच कामं त्याला पडत. पूर्वीं कधींहि पाहिलीं नव्हतीं, ऐकलीं नव्हतीं, अशीं चित्रविचित्र माणसं त्याला आतां भेटूं लागलीं, दिसूं लागलीं. त्यांना 'पोर्सलेलिअन' हें काय असतं हें माहीत नव्हतं, वा त्याचं सदस्यत्व लाभावं हा ध्यास त्यांना कधींहि लागलेला नव्हता. पंधरा–वीस डॉलर्स म्हणजे त्यांच्या दृष्टीनं गडगंज संपत्ति होती, अशीं हीं माणसं होतीं. उंच–खुजीं, काळीं–गोरीं, स्वच्छ–अस्वच्छ. अधूनमधून एखाद्या केसच्या निमित्तानं स्थानिक राजकारणाशीं फ्रँकलिनचा संबंध येई आणि त्यांतल्या कुरूप गोष्टींशीं, लांचलुचपतीशीं, त्याचा परिचय घडे. हें राजकारण वेगळं होतं. हार्वर्ड किंवा हाइड पार्क येथल्या राजकारणासारखं तें नव्हतं, परंतु यानं देखील फ्रँकलिनचं रक्त तापें, त्याच्या अंगांत हिरीरी संचारें, आणि यांतूनच समाजसेवेची आणि सार्वजनिक कार्याची संधी त्याला दिसूं लागली. त्याच्या वडिलांनीं हाईड पार्कला असं कार्य केलं होतं. एलिनॉरचा देखील ह्याच्याशीं संबंध होता. आणि नोकरी-निमित्तानं जोडलेल्या या राजकीय क्षेत्रावाटें फ्रँकलिन हेंच समाजकार्य करण्यासाठीं धडपडूं लागला.

लग्नानंतरच्या पहिल्या कांहीं वर्षांत एलिनॉरचं समाजकार्य जवळ जवळ बंद पडलं होतं. आयुष्याचा बराचसा काळ बाळंतपणं आणि बालसंगोपन यांतच चालला होता. कार्टर लेड्यार्ड ॲण्ड मेलबोर्न या फर्ममध्यें नोकरीला लागून कांहीं थोडे महिने होतात तोंच, म्हणजे १९०७ च्या २३ डिसेंबरला फ्रँकलिनला दुसरं मूल झालं. या वेळीं मुलगा झाला याचा आनंद दोघांच्याहि मनांत मावत नव्हता. या मुलाचं नांव 'जेम्स' ठेवण्यांत आलं. फ्रँकलिनच्या वडिलांचं हें नांव. जन्मानंतर आरंभीचे कांहीं दिवस हा मुलगा तसा नाजूक तब्बेतीचाच होता. त्यामुळें पुढल्या कांहीं काळांत कॅम्पोबेलो आणि हाईड पार्क यापलीकडे अधिक मोठा प्रवास या मंडळींनी केला नाहीं.

दरम्यान सारा रूझवेल्ट या त्यांच्याच एका योजनेंत दंग होत्या. मॅनहॅटन-मध्यें सिक्स्टि फिफ्थ स्ट्रीटवर कांहीं जमीन त्यांनीं खरीदली होती आणि दोन घरं त्या तिथं बांधीत होत्या. त्यांतलं पहिलं त्यांच्या स्वतःसाठीं होतं आणि

दुसरं मुलासाठीं आणि त्याच्या कुटुंबासाठीं. न्यूयॉर्क शहराच्या परिसरांतल्या आपल्या अनेक कामांत फ्रँकलिन इतका बुडून गेला होता कीं, आपल्या संसारांतले व्यवहार बायको पाहते आहे कीं आई पहाते आहे, याचं भान त्याला नव्हतं. आणि नव्या घरांत तो सहकुटुंब रहायला गेला.

नव्या घरांतल्या शयनगृहांत त्यानं प्रवेश केला आणि ड्रेसिंग टेबलापाशीं अनावर आवेगानं स्फुंदत राहिलेल्या एलिनॉरकडे त्याचं लक्ष गेलं.

त्यानं तिला गदगदां हलवून विचारलं, “ तूं रडतेस कां ? झालंय काय ? ”

हुंदक्यांवर हुंदके देत ती कशीबशी म्हणाली, “ हें घर माझं नाहीं. मला इथं राहणं आवडत नाहीं. माझ्या मनासारखी इथली एकहि गोष्ट नाहीं. ”

फ्रँकलिन तिच्या जवळ बसला, तिची समजूत घालण्याचा त्यानं प्रयत्न केला. आपल्या भाबडेपणाची आणि अनुभवीपणाची टिंगल करीत त्यानं तिला हसवण्याचा प्रयत्न केला आणि केलं एवढं पुष्कळ केलं असं समजून तो मोकळा झाला. एलिनॉरला पुन्हां दिवस गेले होते, आणि गर्भारपणांत तिची अवस्था नेहमींच अशी असते, असं म्हणून त्यानं याचा विचार सोडून दिला.

आपल्या नव्या गृहजीवनांत फ्रँकलिन पूर्णपणें समाधानी होता. घर आणि नोकरी यांत तो दंग होता. अडीच वर्षांची ॲना आणि कुत्रा ‘ डफी ’ यांच्या बरोबर खेळण्याबागडण्यांत त्याचा मोकळा वेळ पाहतां पाहतां जात होता. संध्याकाळीं स्नेहीमंडळीं घरीं येत, मेजवान्या झडत.

आतांपर्यंत ‘ लॉ क्लार्क्स ’मध्यें फ्रँकलिनला मोठंच महत्त्व प्राप्त झालं होतं. तो जिथं जाई तिथं हेंच घडे. मात्र इतरांच्या मतें त्याची वकिलींतली ही उमेदवारी तो तितका मनापासून करीत नव्हता.

असं कोणी म्हणे तेव्हां अत्यंत निष्काळजी, वरवरच्या सुरांत फ्रँकलिन त्याला म्हणे, “ इथं कोण लेकाचा आयुष्यभर वकील राहणार आहे ? कोणी सांगावं, एक दिवस मी प्रेसिडेंट देखील होईन ! ”

त्याचा स्वतःचा चुलत भाऊ साक्षात् प्रेसिडेंट असतांना फ्रँकलिनचा हा दावा म्हणजे एक उत्कृष्ट विनोद ठरे. कारण, सांगतांना तो आपण प्रेसिडेंट कसा होणार, त्याचा क्रम टेडी ऊर्फ थिओडोर यांच्यासारखाच सांगे. तो म्हणे,

"प्रथम आपण राज्य–विधिमंडळांत जाणार, त्यानंतर नौदलात असिस्टंट सेक्रेटरी होणार, तसं झालं कीं न्यूयॉर्कचं गव्हर्नरपद दूर नाहीं. आणि मग थेट व्हाईट हाऊस!"

१९०९ च्या मार्चमध्यें त्याला तिसरं मूल झालं. तो फ्रँकलिन एलॅनो रुझवेल्ट, ज्यूनिअर. येथवरचा काळ त्यांनीं पुष्कळच चांगला घालवला होता. जाणवण्याजोगीं आपत्तीच आली नव्हती. आणि एकाएकी त्यांचीं तीनहि मुलं इन्फ्लुएन्झानं आजारी पडलीं. त्यांतली ॲना एलिनॉर आणि जेम्स आजारांतून उठलीं, परंतु आठ महिन्यांचा फ्रँकलिन ज्यूनियर मात्र त्या दुखण्यांतच गेला. आणि त्या जोडप्यावर दुःखाचा पहिला मोठा आघात झाला. हाईड पार्क इथं सेंट जेम्स चर्चच्या दफनभूमींत त्या मुलाचं दफन करण्यांत आलं. पुढें कित्येक दिवस त्याविषयींच्या शोकावेगांतून फ्रँकलिन आणि एलिनॉर बाहेर येत नव्हतीं, कारण तें मूल जाईल असं स्वप्नांत देखील त्यांना वाटलं नव्हतं. दृष्ट लागण्यासारखी त्याची तब्येत सुदृढ होती.

या दुःखावेगानंच कीं काय, फ्रँकलिन त्याच्या कार्यक्षेत्रांत अधिक जिद्दीनं बुडाला. त्यांतच त्याला मनःशांति लाभूं लागली. एलिनॉरला घराबाहेरचं असं क्षेत्र नव्हतं. तिचं दुःख ओलंच होतं, आणि आतां पुन्हां दिवस गेल्यानंच त्यावर क्रमशः खपली धरली.

आतांपावेतों फ्रँकलिनच्या आवडीनिवडींतून त्याचं जीवन एका विशिष्ट दिशेनंच प्रगत होऊं बघत होतं. अगदीं हार्वर्डमधल्या शाळकरी काळापासून संथपणें, परंतु निश्चितपणें, त्याचा पिंड राजकारणाला योग्य बनत चालला होता. आपण विधिमंडळांत जाणार, गव्हर्नर होणार, हें म्हणतांना तो विनोद करीत नव्हता. अर्थात, आपल्या चुलत भावाच्याच पद्धतींनीं हें आपण नेमकें साधू शकूं असा विश्वास मात्र त्याला नव्हता. मुलगा गेला त्याच हिंवाळ्यांत कायद्याच्या फर्मच्या कांहीं कामानिमित्तानं डचेस कौण्टीच्या डेमॉक्रॅटिक पक्षाच्या म्होरक्याशीं फ्रँकलिनची गांठ पडली. गोष्टींवरून गोष्टी निघाल्या आणि पहातां पहातां कोलंबिया पटमॅम आणि डचेस या कौण्टींचा समावेश असलेल्या मतदार संघांतून 'सिनेट'साठीं डेमॉक्रॅटिक पक्षाचा उमेदवार म्हणून फ्रँकलिननं निवडणुकीला उभं रहावं अशी गळ त्याला घालण्यांत आली. हा टापू प्रकर्षानं रिपब्लिकन मताधिक्याचा, डेमॉक्रॅटिक पक्षाच्या उमेदवाराला तिथं आशाच

नव्हती, तिथं मग निवडून येण्याचा प्रश्नच कुठं राहिला ? प्रश्न फक्त उमेदवारी-पुरताच होता.

फ्रँकलिनची परिस्थिति तशी स्वास्थ्याची होती. आपण हरणार हें गृहित धरूनच निवडणूक लढवणं त्याला परवडण्यासारखं होतं. आणि पक्षाचं हें काम चांगल्या प्रकारें बजावल्यास पुन्हां कधीं तरी अधिक उजव्या मतदार संघांतून निवडून येण्याचा संभव त्यानं मनाशीं गृहित धरला. ज्याच्यापाशीं पैसा आहे, पुरेशी सवड आहे आणि कुवत आहे, त्यानें कांहीं ना कांहीं समाजसेवा ही केलीच पाहिजे हें त्याच्या वडिलांचं आग्रही मत त्याच्या मनावर कोरलेलं होतं.

मार्गांत फक्त एकच अडचण होती. वेगवेगळ्या पक्षांत असली तरी, रूझवेल्ट कुटुंबांतलीं माणसं एकमेकांशीं अतिशय निष्ठेनेंच वागत आलेलीं होतीं आणि फ्रँकलिननं वॉशिंग्टनमधली थिओडर रुझवेल्ट यांची बहीण आणि त्याची स्वतःची आत्या ऑन्टी बाय, हिच्याकडे हळूंच विचारणा केली कीं, आपण डेमॉक्रॅटिक तिकिटावर निवडणूक लढवणं रिपब्लिकन पक्षाच्या आसामींना आणि निवृत्त प्रसिडेंट थिओडोर यांना कितपत मानवेल ? परंतु ही चिंता पूर्णपणं दूर झाली. थिओडोरनीं फ्रँकलिनला मनःपूर्वक उत्तेजनच दिलं. त्यांनीं कळवलं होतं , ' आगे बढो. '

तात्काळ फ्रँकलिन डेलानो रूझवेल्ट त्याच्या आवडत्या हडसन रिव्हर व्हॅलीकडे परतला. काया, वाया, मनें करून निवडणूक मोहीम गाजवायची असा त्याचा निर्धार झालेला होता. हाईडपार्कच्या घरीं त्याची आई आणि त्याचीं दोन मुलं यांच्यासहित तो राहिला. एलिनॉरचे दिवस भरत आले होते आणि १९१० च्या २३ सप्टेंबरला तिला मुलगा झाला. तो ' इलियट '.

एलिनॉर बाळंतपणांतून उठून फ्रँकलिनच्या सभांना हजर राहूं लागण्याआंतच फ्रँकलिनची निवडणूक मोहिम सुरू झाली होती. ज्याप्रकारें त्यानं ती उघडली आणि चालवली त्यानं सर्व राजकारणी मंडळींना अचंबित केलं होतं आणि त्याचे मतदार तर त्याच्यावर फिदा होते. दोन सिलिंडरांची ' मॅक्सवेल ' ही प्रवासी गाडी त्यानं भाड्यानं घेतली, तिचा धनीच ती हांकण्यासाठीं नोकरीस ठेवला, आणि इतर दोन स्थानिक उमेदवारांच्या बरोबर गांव न् गांव, शहर न् शहर, तो अक्षरशः विंचरीत फिरूं लागला.

जाई तिथं त्याच्या प्रसन्न मुद्रेनं आणि उमद्या व्यक्तिमत्त्वानं मतदार प्रभावित होत होते. तो बुद्धिमान होता, देखणा होता, तसाच आनंदी होता. आयुष्यांत रस घेणारा होता. आतांशी कुठं त्याची एकोणतिशी पुरी होत होती. परंतु शेतीविषयक प्रश्नांच्या आपल्या माहितीनं शेतकऱ्यांना त्यानं थक्क करून टाकलं. वडिलांप्रमाणें त्यानंदेखील केव्हांतरी या भागांत शेती केली होती. जमिनीचा कस, पाऊसपाणी, पीक, बाजारपेठ, जंगलांचं संरक्षण, अशा विषयांवर तो बोले तेव्हां कामाच्या मळक्या पोषाखांतले त्याचे मतदार लक्षपूर्वक त्याचं म्हणणं ऐकत.

आपण ' रूझवेल्ट ' असून ' टेडी ' नसल्याबद्दल तो भाषणांभाषणांतून विनोद पिकवी, आणि एका सभेंत एका छोकऱ्यानं उठून सुनावलं होतं, " मला माहीत आहे तुम्ही ' टेडी ' नाहींत, कारण हंसतांना तुमचे दांत कोठे दिसतात ? "

आणखी एका ठिकाणीं त्यानं समोरच्या श्रोतृसमुदायाला सांगितलं, " मी वक्ता नाहीं. " त्यावर एका श्रोत्यानं उलट सांगितलं, " तुम्हीं वक्ता असण्याची जरूर देखील नाहीं. एरवींचं बोलत रहा. आम्हांला तेंच ऐकायला आवडतं. "

निवडणुकीच्या दिवसापूर्वी हाईड पार्कला अखेरची प्रचार सभा त्यानं घेतली. ही मोहीम त्यानं उघडली तेव्हां वक्तृत्व त्याच्यापाशीं नव्हतं आणि या मोहिमेचं सूप वाजवतांना वक्तृत्वाची बरीच मोठी समज त्याला आली होती.

निवडणुकीच्या निकालांनीं खुद्द उमेदवारांनादेखील धक्का बसला. प्रतिस्पर्धी रिपब्लिकन उमेदवाराचा आणि इतर दोन उमेदवारांचा दणदणीत पराभव करून डेमॉक्रॅटिक तिकिटावर तो निवडून आला होता. गेल्या बत्तीस वर्षांत प्रथमच त्या भागांतून डेमॉक्रॅटिक पक्षाचा सिनेटर निवडून येत होता. आतां अल्बनीमध्यें २४८ स्टेट स्ट्रीट इथं मिसेस रूझवेल्ट यांनीं नवी जागा घेतली होती. आणि फ्रॅंकलिन ५४ वॉल स्ट्रीट येथल्या आपल्या कचेरींतून याच काळांत सेनेट चेम्बरमध्यें हालला. नव्या ठिकाणीं मुलाच्या संसाराची घडी बसवून देण्यासाठीं सारा रूझवेल्टदेखील कांहीं दिवस त्याच्याकडे येऊन राहिल्या होत्या आणि अल्बनीच्या नव्या घरीं पहिला मोटा सोहळा झाला तो ' न्यू इयर्स डे 'चा. या दिवशीं सेनेटर रूझवेल्ट यांच्या मतदारांना मेजवानी देण्यांत आली.

# आल्बनी ते वॉशिंग्टन

त्या दिवशीं मोठ्या उत्साहानं आणि उल्हासानं येत्या-जात्या पाहुण्यांचं आगतस्वागत हे नवे तरुण सीनेटर आणि त्यांची सहचारिणी मिळून करीत होतीं. पाहुण्यांच्या गर्दीतून कुणाकुणाची विचारपूस करीत हिंडत असतांना अनेकांना फ्रँकलिनच्या चेहेऱ्याचं साम्य आणखी एका माणसाच्या चेहेऱ्याशीं जाणवत होतं. न्यू जर्सीचा गव्हर्नर म्हणून हा माणूस डेमॉक्रॅटिक पक्षाच्या तिकिटावर नुकताच निवडून आला होता. त्याचं नांव 'वुड्रो विल्सन.'

सीनेटच्या परिसरांत 'आणखी एक सीनेटर' म्हणून हरवून जाणं या नव्या आकर्षक व्यक्तिमत्त्वाच्या सीनेटरला मंजूर नव्हतं, आणि म्हणूनच जेव्हां जेव्हां संधी मिळेल तेव्हां तेव्हां सीनेटच्या सभागृहांत उभा राहून तो त्याच्या मतदारांच्या इच्छा, आशा–आकांक्षांना शब्दरूप देई. त्यांच्या तक्रारींना वाचा फोडी.

आणि सिनेटमध्यें आल्याआल्याच एका महत्वाच्या प्रश्नावर वक्तव्य करून सर्वांचं लक्ष त्यानं स्वतःकडे वेधून घेतलं. न्यूयॉर्क शहराच्या स्थानिक राज्य-यंत्रणेविषयींचा हा प्रश्न होता. सीनेटमध्यें त्यावर मोठी खडाजंगी माजलेली होती. न्यूयॉर्क राज्यांतून आलेल्या एका सीनेटरची सीनेट संपली होती. हा बाहेर जाणारा उमेदवार रिपब्लिकन होता. परंतु त्या काळांत अमेरिकेच्या

सीनेटमधला प्रतिनिधी निवडला जात असे तो राज्यविधिमंडळाकडून, आणि न्यूयॉर्क राज्याच्या विधिमंडळांत डेमॉक्रॅटिक पक्षाचं बहुमत असल्यामुळें या राज्यांतून निवडला जाणारा पुढचा सीनेटर डेमॉक्रटिक असणार याविषयीं कुणाळाहि शंका नव्हती, आणि त्यामुळें उमेदवारपदासाठीं होणारी चुरस पक्षांतर्गत स्वरूपाचीच होती. शहरचे पक्षनेते विरुद्ध देशाची पक्षयंत्रणा असं तिचं जुनंच स्वरुप होतं. न्यूयॉर्क शहरातर्फे स्थानिक डेमॉक्रॅटिक पक्षानं बुइल्यम शीहान यांना निवडलं होतं. पक्षांतर्गत त्यांच्या विरुद्धचे उमेदवार एडवर्ड एम. शेफर्ड यांच्यावतीनें फ्रॅंकलिन डेलॅनो रुझवेल्ट हे मोहिमेचं नेतृत्व करीत होते.

या चुरशीच्या निकालाच्या रूपानं 'एफ. डी. आर.' यांनीं वैयक्तिक स्वरूपाचा एक महत्वाचा चमकदार विजय मिळविला. या मोहिमेच्या निमित्तानं त्यांच्या पक्षाला त्यांच्यांतली धडाडी, निर्भयपणा, चातुर्य यांचा घवघवीत प्रत्यय मिळाला. आरंभीं पक्षाला प्रतीत झालेला या माणसाचा सौम्य मनमिळावूपणा, कांहींसं सुखासीन व्यक्तिमत्व वरवरचं होतं असं दिसून आलं. कित्येक आठवडेपर्यंत त्यांनीं विधिमंडळांत प्रचाराचा धडाका लावला, पेचप्रसंग निर्माण केले आणि अखेर न्यूयॉर्क शहराच्या डेमॉक्रॅटिक पक्षाला नमावं लागलं. तडजोड झाली आणि एकच एक उमेदवार निवडण्यांत आला. या प्रचंड आणि सर्व शक्तिमान अशा प्रमुख राज्यांत जें जें घडे तिकडं साऱ्या देशांतल्या राजकारण्यांचे डोळे लागलेले असत, आणि या मोहिमेच्या निमित्तानं 'फ्रॅंकलिन रूझवेल्ट' हें नांव राष्ट्रीय मान्यता पावलं. तथापि, न्यूयॉर्क शहरांतल्या पक्षाच्या अधिकारारूढ माणसांशीं रूझवेल्ट यांनीं चालवलेला झगडा मात्र संपला नाहीं. हें श्वापद आतां केवळ जायबंदी झालं होतं, आणि चवताळलं होतं.

आरंभीच्याच या विजयानं राज्यविधिमंडळांत रूझवेल्ट यांचं वजन केवढं तरी वाढलं. हडसन रिव्हर व्हॅलीच्या भागांतल्या जंगलाचं रक्षण करण्यांत यावं यासाठीं त्यांनीं नवीन मोहिम उघडली. नवनव्या पक्ष्यांच्या शोधांत आपल्या छोट्या पायांनीं हा मुलगा रानावनांतून हिंडे तेव्हांपासून त्याला वृक्षांविषयीं एक आत्मीयता आणि जिव्हाळा वाटूं लागलेला होता. निसर्गाचा समतोल राखायचा असेल तर वृक्ष जोपासले पाहिजेत; वृक्षांच्या पडणाऱ्या पाचोळयानेंच मातीचा कस वाढतो, मातींत ओलावा राहतो, वृक्षांच्या थंडाव्यानेंच ढगांतून पाऊस येतो, इत्यादि गोष्टी कित्येक वर्षांच्या अनुभवानं त्याला

पटलेल्या होत्या. जंगलरानांचं संरक्षण करावं असं त्याचं मत होतं. लांकडांचा व्यापार करणाऱ्या मोठमोठ्या व्यापाऱ्यांच्या हितसंबंधांसाठीं फारसा विचार न करतां रानांची छाटाछाट केल्यानं त्या सुपीक भागाला ओसाड नापीक माळाचं स्वरूप येणार होतं.

आपला पत्रव्यवहार आणि इतर कामं यांत रूझवेल्ट आणि त्यांचा सेक्रेटरी सर्व वेळ बुडून गेलेले होते. अमेरिकेंतल्या आणि इतर देशांतल्यादेखील जास्तींत जास्त माणसांशीं संबंध ठेवण्याचा दंडक रूझवेल्टनीं स्वत:वर घालून घेतला होता. अमेरिका आणि अमेरिकेबाहेरचें जग यांतल्या घडमोडींविषयीं, सतत प्रवास आणि संबंध यामुळेंच रूझवेल्ट यांना अधिक व्यापक असा दृष्टिकोन प्राप्त झालेला होता. या कामांव्यतिरिक्त इतर दोन वकिलांबरोबर रूझवेल्ट यांनीं भागीदारी करून ५२ वॉल स्ट्रीट इथं मार्विन, हूकर अँड रूझवेल्ट अशी एक कायदाविषयक नवीन फर्म स्थापन केली.

वेगवेगळ्या स्वरूपाच्या बैठका आणि मेळावे यांच्या निमित्तानं रूझवेल्ट यांचं निवासस्थान, विशेषत: आल्बनी येथलं निवासस्थान आतां सदा गजबजलेलं असे. घरीं आल्या–गेल्यासाठीं उतरण्या–रहाण्याची कायम व्यवस्था केलेली होती.

आल्बनीचं वास्तव्य एलिनॉरला फार मावकलं आहे हें फ्रँकलिन यांच्या लक्षांत आलेलं होतं. कोणत्या ना कोणत्या सामाजिक कार्यांत भाग घेण्याची संधी, आणि जवळ सासू नसणं या दोन कारणांमुळें हें घडलं होतं याची फ्रँकलिनला जाणीव होती! आतां विवाहाला सहा वर्षं लोटलीं होतीं आणि प्रथमच खऱ्याखुऱ्या अर्थानं एलिनॉर तिच्या घरची कारभारीण झालेली होती. आल्यागेल्यांचं आदरातिथ्य, बैठकांच्या निमित्तानं येणारांना खाऊपिऊ घालणं, या गोष्टी तिला मनापासून आवडत होत्या. आणि स्वत:च्या घराचा कारभार स्वत:च चालवण्यानं तिचा आत्मविश्वास वाढलेला होता. फ्रँकलिन यांच्या असंहि लक्षांत येऊं लागलं होतं कीं तिला राजकारणांतदेखील अलीअलीकडे गोडी वाटूं लागलेली होती.

फ्रँकलिन डेलॉनो रूझवेल्ट हे जात्याच कुटुंबवत्सल गृहस्थ होते. आपल्या माणसांविषयीं कमालीचा जिव्हाळा त्यांच्या मनांत वसत होता. आणि मुलं जसजशीं वाढूं लागलीं, समजुतींत येऊं लागलीं तसतसा त्यांच्या सहवासांत

त्यांना अधिकाधिक आनंद लाभूं लागला होता. परंतु त्याचबरोबर हेंहि खरं कीं, घर, कुटुंब, मुलं, याहून त्यांचा जीव राजकारणावर अधिक होता, आणि नेमकी राजकीय दृष्टी आणि राजकारणांत उपयोगीं येणारा अष्टावधानीपणा हे त्यांचे मोठे गुण ठरत होते.

१९११ मध्यें न्यूजर्सीमध्यें गव्हर्नर विल्सन यांच्या संदर्भात रूझवेल्ट यांच्या राजकीय दृष्टीचा मोठाच प्रत्यय सर्वांना मिळाला. विल्सन हे न्यूजर्सीचे गव्हर्नर म्हणून निवडून आल्यानंतर तावडतोबीनं त्यांचं नांव राष्ट्राध्यक्षपदासाठीं घेण्यांत येऊं लागलं आणि त्यादृष्टीनं मोहीमदेखील सुरूं झाली. इतिहास आणि त्याविषयींचे ग्रंथ हे रूझवेल्ट यांच्या आवडीचे विषय. या निमित्तानं वुड्रो विल्सन यांनीं लिहिलेले अमेरिकेच्या इतिहासाचे पांच खंड आणि इतर अगणित फुटकळ लेख त्यांनीं वाचले होते. विल्सन हे फार व्यासंगी गृहस्थ आहेत आणि राज्यकारभारांतदेखील त्यांचं सामर्थ्य स्वयंसिद्ध आहे याची कल्पना रूझवेल्ट यांना आलेली होती. परंतु या गोष्टीचा प्रत्यय एकदां प्रत्यक्ष आणि जातीनंच घ्यावा म्हणून पुढल्या हिंवाळ्यांत ते स्वतः न्यूजर्सीला गेले आणि गव्हर्नर विल्सन यांची गांठ त्यांनीं घेतली.

मोठमोठे बादशाही दिवाणखाने, त्यांची उंची सजावट, थोर मोठ्या व्यक्ती यांची संवय रुझवेल्ट यांना एव्हांना चांगलीच झालेली होती. परंतु गव्हर्नरच्या कचेरींत जेव्हां त्यांना पाचारण्यांत आलं तेव्हां ते मूर्तिमंत बावरून गेले.

एका प्रशस्त अशा टेबलामागें विल्सन बसलेले होते. सुबक, कातडी बांधणीचे मोठमोठे ग्रंथ नेटकेपणानें ठेवलेल्या सुंदर सुंदर कांचेच्या अलमाऱ्या त्यांच्या पाठीमागें दिसत होत्या. निर्दोष आणि आकर्षक शैलीचं विल्सन यांचं बोलणं होतं. पंचावन्न वर्षांचं त्याचं वय झालेलं होतं परंतु त्याचा बांधा सडसडीत आणि तरुण वाटत होता. बिनकाड्यांच्या चष्म्यांतून त्यांच्या डोळ्यांत एक प्रकारचं काठिण्य जाणवत होतं. पहातां क्षणींच नजरेंत भरणाऱ्या त्यांच्या जबड्याचीं हाडं जणूं लोखंडाचीं घडविलीं आहेत असंच वाटत होतं. स्वतःचा उल्लेख ते 'गव्हर्नर' म्हणून न करतां 'सेवक' म्हणून करीत होते. चुकूनहि त्यांच्या मुद्रेवर स्मित उमटत नव्हतं आणि केवळ एका राज्याच्या गव्हर्नरपदापेक्षां अधिक मोठ्या कर्तृत्वासाठीं आपला जन्म झालेला आहे याची पक्की जाणीव असल्यासारखं त्यांचं बोलणं वागणं होत. 'स्वातंत्र्य' या शब्दाविषयीं

त्यांना विलक्षण आकर्षण होतं, ओढ वाटत होती. तो शब्द उच्चारीत तेव्हां त्यांची मुद्रा उचंबळून येई आणि ऐकणारा थरारून जाई.

कांहीं मूठभर माणसांच्या हातून अमेरिकेची राज्ययंत्रणा काढून ती पुन्हां एकदां साऱ्या जनतेच्या हातीं द्यावी, ही विल्सन यांची आवडती मनीषा होती. ते म्हणाले, " आपल्या अकलंकित सामर्थ्यानं हें नवं राष्ट्र पुढं काय करतं, कसं वाढतं, आणि काय साधतं, हें पाहण्यासाठीं साऱ्या जगानं श्वास रोखून धरला आहे. आम्ही बलवान् आहोंत याचा आम्हांला अभिमान वाटला पाहिजे; पण हें आमचं बल नक्की कशामुळं निर्माण झालेलं आहे ? हें बल निर्माण झालं आहे लक्षावधी माणसांच्या कष्टांतून आणि घामांतून. या कष्टकरी माणसांना नांवं नाहींत. आपल्या कष्टांची बढाई मारणं आणि जाहिरात करणं त्यांना ठाऊक नाहीं...या देशांतले नेते कोणत्या वंशाचे, कोणत्या प्रदेशांतले, कोणत्या घराण्यांतले असतील याचं भविष्य अगाऊ वर्तवणं अशक्य आहे, हें या देशाचं महत्त्वाचं भूषण आहे. " भविष्यकालीन अमेरिका त्यांना दिसत होती. ती एक मोठ्या परस्परविश्वासाच्या वातावरणांतल्या आणि बलशाली अशा राष्ट्रकुटुंबाचा जबाबदार घटक म्हणूनच.

या नव्या, प्रभावी व्यक्तिमत्त्वाच्या दर्शनानं आणि भेटीनं थरारून, स्फूर्ति घेऊन रूझवेल्ट न्यूयॉर्कला परतले. विल्सन हे द्रष्टे गृहस्थ होते, ध्येयवादी गृहस्थ होते. जागतिक शांतता हें त्यांचं स्वप्न होतं. कारण, युद्ध आणि त्यांतला विध्वंस त्यांनीं पाहिलेला होता. त्यांचं कुटुंब जॉर्जियामधल्या ऑगस्टा या गांवचं. यादवी युध्दाच्या काळांत त्यांचे वडील त्या भागांत तेथल्या प्रेसबिटेरियन चर्चचे प्रमुख धर्मगुरु होते. त्या काळांत चर्चच्या आवारांना संघराज्याच्या कैद्यांसाठीं हंगामी तुरुंग असंच स्वरूप प्राप्त झालेलं होतं. हें युध्द शेवटीं संपलं तेव्हां विल्सन यांचं वय केवळ नऊ वर्षांचं होतं. परंतु वयाच्या मानानं त्यांची समज मोठी होती, आणि ह्या युध्दाच्या काळांत त्या कोवळ्या वयांत जें जें बघितलं, ऐकलं, तें सारं त्यांना साक्षात् स्मरत होतं. त्या वेळचा दुष्काळ, इकडून तिकडे सतत जातांना दिसणाऱ्या लष्कराच्या पलटणी, आणि प्राथमिक नैतिक मूल्यांचादेखील विसर पडलेलीं माणसं त्यांना चांगलीं आठवत होतीं.

भेटेल त्या प्रत्येक पक्षनेत्याला 'एफ. डी. आर.' आतां ठासून सांगू

लागले कीं, " विल्सन अमेरिकेचे प्रेसिडेंट होण्याला सर्वतोपरी योग्य आहेत. मला तर वाटतं कीं, आपण त्यांना या कामीं शक्य तें सहाय्य केलं पाहिजे." बहुतेकांना हें पटत होतं.

अमेरिकेंत आतां 'राष्ट्राध्यक्षपदासाठीं विल्सन यांना निवडून द्या' ही मोहीम बळ धरूं लागली होती. गव्हर्नर विल्सन जातीनं शहरोंशहरीं फिरूं लागले, राजकीय कार्यकर्त्यांच्या गटांगटांतून आपली भूमिका विशद करूं लागले. न्यूयॉर्क राज्यांत या कामीं प्रयत्न आणि प्रचार करण्यासाठीं इतर अनेकांच्या वतीनं फ्रँकलिन रूझवेल्ट यांनीं 'विल्सन कॉन्फरन्स' नांवाची यंत्रणा स्थापन केली आणि डेमॉक्रॅटिक पक्षाच्या येत्या राष्ट्रीय मेळाव्यासाठीं विल्सन यांचा पुरस्कार करणारे जास्तीत जास्त प्रतिनिधी पाठविले जावेत म्हणून प्रयत्नांची पराकाष्ठा त्यांनीं आरंभिली.

आणि सुरुवातीलाच त्यांना उमजून आलं कीं न्यूयॉर्क शहरांतला सत्ताधिष्ठित डेमॉक्रॅटिक पक्षच विल्सन यांना प्रखर विरोध करणारा आहे. आणि एका महत्त्वाच्या प्रश्नावर रूझवेल्ट यांनीं स्थानिक पक्षाच्या या म्होरक्यांचा पराभव केला असला तरी देखील श्वापद फक्त जायबंदी झालेलं होतं. तें पूर्वीइतकंच प्रबळ होतं. या म्होरक्यांच्या वजनाला राज्यांच्या पक्षयंत्रणेंत फार महत्त्व होतं. १९१२ च्या जून महिन्यांत बाल्टिमोर येथें पक्षाचा मेळावा भरला आणि ओहिओचे गव्हर्नर जडसन हार्मन यांचं नांव न्यूयॉर्क राज्याच्या डेमॉक्रॅटिक प्रतिनिधिमंडळानं एकमतानं पुरस्कारलं. राष्ट्राध्यक्षपदासाठीं पक्षाचे अधिकृत उमेदवार म्हणून विल्सन यांची निवड होणं दुष्कर वाटूं लागलं.

काय वाटेल तें करून विल्सन यांनाच निवडून आणलं पाहिजे हा रूझवेल्ट यांचा ध्यास होता. मेळाव्याच्या काळांत महत्त्वाच्या क्षणीं आपले पति उपस्थित असावेत या दृष्टीनं एलिनॉरनं बाल्टिमोरमध्येंच एक घर भाड्यानं घेतलं आणि रूझवेल्ट रात्रंदिवस राबून आपल्या उद्दिष्टासाठीं पराकाष्ठा करीत राहिले.

मेळाव्यापूर्वीच्या काळांत एका कमिटीच्या बैठकींतून दुसऱ्या कमिटीच्या बैठकींत अशी त्यांची अव्याहत धांवपळ चालली होती. त्यांचं व्यक्तिमत्व प्रतिनिधींच्या घोळक्यांघोळक्यांतून अनेकांचं लक्ष वेधून घेत होतं, त्यांची विचारपूस होत होती. न्यूयॉर्क शहरांतल्या पक्षातीत वृत्तपत्रांच्या कांहीं संपादकांना मेळाव्यांत वृत्तपत्रविभागांत प्रवेश मिळणं कठीण जात आहे असं

कळतांच या विभागाचे प्रमुख जोसेफस डॅनिअल्स यांना त्यांनीं गांठलं आणि या निमित्तानं या दोघांचा स्नेह जमला तो अखेरपर्यंत. डॅनिअल्स हे उत्तर कॅरोलिनाच्या ' न्यूज ऑब्झर्व्हर ' या पत्राचे संपादक, पक्षाच्या राष्टीय कार्यकारिणीचे एक सदस्य आणि विल्सन यांचे ज्वलंत पुरस्कर्ते. रूझवेल्ट यांच्यापेक्षां हे वयानें वीस वर्षांनीं मोठे, त्यांच्याहून कांहींसे ठेंगणे आणि आडव्या हाडाचे. न्यूयॉर्क राज्यांतून आलेल्या या उत्साही तरुण सेनेटरच्या व्यक्तिमत्त्वावर, त्याच्या धडाडीवर आणि यत्नशीलतेवर ते प्रथमदर्शनीं भाळले. मेळाव्यांत त्यांना एकत्र यावं लागलं, एकत्र वावरावं लागलं, जून महिन्याचा अखेरचा आठवडा दोघांच्याहि दृष्टीनं अत्यंत महत्त्वाचा ठरला.

बाल्टिमोरमध्यें या महिन्यांत कमालीचा उकाडा असे. मेळाव्याचं सभास्थान सिगरेटस्, पाईप्स आणि सिगार्स ओढणाऱ्या शेकडों प्रतिनिधींनीं गच्च भरून गेलं होतं. दिवसांमागून दिवस जात होते, भाषणं केलीं जात होतीं, निर्णय घेतले जात होते. त्या निमित्तानं मोठमोठे संघर्ष उभे राहत होते. या साऱ्यांत फ्रँकलिन व्हॅलिनो रुझव्हेल्ट हे आपल्या गुणांनीं तळपत होते. काय वाटेल तें करून विल्सन यांना निवडून आणणं जरूर होतं. त्याला अन्य पर्याय नव्हता. कुठल्याहि परिस्थितींत प्रेसिडेंट विल्सनच !

याच वर्षी राष्ट्रीय निवडणुकांत डेमॉक्रॅटिक पक्षाला घवघवीत यश प्राप्त झालं. रिपब्लिकन पक्षांत आयत्यावेळीं माजलेली दुही हें याचं कारण होतं. डेमॉक्रॅटिक पक्षाच्या म्होरक्यांना प्रयत्न करूनहि जें साध्य झालं नसतं तें रिपब्लिकन पक्षांतल्या दुहीनं आयतंच घडलं. या पक्षांत जुने विरुद्ध नवे असे तट पडले होते. जुन्यांना राष्ट्राध्यक्षपदासाठीं पुनश्च विल्यम हॉवर्ड टॅफ्ट यांची निवड व्हावी असं वाटत होतं. तर नव्यांना थिओडोर रूझवेल्ट हवे होते. टॅफ्ट हे राष्ट्राध्यक्ष होण्यापूर्वी जवळ जवळ आठ वर्षे थिओडोर रूझवेल्ट अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष होते. मेळाव्याच्या तिसऱ्या दिवशीं अशीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं कीं टॅफ्ट यांचीच निवड होणार. ' आपण दुसरा पक्ष स्थापन करणार ' असं ते बोलूं लागले आणि या घोषणेनं डेमॉक्रॅटिक पक्षाच्या छावणींत आनंदाचा जल्लोष पसरला.

१९१२ च्या २४ जूनला, बाल्टिमोरमध्यें डेमॉक्रॅटिक पक्षाच्या मेळाव्याला आरंभ झाला. सुरवातीचे सारे सोपस्कार, त्यानंतरचा उमेदवारांचीं नांवं सुच-

विण्याचा प्रकार आणि विविध उमेदवारांना पाठिंबा देणारीं लांबलांब भाषणं यांत आपण कसा तग धरूं शकूं याविषयीं फ्रँकलिन यांना खात्री नव्हती. गुरुवारपर्यंत नांव सुचविण्यापर्यंत मेळाव्याची प्रगति कशीबशी झाली. आठ उमेदवारांचीं नांवं रिंगणांत ठेवण्यांत आलीं. पहिलं नांव होतं आलाबामाचे सीनेटर ऑस्कर अंडरवुड यांचं. त्यानंतर क्रम होता मिसोरीचे जेम्स क्लार्क यांचा. हे त्या राज्यांत प्रतिनिधी-गृहाचे 'स्पीकर' होते. नांव सुचवल्यानंतर तो तो उमेदवार व्यासपीठावर येई आणि त्याच्या नांवाची घोषणा होतांच सभास्थान जयजयकारांनीं दुमदुमून जाई. न्यूजर्सीमधल्या केमडेनचे जॉन डब्ल्यू. वेसकॉट यांनीं अखेरीं विल्सन यांचं नांव मेळाव्यापुढें मांडलं तेव्हां पहाटेचे दोन वाजत होते. विल्सन यांना पाठिंबा दर्शविणारीं निदर्शनं त्यानंतर सुमारें अर्धा तास चाललीं होतीं.

शुक्रवारीं पहिलं मतदान घेण्यांत आलं. त्याचा निकाल लागला, क्लार्क ४४०, विल्सन ३२४, हार्मन १४८, अंडरवुड ११७, उरलेले उमेदवार याखालीं होते. म्हणजे मुख्य चुरस होती ती क्लार्क आणि विल्सन यांच्यांत. यांतल्या कोणा एकाला $\frac{२}{३}$ मतं मिळेपर्यंत मतदान चालणार होतं. नऊ वेळां मतदान घेण्यांत आलं तरीहि कांहीं प्रगति होईना. मग न्यूयॉर्कच्या प्रतिनिधी-मंडळांचा प्रवक्ता जागींच उभा राहिला आणि त्यांच्या गटाचीं सारीं मतं त्यानं क्लार्क यांच्या नांवें टाकलीं.

आतां फ्रँकलिन रूझवेल्ट यांची खरी परीक्षा होती. विल्सन यांची पुण्याईची आणि प्रभावाची परीक्षा आतां होती. ताकदीचा कण न् कण एकवटून आतां त्यांच्या पुरस्कर्त्यांनीं लढत देण्याची वेळ आली होती. न्यूजर्सीमध्यें बसून विल्सन या परिस्थितीची दखल घेत होते. आपलं नांव मागं घेण्याची त्यांची इच्छा होती; परंतु त्यांचे पुरस्कर्ते, कार्यकर्ते कोणत्याहि परिस्थितींत याला राजी नव्हते. बाल्टिमोरच्या पुरस्कर्त्यांच्या छावणींतून रूझवेल्ट एखाद्या वावटळीसारखे धांवत होते. त्यांना क्षणाचीही स्वस्थता नव्हती. मेळाव्याचं कामकाज आणि मेळाव्यापाठीमागच्या अनधिकृत वाटाघाटी यांत ते पूर्णपणें बुडून गेले होते.

एलिनॉर रूझवेल्ट यांनीं मेळाव्याला उपस्थित राहून त्यांत रस घेण्याचा प्रयत्न केला; परंतु जें घडत होतं त्याचा नीटसा अर्थ त्यांना लागत नव्हता. कारण समोर घडत होतं त्याहून अधिक पडद्यामागं घडत होतं. हें सारं समजून सांगण्याइतकी सवड 'एफ. डी. आर.' यांना नव्हती. परंतु

' नंतर तें आपण समजावून सांगूं ' असं वचन त्यांनीं पत्नीला दिलं. मेळाव्यांतल्या आपल्या पतीच्या अखंड धांवपळीला आणि वणवणीला वैतागून एलिनॉरनं अखेर सांगून टाकलं कीं, " नाहीं तरी तुम्ही फारसे घरीं फिरकतच नाहीं. आमची आठवण तुम्हांला होतच नाहीं. राजकारणांतच तुम्ही सदा व्यग्र असता, तर मुलांना घेऊन मी आतां कॅम्पोवेलोला जातें. तुमचे मेळावे, बैठका, वाटाघाटी आणि खलबतं संपलीं म्हणजे केव्हांहि तुम्ही तिथं या ! "

रूझवेल्ट यांनीं हें मान्य केलं. तसेंच ते कुटुंबाचा निरोप घेऊन मेळाव्याच्या ठिकाणीं धांवले आणि दिवस-रात्रीचं भान विसरून, जवळ जवळ श्वास रोधल्या अवस्थेंत त्यांनीं पुढचा कांहीं काळ काढला. त्यांच्या पराकाष्ठेला आतां यश येत आहे अशीं चिन्हं दिसूं लागलीं होतीं. न्यूयॉर्क राज्याच्या पक्षीय म्होरक्यांनीं इतर राज्यांच्या प्रतिनिधींना हवं तसं फिरवावं, वळवावं याविषयीं इतर राज्यांच्या प्रतिनिधींतून वाढता उद्वेग दिसूं लागला होता. त्याचा फायदा विल्सन यांना मिळाला. मतांचा कौल वारंवार लावण्यांत येत होता. २६ व्या वेळीं क्लार्क यांना ४६३ मतें पडलीं, विल्सन यांना ४०७ मतें पडलीं. उरलेले उमेदवार गळले. आतां या लढतीला पुष्कळच एकसंघ असं स्वरूप आलं. जागोजाग, सभास्थानीं, क्लार्क यांचे पुरस्कर्ते आणि विल्सन यांच्यासाठीं झटणारे कार्यकर्ते यांच्या चर्चा, वादविवाद आणि वाटाघाटी यांच्या फैरी झडत होत्या. शनिवारीं मेळावा तहकूब झाला, तेव्हां असं दिसत होतं कीं, उद्भवलेला पेचप्रसंग टाळण्यासाठीं बहुधा दोघांहि उमेदवारांना आपलीं नांवं मागं घ्यावीं लागतील.

तथापि नव्या प्रत्येक मतदानांत मतामतांनीं विल्सन यांचं बळ वाढत होतं आणि पंधराव्या मतदानापासून क्लार्क यांच्या मतसंख्येंत झपाट्यानं घट सुरू झाली. सोमवारीं दिवसभर हीं दोनहि नांवं वारंवार मतांना टाकण्यांत येत होतीं. मंगळवारीं, ही जुलैची २ तारीख, क्लार्क यांना विल्सन यांनीं निश्चितपणें मागें टाकलं. बेचाळिसाव्या मतदानांत क्लार्क यांना ४२० मतें पडलीं आणि विल्सन यांची मतसंख्या ४९४ होती. विल्सन यांच्या पुरस्कर्त्यांना आभाळ ठेंगणं होऊन गेलं. या ४२ व्या मतदानानंतर आकस्मिकपणें इलिनॉइसचे प्रतिनिधीमंडळ विल्सन यांच्या पाठीमागें उभे राहिले. पाठोपाठ व्हर्जिनियाच्या प्रतिनिधीमंडळानं तेंच केलं. सेहेचाळिसाव्या खेपेला यांत आलाबामा येऊन पडला,

ओहिओ आला. जयघोषांनीं आणि घोषणांनीं मेळाव्याचं स्थान दुमदुमून गेलं. आतां विल्सन यांची मतसंख्या ९९० होती. क्लार्क फारच मागें पडले होते. विल्सन निवडून आले. राष्ट्राध्यक्षपदासाठीं ते आतां डेमॉक्रॅटिक पक्षाचे अधिकृत उमेदवार होते. आणि राष्ट्राध्यक्षपदाच्या अंतिम निवडणुकींत विजय डेमॉक्रॅटिक पक्षाचाच ही काळ्या दगडावरची रेघ होती. आणखी एकाच मतदानांत एक मतानं विल्सन यांची निवड झाली.

इतर शेंकडों प्रतिनिधींप्रमाणें 'एफ. डी. आर.' यांच्या हर्षाला देखील पारावार राहिला नव्हता. आणि ते कमालीचे थकून गेले होते. जवळ जवळ आठवडाभर अपार दगदग झालेली होती. रात्रींरात्रींचीं जाग्रणं होतीं, उपासतापास होते, नंतरचा विजयाचा उन्माद त्याहून मोठा होता. मेळाव्याच्या मंडपांतून धांवत ते बाहेर पडले. पत्नीला त्यांनीं तार ठोकली, 'आज दुपारीं विल्सन निवडून आले. पुढच्या योजना अनिश्चित. फार मोठं यश. फ्रँकलिन' कॅम्पोबेलोच्या बंदरांत 'एफ. डी. आर.'नीं पाऊल टाकलं तेव्हां सुखातिशयानं ते मोहरून गेलेले होते. सहा वर्षांची 'ॲना' एलिनॉर आणि चवथं संपून पांचवं लागलेला जेम्स यांना त्यांनीं आनंदभरानं चेंडूसारखं हवेंत उडवून झेललं आणि दोन वर्षांच्या एलियटला कडेवर वागवीतच ते घरीं पोंचले.

त्यांची स्वतःची निवडणूक नोव्हेंबरांत येत होती. आणि न भूतो न भविष्यति असा प्रचार ते तिच्यांत निवडून येण्यासाठीं करणार होते. कारण स्वतःसाठीं खर्चीं पडलेल्या प्रयत्नांच्या प्रत्येक कणानं राज्यांतील डेमॉक्रॅटिक पक्षाची बाजू बलवान होणार होती.

एलिनॉरनं त्यांना बजावलं, "आतां तुम्हांला पूर्ण विश्रांति घेतली पाहिजे." आणि तिच्या सुरावरून त्यांना उमगलं कीं यांतून सुटका नाहीं.

विश्रांतीचा अर्थ, 'बे ऑफ फंडी' मधून, 'हाफमून' मधून एकीकडे सुकाणूवर हात ठेवून येत्या निवडणूक मोहिमेचे विचार करीत भटकणं; थंडगार वाहत्या पाण्यांत पोहणं, पाठीवर तरंगत आभाळांतले सरकते ढग पाहणं; आणि प्रचाराच्या योजना आंखणं हाच होता.

ते म्हणाले, "यंदा जरा लवकरच आपणाला विश्रांति घेऊन परतलं पाहिजे." आणि एलिनॉर याला तयार झाली.

हाईड पार्कला परत येतांच न्यूयॉर्कमधल्या आपल्या घराची हालहवाल

पाहण्यासाठीं रूझवेल्ट जोडपं तिथं गेलं. त्या हवेंत 'एफ. डी. आर.' ना बेचैन वाटत होतं. आणि संध्याकाळपर्यंत ताप भरून ते खरोखरीच आजारीं पडले.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं जाग आली तेव्हां त्यांना कमालीची अशक्तता वाटत होती. एलिनॉरनं डॉक्टरांना बोलावलं, परंतु हें दुखणं नेमकं आहे कसलं तें पुढें अनेक दिवस डॉक्टरांना देखील ठरवतां येत नव्हतं. शेवटीं एकदांचं या दुखण्याचं निदान झालं. तें 'टायफॉइड' ठरलं. पतीच्या सुश्रुषेमुळेंच दगदग होऊन आपण गळून जात आहोंत असं एलिनॉरला वाटत होतं. त्याच्या पाठोपाठ तिचाहि क्रम लागला. दोघंहि काळजी वाटावी एवढीं आजारी पडलीं आणि दोघांच्या सुश्रुषेला सारा रूझवेल्ट लगबगीनं हाईड पार्ककडे धांवत आल्या.

एलिनॉर बरी होण्याला फारसा काळ लागला नाहीं, परंतु कित्येक दिवस-पर्यंत बिछान्यांतून उठतां देखील न यावं, मग प्रचाराची तर बातच राहो, इतकी 'एफ. डी. आर.' यांची तब्येत खराब होती. याच वेळीं हा असा आजार जडावा यानं फ्रँकलिन तगमगत होते. हें वर्ष मोठं कसोटीचं होतं. 'प्रोग्रेसिव्ह पक्ष' नांवाच्या नव्या पक्षानं रिपब्लिकन पक्षाची संघटना दुभंगून, मोडून टाकली होती. 'बुल मूझर्स' या नांवानं या नव्या पक्षाचीं माणसं जनतेंत ओळखलीं जात. या नव्या पक्षातर्फे राष्ट्राध्यक्षपदासाठीं थिओडोर रूझवेल्ट यांची शिफारस करण्यांत आली होती. म्हणजे नोव्हेंबरच्या निवडणु-कींत आतां एकूण तीन महत्त्वाचे उमेदवार असणार होते. दोन रिपब्लिकन आणि एक डेमॉक्रॅटिक.

एखाद्या कडू औषधाचा डोस गिळावा तशी 'एफ. डी. आर.' यांनीं ही वस्तुस्थिति गिळली.

पत्नीला ते म्हणाले; "गेल्या वेळीं सीनेटसाठीं मी उभा होतों. तेव्हां मला पाठिंबा देणारा आल्बनीचा लुई हौ तुला आठवतो कां?"

एलिनॉरनं मान डोलावली. ती म्हणाली, "म्हणजे तो असा, हडकुळासा आहे, दिसायला पाप्याचं पितर, आणि सिगारेटींमागून सिगारेटी ओढत असतो, तोच ना?

"हो तोच. मला वाटतं माझ्या प्रचाराच्या मोहिमेचा कार्यक्रम मी त्याच्या हातीं सोंपवावा."

" इतका मोठा धोका पत्करायची गळ त्याला घालावी असा कांहीं हक्क त्याच्यावर तुमचा आहे काय ? "

हें म्हणतांना एलिनॉरच्या मनांत वरच्या भागांतल्या एका राज्यांतल्या अपक्ष पत्रकाराचं उदाहरण होतं. डेमॉक्रॅटिक पक्षाच्या वरिष्ठांच्या विरुध्द स्वतःला नापसंत असलेल्या गोष्टींविरुध्द भूमिका त्यानं पत्करली. यामुळें अक्षरशः भणंग होण्याची वेळ त्याच्यावर आलेली होती. त्याच्या वृतपत्राच्या उत्पन्नाचं प्रमुख साधन अशा ज्या कायदेशीर सरकारी नोटीशी नि जाहिराती त्याला मिळत त्या अधिकाररूढ पक्षाच्या म्होरक्यांनीं बंद पाडल्या होत्या.

फ्रँकलिन यांचा प्रचार सांभाळण्याची तयारी लुई हौ यांनीं दर्शविली. फ्रँकलिन डिलॅनो रूझवेल्ट यांना फार मोठा भविष्यकाळ आहे असं त्याला वाटत होतं; आणि ' लुईच्या निमित्तानं आपल्याला अत्यंत विश्वासू सहकारी लाभला ' अशी फ्रँकलिन यांची खात्री पटली होती. प्रचाराची लढाई हौ यांनीं इतक्या प्रभावीपणानं लढविली कीं, भरपूर बहुमत मिळवून राज्यसीनेटवर ' एफ. डी. आर. ' निवडून आले. त्याचवेळीं टॅफ्ट आणि थिओडोर रूझवेल्ट यांचा पराभव करून राष्ट्राध्यक्ष म्हणून वुड्रो विजयी झाले. या निवडणुकांचा आणखी चांगला भाग होता तो म्हणजे ' एफ. डी. आर. ' यांचा शाळकरी सोबती, लॅथॉप ब्राऊन, न्यूयॉर्कच्या एका मतदार संघांतून कॉंग्रेसमध्यें निवडून आला होता.

या साऱ्यांची, टायफॉइडमधून धीम्या गतीनं परंतु निश्चितपणें बरं होण्याला, सीनेटर रूझवेल्ट यांना फार मदत झाली. अखेर एकदांचे ते स्वतःच्या पायावर उभे राहिले. बाहेर फिरूं लागले, आपल्या कायद्याच्या कचेरींत जाऊन बसूं लागले, आल्बनीची गाडी पकडण्यासाठीं घाईगर्दीनं चालूं लागले आणि या ना त्या प्रश्नावर बोलण्यासाठीं सीनेटच्या सभागृहांत ताठ कुडीनें उभे राहूं लागले.

नव्या राष्ट्राध्यक्षांच्या अधिकारग्रहणाच्या निमित्तानं मार्चमध्यें फ्रँकलिन हे वॉशिंग्टनला आले आणि विलार्ड हॉटेलच्या लॉबीमधून लगबगीनें जात असतां जोसेफस् डॅनिअल्स यांना त्यांनीं पाहिलं. झटक्यानं पुढें होऊन त्यांनीं डॅनिअल्स यांचा हात पकडला.

ते म्हणाले, “ नौ–दलाचे सेक्रेटरी म्हणून तुमची नियुक्ति झाल्याचं ऐकून मला फार फार आनंद वाटला. तुमचं मी अभिनंदन करतो. ”

डॅनिअल्स हे किती कर्तृत्ववान् गृहस्थ होते आणि या सन्मानाला ते किती लायक होते याची फ्रँकलिन यांना कल्पना होती.

यावर सेक्रेटरी डॅनिअल्स यांनीं दिलेल्या जबाबानें फ्रँकलिन यांना स्तिमित केलें. डॅनिअल्स म्हणाले, “ मी म्हणतो, नौ–दलाचा असिस्टंट सेक्रेटरी म्हणून वॉशिंग्टनला यायला तुम्हांला कितपत आवडेल ? ”

‘ एफ. डी. आर. ’ यावर चित्कारले, ‘ कितपत आवडेल ? अहो, याहून अधिक मला काय आवडेल ? साऱ्या जगांत मला इतकी आवडणारी दुसरी गोष्ट असणार नाहीं. नव्या सरकारांत माझा समावेश झाला तर माझ्यासारखा भाग्यवान् मीच. आणि बरं कां, संबंध आयुष्यभर बोटीवर, जहाजावर, मी प्रेम केलंय, नौ–दलाचा अभ्यास केलाय, आणि त्याचा असिस्टंट सेक्रेटरी होणं याइतकी माझ्या दृष्टीनं अभिमानाची दुसरी बाब नाहीं. ”

डॅनिअल्स यांना या प्रकरणीं प्रेसिडेंट विल्सन यांचा सल्ला घ्यावा लागणार होता आणि तो आपण घेऊं असं अभिवचन त्यांनीं फ्रँकलिन यांना दिलं.

हें खरं कीं, पक्षप्रमुखांच्या वर्तुळांतून, “मध्यवर्ति सरकारांत आपला समावेश झाला तर आपल्याला आनंद होईल ” असं ‘एफ. डी. आर.’ यांनीं वेळोवेळीं सुचवलं होतं. परंतु असं कांहीं एवढ्यांतच घडेल अशी अपेक्षा मात्र त्यांनीं ठेवली नव्हती. चुलतभाऊ थिओडोर रूझवेल्ट यांनीं भूषविलेलं पद त्यांना सन्मानानं मिळावं हा योगायोग विलक्षण होता. काळजांत आशा अपेक्षांचं तुफान चालू असतांना नव्या राष्ट्राध्यक्षांचा शपथविधि फ्रँकलिन यांनीं पाहिला. कॅपिटॉल बिल्डिंगसमोर प्रशस्त, उंच व्यासपीठावर दोघे उभे होते. मावळते राष्ट्राध्यक्ष टॅफ्ट आणि उगवते राष्ट्राध्यक्ष विल्सन. संरक्षण म्हणून व्यासपीठाभोंवतालची बरीच जागा दोरखंड बांधून राखून ठेवण्यांत आली होती. परंतु प्रेसिडेंट विल्सन यांनीं दोरखंडाच्या या सरहद्दी पहातांच फर्मावलें कीं, “ ते दोरखंड कापा, लोकांना आंतमध्यें येऊं द्या. ” दोरखंड दूर होतांच जमाव चहूंबाजूंनीं उचंबळला आणि नव्या राष्ट्राध्यक्षांच्या पहिल्या भाषणाचे शब्द त्यांच्या कानीं पडले, “ आजचा दिवस यशाच्या सोहळ्याचा नाहीं.

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
क्रमांक ८००.२.२... दि: ........

सेवेच्या प्रतिज्ञेचा आहे. इथं जमले आहेत ते एका पक्षाचे सदस्य नव्हेत तर साऱ्या मानवतेचे अंश होत. माणसांचीं हृदयें आज आमच्याकडे उत्कंठेनें वळलेलीं आहेत. माणसांच्या जगण्यामरण्याचा सवाल आज आमच्यासमोर उभा ठाकला आहे. आम्ही काय करणार तेंच विचारण्यासाठीं माणसांच्या आशा जणूं आमच्याभोंवतीं आज दाटून राहिल्या आहेत. "

# नौ-दलाचे असिस्टंट सेक्रेटरी

त्याच महिन्यांत ' एफ. डी. आर. ' यांना कळवण्यांत आलं कीं, राष्ट्राध्यक्ष आणि अमेरिकेचे सीनेट यांनीं त्यांच्या नव्या नेमणुकीला मंजुरी दिली असून तात्काळ त्यांनीं वॉशिंग्टनला येऊन नवे अधिकार हातीं घ्यावेत.

यावर अभिनंदनाचं पहीलं पत्र आलं तें टेडी रूझवेल्ट यांचं. त्यांनीं म्हटलं होतं, ' तुझी नियुक्ति झाली असं ऐकून मनाला फार संतोष वाटला. नव्या कामांत तुला भरपूर आनंद लाभेल आणि तुझ्या हातून उत्तम कर्तृत्व घडेल असा विश्वास मला वाटतो. '

वॉशिंग्टनमध्यें नव्या अधिकारपदीं रूजू होणं याचा अर्थ फ्रँकलिन यांच्या साऱ्या कुटुंबियांनीं राजधानीच्या या शहरांत स्थायिक होणं असा होता. आतां शिरावर आलेल्या या नव्या जबाबदाऱ्यांनीं एलिनॉर राजकारणाच्या फारच निकट आलेली होती. कॉंग्रेसमधल्या विविध प्रतिनिधींच्या बायकांशीं तिच्या गांठीभेटी आतां घडत होत्या, त्यांना वारंवार घरीं बोलवावं लागत होतं. त्यांचा पाहुणचार करावा लागत होता. याव्यतिरिक्त न्यायाधिशांच्या बायका, नौ—दलांतल्या अधिकाऱ्यांच्या बायका या घरीं प्रत्यही येत-जात होत्याच. लॅथ्रॉप ब्राऊन यांचं कुटुंब देखील आतां वॉशिंग्टनमध्यें येऊन राहिलं होतं आणि रूझवेल्ट मंडळींच्या दृष्टीनें हें फार चांगलं घडलं होतं.

टेडी रूझवेल्टनीं अगोदर हेरल्याप्रमाणें उत्तम प्रकारचें कर्तृत्व फ्रँकलिन यांच्या हातून आरंभापासून घडूं लागलं. त्यांच्या अंगच्या कार्य करण्याच्या अजोड कुवतीनं ज्येष्ठ मंडळीदेखील त्यांच्या पुढें नमूं लागली. नौदलाच्या सेक्रेटरीला नौ दलाशीं जागरूक संबंध ठेवावा लागे, मंत्रिमंडळांच्या बैठकांना उपस्थित राहावें लागे, खुद्द प्रेसिडेंट आणि कॉंग्रेसमधले महत्त्वाचे नेते यांच्याशीं वारंवार चर्चा विचारविनीमय करावे लागत, आणि या काळांत असिस्टंट सेक्रेटरीला टेबलावर येणारा कामाचा ढिगारा उपसावा लागे.

एवढंच करून थांबण्याची 'एफ. डी. आर.' यांची इच्छा नव्हती. नौदलांत आणि जागोजागच्या गोद्यांतून पुष्कळशीं जहाजं आणि बोटी होत्या. त्यांचा जवळून आणि प्रत्यक्ष परिचय करून घेण्याची 'एफ. डी. आर.' यांची मनिषा होती. म्हणून, खात्यानं स्वतंत्र चिटणीस त्यांना नेमून दिलेला असतांना देखील त्यांनीं स्वतः आल्बनीमधल्या लुई हौ यांना पत्र लिहून आपला वैयक्तिक चिटणीस म्हणून काम करण्याची विनंति केली. फ्रँकलिन रूझवेल्ट ह्यांच्याविषयीं लुई हौ यांच्या मनांत निरतिशय आदर वसत होता. एव्हांनाच पत्रांतून रूझवेल्ट यांना, 'आदरणीय भावी राष्ट्राध्यक्ष' असं संबोधण्याला त्यांनीं सुरुवात केली होती. सत्वरच ते वॉशिंग्टनमध्यें आले. आपल्याबरोबर आपली पत्नी आणि दोन मुलं देखील त्यांनीं आणलीं.

आणि मग लौकरांत लौकर रूझवेल्ट नौ–दलाचे तळ पहात फिरूं लागले. बोटींची पाहणी त्यांनीं सुरू केली. आणि त्यांना नव्यानं असं आढळून आलं कीं, वाफेवर चालणारीं जहाजं नवीं असल्यापासूनचे कित्येक ज्येष्ठ आणि वयोवृद्ध नौदल अधिकारी नौदलाच्या सेवेंत होते. यांच्याशीं रूझवेल्ट यांनीं नवे संबंध प्रस्थापित केले. शिडं उभारून जहाजं कशीं हाकारावींत याचं ज्ञान असलेला हा नवा मंत्री या ज्येष्ठ दर्दी मंडळीला तेव्हांच पटला.

बंदरा बंदरांच्या आणि किनार–पट्टीच्या तपासणी सफरीवर बोटींनीं फिरणं रूझवेल्ट यांच्या अधिकारक्षेत्रांत येत होतं आणि एके दिवशीं फ्लसर या युद्धनौकेवर चढून मुख्य किनारपट्टीनं ते निघाले. 'मेन' आणि 'कॅम्पोबेलो' बेटादरम्यानच्या उथळ पाण्यांत ते आले आणि 'एफ. डी. आर.' यांनीं पुढें होऊन असं जाहीर केलं कीं, यानंतरच्या प्रवासांत बोटीचं संचलन ते स्वतः करणार होते. बोटीचे कप्तान लेफ्टनंट विल्यम एफ. हालसे, ज्युनियर;

यांना ही कल्पना तितकीशी मानवली नाहीं. वेगवान् अशी युध्दनौका म्हणजे कांहीं एखादं ' वाफोरं ' नव्हतं. ' एफ. डी. आर. ' यांनीं त्यांचा इशारा हंसत कानाआड केला. बोटीचं सुकाणू हातीं घेतलं आणि किंचित् काळांतच कॅप्टन हालसे यांच्या मुद्रेवर निश्चिततेचं, विश्वासाचं हंसूं उमटलं.

नंतर हालसे यांनीं याविषयींच म्हटलं, ' युध्दनौकेचा रोख अनेकदां बिनचूक वाटतो तरी तिचा मार्ग सुरक्षित असतोच असं नाहीं. त्यासाठीं तिच्या बाहेरच्या घेराचा आणि वळण मारतांना तिच्या नेमक्या आवाक्याचा अंदाज असावा लागतो. मिस्टर रूझवेल्ट यांनीं पहिलं वळण मारलं तेव्हां नेमका याचाच त्यांना अंदाज आहे याची प्रचीति मला मिळाली आणि मी निश्चित झालों. '

या प्रसंगाविषयीं लेफ्टनंट हॅरॉल्ड आर. स्टार्क यांना कळलं तेव्हां ते म्हणाले, " मिस्टर रूझवेल्ट यांच्याविषयीं कांहीं सांगूंच नका. ते भलतेच दर्यावर्दी आहेत. "

परंतु मि. रूझवेल्ट यांच्या दृष्टीनं एव्हांना महत्त्वाची गोष्ट होती ती वेगळीच. त्यांच्या मतें अमेरिकेचं नौ-दल फार छोटं होतं, तोटकं होतं. आजवर केलेल्या यूरोपच्या सफरींनीं यूरोपच्या राजकारणाचं पक्कं ज्ञान त्यांना झालेलं होतं. वादग्रस्त सरहद्दी आणि प्रदेश यांवरून बाल्कन टापूंत चालणाऱ्या लढायांचा वृत्तांत ते अगत्यानं नजरेखालून घालीत होते. नव्या अधिकारपदाचीं सूत्रं त्यांनीं हातीं घेतलीं तेव्हां पहिल्या बाल्कन युद्धांत, बाल्कन राष्ट्रांतून तुर्कांना बाहेर हांकलण्यांत आलेलं होतं. जूनअखेरहि दुसरं बाल्कन युद्ध उसळलं. बल्गेरिया विरुद्ध सरबिया आणि ग्रीस असा हा सामना होता. हें नवें युद्ध सुमारें महिनाभरच चाललं. परंतु या निमित्तानं एक नवंच प्रत्यंतर लाभलं. तें हें कीं, छोट्या छोट्या राष्ट्रांतल्या युद्धापासून मोठीं राष्ट्रं इतःपर अलिप्त राहूं शकत नव्हतीं.

अधिक बलशाली, अधिक कार्यकुशल असं नौदल अमेरिकेला हवं यासाठीं निवडीची चळवळ ' एफ. डी. आर ' यांनीं उघडली. आणि या कामांत खुद्द राज्ययंत्रणा आणि नौदल यांतूनच त्यांना प्रखर विरोध उभा राहिला. राष्ट्राध्यक्ष विल्सन हे हाडाचे योद्धे बिलकुल नव्हते आणि डॅनिअल्स हेहि नव्हतेच नव्हते. जगांत शांतता नांदलीच पाहिजे अशी दोघांचीहि दृढ श्रद्धा होती.

परंतु रूझवेल्ट हे आपल्या आग्रहाला चिकटून राहिले, आणि त्यांच्या वरिष्ठांनींहि आपला विरोध चालूंच ठेविला. 'एफ. डी. आर.' यांना वाटत होतं कीं आपला वरिष्ठ कोत्या दृष्टीचा आहे. प्रादेशिक पूर्व ग्रह बाळगणारा आहे. आणि सेक्रेटरी डॅनिअल्स आणि आपण यांतल्या या संघर्षाविषयीं ते आकसानें बोलूं लागले. नित्यनैमित्तिक मेळाव्यांतून आपल्या वरिष्ठांची कुचेष्टाहि त्यांनीं आरंभिली. 'गांवढळ' अशी त्यांची संभावना देखील चालवली.

परिणामीं शेवटीं त्यांच्याच एका हितचिंतकानं आणि मित्रानं त्यांना याबद्दल धारेवर धरलं आणि हडसून खडसून जाब विचारला. रूझवेल्ट यांनीं ही संभावना पत्करली. त्यांना कळून चुकलं कीं, हा आपला लहान तोंडीं मोठा घांस झाला, आणि आंतरराष्ट्रीय संबंधांत पुष्कळच गोष्टी आपल्याला अद्याप शिकायच्या आहेत. यानंतर पाठोपाठ न्यूयॉर्क शहराच्या पक्षीय राज्य यंत्रणेकडून अशाच प्रकारची संभावना त्यांना प्राप्त झाली. असिस्टंट सेक्रेटरीपद पत्करुन वर्ष उलटतं न उलटतं तोंच कुणाचीहि—अगदीं एलिनॉरचीहि—दखल न घेतां त्यांनीं जाहीर केलं कीं अमेरिकेच्या सिनेटसाठीं आपण उभे राहणार आहोंत. सेक्रेटरी डॅनिअल्स आणि लुई हौ या दोघांनींहि हें कसं अयोग्य आहे, अनुचित आहे, अनिष्ट आहे. तें रूझवेल्ट यांना पटवण्याचा प्रयत्न केला. परंतु कोणत्याहि परिस्थितींत १९१४ च्या सप्टेंबरांत डेमॉक्रॅटिक पक्षाच्या प्राथमिक चांचणीसाठीं उभे राहण्याचा रूझवेल्ट यांचा निश्चय ढळला नाहीं.

या परिस्थितींत या ताज्या, गरम रक्ताच्या, हट्टी माणसाला कसा हाताळावा याची कल्पना सरावलेल्या पक्षीय वरिष्ठांना उत्तम प्रकारें होती. वास्तविक सीनेटमध्यें सहजीं निवडून यावं अशी गुणवत्ता अंगीं असलेल्या आणि असा आदर निर्माण केलेल्या 'एफ. डी. आर.' यांच्या विरूध्द त्यांनीं प्रतिस्पर्धी उमेदवार उभा केला.

उन्हाळ्यासाठीं एलिनॉर आणि मुलांच्या बरोबर रहाण्याला रूझवेल्ट कॅम्पोबेलोला गेले, तेव्हां एलिनॉरला म्हणाले, "लुईला वाटतं कीं, मी माझी अक्कल गहाण टाकलीय्." एलिनॉरनं ओठावरून एकदां जीभ फिरवली आणि ती कांहींच म्हणाली नाहीं.

त्याच उन्हाळ्यांत कांहीं काळ कौटुंबिक स्वरूपाची एक समस्या निर्माण झाली, आणि तिच्यापुढें सारा राजकीय प्रश्न बाजूला पडला. ऑगस्ट अखेरीस

एलिनॉरचं पांचवं बाळंतपण होत होतं, आणि तिची योग्य ती काळजी घेण्यासाठीं नेहमींच्या डॉक्टरांना न्यूयॉर्कहून आणण्याचं ठरलं होतं. परंतु तारखेंत कांहीं तरी चूक झाली, आणि १९१४ सालांतल्या १६ ऑगस्टला, उत्तर रात्रीं एलिनॉरला वेणा सुरूं झाल्या, आणि डॉक्टर तर नव्हते! फ्रँकलिननीं कसेबसे कपडे केले, नेहमींच्या नावाड्यांना छोटी नौका तयार करण्याला खिडकीवाटें ओरडून सांगितलं आणि मेन मधल्या डॉ. ई. एच. बेनेट. या लुबोक मेन, इथल्या स्नेह्यांना आणण्यासाठीं ते निघाले.

भरीस भर म्हणून एलिनॉरचं तें बाळंतपण अवघड ठरलं. सारी रात्रभर त्रास होत राहिला. पुढचा दिवसभर परिस्थिति तशीच होती. बाळ आणि बाळंतिण आतां सुखरूप आहेत अशी खात्री पटेपर्यंत डॉ. बेनेट एलिनॉरच्या उशाशीं बसून होते. १७ तारखेला संध्याकाळीं एलिनॉरला मुलगा झाला. कुटुंबांतील हा दुसरा मुलगा, आणि पुन्हां एकदां त्याचं 'फ्रँकलिन डेलॉनो रूझवेल्ट ज्युनियर' हेंच नांव ठेवण्यांत आलं.

कौटुंबिक आणि राजकीय दडपणांचा परिणाम फ्रँकलिन यांच्या तब्येतीवर आतां होऊं लागला होता. त्यांच्या स्वभावांत बदल घडत होता, त्यांच्या वृत्तींतील उसळी क्रमशः दबत चालली होती. डोळ्यांभोवतीं काळीं वर्तुळं दिसूं लागलीं होतीं. पत्नी आणि नवीन मूल यांना आईच्या स्वाधीन करून आणि अधिक सुश्रुषेसाठीं दाई ठेवून ते सप्टेंबरच्या प्राथमिक चांचणी निवडणुकीसाठीं न्यूयॉर्कला परतले. आपण जिंकत नाहीं हें त्यांना एव्हांना मनोमन कळून चुकलं होतं. आणि घडलंहि तसंच. त्यांचा पराभव लक्षांत रहावा असा होता, सपशेल होता, आणि त्याचं कारण एकच होतं कीं, आपल्याहून सुज्ञ माणसांचा सल्ला त्यांनीं मानला नव्हता.

पराभवाची वेदना जाणवण्याला त्यांना फारशी उसंत लाभली नाहीं, कारण त्यांचं लक्ष नव्या जागतिक घडामोडींनीं वेधून घेतलं. दुसऱ्या बाल्कन युद्धापासून युरोप म्हणजे एक लष्करी छावणीच होत चालली होती. शांतता काळांतलं बळ-लष्करी बळ—जर्मनींतले लष्करी सत्ताधारी भयावह वाटावं एवढ्या प्रमाणांत वाढवीत होते, आणि या भयापोटींच इतर देश आपआपलं लष्करी बळ जास्तींत जास्त वाढवीत होते. यांत फ्रान्स होता, रशिया होता, ऑस्ट्रिया–हंगेरी होते. १९१४ च्या जूनमध्यें ऑस्ट्रिया-हंगेरीच्या सिंहासनाचे वारस

आर्चडयूक फ्रँसिस फर्डिनांड हे सपत्निक एका बाल्कन देशांतून प्रवास करीत होते, आणि सरबियन सरहद्दीनजीक साराजेव्हो नगरांत मारेकऱ्यांनीं दोघांचाहि जीव घेतला. याचा ठपका सहाजिकच सरबियावर आला. या प्रकरणाची चौकशी हेगच्या न्यायालयापुढें व्हावी ही सरबियाची मागणी उपेक्षिण्यांत आली. ऑस्ट्रिया-हंगेरीनें सरबियाविरुद्ध युद्ध पुकारलं, रशिया युद्धसज्ज झाला, आणि जर्मनीनं रशियाविरुद्ध युद्ध घोषणा केली.

या युद्धांत अमेरिका प्रत्यक्षपणें गुंतण्याचा संभव जाणवूं लागला आणि 'एफ. डी. आर.' यांच्या स्वभावांतली अखेरची स्वयंतुष्टता गळून पडली. विल्सन यांच्या नजरेंतली वेदना आतां त्यांना उमगूं लागली. विल्सन यांच्या एकमेकांवर दडपलेल्या ओठांतील दुःख त्यांना कळूं लागलं.

त्यांना आतां तीन मुलगे होते. जेम्स सात वर्षांचा होता, ईलियट चार वर्षांचा होता. आणि फ्रँकलिन ज्यूनियर, रशियाविरुद्ध जर्मनीनं युद्ध घोषणा केल्यानंतर सतराच दिवसांनीं जन्मला होता. भविष्यकाळांतल्या कोणत्यातरी युद्धांत खर्ची पडण्यासाठींच हीं मुलं जन्मला आलेलीं होतीं काय? पोटीं मुलं आलेल्या कोणत्याहि बापाला अस्वस्थ करणारा हा प्रश्न होता. रूझवेल्ट यांना या प्रश्नानं बेचैन करून टाकलं.

नंतरचे अनेक दिवस वॉशिंग्टनमध्यें वातावरण तंग होतं; औदासिन्यानं आणि फिकिरीनं कुंद झालेलं होतं. बाळंतपणांतून उठून एलिनॉर परत आली याचा 'एफ. डी. आर.' ना मनापासून आनंद झाला. कारण तिच्याशीं बोलल्यानं निर्णय लौकर घेतां येत होते, अधिक विचारपूर्वक घेतां येत होते. तरूण नौदल अधिकाऱ्यांच्या बायकांना देखील एलिनॉर परत आल्यानं फार आनंद झाला होता; कारण या बायांवर त्या मातृवत् प्रेम करीत. त्यांच्या सुखासाठीं झटत. आणि ज्यांचे पती आज्ञेवरून ऐन धोक्यांत गेले असतील त्यांना धीर देत.

युरोपांत युध्द सुरू झाल्यापासून अमेरिकेनें युद्धसज्ज राहिलें पाहिजे अशी मागणी 'एफ. डी. आर.' नीं नव्यानं जोरकसपणें सुरू केली होती. नौ-दलाचे प्रमुख सेक्रेटरी डॅनिअल्स यांच्यामागें याबाबत त्यांनीं लकडा लावला होता. अमेरिकेचें नौ-दल वाढविणें आणि प्रबल राखणें अत्यावश्यक होतें. विद्यमान परिस्थितींत ब्रिटिश आरमाराची वाताहत होती तर अमेरिकेची धडगत राहणार नव्हती.

ब्रिटिश आरमार शक्तिशाली होतं आणि जगांत जागोजाग ब्रिटनच्या वसाहती असल्यानं अमेरिकेची अन्न-मदत आणि सुश्रुषा गाड्या दूरदेशीं पाठविण्याला ब्रिटनची मदत मोठ्या प्रमाणावर होत होती. युरोपांतल्या युद्धांतून निर्माण झालेल्या दुष्काळाच्या बळींना अन्न पुरविण्याचं काम त्या काळांत इंग्लंडमध्यें असलेले हर्बर्ट हूवर यांच्याकडे होतं. आपल्या आरमारी सामर्थ्याच्या बळावर कांहीं काळ बाहेरदेशांतून युद्धसाहित्य मिळविणं ब्रिटननं जर्मनीला अशक्य करून टाकलं. परंतु जर्मनीकडे एक नवीन अस्त्र होतं, 'यू-बोट'. पाणबुड्या नुकत्याच वापरांत येऊं लागल्या होत्या आणि त्यांचा वापर मोठ्या प्रमाणावर पहिल्या जागतिक युद्धांतच प्रथम झाला. ब्रिटनला वेढा घालून त्याची उपासमार करण्यासाठीं जर्मनीनं 'यू-बोटीं'चं तांडे पाठवले. लवकरच सर्वांना कळून चुकलं कीं, आपल्या पाणबुड्यांच्या जोरावर जर्मनी अनिर्बंधपणें सागरी युद्ध खेळत होती. म्हणजे शत्रू राष्ट्रांच्या केवळ युद्धनौकाच या पाणबुड्या बुडवीत नव्हत्या, तर नि:शस्त्र अशी व्यापारी जहाजदेखील त्या बुडवीत होत्या. १९१५ च्या ७ मेला, इंग्लिश उतारू बोट 'लुसिटानिया' एका जर्मन पानबुडीनं बुडविली आणि १२०० माणसें बुडून मेलीं. यांत शंभराहून अधिक अमेरिकन रहिवाशी होते. जर्मनीच्या चांचेगिरीविरुद्ध अमेरिका तापूं लागली, लोकमत या घटनेनं पुरतंच खवळून गेलं.

या बेबंद होऊं पहाणाऱ्या लोकमतावर प्रेसिडेंट विल्सन शिकस्तीनं ताबा राखण्याचा प्रयत्न करीत होते. जर्मनीला त्यांनीं कळविलं कीं, घडल्या गोष्टींची जबाबदारी त्यांच्या शिरावर होती आणि अशी मागणी केली कीं, नि:शस्त्र आरमाराविरुद्ध जर्मनीनं चाललेलं युद्ध तिनं तात्काळ मागं घ्यावं.

रूझवेल्ट ह्यांनीं या प्रकरणीं प्रेसिडेंट विल्सन यांना प्रशंसेचं एक पत्र लिहिलं. त्यांत त्यांनीं म्हटलं होतं, "गेले कांहीं दिवस आपण माझं मन व्यापून राहिला आहांत. कोणत्या परिस्थितींतून आपल्याला जावं लागत आहे याची पूर्णपणें कल्पना मला आहे. याबाबतींत आपल्या मागं मी किती निष्ठेनें उभा आहे तें पुनश्च सांगण्याची जरूरी आहे असं मला वाटत नाहीं. आपल्याला याची कल्पना असेलच. परंतु यावेळीं साऱ्या राष्ट्रानं त्याच निष्ठेनं आणि एकसंघपणं आपल्या मागं राहिलं पाहिजे असं मला उत्कटपणें वाटत होतं. एवढं कळवावं म्हणूनच हें लिहीत आहें."

आर्चड्यूक फ्रँसिस फर्डिनांड हे सपत्निक एका बाल्कन देशांतून प्रवास करीत होते, आणि सरबियन सरहद्दीनजीक साराजेव्हो नगरांत मारेकऱ्यांनीं दोघांचाहि जीव घेतला. याचा ठपका सहाजिकच सरबियावर आला. या प्रकरणाची चौकशी हेगच्या न्यायालयापुढें व्हावी ही सरबियाची मागणी उपेक्षिण्यांत आली. ऑस्ट्रिया-हंगेरीनें सरबियाविरुद्ध युद्ध पुकारलं, रशिया युद्धसज्ज झाला, आणि जर्मनीनं रशियाविरुद्ध युद्ध घोषणा केली.

या युद्धांत अमेरिका प्रत्यक्षपणें गुंतण्याचा संभव जाणवूं लागला आणि 'एफ. डी. आर.' यांच्या स्वभावांतली अखेरची स्वयंतुष्टता गळून पडली. विल्सन यांच्या नजरेंतली वेदना आतां त्यांना उमगूं लागली. विल्सन यांच्या एकमेकांवर दडपलेल्या ओठांतील दुःख त्यांना कळूं लागलं.

त्यांना आतां तीन मुलगे होते. जेम्स सात वर्षांचा होता, ईलियट चार वर्षांचा होता. आणि फ्रँकलिन ज्यूनियर, रशियाविरुद्ध जर्मनीनं युद्ध घोषणा केल्यानंतर सतराच दिवसांनीं जन्मला होता. भविष्यकाळांतल्या कोणत्यातरी युद्धांत खर्ची पडण्यासाठींच हीं मुलं जन्मला आलेलीं होतीं काय? पोटीं मुलं आलेल्या कोणत्याहि बापाला अस्वस्थ करणारा हा प्रश्न होता. रूझवेल्ट यांना या प्रश्नानं बेचैन करून टाकलं.

नंतरचे अनेक दिवस वॉशिंग्टनमध्यें वातावरण तंग होतं; औदासिन्यानं आणि फिकिरीनं कुंद झालेलं होतं. बाळंतपणांतून उठून एलिनॉर परत आली याचा 'एफ. डी. आर.' ना मनापासून आनंद झाला. कारण तिच्याशीं बोलल्यानं निर्णय लौकर घेतां येत होते, अधिक विचारपूर्वक घेतां येत होते. तरूण नौदल अधिकाऱ्यांच्या बायकांना देखील एलिनॉर परत आल्यानं फार आनंद झाला होता; कारण या बायांवर त्या मातृवत् प्रेम करीत. त्यांच्या सुखासाठीं झटत. आणि ज्यांचे पती आज्ञेवरून ऐन धोक्यांत गेले असतील त्यांना धीर देत.

युरोपांत युध्द सुरू झाल्यापासून अमेरिकेनें युद्धसज्ज राहिलें पाहिजे अशी मागणी 'एफ. डी. आर.' नीं नव्यानं जोरकसपणें सुरू केली होती. नौ-दलाचे प्रमुख सेक्रेटरी डॅनिअल्स यांच्यामागें याबाबत त्यांनीं लकडा लावला होता. अमेरिकेचें नौ-दल वाढविणें आणि प्रबल राखणें अत्यावश्यक होतें. विद्यमान परिस्थितींत ब्रिटिश आरमाराची वाताहत होती तर अमेरिकेची धडगत राहणार नव्हती.

ब्रिटिश आरमार शक्तिशाली होतं आणि जगांत जागोजाग ब्रिटनच्या वसा हती असल्यानं अमेरिकेची अन्न-मदत आणि सुश्रुषा गाड्या दूरदेशीं पाठविण्याला ब्रिटनची मदत मोठ्या प्रमाणावर होत होती. युरोपांतल्या युद्धांतून निर्माण झालेल्या दुष्काळाच्या बळींना अन्न पुरविण्याचं काम त्या काळांत इंग्लंडमध्यें असलेले हर्बर्ट हूवर यांच्याकडे होतं. आपल्या आरमारी सामर्थ्याच्या बळावर कांहीं काळ बाहेरदेशांतून युद्धसाहित्य मिळविणं ब्रिटननं जर्मनीला अशक्य करून टाकलं. परंतु जर्मनीकडे एक नवीन अस्त्र होतं, 'यू-बोट'. पाणबुड्या नुकत्याच वापरांत येऊं लागल्या होत्या आणि त्यांचा वापर मोठ्या प्रमाणावर पहिल्या जागतिक युद्धांतच प्रथम झाला. ब्रिटनला वेढा घालून त्याची उपासमार करण्यासाठीं जर्मनीनं 'यू-बोटीं'चं तांडे पाठवले. लवकरच सर्वांना कळून चुकलं कीं, आपल्या पाणबुड्यांच्या जोरावर जर्मनी अनिर्बंधपणें सागरी युद्ध खेळत होती. म्हणजे शत्रू राष्ट्रांच्या केवळ युद्धनौकाच या पाणबुड्या बुडवीत नव्हत्या, तर निःशस्त्र अशी व्यापारी जहाजदेखील त्या बुडवीत होत्या. १९१५ च्या ७ मेला, इंग्लिश उतारू बोट 'लुसिटानिया एका जर्मन पानबुडीनं बुडविली आणि १२०० माणसें बुडून मेलीं. यांत शंभराहून अधिक अमेरिकन रहिवाशी होते. जर्मनीच्या चांचेगिरीविरुद्ध अमेरिका तापूं लागली, लोकमत या घटनेनं पुरतंच खवळून गेलं.

या बेबंद होऊं पहाणाऱ्या लोकमतावर प्रेसिडेंट विल्सन शिकस्तीनं ताबा राखण्याचा प्रयत्न करीत होते. जर्मनीला त्यांनीं कळविलं कीं, घडल्या गोष्टींची जबाबदारी त्यांच्या शिरावर होती आणि अशी मागणी केली कीं, निःशस्त्र आरमाराविरुद्ध जर्मनीनं चाललेलं युद्ध तिनं तात्काळ मागं घ्यावं.

रूझवेल्ट ह्यांनीं या प्रकरणीं प्रेसिडेंड विल्सन यांना प्रशंसेचं एक पत्र लिहिलं. त्यांत त्यांनीं म्हटलं होतं, 'गेले कांहीं दिवस आपण माझं मन व्यापून राहिला आहांत. कोणत्या परिस्थितींतून आपल्याला जावं लागत आहे याची पूर्णपणें कल्पना मला आहे. याबाबतींत आपल्या मागं मी किती निष्ठेनें उभा आहे तें पुनश्च सांगण्याची जरूरी आहे असं मला वाटत नाहीं. आपल्याला याची कल्पना असेलच. परंतु यावेळीं साऱ्या राष्ट्रानं त्याच निष्ठेनं आणि एकसंघपणं आपल्या मागं राहिलं पाहिजे असं मला उत्कटपणें वाटत होतं. एवढं कळवावं म्हणूनच हें लिहीत आहें."

प्रेसिडेंट विल्सन यांनीं पाठविलेल्या उत्तरांत म्हटलं होतं कीं, "या प्रकारच्या पत्रांनीं फार बरं वाटतं. कर्तव्य बजावल्याचं सार्थक वाटतं."

याच बिकट काळांत प्रेसिडेंट विल्सन यांचा मोठेपणा आणि त्यांची प्रवृत्ति 'एफ्. डी. आर.' यांना उत्तरोत्तर, अधिकाधिक दृढपणें पटत गेली. लष्करी सुसज्जतेच्या कार्यक्रमाला अखेरीं नाईलाजानं मान तुकवावी लागतांना प्रेसिडेंट विल्सन यांना कशा यातना होत असतील याची जाणीव रूझवेल्ट यांना आतां होत होती. युद्ध म्हणजे काय असतं तें प्रे. विल्सन यांनीं पुरेपूर बघितलं होतं, आणि अमेरिकेला पुन्हां त्या प्रकारचा आघात सोसावा लागूं नये अशी त्यांची इच्छा होती.

बहुतेक प्रमुख सरकारी शासकांप्रमाणें रूझवेल्ट यांनींदेखील या उन्हाळ्यांत वॉशिंग्टनमध्यें रहावयाचा निर्णय घेतला. कॅंपोबेलोला दरसालप्रमाणें जाऊन राहिलेल्या आपल्या कुटुंबापाशीं पत्रव्यवहारानं त्यांनीं संबंध ठेवला. आणि १ जुलैला सकाळींच जरा लौकरच ते बिछान्यांत जागे झाले तें पोटांतल्या बेफाम वेदनांनीं! पोट मनस्वीं दुखत होतं आणि मस्तकाला जणूं इंगळ्या लागलेल्या होत्या. रूझवेल्टनीं घंटा वाजवली, त्याचा व्हॅले धांवत आला; पुढल्या कांहीं काळांत एका इस्पितळांत त्यांच्या 'अपेन्डिक्सवर' शस्त्रक्रिया करण्यांत आली, आणि शस्त्रक्रियेनंतरच्या विश्रांतींतील निष्क्रीय, प्रदीर्घ अशा कंटाळवाण्या घटकांची टोंचणी वाढायला लागली. माणसानं मनांत योजावं काय आणि ईश्वरानं चुटकीसरशी घडवावं काय!

कॅंपोबेलो इथं आपल्या कुटुंबांत त्यांनीं जुलैचे दिवस काढले. वॉशिंग्टनला परतेपर्यंत ऑगस्ट उजाडला.

वॉशिंग्टनहून एलिनॉरला त्यांनीं लिहिलं होतं,' इथं उकाडा मनस्वी आहे; पण तरी काळजी करण्यासारखं कांहीं नाहीं. माझ्या वतीनं इलीयटचे दोन पापे घे. आणि त्याला सांग कीं, 'वाजले किती तें सांगण्याचं शिकेन' असं त्यानं मला सांगितलं आहे, तें म्हणावं लौकर शिकून घे." पुढें दोन दिवसांनीं त्यानी लिहिलं "आमच्या खात्यांत तशी बरीच सामसूम वाटते. मात्र काम तसं पुष्कळच आहे." त्याच आठवड्यांत त्यांनीं पुन्हां लिहिलं, "लाडक्या बॅब्स, चेव्हीचेस इथं असल्यानं तीन रात्रींसाठीं कालपासून मी मॅक्इल्हेलींज यांच्याकडे येऊन राहिलों आहें." चेव्हीचेस मेरीलॅन्डपर्यंत पसरलेलं होतं आणि तिथं

ओळखीपाळखीच्या अनेकांना भेटतांनाच अधूनमधून गोल्फचा डाव टाकून रूझवेल्ट आपली तब्बेत संभाळीत. नौकाविहाराइतकेंच ते आतां गोल्फचे नादी झाले होते.

त्यानंतरचा कांहीं वेळ जोसेफस डॅनिअल्स आणि फ्रँकलिन डिलॅनो रूझवेल्ट हे नौ-दलाच्या वरिष्ठांच्या खांद्याला खांदा लावून अमेरिकेचं आरमारी सामर्थ्य वाढविण्यासाठीं रात्रंदिवस झटत राहिले. कारण जागतिक परिस्थिति दिवसेंदिवस बिघडत चालली होती. यांतच मध्यंतरीं एफ्. डी. आर. यांना आत्यंतिक स्वरूपाचा घशाचा त्रास सुरू झाला. अतिश्रम हें याचं कारण होतं. आणि विश्रांतीसाठीं अॅटलांटिक सिटीला त्यांना जावं लागलं. या वेळीं त्यांच्याबरोबर त्यांची आई गेली होती. कारण एलिनॉरला वॉशिंग्टनमध्येंच राहून घर संभाळणं भाग होतं. तिचं सहावं बाळंतपण जवळ आलं होतं आणि १९१६ च्या १३ मार्चला तिला मुलगा झाला. त्याचं नांव जॉन ठेवण्यांत आलं.

त्याच सुमारास अमेरिकेला युद्धांत पडावं लागेल या भीतींतच आणखी एक नवीन भीति निर्माण झाली. इनफंटाइल पॅरालिसिसच्या सांथीची ती भीति. 'पोलिओमायलिस' असं त्याला दुसरं नांव होतं. अमेरिकेला ही सांथ तशी नवी नव्हती. पण १९१६ च्या उन्हाळ्यांतली ती सांथ पूर्वी कधीं आली नाहीं अशी जबर होती. न्यूयॉर्कमधल्या ब्रुकलिनला या व्याधीच्या कांहीं केसेस झाल्या आणि पहातां पहातां न्यूयॉर्क, शहरभर तिथून लॉंग आयलंडच्या भागांत आणि पुढें संबंध अॅटलांटिक किनारपट्टींत या सांथीचा फैलाव झाला. या सांथीनं मनस्वी घबराट उडवली. कारण या रोगाचं स्वरूप निश्चितपणें कुणा-लाहि माहित नव्हतं. हा रोग कशामुळें होतो आणि कशामुळें प्रसृत होतो हें कुणालाच कळलेलं नव्हतं. या रोगाला बहुंशीं बळी पडत सोळा वर्षांखालचीं मुलं. आणि पंचाहत्तर टक्के मुलं, पांच वर्षांखालचीं असत. हजारों लोक आपली छोटीं छोटीं मुलं घेऊन मिळेल त्या वाहनानं देशाच्या इतर भागांकडे पळत सुटले, आणि पोलीस पाठवून त्यांना अडवावं लागलं. सांथीला बळी पडणाऱ्या मुलांचं मरण पाहणं यापलीकडे डॉक्टर्स आणि नर्सेस् यांच्या हातांत कांहीं नव्हतं. एकट्या न्यूयॉर्क शहरामध्यें नऊ हजार केसीस् झाल्या, आणि त्यांतल्या दोन हजार मृत्यु पावल्या.

जुलच्या आरंभीं एलिनॉरला लिहिलेल्या पत्रांत ' फफ्. डी. आर. ' नीं म्हटलं होतं. " लाडक्या बॅब्ज न्यूयॉर्क आणि त्याच्या आसमंतांत् पसरलेल्या इनफंटाईल पॅरालिसिसचं स्वरूप अक्षरशः भयंकर आहे. "

१९१६ च्या २३ जुलैला लिहिलेल्या पत्रांत त्यांनीं पत्नीला कळवलं होतं, " इथला उन्हाळा जोरात आहे. कोणत्याहि परिस्थितींत बुधवारीं मध्यरात्रीपर्यंत इथून निघण्याचा पयत्न करीत आहें. शुक्रवारीं सकाळपर्यंत आगगाडीनं इस्ट पोर्टला पोंचेन. ऑगस्टच्या ४ तारखेला न्यूयॉर्कमध्यें सीनेटच्या एका बेठकीला हजर रहायचं आहे. म्हणजे मला वाटतं, ३ तारखेला सकाळींच किंवा त्याहि आदल्या दिवशीं रात्रीं मला तुमचा निरोप घेऊन परत फिरावं लागेल. तुम्हीं सारें आनंदांत आहांत याचा मला आनंद वाटतो. शुक्रवारचीच वाट पहात आहें. तुमचा सर्वांचा, ' एफ्. '

कॅम्पोवेलोचा कुटुंबियांतला अल्पकालीन मुकाम रूझवेल्टना पुष्कळच सुखाचा ठरला. किरकोळ तक्रारी आणि दुखणीं सोडलीं तर सर्वांच्या तब्येती उत्तम होत्या. वॉशिंग्टनला परततांना रूझवेल्ट यांच्या मनांत मोठंच समाधान होतं. असं चुटपुटतेपणीं सर्वांचा निरोप घेऊन निघणं त्यांना आवडलं नव्हतं; परंतु हें वर्ष अध्यक्षीय निवडणुकीचं होतं आणि काय वाटेल तें करून वुड्रो विल्सन हेंच पुनश्च निवडून यायला हवे होते. यायलाच हवे होते.

ऑगस्टमध्यें सांथीचा फैलाव आणखीनच वाढला. त्यानंतर मात्र सांथीचा जोर ओसरत गेला आणि ' धोका संपूर्णपणें नाहींसा होईपर्यंत परत न येतां कॅंपोवेलोला रहा ' असं ' एफ डी. आर. ' यांनीं एलिनॉरला वारंवार लिहिलं. सप्टेंबरमध्यें आणि नंतरच्या कडाक्याच्या थंडींतदेखील ती मंडळी कॅम्पोवेलोलाच राहिली. बोटी चालू होत्या तोंवरच एलिनॉरनं नोकरांना परत पाठवलें. पुढें बोटी बंद झाल्या. त्यांतच ' यू बोटीं ' च्या भयानं सागरी वाहतूक अतिशय धोक्याची वाटूं लागली आणि अखेरीस ऑक्टोबरमध्यें नौ दलाची एक बोट मुद्दाम पाठवून ' एफ् डी. आर. ' यांनीं आपलं कुटुंब कॅंपोबेलोहून हलवलं आणि हाईडपार्कला पाठवलं. मुलं त्यांच्या आजीपाशीं हाईड पार्कला ठेवून एलिनॉर वॉशिंग्टनला फ्रॅंकलिन यांच्याकडे परतली.

राजधानींत दोघांची प्रथम गांठ पडली तेव्हां एलिनॉरनं पतीपाशीं म्हटलं होतं. " कांहींतरी फार वाईट घडायचं आहे, असं अलीकडं मला सारखं

वाटतं. " रूझवेल्टना असा एकच संभव दिसत होता कीं, युध्द अनिश्चित काळपर्यंत चालूच राहिलं तर अमेरिकेला त्यांत उतरावं लागणार !

युद्धांत अमेरिकेनें उतरावं कीं तटस्थ रहावं, हा अध्यक्षीय निवडणुकींतला प्रचाराचा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा झाला. कोणत्याहि पाशवी शक्तीपुढें मानवी स्वातंत्र्याचं रक्षण करणं हें अमेरिकेचं कर्तव्य आहे असं कांहींना वाटत होतं; कांहींच्या मतें, हेतु कांहींहि असला तरी युद्ध करणं गैर होतं; आणखी कांहींना अमेरिकेनं युद्धांत प्रवेश केल्यास त्यांच्या खिशांत पडेल तो घवघवीत नफाच फक्त दिसत होता. त्यांतच अमेरिकेचं स्वरूप अनेक राष्ट्रीय वैशिष्ट्यांना सामावून घेणारं होतं. आतांपावेतों युद्धांत गुंतलेल्या दोनहि बाजूंच्या प्रत्येक राष्ट्राचं प्रतिनिधित्व यांत घडत होतं आणि यानं प्रश्न अधिकच बिकट बनत होता.

राष्ट्रीय निवडणुकांचा निकाल जवळ आला होता. निकाली मतं मोजलीं जाईपर्यंत वूड्रो विल्सन पुनश्च निवडून येतील याची खात्री नव्हती.

जागतिक घडामोडींचं गांभीर्य वाढतच राहिलं दोस्त-राष्ट्र आणि मध्य युरोपांतील राष्ट्रें यांच्यांत अमेरिकेला आपल्या बाजूनं युद्धांत ओढण्याची शिकस्त होऊं लागली. प्रेसिडेंट विल्सन हे तर हाडाचे ध्येयवादी. त्यांनीं कॉंग्रेसपुढें सांगितलं तें असं कीं, " जागतिक शांततेसाठीं आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा राष्ट्रसंघ स्थापन करून अमेरिकेनं या कामांत पुढाकार घ्यावा. " प्रेसिडेंट विल्सन यांच्यापेक्षां ' एफ्. डी. आर. ' यांची भूमिका अधिक लढाऊ होती आणि उतावळीदेखील. परंतु उत्तरोत्तर प्रेसिडेंट विल्सन यांचाच पगडा रूझवेल्ट यांच्या मतावर वाढत्या प्रमाणांत पडूं लागला.

१९१७ च्या फेब्रुवारींत जर्मनीशीं असलेले राजनैतिक संबंध अमेरिकेनें तोडले. जर्मनीच्या पाणबुड्यांचा विध्वंसक संचार आणि त्याच प्रकारच्या अवांतर अत्याचारी घटना अनिर्बंधपणें चालूच राहिल्या. या कामीं प्रेसिडेंट विल्सन आणि इतर आंतरराष्ट्रीय मुत्सद्यांनीं केलेले प्रयत्न वांया गेले.

अमेरिकेचं नौदल क्यूबांतल्या ग्वान्टानामो इथं असल्याचं कळल्यावरून आणि सेक्रेटरी डॅनिअल्सहि वॉशिंग्टनमध्यें नाहींत असं कळल्यानंतर, रूझवेल्ट तांतडीनं व्हाइट हाऊसवर गेले.

प्रेसिडेंट विल्सन यांना त्यांनी गांठून म्हटलं, " आपल्या परवानगीनं ग्वान्टानामोहून आपलं आरमार मी परत बोलावूं इच्छितों. तें गोद्यांत पाठवून

युद्धाच्या दृष्टीनं सुसज्ज करण्याची माझी योजना आहे. ”

“ मिस्टर रूझवेल्ट, याबाबतींत मी आपल्याला कोणतीहि मुभा देऊं शकत नाहीं, याचं मला फार वाईट वाटतं. ”

प्रेसिडेंट विल्सन यांनीं पुढें खुलासा केला कीं, अशा प्रकारच्या उपायांनीं अमेरिकेविषयीं शत्रुत्वाची भावना बळावणार होती. कारण अमेरिकेंतला जर्मन वकील नुकताच बडतर्फ करण्यांत आला होता. रूझवेल्ट यांच्या भावी जीवनाच्या दृष्टीनें मुत्सद्दीपणाची ही आणखी एक चुणूक त्यांना लाभली.

पुढल्या थोड्या दिवसांतच प्रेसिडेंट विल्सन हे कॉंग्रेसमध्यें उपस्थित झाले. सुप्रीम कोर्टाच्या सदस्यांपुढें ते बोलले, आपल्या मंत्रिमंडळाची बैठक त्यांनी घेतली आणि मनस्वी व्यथित आणि भग्नमनस्क चेहेऱ्यानं युद्धघोषणेची मागणी त्यांनीं केली. तटस्थ राष्ट्रांच्या बोटी नाहक अव्याहतपणें बुडविण्यांत येतात आणि रुग्णांच्या ने आण करणाऱ्या बोटीहि याला अपवाद राहिलेल्या नाहींत याचं हृदयस्पर्शी वर्णन त्यांनीं यावेळीं केलं. आणि ते म्हणाले, “ आमची भावना हातीं शस्त्र धरण्याची नसेल, सूडाची नसेल, अथवा राष्ट्राच्या लष्करी ताकदीचा उन्मत्त प्रभावहि दाखविण्याची नसेल. आम्हांला न्यायाची प्रतिष्ठापना हवी आहे, मानवी हक्काची तामिली हवी आहे; आणि आज तरी या गोष्टींचे पाठिराखे फक्त आम्हींच राहिलों आहोंत. ”

फ्रॅंकलिन आणि एलिनॉर ही युद्धघोषणा ऐकण्यासाठीं हजर होतीं.

“ लोकशाहीसाठीं जग सुरक्षित बनविण्याची आवश्यकता आहे. राजकीय स्वातंत्र्याच्या भरभक्कम पायावरच शांततेची उभारणी झाली पाहिजे. आम्हांला आमचा कोणताहि स्वार्थ साधण्याची इच्छा नाहीं. आम्हांला कोणाला जिंकायचं नाहीं, कोणाला गुलाम बनवायचं नाहीं. ”

राष्ट्राध्यक्षांचं भाषण संपलं, सर्वत्र पूर्ण शांतता पसरली होती. हिंसेनं हिंसा नष्ट होत नाहीं असं ज्यांना वाटत होतं, ते अधोमुख होऊन उभे होते. उरलेल्यांनीं हर्षभरानं आणि आवेशानं घोषणा चालवल्या.

मिसेस् रूझवेल्टनीं नंतर एका पत्रांत लिहिलं होतं, “ मी गेले आणि रोधल्या श्वासानं तें सारं ऐकलं होतं. होऊं घातलेल्या पालटानं सुन्न झाल्या स्थितींतच मी घरीं परत आलें. ”

त्यांनीं रेड क्रॉसच्या एका कॅन्टिनमध्यें काम पत्करलं आणि फ्रॅंकलिन

आपले विचार कागदावर उतरण्यासाठीं बसले. "अमेरिकेची राष्ट्रीय अस्मिता आणि उच्च उद्दिष्टे याहून अधिक स्वच्छपणें आणि निश्चितपणें यापूर्वी कोणत्याहि भाषणांत अगर पत्रकांत व्यक्त झालेलीं नाहींत."

त्यानंतर कामाच्या एवढ्या प्रचंड व्यापांत त्यांनीं स्वतःला बुडवलं कीं, दुसरा तिसरा नबळादुबळा त्यांत पुरता मेलाच असता. एका वृत्तपत्रानें या संदर्भांत त्यांची संभावना 'मर्द वृत्तीचा, दृढ निर्धाराचा' अशी केली होती. आणि त्यांचं नांव 'रूझवेल्ट' आहे यांत कांहीं आश्चर्य नाहीं, असं म्हटलं होतं. तथापि आपल्या उत्साहानं अगर लोकांनीं जें जें करावं अशी त्यांची अपेक्षा होती तिनं लोकांच्या मनांत त्यांनीं स्वतःविषयीं कोणत्याहि विपरीत अपेक्षा निर्माण केल्या नाहींत. अद्याप त्यांच्यांत ग्रोटोनच्या शाळेंतला उत्साही, मनमिळाऊ, सर्वांना आवडणारा शाळकरी मुलगा जागा होता. हार्वर्डच्या विश्वविद्यालयांतली नेतृत्वाची वृत्ति कायम होती. देशाला असुरक्षित आणि अयोग्य अशा प्रकारची कांहीं माहिती त्यांच्याकडून काढण्यासाठीं वृत्तपत्रांच्या सराईत आणि निढावलेल्या प्रतिनिधींनीं त्यांना घेरतांच, रूझवेल्ट यांच्या गोडव्यानं ते पाहातां पाहतां विरघळले आणि कोरे कागद बागवीतच परत गेले. लौकरच वॉशिंग्टनमध्यें असं म्हणण्याची जणूं प्रथाच पडली कीं, 'कोणतंहि काम करवून घ्यायचं असेल तर तरुण रूझवेल्ट यांच्याकडे जा.'

प्राप्त परिस्थितींत अमेरिकेच्या नौदलाला तात्काळ सुसंघटित आणि कार्यप्रवृत्त होणं अत्यावश्यक होतं आणि तसं तें झालं याचं श्रेय प्रामुख्यानं 'एफ्. डी. आर.' यांनाच होतं. नौदल–सुसंघटित करण्यापलीकडे आणखी एक महत्त्वाची डावपेचाच्या स्वरूपाची योजना रूझवेल्ट यांनीं मांडली. पाणसुरुंगांचे बुरूज उभे करून पाणबुड्यांच्या हल्ल्यांविरुद्ध इंग्लिश चॅनल आणि नॉर्थ सी यांचं संरक्षण करायचं, अशी ती योजना. ही योजना बिनचूक आहे अशी त्यांची स्वतःची धारणा होती आणि तिच्याबाबत खात्याचे प्रमुख, वेगवेगळे लष्करी प्रमुख, खुद्द प्रेसिडेंट विल्सन, ब्रिटिश आरमाराचे वरिष्ठ, अशा सर्वांचा पाठपुरावा त्यांनीं सातत्यानं चालवला. आणि शेवटीं ही योजना प्रत्यक्षांत आली.

१९१७ च्या अखेरीं अखेरीं रूझवेल्ट यांच्या मनांत एका नव्या महत्त्वाकांक्षेनं घर केलं होतं. ती महत्त्वाकांक्षा, स्वतः युद्धावर दाखल होण्याची!

लॅथ्रॉप ब्राऊन रणगाड्यांच्या एका पथकांत सामान्य सैनिक म्हणून स्वखुषीनं दाखल होऊन गेला होता. रूझवेल्ट यांचे हार्वर्डमधील कित्येक सहाध्यायी गणवेष धारण करून मोकळे झाले होते. बोटी भरभरून माणसं एव्हांना बाहेरदेशीं रवाना झालीं होतीं, आणि आपण मात्र वॉशिंग्टनमध्यें आपल्या टेबलाशीं बसून आहोंत, याची बोचणी आतां रूझवेल्ट यांना जाणवूं लागली. 'एफ्. डी. आर.' यांच्या मनांत काय आहे हें समजतांच नौ-दलाचे सेक्रेटरी डॅनिअल्स यांनीं ठामपणें नकारार्थी मान हलविली. रूझवेल्ट हे वॉशिंग्टनमधले एक अतिशय कार्यतत्पर आणि कार्यकुशल असे मुत्सद्दी होते आणि युद्ध संपेपर्यंत त्यांनीं आपल्या अधिकारावर राहणं हेंच डॅनिअल्स यांच्या मतें राष्ट्राच्या हिताचं होतं.

'एफ् डी. आर.' यांच्या राजकीय सहकाऱ्यांना आणखीच कांहीं वाटत होतं. येत्या निवडणुकांत न्यूयॉर्क राज्याचे गव्हर्नर म्हणून रूझवेल्ट यांनीं निवडून यावं अशी या मंडळींची इच्छा होती. रूझवेल्ट यांनीं तिला नकार भरला होता. यावेळीं महत्त्व फक्त युध्दाला होतं आणि युध्दानंतर स्थिर स्वरूपाच्या शांततेला विल्सन यांच्या मनांतलं स्वप्न रूझवेल्ट यांना दिसत होतं, आपलं वाटत होतं.

१९१८ च्या जानेवारीमध्यें प्रेसिडेंट विल्सन यांनीं कॉंग्रेसपुढें आपला चौदा कलमांचा जाहीरनामा मांडला, आणि युध्द संपतांच स्थिर स्वरूपाची शांतता कशा प्रकारें येऊं शकेल या विषयींची आपली योजना त्यांनीं त्यांत मांडली. उघडपणें वाटाघाटी करून साधलेला उघड स्वरूपाचा तह, सागरी स्वातंत्र्य, व्यापारविषयक न्याय्य कायदे, यांचा समावेश त्यांत होता, आणि अखेरचं चवदावं कलम सर्वांत महत्त्वाचं होतं. तें असं कीं, "राष्ट्रांचा एक सर्वसाधारण स्वरूपाचा संघ स्थापन करावा. मोठ्या आणि लहान राष्ट्रांना राजकीय स्वातंत्र्याची, त्यांच्या सरहद्दींच्या संरक्षणाची हमी सारख्याच स्वरूपांत इथं मिळाली पाहिजे."

१९१८ मध्यें उन्हाळ्यांत सरकारनं मिस्टर रूझवेल्ट यांना प्रत्यक्ष युद्धाचं दर्शन घडवलं. अमेरिकन आरमाराच्या पाहणीसाठीं आणि युद्धपरिस्थितीचं साकल्यानं ज्ञान करून घेण्यासाठीं सरकारनं रूझवेल्ट यांना परदेशांत पाठवलं.

हें सारं गुप्त असल्यामुळें रूझवेल्ट यांना निरोप देण्यासाठींदेखील कोणी

हजर राहूं शकलं नाहीं. एका विनाशिकेंतून त्यांनीं प्रवास केला. मालवाहू बोटींच्या पांच ताफ्यांबरोबर ही विनाशिका निघाली होती. पाणबुडया टाळण्यासाठीं वळणावळणांचा आणि वेडावांकडा असा मार्ग या बोटींनीं पत्करला. या काळांत रूझवेल्ट विनाशिकेच्या डेकवरून सारखे फिरत होते. अत्यंत शांतपणें विनाशिकेवरच्या अधिकाऱ्यांशीं आणि खलाशांशीं त्यांनीं हितगुज केलं. मनावरचा ताण आणि गोंधळ लपवण्याची शिकस्त त्यांनीं चालवली होती. आजवर अनेकांना त्यांनीं हेंच करण्यासाठीं बाहेरदेशीं पाठवलं होतं.

प्रथम ते इंग्लंडला पोहोंचले. तिथं ब्रिटिश आणि अमेरिकन नौदल–अधिकाऱ्यांशीं त्यांनीं वाटाघाटी केल्या. तिथल्या इस्पितळांतल्या जखमी सैनिकांना त्यांनीं भेटी दिल्या. आपल्या रोजनिशींत त्यांनीं नोंद केली होती, " शत्रूपासून आपण फार फार जवळ आहोंत असं इथं वाटत राहिलं. आमच्या एका पलटणींतील बाराशें माणसं गेलीं; दुसऱ्या एकींतील आठशें लोक आम्हीं गमावले. " त्यानंतर ते फ्रान्सकडे गेले. डंकर्कच्या बंदरांत ते उतरले. डंकर्कचं लष्करी महत्त्व फार मोठं होतं आणि अतिशय खडतर अशा काळांतून या महत्त्वाच्या लष्करी ठाण्याला जावं लागलं होतं. एकहि धड स्वरूपाचं घर कुठं दिसत नव्हतं.... जवळजवळ रोज रात्रीं बॉम्बफेक... अशीं तब्बल तीन वर्षं ...साऱ्या गांवांत कांचेचं एकहि तावदान दिसलं नाहीं., आणि माणूस देवीच्या साथींतून उठावं, तसं साऱ्या घरांचे दर्शनी भाग बॉम्बच्या तुकड्यांनीं छिन्नविच्छिन्न होऊन गेलेले दिसत होते.

युद्ध म्हणजे काय याचा अर्थ क्रमशः आतां रूझवेल्ट यांच्या मनांत उतरूं लागला होता. एका विमानहल्ल्याच्या वेळीं विमानहल्ल्यापासून रक्षण करण्याच्या शेल्टरमध्यें त्यांनीं निवारा घेतला होता, आणि तिथं जमलेल्या सामान्य माणसाचं मनोधैर्य प्रत्यक्ष अनुभवलं. पॅरिसच्या वाटेवर कॅले बंदर लागलं. " बॉबफेकीनं कॅले बंदराचा भयंकर विध्वंस केला आहे. " पुढल्या मार्गांत युद्धआघाडीकडे चाललेल्या सैनिकांच्या पलटणीच्या पलटणी त्यांना भेटत राहिल्या. " सारीं गांवं आणि नगरं सैनिकांनीं नुसतीं फुलून गेलेलीं दिसतात. " दिवसागणिक पुढें सरकणाऱ्या जर्मन आक्रमणाच्या छायेंत पॅरिस जवळजवळ झाकळून गेलेलं होतं आणि युद्धांत आपण उतरलों आहोंत अशी साक्षात् जाणीव पॅरिसमध्यें जागोजाग रूझवेल्ट यांना होत होती. हर्बर्ट हूवर यांच्या सन्मानार्थ दिलेल्या खान्याला

युद्धआघाडीकडे निघण्यापूर्वी ते उपस्थित राहिले. यानिमित्तानं फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष प्रसिए पॉइनकेर आणि त्यांच्या पत्नी यांच्याशीं त्यांची बातचीत झाली.

डंकर्क ते पॅरिस हा मार्ग आक्रमून, पॅरिसपासून आघाडीकडे जातांना त्यांना परिस्थितीचं गांभीर्य प्रकर्षानं जाणवलं. बॉंबफेकीनं जमीनदोस्त झालेल्या अनेक गांवांतून रूझवेल्ट फिरले, 'मार्न' नदीच्या आसमंतांतल्या भागाची पाहणी करीत असतांना तिथं त्यांना विध्वंसच विध्वंस दिसत होता. कांहीं दिवसांपूर्वीच त्या भागांत मार्नच्या दुसऱ्या लढाईचा शेवट होऊन दोस्तांचा विजय झालेला होता. "आमच्या समोरच्या खुल्या भागांत जागोजाग जणूं 'क्रूस' उगवले होते. युद्धांतल्या बळींच्या जणू याद्याच या स्वरूपांत आमच्या समोर कुणीतरी मांडल्या होत्या."

जिथं जिथं पहावं तिथं तिथं कोसळलेल्या दरडी, उन्मळलेले वृक्ष, आयत्या वेळीं कसेबसे उभारलेले संरक्षणाचे निवारे, गंजलेलीं बागनेटं, मोडक्या बंदुका, अन्नपदार्थांचे रिकामे डबे, हात-बॉम्बस्, ओव्हर कोटस्, पावसानं धुवून निघालेलीं प्रेमपत्रं, यांचं विदारक दर्शन रूझवेल्ट यांना घडत होतं. प्रेसिडेंट विल्सन यांनीं कॉंग्रेसपुढें युद्धघोषणा केली तेव्हां कोणत्या वेदनेनं त्यांचीं आंतडीं पिळवटून गेलीं असतील त्याची परिपूर्ण कल्पना आतां रूझवेल्ट यांना येत होती. जागतिक शांततेवरची त्यांची श्रद्धा घटकेघटकेला अधिकाधिक दृढावत होती.

अगदीं ताज्या बॉंबफेकींत भुईला मिळालेल्या जळत्या गांवांतून रूझवेल्ट यांची मोटार आतां जाऊं लागली, आणि युद्ध-आघाडीची पहिली खूण अशा ऑब्झर्वेशन बलूनशीं ते येऊन पोहोंचले.

एका इस्पितळाला भेट दिल्यावेळीं, एका सैनिकावर शस्त्रक्रिया होत असतां ती पहातांना इमारतीवर बॉम्ब पडला आणि साऱ्या खिडक्यांच्या तावदानांचा फुटून चक्काचूर उडाला. जर्मनांच्या नजरेखालच्या एका रस्त्यावरून त्यांची गाडी जात असतां गाडीमागेंच एक बॉम्ब येऊन पडला.

व्हर्डूनकडे जाणाऱ्या कुमकेच्या मार्गानं ते गेले. "एकहि घर कुठं उभं दिसत नाहीं." युध्दक्षेत्रावर जाण्यासाठीं डोक्यावर शिरस्त्राण आणि तोंडाला गॅसमास्क त्यांनीं बांधला. गलिच्छ आणि कुबट अशा भुयारांतून दम टाकणारीं सैनिकांचीं थकलीं भागलीं पथकं त्यांनीं पाहिलीं. गोलंदाजीच्या माऱ्यापासून

अगदीं निकट अशा स्थळापर्यंत ते येऊन पोहोचले. गोळ्यांच्या माऱ्यानं जमिनीची चाळण झालेली होती. पहावं तिकडे ओसाड आणि स्मशानवत् !

त्यांना युध्द बघायचं होतं आणि युध्द हें असं होतं !

सुसंस्कृत माणूस हा अशा प्रकारें आपले मतभेद मिटवीत होता.

● ● ●

# पोलिओचा आघात

अमेरिकेला परतण्यासाठीं फ्रान्समधील ब्रेस्ट बंदरांत 'एफ्. डी. आर.' बोटीवर चढले तेव्हां त्यांना अंगांत ताप चढावा तसा थकवा जाणवत होता. मनाची उभारी उरली नव्हती· सांधा नि सांधा दुखत होता, फुटत होता. बोटीवरच्या आणखी अनेकांना असंच झालं होतं. युरोपमध्यें मोकाट संचारणाऱ्या इन्फ्लुएंझाच्या सांथीची बाधा या सर्वांना झाली होती आणि प्रत्यक्षांत न्यूयॉर्कला बोट पोहोंचण्याआधींच अनेकजण या सांथीनं मरण पावले. रूझवेल्ट यांचा आजार वाढला आणि निदान न्युमोनियाचं झालं. एलिनॉरला परिस्थिति अगाऊच कळवण्यांत आलेली होती. ॲम्ब्युलन्सची गाडी आणि डॉक्टर घेऊनच ती बंदरावर येणार होती. हाईडपार्कच्या घरीं ती रूझवेल्ट यांना घेऊन जाणार होती. तिथं त्यांना पूर्ण विश्रांति घ्यायला लावणार होती.

वॉशिंग्टनमध्यें आपली अतिशय जरूरी असतां आपल्याला हें असं एका छोट्या गांवांत रुग्णशय्येवर पडून रहावं लागावं, याचा रूझवेल्ट यांना घडो-घडीं मनस्वी मनस्ताप होत होता. परंतु या निमित्तानंच आपल्या माणसांच्या सहवासांत कांहीं काळ घालवण्याची संधि त्यांना लाभली. जागतिक आणि राष्ट्रीय घडामोडींनीं ते आणि त्यांचं घर यांच्यांत जणू पाचरच मारून टाकलेली होती. ॲना एलिनॉर आतां बारा वर्षांची झाली होती. 'चीफ' नांवाचा एक कुत्रा

तिनं कुठूनतरी मिळवून पाळलेला होता. त्याच्याविषयीं पदोपदीं पुष्कळ चर्चा होई. ॲना म्हणे, "घरांतले बाकीचे कुत्रे सगळ्यांचे आहेत; पण हा मात्र माझाच एकटीचा आहे, अन् तो तसाच राहिला पाहिजे." एफ्. डी. आर. यांनीं हें मान्य केलं. आपण तयार करीत असलेल्या नौका घेऊन रूझवेल्ट यांचे मुलगे त्यांच्याभोंवतीं जमत, जमवीत असलेले चित्रविचित्र प्राणी आपल्या वडिलांना ते दाखवीत; आणि आपण पुरेसे मोठे होतांच आपल्याला शिकारीसाठीं बंदूक पाहिजे अशी मागणी करीत. आपण आजारां-तून पुरेसे बरे होतांच पोरांना घेऊन रानांतून सहली काढूं, असं अभिवचन त्यांनीं वडिलांकडून घेतलं. आपल्या पोरवयांत फ्रँकलिन यांनीं ह्या भागांतल्या रानांतून दिवस अन् दिवस भ्रमंती केलेली होती. 'कॅम्पोबेलोच्या आपल्या बोटीचं काय ?' असा सवाल प्रत्येक मुलगा फ्रँकलिन यांना विचारीत होता. वडिलांनीं मुलांना आश्वासन दिलं कीं, त्यांना नवीन बोट घेऊन देण्यांत येईल. कॅम्पोबेलोची बोट त्यांनीं सरकारला विकली होती. कारण, त्या भागांतल्या सागरी कामांसाठीं सरकारला तिची आवश्यकता आहे हें त्यांना पटलेलं होतं.

त्यांनीं मुलांना खुपीनं सांगितलं, "समुद्रावरून फिरण्यासाठीं तुम्हांला एक नौका मी घेऊन देईन; आणि ती कशी चालवयाची हें तुमच्यापैकीं प्रत्येकानं शिकलं पाहिजे."

पोरं झोंपलीं म्हणजे फ्रँकलिन आणि एलिनॉर यांना बसून बोलतां येई. भविष्यकाळच्या अनेक योजना आंखतां येत. मुलांचं शिक्षण हा दोघांच्या चर्चेंतला एक महत्त्वाचा विषय होता. 'ॲना' चं शिक्षण वॉशिंग्टनमधल्या आणि न्यूयॉर्कमधल्या खाजगी शाळांतून चाललं होतं. त्या काळांत मुलींना कॉलेज शिक्षण घेतां येईच असं नाहीं, आणि तें ॲनाला मिळावं, असं तिच्या आई-वडिलांना वाटत नव्हतं. तरीहि लग्नापूर्वी थोडा काळ ती कार्नेलच्या कल्चरल कॉलेजांत गेली.

मुलांना आतां ग्रोटोनच्या शाळेंत पाठवण्यांत यायचं होतं. त्याविषयींची व्यवस्था केव्हांच करून ठेवण्यांत आलेली होती. १९२० मध्यें त्यांतला जेम्स प्रथम त्या शाळेंत दाखल होणार होता.

आणखी एका महत्वाच्या बाबतींत पतिपत्नीचं बोलणं होणं अत्यावश्यक होतं. 'एफ्. डी. आर.' यांच्या मनांत तो विचार सातत्यानं फिरत राहिला.

त्यांनीं एलिनॉरला म्हटलं, " बॅब्ज, मी आतां चांगला बरा झालों ना, म्हणजे मला युद्धावर गेलं पाहिजे. आघाडीवर माणसाला मरतांना, जखमांनीं कळवळतांना, कण्हतांना मीं पाहिलं आहे. तिथल्या आमच्या सैनिकांची हालत मीं पाहिली आहे. तिथं ते तसे जगतमरत असतांना मला इथं स्वास्थ्यांत राहणं शक्य नाहीं. "

परंतु दैवाच्या मनांत कांहीं तिसरंच होतं. आजारांतून बरे होऊन सहकुटुंब रूझवेल्ट वॉशिंग्टनला परतले आणि अद्याप जोरांत असलेल्या इन्फ्लुएंझाच्या सांथीला ह्या कुटुंबाला तोंड द्यावं लागलं. ते स्वतः, सर्व मुलं, आणि तीन नोकर या सांथीनं पहिल्याच फटक्याला आजारी झाले. अंगचाच अमाप सोशिकपणा आणि चिवटपणा असलेल्या एलिनॉरनीं केवळ एका नर्सच्या मदतीनं या सर्वांची रात्रंदिवस सेवासुश्रुषा चालविली आणि हें घरचं काम संभाळून त्या रेडक्रॉसचंदेखील काम करीत राहिल्या.

रूझवेल्ट यांनीं युद्धावर दाखल होण्याआड जागतिक घडामोडीदेखील आल्या. १९१८ च्या ११ नोव्हेंबरला युद्ध संपलं. त्या उन्हाळ्यांत ऑस्ट्रिया-हंगेरीचा पाडाव झाला होता. सप्टेंबरमध्यें बल्गेरिया आणि तुर्कस्तान शरण आले आणि पाठोपाठ दोस्त राष्ट्रें आणि जर्मनी यांचा तह झाला.

यानंतर काय घडणार हें ' एफ्. डी. आर. ' यांना समजत होतं. आपला कोणत्याहि प्रकारचा स्वार्थ नसतांना अमेरिका या युद्धांत उतरली होती. असं निःस्वार्थपणें युद्धप्रवृत्त होणारं तें एकमेव राष्ट्र होतं आणि युद्धानंतर शांतता प्रस्थापित करण्यासाठीं आणि टिकवण्यासाठीं साऱ्या जगाची दृष्टि अमेरिकेकडे लागलेली होती. पॅरिसच्या शांतता तहपरिषदेला अमेरिकेचे प्रतिनिधि म्हणून वुड्रो विल्सन गेले.

डिसेंबरच्या आरंभीं प्रेसिडेंट विल्सन आणि त्यांच्या बरोबरचे अमेरिकन मुत्सद्दी युरोपच्या बोटीवर चढले, आणि पुढल्याच महिन्यांत रूझवेल्ट एलिनॉर समवेत त्यांच्या मागोमाग गेले. बाहेर देशांतलं अमेरिकन नौदल, युद्धसाहित्य आणि सैनिक दलें विसर्जित करण्याचं काम त्यांच्याकडे आलेलं होतं.

या प्रवासांत थिओडोर रूझवेल्ट निवर्तल्याचं त्यांना कळलं. पॅरिसला पोहोंचतांच तिथं राहणारे थिओडोर यांचे दोन मुलगे ' केरमिट ' आणि ' थिओडोर ज्युनिअर ' यांची गांठ त्यांनीं घेतली आणि त्यांचं सांत्वन केलं.

थिओडोर यांचीं चारहि मुलं युद्धावर दाखल झालेलीं होतीं. आर्चिबाल्ड, थिओडोर ज्युनिअर–आणि क्वेन्टीन हीं अमेरिकन लष्करांत दाखल झालेलीं होतीं. यांतला क्वेन्टीन मारला गेला होता. केरमिट ब्रिटिश लष्करांत दाखल झालेला होता.

पॅरिसमध्यें जागोजाग आतां शांततेप्रीत्यर्थ समारंभ–सोहाळे झडत होते. स्थानिक स्वरूपाच्या विविध क्षेत्रांतील महत्त्वाच्या आसामी या निमित्तानें रूझवेल्ट यांना भेटत होत्या. शांतता परिषदेविषयींच्या तोडक्या मोडक्या वार्ता चर्चिल्या जात होत्या. परिषदेची प्रगति आशादायक नव्हती. राष्ट्रसंघाच्या आपल्या कल्पनेचं समर्थन प्रेसिडेंट विल्सन पराकाष्ठेनं करीत होते. परंतु हजर असलेल्या इतर राष्ट्रांचे प्रतिनिधी आपआपल्या राष्ट्रांचे हितसंबंध सांभाळण्यासाठींच तिथं आलेले होते. जर्मनीला केल्या पापाचं प्रायश्चित्त मिळालंच पाहिजे, एवढाच त्यांचा आग्रह होता, असं विल्सन यांना पावलों-पावलीं जाणवूं लागलं. केवळ अशक्य अशा प्रदेशविषयक आणि इतर नुकसान-भरपाईच्या मागण्या जर्मनीकडे केल्या जात होत्या; जर्मनीवर लादल्या जात होत्या. भविष्यकाळावर, दूरवर नजर लावलेल्या विल्सन यांच्यासारख्या ध्येय-वाद्याच्या दृष्टीनं ही सारी परिस्थिति फार बिकट तर होतीच; परंतु निराशाजनक-देखील होती. तहाच्या निर्णायक मसुद्यांत राष्ट्रसंघाची कल्पना घुसवण्यांत त्यांना यश आलं नाहीं. पॅरिस शहराच्या बाहेर व्हर्सेल्स इथं या तहावर सह्या झाल्या.

प्रेसिडेंट विल्सन सपत्नीक ज्या बोटीवरून अमेरिकेला परतले त्याच बोटींत फ्रँकलिन आणि एलिनॉर हींदेखील होतीं. प्रवासांत एके दिवशीं विल्सन यांनीं त्यांना खान्याचं आमंत्रण दिलं. या वेळीं संभाषणाचा विषय एकच होता. विल्सन यांचं मन हा विषय व्यापून राहिला होता. विल्सन ह्यांच्या म्हणण्याचा इत्यर्थ असा होता कीं, "राष्ट्रसंघांत अमेरिकेनं भाग घेतलाच पाहिजे; एरव्ही जगाचा दारुण अपेक्षाभंग होईल. कारण, ज्याचे हितसंबंध साम्राज्यांत अगर युद्धांत गुंतलेले नाहींत आणि ज्यावर सर्वांचा विश्वास आहे, असं हें आपलं एकमेव राष्ट्र आहे."

प्रेसिडेंट विल्सन यांची बोट बोस्टनच्या धक्क्याला लागली तेव्हां तिथं त्यांचं प्रचंड स्वागत झालं. तो सोहाळा पाहतांना रूझवेल्ट यांचं काळीज

आशेनं तुडुंब भरून आलं. विल्सन यांच्या गाडीमागोमाग, विजयघोषणा करणाऱ्या दुतर्फा जमलेल्या जमावाच्या मधून रूझवेल्ट यांची गाडी गेली. बोस्टनचे गव्हर्नर कोलरिज यांनीं या मंडळींच्या आगमनानिमित्त दिलेल्या मेजवानीला रूझवेल्ट दांपत्य उपस्थित राहिलं. तिथून पुढें वॉशिंग्टनला पोचें-पर्यंत तें उत्साहदायक वातावरण जागोजाग कायम राहिलं.

परंतु मुक्कामीं पोचल्यानंतर अल्प काळांतच याची जाणीव त्यांना होऊं लागली कीं, विल्सन यांच्या मनोदयाविरुद्ध एक मोठी फळी उभी राहूं लागली होती. युरोपमधल्या राष्ट्रांशीं अमेरिकेची मोट बांधण्याच्या कोणत्याहि योज-नेला असाच विरोध होणार हें दिसूं लागलं. देशाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत प्रेसिडेंट विल्सन यांनीं वक्तव्यांचा सपाटा लावला. राष्ट्रसंघाची आपली कल्पना ते जिथं जातील तिथं मांडीत होते, विशद करीत होते. 'एफ्. डी. आर.' यांनींहि तेंच व्रत पत्करलं. परंतु अलिप्ततावाद्यांचा सूर वाढतच राहिला.

आपल्या महान् स्वप्नांना स्वदेशींच एवढा मोठा विरोध उभा रहावा, त्यांची अशी धडधडीत पायमल्ली व्हावी, याची व्यथा प्रेसिडेंट विल्सन यांचं काळीज फोडून टाकणारी होती. आणि सप्टेंबरअखेरीस रूझवेल्ट यांना वार्ता कळली कीं, प्रेसिडेंट विल्सन कोलोरॅडोंत प्युएब्लो इथं एका सभेंत भाषण करीत असतांना खालीं कोसळले. वॉशिंग्टनमध्यें त्यांना आणण्यांत आलं, तिथं थ्रॉबॉसिसचा झटका त्यांना आला आणि सबंध डावी बाजू लुळी पडली.

'एफ् डी. आर.' यांच्या मतें जागतिक राष्ट्रसंघाच्या, विल्सन यांच्या उद्दिष्टासाठीं पुढें झगडत राहणं हें त्यांच्या पक्षाचं काम होतं आणि सर्वच जरी नाहीं तरी बरेच जण त्यांच्यांशीं या बाबतींत सहमत होते.

१९१८ च्या निवडणुकींत दोनहि गृहांत डेमॉक्रॅटिक पक्षाचं बहुमत नष्ट झालं होतं, आणि १९२० च्या अध्यक्षीय निवडणुकांचे नगारे वाजूं लागले तेव्हां देशभर लोकमत रिपब्लिकन पक्षाकडे जोरानें झुकत होतं.

जूनमध्यें पक्षाच्या राष्ट्रीय मेळाव्यांनीं देशांतलं वातावरण पुन्हां दुमदुमणार होतं. शिकॅगोमध्यें आपल्यांतली दुही मिटवून रिपब्लिकन पक्षानं आपला मेळावा भरवला आणि ओहिओ कॉन्झर्व्हेटिव्ह सेनेटर वॉरेन जी. हार्डिंग यांना राष्ट्रा-ध्यक्षपदासाठीं उमेदवार निवडलं.

९४६८०



सॅनफ्रॅन्सिस्कोंत भरलेल्या डेमॉक्रॅटिक पक्षाच्या राष्ट्रीय मेळाव्याला 'एफ्. डी. आर.' गेले ते अशा निश्चयानं कीं, अध्यक्षीय निवडणुकींत राष्ट्रसंघाच्या कल्पनेला प्रधान महत्त्व प्राप्त व्हावं. यासाठीं जें जें शक्य तें तें सारं करायचं. त्यांना न्यूयॉर्कचे गव्हर्नर आल्फ्रेड ई. स्मिथ हे अध्यक्षीय उमेदवार म्हणून निवडून यायला हवे होते.

'आल्' स्मिथ यांची पूर्वपीठिका बरोबर 'एफ्. डी. आर.' यांच्या विरुद्ध होती. न्यूयॉर्क शहराच्या दरिद्री वस्तींत एका आयरिश निर्वासित कुटुंबांत त्यांचा जन्म झाला. या दरिद्री वस्त्या एलिनॉरनं फ्रँकलिनला प्रथम दाखविल्या होत्या. वयाचीं बारा वर्षं पूर्ण होतात न होतात तोंच स्मिथ यांचे वडील गेले, मग शाळा सोडावी लागली आणि काम पत्करावं लागलं. त्यांची आई छत्र्या बनवण्याच्या एका कारखान्यांत काम करीत होती आणि हमाली करून हा बारा वर्षांचा मुलगा जमेल तेवढी मिळकत करी. पुढें फुल्टनच्या मच्छीबाजारांत दिवसाचे बारा बारा तास तो राबूं लागला. वयाची एकविशी होईपर्यंत आल् स्मिथ यांनीं पुष्कळ आयुष्य पाहिलं होतं आणि वृत्तीनं ते निर्ढावलेले बनले होते. स्थानिक राजकारणांत ते भाग घेऊं लागले आणि राज्यकारभाराची पद्धति पायरीपायरीनें समजावून घेत, अतिशय कष्टपूर्वक अनेक खटाटोप करीत, अत्यंत खडतर मार्गानं ते उच्च पदापर्यंत पोहोंचले होते. राज्यविधिमंडळांचे ते सदस्य बनले तोंवर स्थानिक राज्ययंत्रणेंत काय काय सुधारणा आणि बदल हवेत याची कल्पना त्यांना आलेली होती. आणि राज्याच्या गव्हर्नरपदीं नियुक्ति होतांच यांतल्या कित्येक गोष्टी त्यांनीं प्रत्यक्षांत आणल्या.

सॅनफ्रॅन्सिस्कोला पक्षाच्या मेळाव्यासाठीं येऊन पोहोचतांच तिथं ठरलेली गडबड, गोंधळ, पडद्याआडच्या चर्चा, वादंग, मेळाव्यापूर्वीच्या बैठका आणि योजनांची आंखणी असं सारं 'एफ्. डी. आर. यांना' अपेक्षेप्रमाणं आढळलं. आठ वर्षं पूर्वीं बाल्टिमोरला मेळाव्याचा निर्णय काय लागणार हें जसं अखेर-पर्यंत अनिश्चित होतं, तसंच याहि वेळीं होतं. परंतु मेळाव्याच्या उद्घाटनाच्या दिवशीं प्रेसिडेंट विल्सन यांचं एक प्रचंड तैलचित्र अनावरण करून मेळाव्यापुढें लावण्यांत आलं आणि अर्धांग लुळंपांगळं पडलेल्या राष्ट्राध्यक्षांविषयीं आदर व्यक्त करण्यासाठीं मेळाव्यांत निदर्शनांचा महापूर उसळला...तें दृश्य पाहून

'एफ्. डी. आर.' यांचं काळीज गहिंवरानं फुटायला आलं आणि त्यांची नजर गेली न्यूयॉर्कच्या प्रतिनिधि-मंडळावर. ही मंडळी स्वस्थ आणि मख्ख बसून होती. रूझवेल्ट यांच्या मनांत त्वेष उसळला. ठीक आहे. राज्यांतल्या लोकमतावर प्रभाव जास्त कोणाचा याचा एकदांचा निकाल होऊनच जायला हवा होता. रूझवेल्ट उठले, त्या प्रतिनिधिमंडळाच्या मध्यभागीं जाऊन पोहोंचले, एका आडदांड मनुष्याच्या हातून राज्याची पताका त्यांनीं हिसकावून घेतली आणि व्यासपीठाकडे जाणाऱ्या निदर्शकांच्या मिरवणुकींत पताका उंच धरून ते सामील झाले, आणि साऱ्या मेळाव्याला ते फार फार उंच भासले.

उमेदवारांचीं नांवं सुचविण्याची वेळ येतांच आल् स्मिथ यांच्या वतीनं जे कोणी बोलले त्यांत फ्रँकलिन रूझवेल्ट होते. राज्यांच्या नांवाचा पुकारा आद्याक्षरांच्या बरहुकूम होत असल्यामुळें, कित्येक नांवं सुचविलीं जाईपर्यंत, त्यांना दुजोरा देईपर्यंत, त्यांच्या वतीनं निदर्शनं होईपर्यंत, आपली उताविळी दडपीत रूझवेल्ट यांना धीर धरावा लागला. पहिल्या उमेदवारपत्रिकेवर बावीस नांवं आलीं. परंतु यांतलीं चारच खऱ्या अर्थानं सामर्थ्यवान् वाटत होतीं. त्या चार नांवांत अग्रक्रम होता, कॅलिफोर्नियाचे विल्यम जी. मॅकॲड यांचा. हे प्रेसिडेंट विल्सन यांचे जामात. त्यानंतर होते पेनसिल्व्हानियाचे ए. मिचेल पामर. त्यानंतर क्रम होता ओहिओचे गव्हर्नर जेम्स एम्. कॉक्स यांचा आणि सर्वांत शेवटीं होते आल् स्मिथ.

त्यानंतर सुरू झाल्या मत-मोजण्यांमागून मत-मोजण्या. यांत आल् स्मिथ यांचं नांव झपाट्यानं मागं पडत पडत निघून गेलं आणि अखेरीं खरी लढत उरली ती मॅकॲड आणि कॉक्स यांच्यांत. आणि चव्वेचाळिसाव्या राज्यवारी मत-मोजणींत अखेरीं कॉक्स विजयी ठरले.

परंतु उपाध्यक्षपदाचा प्रश्न अजून बाकी होता. हा उमेदवार तरी विल्सन यांच्या मताचा असणं आवश्यक होतं आणि कॉक्स यांच्यापेक्षां देशाच्या एखाद्या वेगळ्या भागांतून तो निवडला जाणं आवश्यक होतं.

पक्षाच्या कार्यकर्त्यांनीं विचारलं, "मि. कॉक्स, तुम्ही कोणाचं नांव सुचवतां"?

"मला विचाराल तर न्यूयॉर्कचे "फ्रँक्लिन डी. रुझवेल्ट यांचं" कॉक्स उत्तरले.

ही विचारणा होती पडद्यामागच्या अनधिकृत चर्चेतली. एफ्. डी. आर. यावेळीं उपस्थित नव्हते. परंतु जेव्हां त्यांना याविषयीं विचारण्यांत आलं

त्यावेळीं शेरवूडच्या मैदानांत धांव घेण्यासाठीं खुरांनीं माती उकरणाऱ्या उमद्या घोड्याप्रमाणें रूझवेल्ट यांच्या मनाची अवस्था झाली. एक प्रकारच्या हिरीरीनं ते भारून गेले.

राष्ट्रसंघाच्या कल्पनेला जोरदार पाठिंबा देणारा ठराव मेळाव्यानं यापूर्वीच संमत केला होता. म्हणजे वुड्रो विल्सन यांना न्याय मिळाल्यासारखंच झालं होतं. राष्ट्राच्या कोपऱ्याकोपऱ्यांत आतां प्रचाराची मोहीम पोहोंचणार होती आणि विरोधकांची वाढती उंचावती फळी फोडूनदेखील विजय त्यांचाच होणार होता. फ्रँक्लिन डिलॅनो रूझवेल्ट यांना याविषयीं अणुमात्र संशय नव्हता.

ओहिओच्या कुणातरी सदस्यानं मेळाव्यापुढें त्यांचं नांव सुचवलं आणि गव्हर्नर आल् स्मिथ यांनीं जातीनं उठून या नांवाला दुजोरा दिला; आणि पाठोपाठ या नांवाच्या पुरस्कर्त्यांच्या घोषणांनीं ज्यावेळीं मेळावा दुमदुमला गेला, त्यावेळीं खुद्द 'एफ्. डी. आर.' देखील विस्मित झाले. त्यांच्या वतीनें मेळाव्याचा सूर इतका जोराचा आणि स्वच्छ होता कीं, इतर उमेदवारांनीं क्रमशः माघार घेतली आणि एकमतानं उपाध्यक्षपदाचे उमेदवार म्हणून रूझवेल्ट यांची निवड झाली.

उमेदवारी आपण पत्करल्याचं जाहीर करतांना त्यांनीं केलेल्या भाषणाचा प्रभाव मेळाव्यावर फार चांगला पडला. ते म्हणाले, "अत्यंत भारावलेल्या अंतःकरणानं आणि हातून जास्तींत जास्त देशसेवा घडावी, या एकाच इच्छेनं मी उपाध्यक्षपदाची ही उमेदवारी पत्करीत आहें......आपण डोळे उघडून हें पाहिलं पाहिजे कीं, आजच्या जगांत सुसंस्कृत माणसांचीं जीवितं एकमेकांत इतकीं गुंतलीं आहेत, एका देशांतील माणसांचीं जीवितं दुसऱ्या देशांतील माणसांच्या जीवितांशीं इतकीं निगडित झालेलीं आहेत कीं, या जगांत राहून या जगापासून अलिप्त राहण्याची कल्पना पूर्णतया व्यर्थ आहे.... युद्धाची घोषणा होऊं शकते, शांततेची होऊन पुरत नाहीं. शांतता ही प्रयत्नपूर्वक, निर्धारपूर्वक आणि निग्रहपूर्वक प्रस्थापित करावी लागते, सहकार्यानें सांभाळावी लागते...छोट्या छोट्या राष्ट्रांना, छोट्या छोट्या माणसांना आपलीं आयुष्यं सुरक्षितपणें जगतां यावीं या उद्दिष्टासाठीं स्थापन झालेल्या राष्ट्रसंघाचं सदस्यत्व आपल्याला आज देऊं करण्यांत आलेलं आहे... 'आपल्यापुरते आपण' या समजुतींत मशगुल होऊन जगण्याचे दिवस संपले आहेत, आणि

आम्हांला त्याची खंत असतां कामा नये; कारण आमची नजर असली पाहिजे भविष्याकडे. अधिक चांगल्या, अधिक सुरक्षित, अधिक व्यापक अशा भवितव्याकडे...या कामांत अमेरिकेला संधि चालून आलेली आहे. जगाला आपण आदर्श घालून देऊं या."

१९२० साल रिपब्लिकन पक्षाचं आहे याची जाणीव डेमॉक्रेटिक पक्षाच्या सूज्ञ म्होरक्यांना आणि खुद्द रूझल्वेट यांना झालेली होती. जागतिक युद्धाची एक मोठी प्रक्रिया अमेरिकेवर झालेली होती. अलिप्ततावाद्यांची बाजू बळकट होती. परंतु 'एफ्. डी. आर.' यांनीं स्वत:पुरतं असं ठरवलं होतं कीं, राजकारणाचा हा एक खेळ आहे, आणि पराजयाच्या भयानं त्यांतली थरार गमावणं शहाणपणाचं नव्हे. हा खेळ जीव ओतूनच खेळला पाहिजे. अक्षरश: हजार भाषणं करण्याचा संकल्प त्यांनीं सोडला.

राज्ययंत्रणेच्या आठ वर्षांच्या प्रत्यक्षाप्रत्यक्ष अनुभवांनीं रूझवेल्ट यांचा राजकीय पिंड पोसलेला होता. त्यांची राजकीय दृष्टि प्रगल्भ झालेली होती. राजकारणांत देवाण-घेवाण ही झालीच पाहिजे, परिणामांचा विचार न करतां आपल्याच तोऱ्यांत माणसांनीं वावरतां कामा नये आणि शक्य होईल तेव्हां पक्षांतल्या साऱ्या गटांना आणि उप-गटांना बरोबर घेऊनच आपण चालत राहिलं पाहिजे, अशी त्यांची धारणा होती. आल् स्मिथ यांच्या नांवाला दुजोरा देतांना त्यांनीं केलेलं भाषण स्वखुषीनं केलेलं होतं तरी एकीकडे त्याचा परिणाम न्यूयॉर्कच्या पक्षीय म्होरक्यांशीं त्यांचे संबंध सुधारण्यांत झाला होता; हें लक्षण फारच चांगलं होतं. खरोखरी चांगलं होतं.

रूझवेल्ट आणि कॉक्स यांचं चांगलं जमत गेलं आणि निवडणुकीच्या मोहिमेचा नारळ फोडायचा तो राष्ट्राध्यक्ष विल्सन यांना भेटून आणि आदरांजली अर्पण करून, याविषयीं दोघांचंहि एकमत झालं.

वुड्रो विल्सन यांच्या भेटींत, त्यांची अवस्था पाहून एफ्. डी. आर. यांचे डोळे भरून आले. डोळ्यांवाटें अश्रू जवळजवळ ओघळले. हवेंत उष्मा होता तरीहि विल्सन यांनीं एक जाडजूड शाल अंगाभोंवतीं लपेटून घेतली होती. त्यांचीं हाडं दिसत होतीं, मुद्रेवर रोगट फिकटपणा पसरला होता, डोळे निस्तेज होते, शब्द अस्पष्ट उमटत होते. व्हाईट हाऊसमध्यें एका आरामखुर्चीवर ते पहुडले होते. डावा हात मेल्यासारखा बाजूला पडून होता, दृष्टि एवढी अधू

झालेली होती आणि वृत्ति एवढी विमनस्क होती कीं, समोर आलेलीं माणसं-देखील त्यांना प्रथम दिसलीं नाहींत.

रूझवेल्ट यांच्या कानांत कॉक्स पुटपुटले, "यांची अवस्था कांहीं खरी नव्हे" कॉकस् प्रेसिडेंट विल्सन यांच्याशीं बोलले आणि त्यांच्या आवाजानं दचकून विल्सन यांनीं आपलं मस्तक वर केलं. अगदीं हळुवार, दबल्या सुरांत ते म्हणाले, "तुम्ही आलांत याबद्दल आभारी आहें. मला फार आनंद वाटतो आहे."

"मिस्टर प्रेसिडेंट, कायावाचामनेंकरून आम्ही तुमच्याच बाजूनं राहूं, म्हणजेच राष्ट्रसंघाच्या बाजूनं राहूं."

पुन्हां एकदां प्रेसिडेंट विल्सन आपल्या रुग्णाइत आवाजांत म्हणाले, "मी फार कृतज्ञ आहें."

युद्धांत घायाळ झालेल्या एका महान् योध्याला जणूं ही मंडळीं साक्षात् पहात होती. हें युद्ध होतं, युद्धाच्या विध्वंसापासून मानवजातीचं रक्षण करण्यासाठीं.

भाषणांच्या सलामीच्या मोहिमेंत 'एफ्. डी. आर.' देशाच्या उत्तरे-कडच्या कोपऱ्यांत पोंचले. बरोबर दोन वृत्तपत्र-प्रतिनिधी होते. मारव्हिन मॅकिंण्टायर आणि स्टीफन टी. अर्ली हे ते दोघे. पुढें कित्येक वर्षं ते रूझवेल्ट यांच्याबरोबर राहणार होते. नौ-दलाच्या कारभाराकडे पाहण्यासाठीं लुई हौ वॉशिंग्टनमध्यें राहिले. 'एफ्. डी. आर.' यांच्या दुसऱ्या दौऱ्यांत मात्र हौ यांनीं त्यांची सोबत केली. अध्यक्षीय प्रचारासाठीं रूझवेल्ट यांनीं तिसरा दौरा देशांतून केला तेव्हां बरोबर आणखी माणसं होतीं. आगगाडीचा वेगळा डबा त्यांच्यासाठीं देण्यांत आला होता. यांत एलिनॉर रूझवेल्ट याहि होत्या. गुण आणि सल्ला मिळेल तेथून घ्यावा या मताचे लुई हौ हे होते आणि गुणांचा उपयोग जमेल तिथं करून घेण्याकडे त्यांची नजर असे. या दौऱ्यांत ते मिसेस् रूझवेल्ट यांना बरोबर घेऊन रूझवेल्ट यांचीं भाषणं तयार करीत; तीं आगाऊ तपासत. कारण, मिसेस् रूझवेल्ट यांचे विचार आणि त्यांची टीका या कामीं हौ यांना फारच उपयोगी पडे. राजकारणाचे धडे मिसेस् रूझवेल्ट यांना दिले ते त्यांनींच.

त्या एकदां म्हणाल्या, "व्यासपीठाच्या फेऱ्या करणं, एकाच भाषणाच्या सुधारून अगर बिघडवून वाढविलेल्या आवृत्त्या जणूं प्रथमच ऐकतों आहोंत,

अशी मंत्रमुग्ध मुद्रा करून ऐकणं, कितीहि थकवा आला असला तरी मुद्रा टवटवीत करून जमलेल्या माणसांचं स्वागत करणं आणि त्यांच्या आगमनानं आपल्याला हर्ष झाला आहे असं दाखवणं, ना ओळखीपाळखीचे, ना कधीं पाहण्यांऐकण्यांतले देखील, अशा कोणकोणाला जन्मोजन्मींचे आप्त असल्यासारखे भेटून त्यांची विचारपूस करणं, यांत आयुष्याचे दिवस मीं यापूर्वी असे कधींहि घालवले नव्हते."

फ्रँकलिन त्यांना सांगत, "लुईचं मत तुझ्याविषयीं फारच चांगलं आहे." आणि असंच रहावं यासाठीं मिसेस् रूझवेल्ट आपल्याकडून झटत राहिल्या.

मिसेस् रूझवेल्ट पतीला म्हणत, "फ्रँकलिन, तुझ्याबरोबरच्या या बहुतेक माणसांना असं वाटतंय् कीं, एक ना एक दिवशीं तूं अमेरिकेचा राष्ट्राध्याक्ष होशील!"

या निवडणुकींत विजय मिळवण्यानं राष्ट्राध्यक्षपदाच्या उमेदवारीचा रूझवेल्ट यांचा संभव वाढणार होता, दढावणार होता; परंतु देशभर प्रतिदिनीं अधिक भरभक्कम होणारी अलिप्ततावाद्यांची फळी, त्यांना आणि गव्हर्नर कॉक्स यांना चांगलीच जाणवत होती. निवडणुकींत गांवोगांव बहुमतानं रिपब्लिकन पक्षानं बाजी मारली, अध्यक्षपदीं हार्डिंग, आणि उपाध्यक्षपदीं कॅल्व्हिन कूलीज निवडून आले.

'एफ्. डी. आर.' यांची निराशा किती दारुण होती याची फार चांगली कल्पना एलिनॉरला होती. सांत्वनाच्या भरीस न पडतां त्या फ्रँकलिन यांना म्हणाल्या, "आतां हाईड पार्क इथं 'थँक्स-गिव्हिंग डे' कसा साजरा करायचा त्याचा विचार आपण करूं या. कधीं केला नाहीं असा दिवस आपण साजरा करूं या. कुटुंबांतली सारी मंडळी एकत्र येऊं, राहूं, मजा करूं."

आणि खरोखरीच हा सारा परिवार एकत्र जमला. तो दिवस फार मजेचा गेला. राजकीय क्षेत्रांत आणि सरकारी उच्चपदावर कोणीतरी होण्याचा आपल्या मुलाचा संभव हुकला, याचं सारा रूझवेल्ट यांना मनांतून बरं वाटलेलं होतं. एक मोठा व्याप त्याच्या मागें लागणारा होता. तो गेला हें त्यांचं समाधान होतं. आतां घरीं त्या होत्या, पांच मुलं होतीं! ॲना चवदा वर्षांची झाली होती. पोर मोठी देखणी दिसत होती. बांधा सडसडीत, केस पिंगट आणि विपुल, यानं ती मोहक वाटे. जेम्स तेरा वर्षांचा झाला होता.

ग्रोटोनची पहिली टर्म संपवून तो घरीं आला होता. दहा वर्षांचा इलियट, सहा वर्षांचा फ्रँकलिन ज्युनियर आणि साडेचार वर्षांचा बछडा जॉन हाहि होता.

पाहतां पाहतां 'एफ. डी. आर.' यांच्यांतली उत्सवमूर्ति उफाळून आली आणि थिओडोर, ज्युनियर हा नौदलाचा नवा असिस्टंट सेक्रेटरी म्हणून नियुक्त होणार हें कळल्यावर 'एफ्. डी. आर.' आणि एलिनॉर यांनीं पोटभर हंसून घेतलं. या पदावर नियुक्त होणारा हा एकटा नव्हे, दुकटा नव्हे, तर तिसरा रूझवेल्ट होता. रिपब्लिकन पक्षाच्या तिकिटावर तो निवडून आला होता. वडिलांची परंपरा त्यानं उत्कृष्ट प्रकारें संभाळली होती आणि त्याचं पारितोषिकच त्याला लाभत होतं.

ख्रिसमस् निमित्तानं आणखी मोठा सोहळा हाईड पार्कच्या 'डेमॉक्रॅटिक' रूझवेल्ट मंडळीच्या घरीं झाला आणि मग उरलेल्या हिंवाळ्यासाठीं न्यूयॉर्कमध्यें ते येऊन राहिले. निवडणुकांनंतर कांहीं दिवस या कुटुंबांत तात्पुरत्या स्वरूपाच्या 'सेक्रेटरीयल' कामासाठीं मार्गराईट लहॅण्ड नांवाच्या तरुण बाई येऊन राहिल्या होत्या. पत्रव्यवहाराच्या बाबतींत त्या रूझवेल्ट यांना मदत करीत. अल्पकाळांतल्या रूझवेल्ट परिवारांत 'मिसि' या संबोधनानं त्या ओळखल्या जाऊं लागल्या. त्या कार्यतत्पर होत्या, विश्वासू होत्या, उत्साही होत्या आणि पहाव्या तेव्हां आनंदानं त्या जणूं उतूं जात आहेत असं वाटे. रूझवेल्ट यांच्याविषयीं त्यांच्या मनांत आदर होता.

निवडणुकांनंतर मेरीलॅन्ड,—फायडॅलिटी ॲण्ड डिपॉझिट नांवाच्या कंपनीमध्यें रूझवेल्ट यांनीं नोकरी पत्करली, आणि या कंपनीच्या न्यूयॉर्कच्या कचेरींत ते दाखल झाले. ल–हॅन्ड यांना त्यांनीं आपली कायम स्वरूपाचे सेक्रेटरी म्हणून नियुक्त करून घेतलं. त्यांना कार्यक्षेत्र अद्यापहि मुबलक होतं. त्यांनीं स्थापन केलेली कायद्याची फर्म आतां 'एम्मेट, मार्व्हिन ॲण्ड रूझवेल्ट' या नांवानं ओळखली जात होती. हिचे अद्यापहि ते सदस्य होते.

कॅम्पोबेलो इथं पुढचा उन्हाळा काढायचा असे बेत रूझवेल्ट परिवारांत बोलले जाऊं लागले. नवी घेतलेली नौका 'व्हिरेओ' हिच्यांतून समुद्रावर करायच्या मोठमोठ्या सफरींच्या गोष्टी मुलांच्यांत सुरू झाल्या.

आणि अचानक 'एफ्. डी. आर.' यांना वॉशिंग्टनचं पाचारण आलं. पूर्वीच्या राज्ययंत्रणेनं नौदलाचा कारभार कशा प्रकारें केला याविषयीं नव्या

राज्ययंत्रणेनं एक घाणेरडी चौकशी चालू केली होती. या कामीं ' एफ्. डी. आर. ' यांनीं उपस्थित राहून कैफियत द्यावी आणि कांहीं गोष्टींचा खुलासा करावा, अशा प्रकारचा आदेशहि त्यांना देण्यांत आला होता. पुन्हा एकदां मिसेस् रूझवेल्ट आणि मुलें यांना कॅम्पोबेलो इथं सोडून रूझवेल्ट राजधानीकडे परतले.

चौकशी समितीसमोर आपल्या देखण्या आणि बुद्धिमान् व्यक्तिमत्त्वानं आणि स्मरणशक्तीनं रूझवेल्ट यांनीं साक्षीदार म्हणून मोठाच प्रभाव पाडला. आपली जबानी संपवतांना ते म्हणाले, " माझ्या कारभारांत मीं भयंकर स्वरूपाचे गुन्हे केले आणि गोंधळ केला या आरोपांना या समितीसमोर मांडलेल्या पुराव्यानं प्रत्यक्षपणें कोणताहि दुजोरा मिळतो असं मला वाटत नाहीं. माझ्यावर आरोप करणाऱ्या सेनेटरांना या पुराव्याचा फायदा मिळत नाहीं. नौदलाला राजकीय फूटबॉल म्हणून वापरण्याचा हा उद्योग थांबला पाहिजे. मेल्या इतिहासाचा मुडदा पक्षीय स्वार्थासाठीं उकरण्याचा हा गलिच्छ प्रकार जनतेला किळस आणणारा ठरला आहे..." त्यांची दीर्घ कैफियत संपली आणि सारी चौकशीच सोडून देण्यांत आली. २१ जुलैला घरीं लिहिलेल्या पत्रांत रूझवेल्ट यांनीं लिहिलं होतं, " लाडक्या बॅब्ज, वॉशिंग्टन-मध्यें हवेंत अतिशय उष्मा होता. काल मीं वॉशिंग्टन सोडलं. तिथं पोंचेन तेव्हां नौका सज्ज ठेवावी. पोरांना पापे आणि तुलाहि पुष्कळ पुष्कळ. तुझा —एफ्. डी. आर. "

जें घडलं त्यानं रूझवेल्ट मनस्वीं थकून, गळून गेले होते. कुटुंबांतला जिव्हाळा आणि हवेंतला गारवा त्यांना हवाहवासा झाला होता. राजकारणाच्या व्यापापासून कांहीं दिवस खरोखरी लांब रहावंसं वाटत होतं. युद्ध संपल्यापासून प्रथमच ते सुट्टी उपभोगणार होते. जुलैच्या २३ तारखेला कॅंपोबेलोकडे जाणाऱ्या बोटीवर त्यांनीं पाय ठेवला. हवा कुंद होती. धुकं दाट होतं. बोटीचा वेग मंद होता आणि कधीं एकदां मुक्कामीं पोहोंचतों असं रूझवेल्ट यांना होऊन गेलं.

मनांत ऐन समुद्रांतल्या मच्छीमारीचा विचार चालू होता. फार दिवसांपासून हा छंद त्यांच्या मनांत होता. मुलांना घेऊन रानावनांत फिरण्याची कल्पना उसळ्या मारीत होती. कुठं कुठं सहली काढायच्या तें मनाशीं घोकत होते.

ते घरीं पोचले तेव्हां मिसेस् हौ आणि त्यांचीं मुलें तिथं येऊन राहिलेलीं त्यांना आढळलीं. थोड्याच दिवसांत लुई हौ हेहि येऊन पोंचतील असं आश्वासन त्यांनीं या मंडळींना दिलं.

पुढचा आठवडाभर हा सारा परिवार समुद्रावरून सफरी करणं, पोहणं, भटकणं, टेनिस खेळणं आणि रात्रीं गाढ झोंप घेणं, या उद्योगांत निमग्न होता. परंतु हें सारं करूनहि रूझवेल्ट यांचा थकवा जात नव्हता. नौकानयनाचं शिक्षण मुलांना देण्यांत तासन् तास घालवूनदेखील मनाला उभारी वाटत नव्हती. तब्बेतीचा मामला बिनसला तो बिनसलेलाच होता.

ऑगस्टची १० तारीख. दिवस मोठा प्रसन्न होता. हवा छानदार होती. एलिनॉर आणि मुलांना घेऊन रूझवेल्ट समुद्रावर गेले. त्यांनीं नौकाविहार केला. आळीपाळीनं एक एक मुलगा नौकेचं सुकाण करीत होता. किनाऱ्याच्या बाजूनं परततां परततां समोरच्या झाडीमागें धुराचे छोटे छोटे लोट त्यांना दिसले. कुठेंतरी वणवा लागत होता असं त्यांना वाटलं, आणि तो विझवणं आवश्यक होतं. ताबडतोब 'ए.फ्. डी. आर.' यांनीं नौका किनाऱ्याला लावली आणि वणवा विझवण्यासाठीं ही सारी मंडळी किनाऱ्याकडे धांवली. ज्वाला विझल्या तसं एकमेकांच्याकडे त्यांनीं पाहिलं आणि सारेच मोठमोठ्यांदा हंसूं लागले. प्रत्येकजण थकून गेला होता, तापला होता, ज्वाळांच्या धगींत काळवंडला होता. चेहरे, कपडे, काजळीनं माखून गेले होते.

एफ्. डी. आर. म्हणाले, "आपण पोहूं या."

ताबडतोब मुलांनीं ओरडा केला, "पोहूं या! पोहूं या!" आणि कॅम्पोबेलोवरच्या लेक ग्लेन सेव्हर्न या तळ्यावर ही सारी मंडळी पोहायला गेली.

मिसेस रूझवेल्ट मात्र स्वयंपाकासाठीं घरीं परतल्या.

पोहणं संपलं तरीहि 'एफ. डी. आर.'ना ताजंतवानं वाटत नव्हतं म्हणून ते किनाऱ्याकडे गेले आणि तेथल्या थंड पाण्यांत त्यांनीं पुन्हां एकदां बुडी मारली. त्यानंतर धीमी धांव मारीत त्यांनीं घर गांठलं. आणि दरम्यानच्या काळांत येऊन पडलेल्या टपालाचा निकाल लावण्यास त्यांनीं सुरुवात केली. अंगावर पोहण्याचे कपडे तसेच होते आणि पोर्चमध्यें बसून रूझवेल्ट एका मागून एक पत्र निकालांत काढीत होते.

एकाएकीं अंगांत थंडी भरून आली. थंडीच्या लाटांवर लाटा जणू शरीरांतून फुटूं लागल्या. एलिनॉरला ते म्हणाले, "मला आजारी पडून चालणार नाहीं ! मी असाच्या असा जाऊन बसतों शेकोटीपाशीं. म्हणजे अंगांत जरा ऊब वाटेल."

"जेवायला वाढूं का?" म्हणून मिसेस् रूझवेल्टनीं विचारलं. त्यावर त्यांनीं नकार भरला. ते म्हणाले, "जेवणावर इच्छा नाहीं. मला फक्त थंडी वाजते आहे."

ते बिछान्यांत शिरले, डोक्यापर्यंत अंगावर पांघरूण घेतलं, नाक डोळे उघडे ठेवण्याचा प्रयत्न चालवला. वास्तविक नौका–विहार, पोहणं, धीमी दौड मारीत घरीं येणं, यांनीं बरं वाटायला पाहिजे होतं; पण उलट अंग दुखत होतं, सांधे फुटत होते, आणि वास्तविक कांहींहि खाल्लं नसतांना पोट बिघडल्यासारखंहि वाटत होतं. झोंप लागत नव्हती. वारंवार दचकून जागं व्हायला होत होतं. डोळ्यांवर गुंगी येत होती, पाठींत कळा मारत होत्या, आणि पाय मनस्वी दुखूं लागले. एलिनॉरला उठविण्याची, त्रास देण्याची त्यांची इच्छा नव्हती.

सकाळ झाली. एलिनॉर जागी होऊन पतीच्या बिछान्यापाशीं आल्या, त्यांच्या कपाळीं त्यांनीं हात ठेवला आणि त्या म्हणाल्या, "फ्रँकलिन, तुझ्या अंगांत ताप आहे !"

फ्रँकलिन म्हणाले, "मला त्राससुद्धां भारी होत आहे, बॅब्स. खरं म्हणजे मुलांना मीं रानांत न्यायचं कबूल केलंय्; पण तें कसं जमतं कोण जाणे !"

"त्यांना ग्रेस हौ घेऊन जाईल. मी इथं तुझ्याबरोबर राहीन."

कळा वाढल्या. असह्य होऊं लागल्या. एलिनॉरनीं ल्यूबेकचे डॉक्टर बेनेट यांना बोलावलं, परंतु दुखण्याचं निदान डॉक्टरांना होईना.

अंग लुळंपांगळं पडूं लागलं, पायांपर्यंत हा लुळेपणा पोंचला. मग पाठ लुळी पडली, बाहू आणि हात पाठोपाठ ताब्याबाहेर गेले. ग्रेस हौ यांनीं त्यांच्या पतीला तार केली आणि तात्काळ, ताबडतोबीनं येण्याला कळवलं.

बुधवारीं संध्याकाळची ही कथा; शुक्रवारपर्यंत फ्रँकलिन यांची अवस्था चालतांदेखील येईना अशी झाली. लुई हौ तोंवर येऊन पोंचले होते आणि अधिक तज्ज्ञ डॉक्टर शोधण्यासाठीं डॉ. बेनेट यांना घेऊन ते परत गेले. बार

हार्बर इथं फिलाडेल्फियाचे स्पेशालिस्ट डॉ. डब्ल्यू. डब्ल्यू. कीन हे सुटीसाठीं येऊन राहिले होते. त्यांना घेऊन ही मंडळी कॅम्पोबेलोला आली. डॉ. कीन यांनीं फ्रॅंकलिनना तपासलं आणि कण्याच्या खालच्या भागांत रक्त साकळल्यानं हा लुळेपणा आलेला आहे असं निदान केलं. त्यांनीं सूचना दिली, "रोज त्यांच्या स्नायूंना काळजीपूर्वक 'मसाज' करीत चला."

त्या बेटावर अनुभवी नर्स मिळणं कठीण; म्हणून स्वतः एलिनॉर आणि लुई हौ हे दोघे फ्रॅंकलिन यांच्या सुश्रुषेला लागले. रात्रंदिवस त्यांनीं या त्यांच्या लाडक्या पेशंटची सुश्रुषा केली. मसाजच्यादे खील वेदना होत. ओठांवर ओठ दाबून 'एफ्. डी. आर.' त्या कशाबशा सहन करीत. डॉ. कीन यांचं निदान असं होतं कीं, क्रमशः रक्ताचा गोळा रक्तांत मिसळून जाईल. आणि रूझवेल्ट यांना हाताचं चलनवलन करतां येऊं लागलं, तेव्हां सर्वांना असं वाटलं कीं, डॉक्टरांचे निदान अचूक ठरत आहे. परंतु पाठोपाठ डॉक्टरांनीं पुन्हां एकदां तपासणी करून आपलं निदान बदललं आणि असं ठरवलं कीं, मानेच्या हाडांतच दुखण्याचं मूळ असलं पाहिजे आणि त्याचं स्वरूप अधिक गंभीर आहे. मात्र ते असे म्हणाले कीं, दुखण बरं होण्यासारखं आहे आणि शेवटीं रूझवेल्ट हे बरे होतीलच. दोघांहि डॉक्टरांचं याविषयीं एकमत होतं.

परंतु, शेवटीं म्हणजे कधीं? रूझवेल्ट यांना बिछान्यांतून उठून उभं राहायचं होतं. पुष्कळ भटकायचं होतं, पोहायचं होतं, समुद्रावरून सहली करायच्या होत्या, मुलांच्या बरोबरीनं किनाऱ्यावरून धांवायचं होतं, शेजाऱ्यां-बरोबर गोल्फ खेळायचा होता आणि लुई हौबरोबर पुढचे राजकीय बेत आंखायचे होते. हें असं लहान अर्भकासारखं बिछान्यांत किती दिवस राहावं लागणार होतं? त्यांच्या आजारीपणांतच त्यांचा सेक्रेटरी होण्याचा मनोदय हौनीं वारंवार व्यक्त केला होता. आग्रहपूर्वक ते तीं कामं करीत होते. आलेलीं सारीं पत्रं रूझवेल्ट यांना मोठ्यांदा वाचून दाखवीत आणि ते सांगतील तशीं उत्तरें ते स्वतः लिहीत.

मुंगीच्या गतीनं ऑगस्ट कसाबसा संपत आला. 'एफ्. डी. आर.' यांच्या अंगांतला ताप कायम होता, तशीच वेदनादेखील रात्रंदिवस अंगभर फुटत होती. आतां डॉक्टर असं सुचवूं लागले होते कीं, कण्याच्या खालच्या भागां-तलं 'कंजेशन' हें इन्फंटाईल पॅरालिसिसच्या झटक्याचं मूळ असावं.

हा सर्वांनाच धक्का होता. स्पेशॅलिस्टला बोलावण्यांत यावं असं एलिनॉर म्हणूं लागल्या आणि बोस्टनचे डॉ. रॉबर्ट डब्ल्यू. लॉव्हेट यांना बोलावण्यांत आलं. त्यांनीं निश्चितपणें 'पोलिओच आहे' असं सांगून टाकलं.

'एफ्. डी. आर.' यांच्या मनाची मनस्वी घबराट उडाली. आपल्याला पोलिओ झाला आहे, मग आतां आपल्या मुलांचं काय, असं ते विचारूं लागले. मुलें त्यांच्या संसर्गात आज कित्येक दिवस वावरत होतीं; परंतु लॉव्हेट यांनीं अशी हमी दिली कीं, मुलांना धोका नाहीं. परंतु 'एफ्. डी. आर.' यांच्या मनाला आतां चैन नव्हती. पुढें कित्येक दिवस मुलांच्या चिंतेनं ते तशा रुग्णावस्थेंतहि कमालीचे बेचैन असत. मनाशीं त्यांना वाटे कीं, आज मुलें व्यवस्थित दिसतात; परंतु आपल्या रोगाचं लक्षण जाणवायला किती दिवस लागले!...

काय झालें हें एकदां समजून आल्यानंतर त्यांत सुधारणा होण्याची फार अपेक्षा करण्यांत तरी काय अर्थ होता? हें दुखणं एकदां कळून चुकल्यानंतर तें बरं 'शेवटींच' होणार हें दिसत होतं आणि शेवट कुठला तेंहि कळत होतं. दुःखावेगानं उशीवर मस्तक विसावून 'एफ्. डी. आर.' आपल्या पत्नीकडे पहात. दोघं मिळून डॉ. लॉव्हेट यांचा सल्ला आठवीत, "औषधाचा फारसा उपयोग दिसत नाहीं आणि त्यांनीं भूक मरणार असेल तर तीं न दिलेलींच बरीं. मात्र झोंप बिलकूल नाहीं, यासाठीं ब्रोमाईडस चालू ठेवावींत. मसाज न करणं बरं. याहून अधिक कांहीं तूर्त नको. गरम पाण्याची आंघोळ पुन्हां एकदां विचारांत घेण्यांत यावी. कारण, या अवस्थेंत रोग्याला तिचा फायदा होतो. त्याला जरा उत्साह मिळतो. पाण्याच्या खालीं पायांचं चलनवलन करण्याची संधि त्याला मिळते. या दुखण्यांत मानसिक औदासिन्य वाढण्याचा संभव असतो. रोगी चिडचिडा बनतो."

एकांतांत फ्रँकलिननीं आपल्या या अवस्थेबाबतचा मनांत सांठलेला सारा कडवटपणा एलिनॉरपाशीं ओकून टाकला. त्यांच्या मुद्रेवर यानं मनस्वी चिंता उमटली; परंतु त्याला इलाज नव्हता.

रूझवेल्ट यांनीं त्यांना म्हटलं, "झालं हें आईला कळव, मुलांनाहि सांग. मात्र त्यांना काळजी वाटणार नाहीं किंवा दुःख होणार नाहीं अशा पद्धतीनं बोल."

पुढच्या कांहीं दिवसांत ज्यानं कांहीं हिंमत वाटावी असं एकच चिन्ह

अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........


एलिनॉर यांना पतीमध्यें दिसत होतं. त्याच्या नजरेंत एक प्रकारचं काठिण्य वाढूं लागलं होतं. हीच नजर कांहीं वेळां त्यांना जाणवली होती. न्यूयॉर्क-मधल्या अधिष्ठित पक्ष यंत्रणेशीं झुंज घेतांना; आरमार वाढलें पाहिजे याविषयीं वॉशिंग्टनमधल्या श्रेष्ठींशीं वाद घालतांना; आणि शेवटीं नौ दला-विषयींच्या चौकशीसाठीं पाचारण आलें असतांना आपल्यावरल्या आरोपांना उत्तर देण्यासाठीं वॉशिंग्टनला जातांना...

सारा रूझवेल्ट या काळांत युरोपमध्यें होत्या. कोणत्याहि दिवशीं त्या परतणार होत्या. एलिनॉरनीं त्यांना अत्यंत काळजीपूर्वक एक छोटेसें पत्र लिहिलें. "फ्रँक्लिन बरेच आजारी आहेत आणि मंगळवारीं तुम्हांला उतरवून घेण्यासाठीं ते येऊं शकत नाहींत याविषयीं त्यांना फार वाईट वाटत आहे. आई तुम्ही परत येणार, घरीं येणार, यानं आम्हां सर्वांना आनंद झाला आहे. तुमच्या येण्यानं इथं किती मदत होणार आहे याची तुम्हांला कल्पना नसेल ......" पत्राचा सूर तसा शांत होता, घडलं होतं त्याचं गांभीर्य कमींतकमी भासवण्याचा होता. परंतु यानं देखील सारा रूझवेल्ट तीरासारख्या धांवत कॅम्पोबेलोला येऊन पोंचल्या. दरम्यान डॉक्टरांनीं सांगितलं होतं कीं जरा आराम वाटूं लागतांच रोग्यानें उठून बसण्याचा प्रयत्न केला पाहिजे. परंतु आतां आराम वाटण्याची वाट पाहाण्याला एफ. डी. आर. तयार नव्हते. आई येते आहे असं कळतांच, सारं सेनेट जोमदारपणें भारून टाकणारा आपल्या ठेवणींतला आवाज काढून ते म्हणाले, " बॅब्ज, चल, आत्तांच्या आतां मी बसण्याचा प्रयत्न करतों."

निव्वळ उठून बसणं म्हणजे देखील अत्यंत वेदनादायक ठरत होतं, प्रत्यक्ष मरण वाटत होतं. एलिनॉर आणि लुई हौ हें सारं पहात होते. रूझवेल्ट यांनीं पडूनच रहावं असं एलिनॉरना वाटूं लागलं, परंतु लुई हौनीं तें नाकारलं. 'एफ. डी. आर.' यांची ही व्यथा बरी होणार नाहीं यावर देखील विश्वास ठेवण्याचं त्यांनीं नाकारलं होतं, आणि प्रत्यही ते सर्वांना असं बजावीत होते कीं, 'एफ. डी. आर.' पूर्णपणें बरं होणार, आणि एक ना एक दिवस अमेरिकेचे राष्ट्राध्यक्षहि होणार.

सप्टेंबरच्या मध्यापर्यंत सारीजणं कॅपोबेलोलाच राहिलीं, कारण रूझवेल्ट यांना तिथून हलवण्याची परवानगी डॉक्टरांनीं नाकारली होती.

मग एलिनॉरनीं पतीला सांगितलं, " आम्ही तुला न्यूयॉर्कला घेऊन जायचं असं म्हणतां आहोंत. तिथल्या प्रेसबिटेरियन हॉस्पिटलमध्यें तुला ठेवण्याची डॉक्टर लॉव्हेट यांची इच्छा आहे. तिथं डॉक्टर जॉर्ज ड्रेपर म्हणून आहेत ते तुला पाहतील. "

आणि अचानक विलक्षण उमेद येऊन 'एफ. डी. आर.' उद्गारले, " जॉर्ज ड्रेपर म्हणजे, ग्रोटोनमध्यें माझ्यापुढें एक वर्ष होता तो ? वाहवा, त्याचा पेशंट म्हणून राहायला मला फार आवडेल ! "

फ्रँकलिन यांच्या राजकीय भवितव्याच्या काळजीनं लुई हौ मनांतून मात्र बरेच हडबडले होते. एकटे असले म्हणजे सिगारेटी मागून सिगारेटी ते ओढीत बसत असत; विचार करीत, फेऱ्या घालीत असत. 'एफ. डी. आर. यांना पोलिओ झाला आहे हें बाहेर कुणाला कळावं असं त्यांना वाटत नव्हतं, आणि त्यांना न्यूयॉर्कला हलवायचं तर प्रश्न स्ट्रेचरवरून नेण्याचा होता. वर्तमान-पत्राचीं माणसं, विशेषतः फोटोग्राफर्स, तिथं येऊन पाहण्याचा संभव होता, आणि मग रूझवेल्ट यांची व्यथा गुप्त राहणार नव्हती. 'एफ. डी आर' यांना न्यूयॉर्कला कसं नेण्यांत यावं याविषयींची एक योजना आपण आंखली आहे असं त्यांनीं रूझवेल्ट परिवाराला सांगून टाकलं. दोन बोटींतून कँपोबेलो-हून या माणसांनीं निघायचं होतं, नंतर न्यूयॉर्कच्या वृत्तपत्रांकडे अशी वार्ता ते पाठविण्याची व्यवस्था करणार होते कीं, आपल्या मोटर लॉंचमधून रूझवेल्ट ईस्टपोर्टमधल्या धक्क्याकडे येत आहेत. सहाजिकच, वर्तमानपत्रांचीं माणसं त्या धक्क्यावर जमणार होतीं. आणि दुसऱ्याच एका धक्क्यावरून स्ट्रेचरवरून 'एफ. डी. आर.' यांना हॉस्पिटलकडे घेऊन जाण्यांत येणार होतं. ही योजना अतिशय यशस्वी ठरली. लुई हौ यांच्या राजकीय योजनांचं हें वैशिष्ट्य होतं. वर्तमानपत्रांत लोकांना रूझवेल्ट दिसले ते न्यूयॉर्कडे जाणाऱ्या आगगाडीच्या डब्यांत बसलेले, फक्त चेहऱ्यापुरतेच. हा चेहरा हंसरा होता.

मेन ते न्यूयॉर्क हा आगगाडीचा प्रवास मोठा त्रासदायक होता. गाडीला क्षणोक्षणीं धक्के आणि हिसके बसत होते. रूझवेल्ट यांच्या पाठीला आणि पायांना प्रत्येक धक्क्याबरोबर वेदनांच्या इंगळ्या डसत होत्या, परंतु आपल्या मुद्रेवर उमटणाऱ्या एकेका वेदनेबरोबर आपल्या माणसांना होणाऱ्या आत्यंतिक वेदना त्यांनीं पाहिलेल्या होत्या आणि म्हणून आपल्या

वेदना ते आतां छळवूं लागले होते. तोंडावाटें वेदनेचा एकहि उद्गार निघूं द्यावयाचा नाहीं, तक्रारीचा एकहि शब्द काढावयाचा नाहीं असा निर्धार त्यांनीं केला होता. आपण आजारी आहोंत असं ते आतां चुकून देखील म्हणत नव्हते. भोंवतालच्या माणसांपेक्षां आपण वेगळे आहोंत असं देखील जाणवूं देत नव्हते. जणूं त्यांच्या दृष्टीनें आजार आतां संपलाच होता आणि पूर्ववत् धडधाकटपणा प्राप्त करून घेण्यासाठीं यानंतरची लढाई होती. समजा, चालतां आलंच नाहीं तर न चालणाऱ्या शरीरानें देखील कृतिशील आयुष्य त्यांना जगायचं होतं.

'एफ. डी. आर.' इस्पितळांत येऊन सुखरूप दाखल झाले. त्यानंतर डॉ. ड्रेपर यांनीं वृत्तपत्रप्रतिनिधींना अधिकृतपणें निवेदन केलं कीं, रुझवेल्ट यांना पोलिओचा सामान्यसा झटका आलेला आहे, त्यांतून ते बरे होत आहेत आणि ते कायमचे पांगळे होतील असा संभव नाहीं.

प्रेसबिटेरियन हॉस्पिटलमध्यें नर्सेस आणि इतर परिचारक यांच्याशीं हास्य-विनोद करणारा रूझवेल्ट यांचा ढाल्या आवाज आतां केव्हांहि इस्पितळाच्या वास्तूंत दुमदुमतांना ऐकूं येऊं लागला होता. केव्हां केव्हां एलिनॉर मुलांना वडिलांच्या भेटीला आणी, आणि रूझवेल्ट त्यांच्याबरोबर लटक्या कुस्त्या खेळत, लढाई करीत. मुलांचं शिक्षण कसं चाललंय, त्यांचा कल कुठं आहे, त्यांच्या मनांत कोणत्या आकांक्षा आहेत यांत ते पूर्वीसारखेच रस घेत होते. मुलांची प्रगति विचारल्यावर आपण केवढी प्रगति करीत आहोंत त्याचीहि बढाई ते मुलांकडे मारीत. बिछान्यावर टांगून ठेवलेल्या कड्यांना धरून लोंबकळण्याचा यशस्वी प्रयत्न आपण कसा करीत आहोंत हें त्यांना ते दाखवीत. या व्यायामानें घट्ट बनलेले आपले दंड ते त्यांना दाखवीत.

त्यांचे जुने वरिष्ठ जोसेफस डॅनियल्स हे उत्तर कॅरोलिनांतून त्यांना भेटण्यासाठीं आले होते. भेटीला येईल त्या प्रत्येक माणसाप्रमाणें, डॅनियल्स यांचीहि अपेक्षा, ज्याला उत्साहाची अपेक्षा आहे, उत्तेजनाची अपेक्षा आहे असा कण्हणाईत, हताश, उदास रोगी, आपल्याला दिसेल अशी होती. परंतु 'एफ. डी. आर.' यांच्या बिछान्याशीं ते पोंचले तेव्हां 'एफ. डी. आर.' यांनीं त्यांच्या हनुवटीवर असा जबरदस्त ठोसा ठेवून दिला कीं डॅनियल्स हेलपाटले आणि 'एफ. डी. आर.' पोट फुटेंपर्यंत हंसत राहिले. आपल्या दुमदुमणाऱ्या

आवाजांत ' एफ. डी. आर. ' ओरडले, " कोणी लुळा पांगळा दिसेल अशी तुझी अपेक्षा होती, पण चल, अजून कुस्तीला ये, मी तुला पाडून टाकतों ! " रूझवेल्ट यांना उमेद होती, आत्मविश्वास होता, त्यांच्या मनाचा निर्धार प्रबळ होता, त्या पाठीमागची स्फूर्ति, त्यांच्या बिछान्याशीं रात्रंदिवस राहिलेली त्याची पत्नी एलिनॉर हीच होती. अत्यंत शांतपणें आणि मनापासून त्या आपल्या दैवताची सेवाशुश्रुषा करीत होत्या. केवढ्या जबरदस्त स्त्रीशीं आपण लग्न केलें आहे याची कल्पना आतां कुठें रूझवेल्ट यांना येत होती.

त्याचप्रमाणें त्यांना हीहि जाणीव होती कीं आपल्या भवितव्याबाबत आपली आई आणि पत्नी यांच्यांत एक प्रेमळ लढत सतत चालू आहे. आईची इच्छा होती कीं आपल्या मुलानें सार्वजनिक क्षेत्रांतून निवृत्त होऊन हाईड पार्कला येऊन राहावें आणि उरलेलें आयुष्य फारशी धावपळ, श्रम न करतां एखाद्या मामुली, खेडवळ पण सुसंस्कृत माणसाप्रमाणें काढावें. परंतु या अवस्थेंत आपला पति कधींहि राहणार नाहीं याची जाणीव एलिनॉर यांना होती. या दोघींपैकीं कुणाचें सामर्थ्य अधिक ठरणार, अखेर कोण जिंकणार, हें रूझवेल्ट यांना उमजूं लागलें होतें. त्यांना आतां कळून चुकलं होतं कीं माणसाचं मनोधैर्य टिकायचं असेल तर त्याच्या बरोबरीनें झगडणारी त्याची पत्नी एवढी एकच गोष्ट त्याला पुरते.

सुमारें दीड महिन्यांनंतर उशांच्या ढिगाऱ्यांत उठून बसण्याइतपत प्रगति रूझवेल्ट यांनीं इस्पितळांत केली. परंतु दीर्घ काळपर्यंत त्यांचे पाय मात्र निकामीच राहणार होते. ऑक्टोबरच्या १८ तारखेला ते इस्पितळांतून घरीं आले. त्यांच्या घरीं राहण्याच्या निमित्तानें घरची सारी घडीच विसकटून नव्यानें बसवावी लागणार होती; आणि घरांतलीं सारीं माणसं त्यांच्यासाठीं जशीं झटणार होतीं, तसेंच घरांतल्या माणसांच्या स्वास्थ्यासाठीं असं पडून चालणार नव्हतं. त्यांनाहि झटावं लागणार होतं. जितकं स्वयंपूर्ण होतां येईल तेवढं आतां व्हायचं होतं. आपण आजारी आहोंत, पांगळे आहोंत ही जाणीव इतरांना कमींतकमी द्यायची होती. पूर्वींचे पायंडे आतां पुन्हां पाडायचे होते. थंडी-मध्यें न्यूयॉर्कच्या घरीं, उन्हाळ्यांत कॅम्पोबेलो. ते आतां उठून बसूं शकत होते. दंड आणि बाहु यांचा भरपूर उपयोग त्यांना करतां येत होता. म्हणजे नाव वल्हवण्यासारखीं कामें त्यांना जमण्यासारखीं होतीं, मासे मारतां येणार होते,

आणि लौकरच आपल्या कायदेविषयक फर्मच्या कचेरींत ते जाऊन बसूं लागणार होते.

यांच्या जोडीला पायांचे आणि पोटाचे ढिले पडलेले स्नायू पूर्ववत् कार्य-प्रवृत्त व्हावेत म्हणून करायचा व्यायाम आणि घ्यायचे उपचार होते.

आणि हें सारं साधायचं तर जवळ नसलेली एक गोष्ट प्रकर्षानं आणणं आवश्यक होतं. आणि ही गोष्ट म्हणजे चिकाटी.

●●●

# तळाला स्पर्श आणि पुन्हां वर

'एफ्. डी. आर.', त्यांना मदत करणारे डॉक्टर्स आणि नर्सेस् यांना मानवी चिकाटीचा अत्यंत मोठा वस्तुपाठच देत होते. रूझवेल्ट त्यांना अनेक प्रश्न विचारीत आणि यांतल्या अनेक प्रश्नांवर खांदे उडवून आणि निरुत्तर होऊन आपलं अज्ञान ह्या सर्वांना व्यक्त करावं लागे. हे प्रश्न वैद्यकीय असत. 'पोलिओ मायलिटिस' या दुखण्याविषयींचे ते असत. या दुखण्याविषयीं सारं कांहीं जाणून घेण्याची रूझवेल्ट यांना घाई सुटली होती. परंतु जें स्वतःला माहीत नाहीं, तें ही डॉक्टर मंडळी या रोग्याला तरी काय सांगणार! सरकारी कामाला लाल फीत जोडली जाऊं शकत होती; परंतु वैद्यकीय संशोधनांत जवळच्या वाटा नव्हत्या. सतत संशोधन, प्रयत्न आणि आशा, हाच या क्षेत्रांतला एकमेव आणि प्रदीर्घ मार्ग होता.

हीं सारीं रूझवेल्टना सांगत कीं, पोलिओ हें फार पुरातन दुखणं आहे, एवढंच आपल्याला त्याविषयीं माहिती आहे. एका पुरातन इजिप्शियन थडग्यांत वाळलेल्या अवयवांचा माणसाचा सांगाडा सांपडल्याचं त्यांनीं एका चित्रांत पाहिलं होतं. त्याचप्रमाणें सर वॉल्टर स्कॉट पांगळा झाला होता तो देखील पोलिओमुळेंच, असा निष्कर्ष वैद्यकीय तज्ज्ञांनीं उपलब्ध माहितीवरून काढला होता. एकप्रकारच्या जंतूंमुळें पोलिओ होत असतो आणि हे जंतू

सूक्ष्मदर्शक यंत्रांमधूनदेखील दृष्टीला न दिसणारे असतात; हे एका माणसा-पासून दुसऱ्या माणसाकडे कसे जातात, एका जागेवरून दुसऱ्या जागेकडे कसे पोंचतात तें अजूनहि कळूं शकलं नव्हतं. हे पोलिओचे जंतू एकदां शरिरांत शिरतांच मेंदूच्या नसा व्यापून टाकतात आणि त्यामुळें माणसं पांगळीं होत. या विसाव्या शतकांतच पोलिओचा प्रसार हा इतका वाढला होता. अमेरिकेंत या रोगाची पहिली सांथ १८९४ सालीं आली होती. परंतु १९१६ मध्यें या रोगानं जेवढी वाताहत केली तेवढी त्या वेळीं केली नव्हती. ह्या १९१६ च्या सांथींत मिसेस् रूझवेल्टनीं ऑक्टोबरपर्यंत मुलांना कॅम्पोबेलोलाच ठेवून दिलं होतं.

ह्या रोगावरच्या उपचाराबाबत डॉक्टरांमध्यें मतभेद होते. प्रत्येकाची वेगवेगळी पध्दत होती; परंतु सर्वांचं एका बाबतींत एकमत होतं कीं स्नायू निरोगी रहायचे किंवा त्यांनीं आपला निरोगीपणा पुन्हां प्राप्त करून घ्यायचा तर त्यांना व्यायाम मिळाला पाहिजे. त्यांच्या मधील नर्व्हस् एकदां मेल्या म्हणजे ते आपसूक हलणं अशक्य ! मग उपाय एकच. त्या अवयवाला मसाज करणं, किंवा बाहेरच्या एखाद्या साधनाच्या मदतीनं त्यांचं चलनवलन चालू ठेवणं.

एफ्. डी. आर. यांच्या पाठीचे स्नायू या रोगानं लुळे पडले होते आणि त्यांतील ताकद पुन्हां आणायची तर पलंगाच्या वर टांगून ठेवलेल्या रिंग्जच्या मदतीनं वारंवार त्या स्नायूंची हालचाल करणं आवश्यक होतं. हें केल्यानंच परिणामीं ते निदान चाकाच्या खुर्चीत बसून फिरूं शकणार होते. त्यानंतर पुढचा उपचार होता कुबड्यांच्या योगानं चालणं हा.

बिछान्यांतून ते उठूं लागले होते नव्हते एवढ्यातच गुडघ्याच्या मागचे स्नायू घट्ट होऊं लागले, सुकूं लागले आणि डॉक्टरांना हे स्नायू कायमचे सुकून जाऊं नयेत यांसाठीं रूझवेल्ट यांचे पाय प्लॅस्टरमध्यें टाकावे लागले. या प्लॅस्टरच्या कास्टरमध्यें लांकडाच्या पांचरी रोज थोड्या आंत सरकवून हे पाय ते क्रमशः पूर्ववत् सरळ करीत होते. ही प्रगति अतिशय मंद होती आणि रूझवेल्ट यांना अतिशय वेदना होत. अखेर प्लॅस्टरमधून पाय काढण्यांत आले अणि धातूच्या ब्रेसेस वापरून रूझवेल्ट पायांना व्यायाम देऊं लागले.

या ब्रेसेस पायांना लावल्या जात तेव्हां रूझवेल्ट यांना उताणं पडून रहावं लागे. त्यानंतर कोणाच्या तरी मदतीनं ते कसेबसे उठून चाकांच्या खुर्चीत

बसत. विल्सन यांच्या या खंद्या पुरस्कर्त्याला, नौ-दलाच्या या समर्थ असिस्टंट सेक्रेटरीला, आज ना उद्यां राष्ट्राध्यक्ष होईल असं ज्याच्याविषयीं म्हटलं जात होतं त्या कर्तृत्ववान् माणसाला, लहान अर्भकाप्रमाणं काळजीपूर्वक त्याच्या पायावर उभे करावं लागे. कुबड्या देऊन चालवावं लागे. अशा चालण्याचा प्रत्येक प्रयत्न संपला कीं, घामाची आंघोळ झालेल्या स्थितींत, मनस्वी दुःखानं गळून रूझवेल्ट पुन्हां एकदां आपल्या चाकांच्या खुर्चीत कसेबसे बसकण घेत.

तथापि, त्यांचे शब्द असत, "थोड्याच दिवसांत मी चालेन! तुम्हांला दिसेल, तुम्ही पहाल!"

परंतु प्रत्यक्षांत आपल्या पायांचा उपयोग पूर्ववत् करतां येणं ही किती जिकिरीची आणि दीर्घ कालानं साध्य होणारी गोष्ट आहे, याची जाणीव त्यांना होऊं लागली. आतां चालूं लागायला कित्येक वर्षंसुद्धां लागतील हें त्यांना समजून चुकलं.

आपल्या खोलींत ते एकटे असत तेव्हां शरिराचं चलनवलन चालू ठेवण्यासाठीं ते जमिनीवरून रांगत, सरपटत, आणि क्षुद्रपणाची सीमाच आपण गांठली असं त्यांना वाटे. या क्षुद्रपणाला अंत नाहीं असं त्यांना वाटूं लागे. पुन्हां धडधाकट व्हायचं, समर्थ व्हायचं तर नवा जन्म घेतला पाहिजे असं त्यांना वाटे. हा जन्म तरी असाच लुळापांगळा आणि खडतर ठरणार ही खात्री त्यांना झपाटून टाकी. हें असंच रांगत, सरपटत रहावं लागलं, इतरांच्या अंगाखांद्यांवरून अर्भकासारखं वाहिलं जात रहावं लागलं तर पुन्हां सार्वजनिक जीवनांत कधींतरी पाऊल ठेवतां येईल काय, याविषयीं कमालीचा संभ्रम त्यांच्या मनांत दाटे; त्यांना वाटे कीं, या अशा लुळ्यापांगळ्या अवस्थेंत प्राण गेला तरी पुन्हां लोकांच्या समोर जाणार नाहीं. व्यासपीठावर उभा राहीन तो माझ्या दोन पायांवर, आणि हें साध्य करायचं तर ह्या रोगावरचे असतील नसतील तेवढे उपचार करून घेणं जरूर होतं. त्यासाठीं सोसाव्या लागतील त्या वेदना सोसणं आवश्यक होतं.

त्यांच्यावर प्रथम उपचार केला तो डॉक्टर विल्यम मॅक्डोनाल्ड यांनीं. हे मॅसॅच्युसेटस्‌मधल्या मॅरियन इथले. कित्येक वर्षंपर्यंत दर उन्हाळ्यांत फ्रँकलिन आणि एलिनॉर मॅरियनला जात, तिथं राहात, डॉक्टरनीं नेमून दिलेला व्यायाम 'एफ. डी. आर.' तिथें शिकत.

डॉक्टर लॉव्हेट यांच्या उत्तेजनानें 'एफ्. डी. आर.' यांना लवकरच कळून आलं कीं, आपल्याला या परिस्थितींत पोहणं फार हितावह आहे. जमिनीवर ज्यांची हालचाल दुष्कर ते पाय पाण्यांत प्रथम हलवितां आले तेव्हांचा त्यांचा आनंद अपूर्व होता!

पोहोतांना शरीर पाण्यावर पूर्णपणें तरंगलेलं असतं. शरिराचा भार पायांवर मुळींच नसतो, आणि पायांची मोकळी हालचाल होऊं शकते.

थोड्या उत्तरेकडे हडसन नदीकांठीं रहाणारं व्हिन्सेंण्ट अॅस्टर कुटुंब पोहण्यासाठीं 'एफ. डी. आर.' यांना मुद्दाम आपल्याकडे पाचारण करी. त्यांच्या पोहण्याच्या तलावांत रूझवेल्ट मोकळेपणानं पोहत.

"माझी ही अवस्था झाली ती पाण्यानं केली, आणि आतां मला पूर्ववत् करायचं तर तें पाणीच करील," असं रूझवेल्ट पोहतां पोहतां बाजूला उभ्या असलेल्या त्यांच्या शोफरला मजेनं ओरडून सांगत.

स्नायूंची हालचाल पूर्ववत् करण्याच्या दृष्टीनं सूर्यप्रकाश हा आणखी एक चांगला उपाय होय, असंहि त्यांना कळून आलं. आणि थंडीचे दिवस फ्लोरिडा इथं घालवायचे मनसुबे ते रचूं लागले.

हळूंहळूं त्यांच्या कार्यक्रमांची गर्दी पूर्ववत् सुरू झाली. चाकांच्या खुर्चींत बसून त्यांची दरभर धांवपळ होऊं लागली. मिस् लन्हँण्ड हिला पत्रें डिक्टेट करणं, लुई हौ यांच्याबरोबर वाटाघाटी आणि चर्चा करणं, नियोजित 'वुड्रो विल्सन फौंडेशनच्या' स्थापनेबाबत इतरांबरोबर बसून योजना आंखणं, यांत त्यांचा दिवस जाऊं लागला. ज्या जागतिक सहकार्याच्या उद्दिष्टासाठीं वुड्रो विल्सन यांनीं स्वतःचं जीवन दिलं, त्या उद्दिष्टासाठींच ही नवी संस्था कार्य करणार होती.

आजारापूर्वीं 'बॉय स्काऊट' चळवळींत रूझवेल्ट रस घेऊं लागले होते आणि आतां पुन्हां एकदां बृहत् न्यूयॉर्क विभागाचे अध्यक्ष म्हणून ते या चळवळींत भाग घेऊं लागले.

आतां कांहीं काळांतच आपल्या कायदेविषयक फर्मच्या कचेरींत आपल्याला जाऊन बसतां येऊं लागेल असं त्यांना वाटूं लागलं आणि एलिनॉर याच्याशीं सहमत होत्या.

परंतु रूझवेल्ट यांची आई मात्र धक्का बसल्याप्रमाणें यावर म्हणाली,

" भलतंच काय फ्रँकलिन ! तुला अशी घाई करून चालायचं नाहीं. तूं विश्रांति कमी घेतोस, घडपड भारी करूं लागला आहेस. शक्तीपलीकडे कामं करून भलतंचकांहीं करून घेशील. "

रूझवेल्ट यांच्या मातृदेवतेला या चिंतेनं झपाटावं यांत कांहींच आश्चर्य नव्हतं. कारण एक–एकदां येत्या–जात्या माणसांनीं त्या घराला अक्षरशः एखाद्या सार्वजनिक ठिकाणाचं स्वरूप येई. लुई हौ यांच्या मदतीनं एलिनॉर आतां राजकारणांत अधिकाधिक भाग घेत होत्या. त्यांचा आणि हौ यांचा कयास असा होता कीं, एलिनॉरच्या राजकीय कार्यांनीं, राजकारणांत पुन्हां कार्यप्रवृत्त व्हावं अशी ऊर्मि एफ्. डी. आर. यांना अधिक प्रमाणांत येऊं लागेल आणि त्याचा मोठाच फायदा होईल. आपलं सामाजिक कार्यदेखील एलिनॉर यांनीं आतां हातीं घेतलं आणि स्त्रियांच्या अनेक संस्थांसमोर त्यांनीं भाषणं केलीं. १९२० मध्यें सबंध देशभर स्त्रियांना मतदानाचा हक्क प्राप्त होतांच स्त्रियांच्या या संस्थांना बरंच महत्त्व प्राप्त झालं होतं. पाहतां पाहतां रूझवेल्ट यांच्या घरांत आणखी एक व्यक्ति येऊन सामील झाली, रुळली, घरांतील झाली, ती एलिनॉर यांची पर्सनल सेक्रेटरी मालविना थॉम्पसन. रेड क्रॉसच्या कामामध्यें या दोघींची गांठ पडली होती.

मिस् थॉम्पसन यांच्यावर प्रथमदर्शनींच घरांतल्या मुलांचा लोभ जडला. मिस् थॉम्पसन यांना ' टॉमी ' हें लाडकं संबोधन मिळालं. मुलांना मिस्-ल हॅण्ड ह्याहि फार आवडत. मात्र लुई हौ त्यांना कधींच मानवले नाहींत. त्यांच्या दमेकरी खोकल्यानं ते मुलांना नकोसे वाटत. त्यांतच त्यांच्या तोंडाला सिगरेटींचा दर्प येई आणि त्यांचे कपडे सदा चुरगळलेले, मळलेले असत. आणि मुलांच्या मनांत असलेला आणखी एक मोठा प्रश्न म्हणजे या असल्या माणसाला घरांतील सर्वांत चांगली खोली काय म्हणून !

परंतु त्यांचे वडील पांगळे झाले असले तरी ते म्हणतील तेंच घरांत घडणार याची समज मुलांना आलेली होती आणि लुई हौ हे त्यांच्या वडिलांचे जिगरदोस्त होते, आणि ते घरांत होते तसेच राहाणार होते.

पांगळेपणानं रूझवेल्ट यांच्यांत झालेला एक बदल म्हणजे घरांत ते अधिक कडकपणानं, कठोरपणानं वागूं लागले. त्यांच्या इच्छेविरुद्ध कांहीं घडे तेव्हां त्यांचा तोल पट्दिशीं जात असे. एवढ्यातेवढ्यावरून त्यांचा संताप होत असे.

तोंडून कडवट शब्द जात. १९२२ मध्यें ग्रोटोनच्या शाळेंत एलियटला पाठवण्याचा बूट निघाला तेव्हां याला विरोध करण्याच्या निमित्तानं एलियटला धडा मिळाला कीं, वडिलांच्या इच्छेला विरोध करणं यासारखं या घरांत दुसरं कांहीं पाप नाहीं. ग्रोटोनला जाणं हा रुझवेल्ट यांच्या घरांतल्या मुलांकरतां वादापलीकडचा मुद्दा होता. ग्रोटोनवर जणूं रुझवेल्ट यांची अंधश्रद्धा होती ! या शाळेवर त्यांनीं प्रेम केलं होतं, थोरल्या जेम्सनं तें केलं होतं, आणि एलियटला तें करणं क्रमप्राप्त होतं. भावनावेगांचीं प्रदर्शनं आणि अश्रू यांचा कांहींहि उपयोग झाला नाहीं आणि एलियटला ग्रोटोनला जावंच लागलं.

आपल्या या व्याधीनं आपल्या स्वभावांत फार मोठा पालट घडत आहे याची जाणीव 'एफ्. डी. आर.' यांना इतर कुणाहिपेक्षां अधिक होती. त्यांची इच्छाशक्ति दगडासारखी घट्ट बनली होती, त्याचप्रमाणें विचारांची सखोलता दिवसागणिक वाढत होती. आणि कांहीं मूल्यांविषयींची निष्ठा अधिकाधिक प्रगल्भ बनत होती. पोलिओचा झटका येण्यापूर्वीं ज्या वातावरणांत ते वाढले त्या वातावरणाशीं कांहीं अंशीं विसंगत असा व्यापक आणि लोकशाही स्वरूपाचा दृष्टिकोन त्यांच्यांत बळावत होता. त्याचबरोबर आपण वरच्या सामाजिक थरांतले आहोंत ही जाणीवहि सातत्यानं होती. कनिष्ठ वर्गांच्या बाबतींत त्यांची भूमिका औदार्याची, दानधर्माची असे. आतां नव्या दुर्धर दुखण्यानं वरच्या उच्च सामाजिक श्रेणीचा त्यांचा ताठा कुठच्या कुठें गेला. आतां ते असहाय्य होते,हीनदीन होते; आणि त्यांतच इतरांच्या मदतीवर जगणं नशिबीं आलं होतं. यांतून एक नवीन दृष्टि त्यांना मिळूं लागली. समाजांतलेन, नाहीरे ज्यांच्यापाशीं खाण्याला दोन घांस नाहींत, ज्यांना रोजगार नाहीं, जे व्याधीग्रस्त आहेत, ज्यांना स्वतःच्या पायांवर उभं राहून चालतां येत नाहीं त्यांच्याविषयींचा एक नवा दृष्टिकोन 'एफ. डी. आर.' यांना आतां लाभला. त्यांचे वडील नेहमीं म्हणत कीं, ज्यांच्यापाशीं भरपूर पैसा आणि पुरेशी संपत्ति आहे त्यांनीं इतरांच्या हितार्थ ती कारणीं लावावी. आतां दुखण्यांतून बरे झाल्यावर ते जेव्हां राजकारणांत पदार्पण करणार होते आणि तसं निश्चितपणें घडणारहि होतं तेव्हां या नव्या दृष्टिकोनांतून ते राजकारण करणार होते.

इस्पितळांतून घरीं आल्यापासून टपालातं देशभर राजकीय स्नेह्यांबरोबर

रूझवेल्ट यांनीं संबंध राखले होते. जागोजागच्या मेजवान्यांच्या निमित्तानं, ते स्फूर्तिदायक संदेश पाठवीत. लोकशाही आणि जागतिक शांतता यांचा निःसंदिग्ध पुरस्कार या संदेशांतून त्यांनीं केलेला असे. या काळांत अशा पांगळ्या परिस्थितींतदेखील आपलं राजकीय अस्तित्व त्यांनीं अशा प्रकारें सर्वांसमोर जीतेजागते ठेवलं कीं, १९२२ च्या निवडणुकींत गव्हर्नरपदासाठीं उमेदवार म्हणून त्यांची निवड होणार, अशी अफवा पक्षयंत्रणेनं मुद्दाम प्रसृत करून त्यांच्या लोकप्रियतेचा अंदाज घेणं चालवलं.

रूझवेल्ट यांच्या कानीं हें येतांच 'यंदा नको' एवढंच त्यांनीं कळवलं.

त्या वर्षी आल् स्मिथ यांना न्यूयॉर्कच्या गव्हर्नरपदासाठीं उभं करण्यांत यावं अशी रूझवेल्ट यांची इच्छा होती. हें प्रत्यक्षांत यावं यासाठीं लुई हौ आणि एलिनॉर, मिसि आणि टॉमी यांच्या मदतीनं त्यांनीं पुष्कळच कार्य केलं. हडसन व्हॅली भागांत फार पूर्वीपासून रूझवेल्ट परिवाराच्या शेजारीं राहणाऱ्या मॉर्गेन्थाऊ परिवाराचं देखील या कामीं त्यांना फार सहाय्य झालं. राज्यसीनेटच्या निवडणुकीसाठीं आपल्या लाल 'मॅक्सवेल' गाडीमध्यें बसून रूझवेल्ट गांवोगांवांत प्रचार करीत होते, त्या काळांत मंडळींशीं त्यांचा परिचय घडला. एलिनॉर मॉर्गेन्थाऊ आणि एलिनॉर रूझवेल्ट या जिवलग मैत्रिणी होत्या.

आल् स्मिथ यांच्यावतीनं पुनश्च एकदां या मंडळींनीं चालविलेल्या या मोहिमेपुढं न्यूयॉर्कच्या पक्षयंत्रणेला अखेर नमावं लागलं. बाकी सर्व देशभर रिपब्लिकन पक्षानं दणदणीत विजय प्राप्त करून घेतला असतांना, न्यूयॉर्क राज्यांत मात्र डेमोक्रॅटिक उमेदवार आल् स्मिथ निवडून आले. यानं दुखाविलेली न्यूयॉर्कची पक्षयंत्रणा निवडणुकीची धूळ खालीं बसतांच याचा बदला घेण्याचा प्रयत्न करील याची पूर्ण जाणीव रूझवेल्ट यांना होती.

आतां शक्य तितक्या लवकर बरें आणि धडधाकट होणें आवश्यक होतें. व्यायाम, पोहणं, आणि जमेल तसं आणि जमेल तेव्हां नव्हे तर जिद्दीनं, व कुठल्याहि परिस्थितींत शरीर शक्य तितक्या लौकर पुन्हां पूर्ववत् होणं अतिशय जरूर होतं. कुबड्या टाकायलाच हव्या होत्या. त्यांच्या भोंवतालच्या माणसांना वाटत होतं कीं, ते जरूर त्यापेक्षां अधिक ताण घेत आहेत. परंतु आपल्या ताकदीची कल्पना रूझवेल्टना पुरेपूर होती. बाहू आणि दंड तयार होण्यासाठीं

हाईडपार्कच्या घराच्या अंगणांत त्यांनीं एक कमान उभारून ठेवली होती, तिच्यावर ते व्यायाम घेत. घराभोंवतालच्या पायवाटांवर कुबड्यांनीं खुरडत खुरडत ते रोज चालवेल तितकं चालत. दिवसा-दिवसांनीं हें अंतर वाढवण्याची त्यांची खटपट असे. कुबड्या घेऊन चालणं तसं सोपं नव्हतं. आधीं कुबड्या पुढं ठेवाव्या लागत आणि नंतर पाय ओढून कुबड्यांच्या बरोबरीनं आणावे लागत, आणि या पायांत जवळ जवळ चाळीस पौंड वजनाचं पोलादी वजन घातलेलं !

१९२२ अखेरीं अखेरीं पुनश्च कामाला लागण्याचा निर्णय त्यांनीं घेतला. ५२ वॉल स्ट्रीट इथं त्यांची कचेरी होती. या कचेरीला, चढण्यासाठीं पायऱ्या होत्या आणि पायऱ्या चढणं, कुबड्या घेऊन, फरफटत्या पायांनीं अतिशय कठीण होतं. त्या मानानं १२०, ब्रॉड–वे येथील फायडॅलिटी ॲण्ड डिपॉझिट कंपनीच्या पायऱ्या नसलेल्या कचेरींत जाऊन बसणं सोपं होतं. म्हणून ' एफ. डी. आर. ' हे त्या कचेरींत जाऊन बसूं लागले. त्यापूर्वीं त्या कचेरींत ते बसत त्याला मध्यंतरीं वर्ष उलटून गेलं होतं.

वास्तविक ते चाकांची खुर्ची वापरूं शकत होते, दोन माणसें ठेवून स्वतःला उचलून कचेरींत नेऊन ठेवण्याची व्यवस्था करूं शकत होते; परंतु पहिल्या दिवसापासून स्वतः चालण्याचा त्यांचा निर्धार पक्का होता. इमारतीच्या रखवालदारानं गाडीचं दार उघडतांच रूझवेल्टनीं आपले पांगळे पाय बाहेर काढले, ते सरळ केले, आपल्या पोलादी ब्रेसिसचे सांधे पाय ताठ राहतील अशा बेतांनीं जुळवले आणि शोफरच्या मदतीनं ते बाहेर येऊन उभे राहिले. शोफरनं पुढं केलेल्या कुबड्या त्यांनीं हातीं घेतल्या आणि ते कचेरीकडे चालूं लागले.

पावलांपावलांगणिक असह्य यातना होत असतांना अचाट जिद्दीनं एक एक पाऊल पुढें सरकणारा हा मनुष्य बघायला माणसं जमलीं. गोगलगाईच्या गतीनं ' एफ्. डी. आर. ' सरकत होते. कुबडी पुढें ठेवली कीं शोफर तिच्या पुढें आपला पाय धरी. हेतु हा कीं, ती कुबडी सरकूं नये.

कुणी तरी कुणाला तरी विचारलं, " हे ते रूझवेल्ट तर नव्हेत ? ते इतके पांगळे झालेत याची कल्पनाच नव्हती ! "

खालची जमीन निसरडी झालेली होती. कुबडी घसरली आणि त्या खाऱ्या

माणसांपुढें ' एफ्. डी. आर. ' जमिनीवर आपटले. यानें हा माणूस रडकुंडीला येईल, चिडेल, शरमिंदा होईल अशा कुणाकुणाच्या अपेक्षा फोल ठरल्या. कोलांटी घेणाऱ्या लहान पोरध्याप्रमाणें रूझवेल्ट उठून बसले आणि जोरांत म्हणाले, " जमलेल्यांपैकीं मला कुणी तरी हात द्या ! माझ्या शोफरला मी पेलत नाहीं ! "

आणि मदतीसाठीं गर्दीतला एक तरुण माणूस पुढें झाला. गर्द पिंगट केसांचा, उमद्या मुद्रेचा, फारसा उंच नव्हे आणि त्या मानानें अंगानें धड-धाकट. रूझवेल्ट यांना त्यानें दरवाजापर्यंत पोहोंचवलं आणि आणि ' एफ. डी. आर. ' यांच्या मनांत या माणसाविषयीं सहाजिकच एक कृतज्ञता निर्माण झाली. ते म्हणाले, " माझं नांव रूझवेल्ट. "

तो तरुण माणूस म्हणाला, " होय, मला माहीत आहे. मी आपल्याला ओळखतों. मी ' ओ कॉनर. बेसिल ओ कॉनर. ' या इमारतींतच माझी कायद्याची कचेरी आहे. "

पुढं आयुष्यभर टिकलेल्या आणखी एका मैत्रीचा हा असा आरंभ झाला. ' एफ. डी. आर. ' त्यांच्या कचेरींत प्रथम आठवड्यांतून दोनच दिवस, नंतर तीन दिवस, चार दिवस, अशा वाढत्या प्रमाणांत येऊन बसूं लागले. त्या निमित्तानं या दोघांच्या वाढत्या प्रमाणांत गांठी पडूं लागल्या आणि कांहीं महिन्यांच्या अवधींतच ते भागींत स्वतंत्र धंदा उभारण्याच्या गोष्टी करूं लागले. १९२५ च्या १ जानेवारीला दोघांनीं मिळून एक नवी फर्म स्थापन केली, " रूझवेल्ट ॲण्ड ओ, कॉनर. "

बेसिल ओ कॉनर यांच्याशीं जडलेल्या मैत्रीच्या त्या पहिल्या दोन वर्षांत ' एफ्. डी. आर. ' आपल्या पांगळ्या अवस्थेतून पुन्हां धडधाकट स्थितीकडे येण्यासाठीं अविरत प्रयत्न करीत होते. उपचार करून घेत होते, कुबड्या वापरीत होते. १९२३ च्या आरंभीं ते फ्लोरिडाला जाऊन राहिले. एका छोट्या बोटींतून ते समुद्रावर सहलीला गेले. त्यांनीं मासे मारले. समुद्रावर पुष्कळ भ्रमंति केली, आणि पुष्कळ ताजेतवाने होऊन ते न्यूयॉर्कला परतले. आपण पकडलेल्या मोठमोठ्या माशांचा एकच विषय त्यांच्या तोंडीं होता. शार्क माशांनीं बुजबुजलेल्या कॅरिबियन समुद्रांत पोहणं फारसं शक्य नव्हतं, तरी पण उन्हांतून फिरण्याचा, मुबलक सूर्यप्रकाश अंगावर घेण्याचा

फायदा मात्र झाला होता. त्यांनी संकल्प सोडला, ‘ हिंवाळयांत एक शिकारा विकत घेऊन मी इथं राहणार ! ’ उन्हाळ्याचे दिवस मॅसॅच्युसेटसमधल्या मॅरियन या गांवीं आणि हाईडपार्क अशा दोन ठिकाणीं मिळून ते घालवीत होते. शरिराचे बाळलेले पांगळे स्नायू हळूंहळूं कार्यक्षम होत होते. तथापि अजून त्यांच्यावर फारसं नियंत्रण आलेलं नव्हतं, आणि ब्रेसिस न वापरतां आपले पाय आपलं शरीर कधींहि पेलूं शकणार नाहींत, हें आतां रूझवेल्ट यांना समजून चुकलं होतं. एलिनॉरला आतां आपण आपले पाय बनवलं पाहिजे. राजकीय दौरा, भाषणं, सभा, बैठका, हें सारं आपल्या वतीनं तिलाच पाहिलं पाहिजे, असं त्यांना वाटूं लागलं होतं.

परंतु हें सारंच तिच्यावर सोपवण्यालाहि ते तयार नव्हते. १९२४ च्या जून महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत, न्यूयॉर्क शहरांतल्या मॅडिसन स्क्वेअर गार्डन इथं डेमॉक्रॅटिक पक्षाचा राष्ट्रीय मेळावा भरायचा होता आणि याला ते जातीनं हजर राहणार होते.

मेळावा जवळ आला. रूझवेल्ट यांचं निवासस्थान माणसांनीं गजबजून गेलं. पक्षाचे नेते एकसारखे येत होते, जात होते, मिसि ल-हॅण्ड हिचे हात पत्र लिहून तुटायला आले होते. लुई हौ जणूं कसल्या तरी नशेंत वावरत होते. भोंवतालच्या राजकीय वातावरणांत ‘ एफ्. डी. आर. ’ यांच्यापेक्षा तेच जणूं अधिक सुख घेत होते. त्यांच्या सुखाचं कारण एकच होतं, फ्रॅंकलिन डिलॅनो रूझवेल्ट हे आतां राजकारणांत परत उतरणार होते; आपल्या दोन पायांवर मेळाव्याच्या तुफान जनसंमर्दापुढें ते उभे राहणार होते आणि राष्ट्राध्यक्षपदासाठीं आल् स्मिथ यांचं नांव पुरस्कारणार होते.

हौ येत्या-जात्याला आसुसून सांगत होते, “ आणखी केव्हां ना केव्हां रूझवेल्ट यांचंच नांव राष्ट्राध्यक्षपदासाठीं सुचवलं जाणार. ” ते कशाला, थोड्या दिवसांपूर्वीच न्याहरीच्या वेळीं फ्रॅंकलिन यांच्या शयनगृहाकडे ते कांहीं बोलण्यासाठीं गेले होते आणि फ्रॅंकलिन त्यांना अतिशय आनंदांत दिसले. फ्रॅंकलिननीं आपल्या अंगावरची चादर मागें सारली, आपला एक पाय बाहेर काढला, आणि त्याच्याकडे बोट करीत ते ओरडले, “ पहा, लुई पहा, मी माझा अंगठा हलवूं शकतों ! ”

पुढचा महिनान् महिना, त्यांतला प्रत्येक दिवस आणि प्रत्येक क्षण,

आपल्या निर्जीव अवयवांत चैतन्य निर्माण करण्यांत, त्यांना आपल्या काबूंत आणण्यांत रूझवेल्ट यांनीं आपली सारी इच्छाशक्ति पणाला लावली. पाठीचे आणि पोटाचे स्नायू पुन्हां चलनवलन करूं लागले होते आणि पायहि ताब्यांत येतील याविषयीं त्यांना खात्री वाटत होती.

नांव सुचविण्यापुरतंच ' एफ्. डी. आर. ' मेळाव्यांत भाग घेणार नव्हते; तर न्यूयॉर्क राज्याच्या ' स्मिथ फॉर प्रेसिडेंट ' प्रचार समितीचं अध्यक्षपद-देखील त्यांनीं पत्करलं होतं. प्रत्यक्ष मेळाव्यांत त्यांच्या मतानं आल् स्मिथ यांच्या उमेदवारीला मोठंच वजन प्राप्त होणार होतं. राष्ट्राध्यक्षपदाचा प्रश्न यंदा तसा खडाजंगी वादाचा ठरणार होता. ' **कुळवलुक्स-क्लन** ' हा एक महत्त्वाचा प्रश्न उमेदवाराच्या निवडीवर परिणाम करणारा होता. रूझवेल्ट हे आपल्या भाषणांत या निग्रोविरोधी चळवळीचा निःसंदिग्धपणें धिक्कार करणार होते. या चळवळीच्या रूपानं वावरणाऱ्या वर्णद्वेषाचा, दुराग्रहाचा निषेध करणार होते. खुद्द आल् स्मिथ हे अत्यंत एकनिष्ठ रोमन कॅथॉलिक होते. आणि मेळाव्यांत पक्षाचा उमेदवार म्हणून ते निवडून येते तर पक्षाच्या वर्णद्वेषविरोधी धोरणाला दुप्पट जोम चढला असता. दुसरा महत्त्वाचा प्रश्न होता राष्ट्रसंघाचा. याबाबतींत पक्षानं निःसंदिग्ध भूमिका घ्यावी आणि राष्ट्र-संघाचा पुरस्कार करावा, अशी रूझवेल्ट यांची इच्छा होती. अमेरिकन जनतेचं या प्रश्नावर सार्वमत घेतलं जावं असं त्यांचं म्हणणं होतं. त्याचबरोबर समान हक्कासाठीं चाललेली स्त्रियांची चळवळदेखील लक्षांत घेण्याची निकड होती. रूझवेल्ट यांचं म्हणणं होतं कीं, स्त्रियांना समान हक्क द्यावेत.

पुन्हां एकदां दीर्घ कालानंतर राजकारणाच्या छावणींत उतरणं रूझवेल्ट यांना फारच स्फूर्तिप्रद वाटत होतं. या सुमारासच त्यांचा मुलगा जेम्स ग्रोटोनहून घरीं येणार होता आणि आपला मदतनीस म्हणून त्यालाच ते मेळाव्याला नेणार होते.

देशांत अद्यापि रिपब्लिकन पक्षाची चलती होती. रिपब्लिकन पक्षाची फळी एकसंध आणि भरभक्कम उभी होती. या पक्षाच्या मेळाव्यांत मॅसाच्यु-सेटस्चे कॅलव्हिन कूलिज यांना राष्ट्राध्यक्षपदाचा उमेदवार म्हणून निव डण्यांत आलं. त्या मानानं डेमॉक्रॅटिक पक्षाचा मेळावा तितक्याच थाटामाटानं भरत असला तरी त्याचं स्वरूप मात्र तेवढं संघटित नव्हतं. किंबहुना,

महत्त्वाच्या प्रत्येक प्रश्नावर पक्षामध्यें दुफळी होती. राष्ट्रसंघ, निग्रोविरोधी गुप्त चळवळ, दारूबंदी, यांतल्या प्रत्येक प्रश्नावर मतभेद होते. राष्ट्रसंघाला पाठिंबा देणारा ठराव पक्षांत कसाबसा मंजूर झाला; परंतु निग्रोविरोधी चळवळीविषयींचा ठराव मात्र एकमतानं नामंजूर ठरला.

पक्षाचे म्होरके आणि लुई हौ, फ्रँकलिन रूझवेल्ट आणि आल् स्मिथ या सर्वांनाच आपल्यापुढल्या समस्यांची जाणीव होती. राष्ट्राध्यक्षपदासाठीं उमेदवाराची निवड या समस्यांतून मार्ग काढीतच करावी लागणार होती.

या निमित्तानं आपली सारी जुनी राजकीय चातुरी कायम आहे याचा प्रत्यय रूझवेल्ट यांना आला. किंबहुना मध्यंतरीच्या निवृत्तीमुळें या चातुरीला प्रगल्भ आणि परिपक्व विचारांची जोडहि लाभली होती. रूझवेल्ट यांना चाकाच्या खुर्चीत बसवून व्यासपीठाकडे आणण्यांत येऊं लागलं तशी माणसांनीं गच्च भरलेल्या, वातावरण तापलेल्या त्या सभागृहांत एकच गलका उठला. चाकांच्या खुर्चीतून उचलून इतर वक्त्यांच्या बरोबरीनं रूझवेल्ट यांना व्यासपीठावर बसविण्यांत आलं. ते यंदा पुनश्च राजकारणांत पदार्पण करीत आहेत याची जाणीव या निमित्तानं साऱ्या मेळाव्याला झाली. यांतच रूझवेल्ट यांचे असंख्य एकनिष्ठ पाठीराखे होते.

रूझवेल्ट यांनीं समोरच्या जनसंमर्दावर एक दृष्टि टाकली; खिशांत ठेवलेल्या भाषणाचा विचार त्यांच्या मनांत आला. हें भाषण तयार करण्यासाठीं घेतलेल्या परिश्रमांची आणि केलेल्या चर्चांची त्यांना आठवण आली. आजचं भाषण हें आपल्या स्वतःच्या आणि आल् स्मिथच्या दृष्टीनं अत्यंत महत्वाचं ठरणार आहे याची जाणीव त्यांना झाली. अध्यक्षांनीं रूझवेल्ट यांचा परिचय मेळाव्याला करून दिला आणि पायांच्या पोलादी ब्रेसिस सरळ करून, पक्क्या करून रूझवेल्ट स्वतःच्या पायांवर कुणाच्या तरी मदतीनं उभे राहिले. त्यांनीं कुबड्या हातीं घेतल्या आणि कुणाचीहि मदत न घेतां वक्त्याच्या टेबलापर्यंत ते चालत गेले. व्यासपीठावरून ते अशा प्रकारें वाटचाल करीत असतांना सारं सभागृह काळजीनं पण कौतुकानं आणि आदरानं त्यांच्याकडे एकटक पाहात होतं. रूझवेल्ट वक्त्याच्या टेबलापर्यंत पोहोंचले. टेबलाची कडा त्यानीं आपला तोल सांभाळण्यासाठीं गच्च पकडून धरली, कुबड्या सोडून दिल्या, जिवणी उन्नत केली, एक प्रसन्न हास्य केलं आणि समोरचं सभागृह घोषणांनीं दुमदुमून गेलं. रूझवेल्ट यांनीं आपलं भाषण सुरू केलं.

सभागृहांतले शेंगांच्या टरफलांचे आवाज थांबले, शिलगावलेले चिरूटहि झरझरा विझले, कुजबूज पाहतां पाहतां शांत झाली, अगदीं मागच्या बाजूस गॅलरीमधून देखील विलक्षण शांतता आणि एकाग्रता पसरली. आपल्या भाषणांत 'एफ्. डी. आर.' यांनीं न्यूयॉर्कचे गव्हर्नर म्हणून आल् स्मिथ यांनीं बजावलेल्या कामगिरीचा अढावा घेतला, सरकारी लाल फितींतून मार्ग काढून महत्त्वाचीं कामं कौशल्यानं करून घेण्याची आल् स्मिथ यांची हातोटी त्यांनीं वाखाणली, लोकहिताविषयींची आल् स्मिथ यांची निःस्वार्थ निष्ठा त्यांनीं प्रशंसिली. कुचराई, गाफीलपणा, आणि अन्याय जिथें जिथें तिथें तिथें त्यावर घाव घालण्याची. त्यांची तत्परता त्यांनी वाखाणली. प्रतिस्पर्ध्यांचा थरकांप उडवणारा त्यांचा दरारा त्यांनीं उल्लेखला. स्मिथ यांच्या तळमळीच्या वक्तृत्वाचा त्यांनीं गौरव केला. ते म्हणाले, "राजकारणाच्या रणांगणावरचे आल् स्मिथ हे अत्यंत प्रसन्न असे योद्धे आहेत."

'प्रसन्न योद्धे' हे शब्द रूझवेल्ट यांच्या तोंडून उमटतांच सभागृहांत आल् स्मिथ यांच्या नांवाचा असा प्रचंड जयजयकार सुरू झाला कीं, रूझवेल्ट यांच्या भाषणांतलीं समारोपाचीं वाक्यें कुणालहि ऐकूं गेलीं नाहींत. हा जयजयकार जसा आल् स्मिथ यांचा होता तसाच तो फ्रँकलिन रूझवेल्ट यांचाहि होता! अनेकांच्या मनीं आलं कीं, ज्यांचं नांव सुचवलं गेलं त्यांच्या ऐवजीं ज्यानं तें सुचवलं त्यालाच निवडून देतां येते तर काय बहार झाली असती! निवडणुकीला उभा राहण्याइतका तो धडधाकट असायला हवा होता.

आपल्या भाषणाला सभागृहानं दिलेल्या प्रतिसादानं थरारून, तृप्त होऊन, सुखावून 'एफ. डी. आर.' आपल्या चाकाच्या खुर्चीपर्यंत गेले, आणि सभागृहांतला जल्लोष अखेर थांबतांच व्यासपीठावरून निघून गेले.

उमेदवारांच्या रिंगणांत आणखीहि एक व्यक्ति होती. तिचंहि स्वागत सभागृहानं तितकंच मनःपूर्वक केलेलं होतं. ती व्यक्ति, कॅलिफोर्नियाचें विल्यम गिब्स मॅकॅडू. यांच्याशीं स्पर्धा करून आल् स्मिथ निवडून येणं तसं सोपं नव्हतं.

तें केवळ सोपं नव्हतं इतकंच नव्हे तर अत्यंत बिकटसुद्धां होतं असं पुढल्या मेळाव्यांत सिध्द झालं. कारण प्रत्यक्ष मतदान सुरू झालं तेव्हां असं जाणवलं कीं, निवडणुकीच्या प्रश्नावर कोणताहि निर्णय सहजासहजीं शक्य नव्हता. परंतु केव्हां ना केव्हां तो घेतला जाणं भागच होतं आणि त्यामुळें किती काळ

लागेल हें राजकारणांतल्या मामल्यांत मुरलेल्यांना देखील सांगणं अशक्य झालेलं होतं. यापूर्वीचा कुठलाहि मेळावा एवढा विस्कळीत ठरलेला नव्हता. जुलैची एक तारीख उजाडली. पंधराव्या खेपेला मतदान घेण्यांत येत होतं. मॅकॅडू यांना ४७९ मतं पडलीं होतीं, स्मिथ यांना ३०५·॥· आणि कुणालाहि बहुमत, पुरेसं बहुमत मिळण्याची शक्यता नव्हती. अखेर जुलैच्या ८ तारखेला, जवळ जवळ शंभर वेळां मतदान घेण्यांत आल्यानंतर 'एफ. डी. आर.' यांनीं मेळाव्याला उद्देशून पुनश्च भाषण केलं. त्यांनीं जाहीर केलं कीं मॅकॅडू उमेदवारींतून आपलं नांव मागें घेण्याला तयार असतील तर आल् स्मिथ देखील आपलं नांव मागें घेतील. प्रथम मॅकॅडू यांनीं याला नकार दिला. परंतु दुसऱ्या दिवशीं मात्र त्यांनीं आणि आल् स्मिथ यांनीं आपलीं नांवं मागें घेतलीं आणि उमेदवारीसाठीं तिसरंच एक नांव मेळाव्यानं मंजूर केलं. तें नांव वेस्ट व्हर्जिनियाचे जॉन डब्ल्यू. डेव्हिस. एक तर तें वर्ष रिपब्लिकन पक्षाला अनुकूल होतं, आणि आपल्यांतल्या दुहीचं प्रदर्शन मांडून डेमॉक्रॅटिक पक्षानं जनतेचा विश्वास गमावला होता. एक प्रकारें आत्तांच्या निवडणुकींत पक्षाचा पराभव झाल्यासारखाच होता.

पक्षानं जनतेचा विश्वास गमावला असला तरी मेळाव्यांत प्रामुख्यानं वावरलल्या दोन माणसांनीं मात्र तो कायम राखला होता. यांतले एक होते आल् स्मिथ. पुढल्या निवडणुकींत न्यूयॉर्क राज्याचे गव्हर्नर म्हणून ते पुन्हा एकदां निवडून आले. आणि दुसरे होते 'एफ. डी. आर.' झाडून साऱ्या वृत्तपत्रांनीं त्यांच्या स्तुतीनं आपले रकाने भरून काढले. राजकीय निरीक्षकांनीं रूझवेल्ट यांना व्यक्तीशः पत्रं लिहून आपली कौतुकाची, आदराची भावना व्यक्त केली.

'ईव्हिनिंग वर्ल्ड' या वृत्तपत्रानं म्हटलं होतं, "गव्हर्नर स्मिथ हे जिंकले कीं हरले याला महत्त्व नाहीं. महत्त्वाचं हें कीं १९२४ च्या डेमॉक्रॅटिक मेळाव्याचे खरे 'हीरो' फ्रँकलिन डी. रूझवेल्ट ठरले. अत्यंत प्रतिकूल वातावरणांत, क्षुद्र मतभेद, धार्मिक दुराग्रह, राजकीय स्वार्थसाधूपणा, वैयक्तिक महत्त्वाकांक्षा आणि गटबाजी यांच्यावर त्यांनीं आपलं स्थान यशस्वीपणें ठेवलं. साऱ्या देशभरच्या पक्षप्रतिनिधींच्या आदराला पात्र ठरलेले एकमेव नेते हें त्यांचं नव्यानं सिद्ध झालेलं महत्त्व आहे..."

● ● ●

# वॉर्म स्प्रिंगचे मध्यंतरीचे दिवस

मेळाव्याच्या निमितानं 'एफ. डी. आर., यांना असंख्य माणसं भेटलीं. यांत होते एक सधन बॅन्कर. यांचं नांव होतं जॉर्ज फॉस्टर पीबॉडी. यांचा बहुतेक काळ न्यूयॉर्क शहरांत जाई. तिथं त्यांचा व्यापार धंदा होता, परंतु व्यापाराच्या निमित्तानं जॉर्जियांतहि त्यांचं येणं-जाणं होतं. मेळावा संपल्यानंतर थोड्याच दिवसांत फ्रॅंकलिन यांना पीबॉडी यांचं पत्र आलं. जॉर्जियांतल्या मेरिवेदर कौंटीमध्यें वॉर्म स्प्रिंग्स इथं आपल्या मालकीची एक वाडी असल्याचं पीबॉडी यांनीं रुझवेल्ट यांना कळवलं होतं. ॲटलांटापासून सुमारें पंचाहत्तर मैल दक्षिणेकडे हें ठिकाण होतं. या जागीं क्षारयुक्त गरम पाण्याचा एक नैसर्गिक झरा होता. याचं ऊष्णतामान ८८° होतं, आणि याचं पाणी औषधी आहे असं याविषयीं बोललं जाई. या झऱ्यानजीकच रहाण्याची व्यवस्था असणारं एक जुनं होटेल होतं. या झऱ्याच्या पाण्याचा उपचार रूझवेल्ट यांनीं करून पहावा अशी पीबॉडी यांची इच्छा होती. रूझवेल्ट यांची खात्री पटावी म्हणून त्यांनीं एका स्थानिक माणसाचं पत्र सोबत जोडलं होतं. हा माणूस –लुई जोसेफ-याचे हातपाय पोलीओनं लुलेमांगळे झाले होते, परंतु या गरम पाण्याच्या झऱ्यामुळें आतां तो हातांत नुसत्या काठ्या घेऊन ब्रेसेस शिवाय चालू शकत होता.

'एफ. डी. आर.' यांच्या मनानं इथं जावं असं घेतलं. पोहणं आणि पाण्याखालीं पायांना व्यायाम देणं याचं महत्त्व त्यांना पूर्वीपासून कळलं होतं. इतकंच नव्हे तर पाण्याखालीं पायांना ब्रेसीस न लावतां ते उभे देखील राहूं शकत. प्रत्येक ठिकाणीं अडचण एकच असे कीं, ज्यांत पोहायचं तें पाणी फार थंड असे आणि त्यांत फार काळ राहणं अशक्य असे. आतां या गरम पाण्याच्या झऱ्याचा उपयोग त्यांना करून पाहतां येण्यासारखा होता. तासन् तास किंवा जास्त काळ देखील, हुडहुडी न भरतां वा न गारठतां या पाण्यांत राहतां येणार होतं, आणि या झऱ्याच्या पाण्याला कांहीं औषधी गुण असूं शकतो अशी जी समजूत होती ती खरी असेल तर दुधांत साखर पडणार होती !

निवडणुकीच्या दिवसाची देखील आतां त्यांनीं वाट पाहिली नाहीं. १९२३ च्या ३ ऑक्टोबरला, ते स्वतः एलिनॉर आणि मिस ल-हॅण्ड—जिथं जात तिथं निदान एक सेक्रेटरी तरी त्यांना बरोबर लागेच—अशीं तिघं जॉर्जियांतल्या बुलॉकव्हील या छोट्या गावंदऱ्याच्या बारक्याशा स्टेशनांत आगगाडीनं येऊन पोंचलीं. 'वॉर्म स्प्रिंग्स' हें नांव या गांवाला नव्यानंच मिळालं होतं. गाडी स्टेशनांत थांबूं लागतांच खिडकीवाटें त्यांना दिसलं कीं, प्लॅटफॉर्मवर कांहीं माणसं उत्सुकतेनं त्यांच्या स्वागतार्थ जमलेलीं आहेत. गाडी थांबली, प्लॅटफॉर्मच्या एका टोंकाला मिसेस रूझवेल्ट डब्यांतून उतरल्या. त्यासरशीं त्या मंडळींतला एकजण तत्परतेनं पुढं झाला. आपलं नांव 'टॉम लॉयलेस' असल्याचं त्यांनं सांगितलं. जॉर्जियांतल्या कोलंबस शहरांतल्या 'एन्क्वायरर सन' या वृत्तपत्राचा हा अतिशय धडाडीचा मालक आणि संपादक असल्याचं नंतर त्यांना समजून आलं. त्या भागांत चालणाऱ्या निग्रोविरोधी 'कु क्लक्स-क्लॅन' चळवळीविरुद्ध बोलण्याचं धैर्य त्यानं दाखवलं त्यामुळं त्याच्या धंद्यांतून त्याला बाहेर पडण्याला भाग पाडण्यांत आलं होतं.

वॉर्म स्प्रिंग्जची जागा मुळांत लॉयलेस यांच्या मालकीची. पांच वर्षांपूर्वीं या जागेविषयीं कांहीं करतां आल्यास करावं असं त्याच्या मनानं घेतलं होतं आणि त्यानं ती 'लीज'नं दिली होती. त्यांना त्यांत फारसा फायदा मिळालेला नव्हता, आणि रूझवेल्ट यांच्या आगमनाआधीं दोन वर्षंच पुष्कळ गळ घालून जॉर्ज फॉस्टर पीबॉडी यांना त्यांनीं ती विकत घ्यायला लावली होती.



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
क्र. ...... दि: ..........

लॉयलेस यांच्यासोबत त्यांच्या पत्नीहि होत्या. त्याशिवाय स्थानिक प्रतिष्ठित कुटुंबांतल्या मिस जॉर्जिया विल्किन्स आणि मिस मिनि बुर्लक या दोघी होत्या. स्वतःच्या पांगळेपणांतल्या सुधारणेविषयीं पत्र लिहून कळवणारे लुई जोसेफ देखील हजर होते, आणखीहि बरीच मंडळी होती. या मंडळींनीं एलिनॉर यांना आपला परिचय करून देईपर्यंत, आपले भरभक्कम बाहू कुबड्यावर घातलेले 'एफ. डी. आर.' प्लॅटफॉर्मवर उतरले. मंडळींना पाहून त्यांचं ठराविक प्रसन्न स्मित त्यांनीं केलं, त्यांना उचलून चाकांच्या खुर्चीत ठेवण्यांत आलं आणि खुर्चीसकट तिथून जॉर्जिया विल्किन्स यांच्या गाडींत नेऊन ठेवण्यांत आलं.

आभाळ स्वच्छ होतं. ऊन चांगल्यापैकीं होतं. हवेंत ऊब होती. 'पाईन' चा गंध सर्वभर पसरला, दरवळला होता. हा भाग मूळचा डोंगराळ आणि चांगलाच उंचीवर होता याची जाणीव 'एफ. डी. आर.' यांना झाली. 'ॲपालॅशियन' डोंगर-मालिकेच्या दक्षिण टोंकावर हें ठिकाण असल्याचं मंडळींनीं त्यांना सांगितलं.

'मेरीवेदर इन' समोर गाडी येऊन थांबली. आलं हें राहण्याचं ठिकाण गाडीच्या खिडकीवाटें पाहून 'एफ. डी. आर.' यांनीं मस्तक मागें फेकून मनःपूर्वक हास्य केलं. समोरची इमारत जुन्या पद्धतीची, तीन मजली, लांकडी बांधणीची होती. दर मजल्याला उघडं 'पोर्च' होतं.

आनंदानं ते उद्गारले, "वा : ! मुक्कामाला फार छान ठिकाण!"

तथापि ते स्वतः आणि एलिनॉर या मोठ्या खानावळींत राहणार नव्हतीं. नजीकच्याच भागांतल्या 'हार्ट' नामक मंडळीच्या मालकीच्या छोट्याशा घरकुलांत त्यांनीं आपला मुक्काम ठेवला.

'मेरीवेदर इन' ज्या टेकडीवर उभी होती त्या टेकडीच्या पायथ्याशींच झरा होता. त्यांत पोहण्यासाठीं 'एफ. डी. आर.' नुसते अधीर व उतावीळ होऊन गेले होते. आपल्याला या झऱ्याचा फायदा किती होईल याचा अंदाज त्यांना तात्काळ हवा होता.

चाकांच्या खुर्चीतून झऱ्याच्या काठांशीं ते उतरले आणि झऱ्याच्या पाण्यांत आपल्या बळकट बाहूंनीं त्यांनीं स्वतःला सोडून दिलं, त्या क्षणापासून साऱ्या शरिराला घेरून टाकणाऱ्या ऊन ऊन पाण्याविषयीं त्यांच्या मनीं एक प्रकारचा

विश्वास आणि दिलासा निर्माण झाला. पाणी खारं नव्हतं किंवा आणखी कोणत्या क्षाराची रुची देखील त्याला नव्हती. परंतु निव्वळ रुची ही त्याची कसोटी ठरूं शकत नव्हती. महत्त्वाची गोष्ट ही होती कीं, वेळीं दोन दोन तास देखील मनांत आलं तर ते पाण्यांत राहूं शकत होते. आणि तसे ते राहूंहि लागले. त्या पाण्यांत ते पोहत, शरिराला व्यायाम देत, पोहणाऱ्या इतर माणसांबरोबर चेंडूचे खेळ खेळत आणि पाण्यांत पायांच्या ब्रेसेस न घालतां ते ताठ उभे राहात. पाय चांगले दुखले कीं स्वतःला ओढत ते पाण्याबाहेर नेत आणि आणखी एखादा तासभर उन्हांत पडून रहात.

अंगच्या उतावळीनं त्यांचा ताबा घेतला आणि त्यांना पत्र लिहिणारे लुई जोसेफ यांना स्वतःच्या ताकदीनं चालतांना जेव्हां त्यांनीं पाहिलं तेव्हां तर ही उतावीळ 'एफ. डी. आर.' यांना अक्षरशः अनावर झाली. याच झऱ्याच्या पाण्यांत लुईला आपल्या पायांतलं चैतन्य पुन्हा गवसलं होतं. परंतु 'एफ. डी. आर.' यांना मात्र तसा लक्षांत यावा असा कोणताच गुण येत नव्हता.

रूझवेल्ट यांची ही उतावळी अवस्था लक्षांत येतांच लुई आणि इतरांनीं त्यांना बजावलं कीं, "मिस्टर रूझवेल्ट, कांहीं ना कांहीं गुण दिसायला निदान तीन आठवडे तरी जावे लागतील."

परंतु तिकडं राष्ट्रीय निवडणुकांचे नगारे वाजूं लागले होते !

तीन आठवडे कोणत्याहि परिस्थितींत इथंच राहायचं. जरूर पडली तर अधिक राहायचं, असं रूझवेल्ट यांनीं ठरवून टाकलं. एलिनॉरनीं त्यांना दुजोरा दिला. राजकीय कामासाठीं त्या स्वतःच न्यूयॉर्कला परतणार होत्या.

आपल्या आईला लिहिलेल्या पत्रांत 'एफ. डी आर.' यांनीं लिहिलं होतं, "इथं सारीं माणसं आमच्याशीं फार सौजन्यानं वागतात. दुपारीं मिस्टर लॉयलेस यांनीं आपल्या मोटारींतून आम्हांला सभोंवतालच्या भागांतून फिरवून आणलं. हा भाग, निसर्ग–सौंदर्याच्या दृष्टीनं सुरेख आहे; परंतु त्याचबरोबर जागोजाग, पदोपदीं, उपेक्षा आणि दारिद्र्य यांचं दर्शन होतं. आम्हीं राहतों तें घरकुल 'हार्ट्स' मंडळींच्या मालकीचं आहे. शेजारींच लॉयलेस मंडळी राहतात."

रूझवेल्ट यांचा बराचसा काळ झऱ्याच्या पाण्यांतच जाऊं लागला. जमिनीं-तल्या एका खोल भागांतून मिनिटाला ८०० गॅलन्स या वेगानं वाहणाऱ्या

त्या गरम पाण्यांत ते राहतां येईल तितका वेळ राहूं लागले. रोजची सबंध सकाळ ते त्या पाण्यांतच घालवीत, दुपारीं पत्रव्यवहार संभाळीत, छंद म्हणून देशोदेशींच्या टपालाचीं तिकिटें जमवीत, किंवा लॉयलेस मंडळींबरोबर आस-पासच्या टापूंत सहली करीत.

वॉर्म स्प्रिंग्जच्या मुक्कामाच्या त्या आरंभींच्या काळांत झरा हेंच त्यांचं मुख्य ठिकाण होतं आणि प्रामुख्यानं त्यांच्या स्वतःच्या प्रचंड उत्साहाच्या, दृढनिश्चयाच्या जोरावर सर्वांच्या अपेक्षेपेक्षांहि लौकर त्यांचे पाय सुधारूं लागले. थोडक्या दिवसांतच पाण्यांत ते ब्रेसीसशिवाय उभे राहूं लागले, एवढंच नव्हे तर कांहीं पावलंहि टाकूं लागले.

एके दिवशीं सकाळीं बरोबरीच्यांना उद्देशून ते उद्गारले, "अरे पाहा, आजारीं पडल्यापासून प्रथमच माझ्या पायांचे अंगठे मला हलवतां येतात!" त्यांच्या सुरांत जाणवावा इतका कंप होता.

हेंच तें स्थळ होतं. वारंवार इथं यायला हवं होतं. आतां पुढल्या खेपेला राजकीय सभेच्या व्यासपीठावर ते उभे राहणार होते, तेव्हां त्यांना कुबड्यांची देखील आवश्यकता राहणार नव्हती, इतकंच नव्हे तर कदाचित् ब्रेसीसदेखील लागल्या नसत्या.

आपल्याला नेमकं काय झालेलं आहे याविषयीं डॉक्टरमंडळी फारच थोडं सांगूं शकतात आणि आपल्यालाच त्याची जास्त कल्पना येऊं शकते. यावरून रूझवेल्ट यांनीं स्वतःपुरता निष्कर्ष काढला होता कीं, आपणच आपले डॉक्टर. एका स्थानिक डॉक्टराच्या मदतीनं शरिरांतल्या स्नायूंचा एक मोठा तक्ता त्यांनीं तयार केला आणि प्रत्येक स्नायूचं काम समजून घेतलं. कोणत्या स्नायू-मुळं गुडघा वाकूं शकतो, कोणत्या स्नायूमुळं तो ताठ राहूं शकतो. चालतांना कोणते कोणते स्नायू उपयोगांत येतात, उभं राहिलं म्हणजे कोणत्या स्नायूंवर भार असतो, बसल्यानं कोणते स्नायू ताणले जातात, हें सारं त्यांनीं समजावून घेतलं.

एव्हांना या भागांतल्या एका जुनाट समजुतीवर त्यांची स्वतःची श्रद्धा बसली होती. ती समजूत अशी कीं, इथल्या झऱ्याच्या गरम पाण्यांत औषधी गुण आहे. या भागांत 'गोरीं' माणसं येऊन राहण्याआधीं 'इंडियन्स' रहात. आपल्या आजारी आणि जखमी योध्यांना ते इथं घेऊन येत; या

झऱ्याच्या पाण्याचे उपचार त्यांच्यावर करीत, आणि त्यांचे आजार आणि त्यांच्या जखमा बऱ्या करीत. या पाण्यावर त्यांची एवढी मोठी श्रद्धा होती कीं, या भागांतल्या साऱ्या जमाती या झऱ्याला धार्मिक महत्त्व देत. या झऱ्याच्या आसमंतांत असतांना ते शत्रुत्व विसरत, कोणीहि कोणाला इथं इजा करतां कामा नये असा अलिखित दंडक त्या काळांत रूढ झालेला होता.

आईला लिहिलेल्या आणखी एका पत्रांत रूझवेल्ट यांनीं सांगून टाकलं, " मी परतलों म्हणजे मिस्टर जॉर्ज फॉस्टर पीबॉडी यांच्याशीं या विषयांत जरा बोलणार आहें. त्यांच्याच मालकीची ही जागा आहे. मला वाटतं, इन्फन्टाइल पॅरॅलिसिस आणि त्या प्रकारच्या रोगांवर इथं एक कायम स्वरूपाचं उपचार-केंद्र उघडतां येईल ! "

न्यूयॉर्कला परतल्यावर पीबॉडी यांच्याव्यतिरिक्त आणखी अनेकांशीं त्यांनीं या विषयावर बोलणीं केलीं. जानेवारीमध्यें कायद्याच्या धंद्यांत नवी भागी त्यांनीं पत्करली. ही भागी बेसिल ओ कॉनेर यांच्याशीं होती. एप्रिलच्या १ तारखेला ते पुन्हां वॉर्म स्प्रिंग्जला परतले. या वेळीं जवळ जवळ दीड महिना त्यांचा मुक्काम इथं राहणार होता. न्यूयॉर्कमधल्या त्यांच्या या खेपेच्या वास्तव्यांत, राजकीय क्षेत्रांत त्यांच्याविषयीं चांगलाच दबदबा निर्माण झालेला होता एव्हांना राष्ट्रीय स्वरूपाचा राजकीय नेता हें महत्त्व रूझवेल्ट यांना प्राप्त झालेलं होतं. स्थानिक वृत्तपत्रांतून त्यांना प्रसिद्धि लाभत होती. यांतल्या एका वृत्तपत्रानं 'पोहून व्याधिमुक्त' या शीर्षकाखालीं, भरपूर अतिशयोक्तीनं भरलेला एक लेखच आपल्या अंकांत प्रसिद्ध केला. हा लेख इतर अनेक वृत्तपत्रांनीं पुनर्मुद्रित केला आणि या निमित्तानं रूझवेल्ट यांना आणि वॉर्म स्प्रिंग्ज या ठिकाणाला मुबलक प्रसिद्धि लाभली.

पुढच्या मुक्कामांत, ते वॉर्म स्प्रिंग्जला येऊन स्थिरावलेहि नाहींत आणि नुकतीच कुठं टॉम लॉयलेस आणि इतरांशीं इथं एखादं उपचारकेंद्र काढण्याबाबतींत बोलणीं त्यांनीं चालवलीं होतीं. तोंवर पॅरॅलीसिसचे दोन रोगी एका गाडीनं इथें येऊन पोंचले देखील, असं त्यांच्या कानीं आलं. कांहीं चमत्काराच्या अपेक्षेनंच हे दोघे येऊन पोंचलेले दिसत होते. आतां रूझवेल्ट यांनीं पुढाकार घेतला आणि सुचवलं, " तूर्त गांवांतल्या खानावळींत त्यांच्या राह-

ण्याची व्यवस्था करा, तोंवर आपण इथं कायम स्वरूपाच्या व्यवस्थेची कांहीं तरतूद करूं या."

त्या भागांत एक निकामी स्वरूपाचं घर उभं होतं. घाईघाईनंच त्याची शाकारणी करण्यांत आली, तें स्वच्छ करण्यांत आलं, आणि 'एफ. डी. आर.' यांनीं त्याला नांव देखील देऊन टाकलं, 'दि रेड.'

मिळालेल्या प्रसिद्धीनं आणखी रोगी त्या भागांत येऊं लागले आणि पाहतां पाहतां त्यांची संख्या दहावर गेली. 'एफ. डी. आर.' यांना मनापासून आनंद झाला होता, परंतु अशा ठिकाणीं सुटींत येणाऱ्या माणसांसाठीं चालवण्यांत येणारीं हॉटेलं आणि खानावळी यांच्याविषयीं त्यांना नव्यानं कांहीं शिकायचं होतं. आपला रोग बरा व्हावा म्हणून या भागाकडे येऊं लागलेल्या या व्याधिग्रस्त, पांगळ्या, केविलवाण्या, माणसांकडे या हॉटेलांतलीं आणि खानावळींतलीं माणसं नफरतीनं पाहूं लागलीं, त्यांची दखल घेईनाशीं झालीं. आणि खुद्द गरम पाण्याच्या झऱ्यांत तीं माणसं पोहण्यासाठीं उतरूं लागलीं तेव्हां तर त्यांनीं मोठा गहजब केला. हीं माणसं पोहण्याला उतरूं लागलीं तर ह्या पाण्यांत पोलिओच्या जंतूंचा प्रादुर्भाव होईल आणि आपल्याला या रोगाची बाधा होईल, अशी ओरड त्यांनीं चालविली. 'अशा प्रकारचा संभव बिल्कूल नव्हता.' असं त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न व्यर्थ ठरला.

सुरुवाती-सुरुवातीला या प्रकरणांत पडण्याचं 'एफ. डी. आर.' यांनीं टाळलं. या दहाहि रुग्णाईत माणसांच्या बरोबरीनं ते स्वतः आणि लुई जोसेफ पाण्यांत उतरले. त्या माणसांना त्यांनीं उत्तेजन दिलं, धीर दिला. पोहायला शिकवलं. पोहतां पोहतां लुईला त्यांनीं पाण्यांत खालीं ढकललं. मागून येऊन लुईनं त्यांना पाण्यांत खालीं ढकललं. रबराचा एक मोठा चेंडू ते एकमेकांकडे उडवूं लागले. आलेल्या रोग्यांच्यामध्यें पेनसिल्व्हानियाचा एक उंच, हाडकुळा इसम होता. फ्रेस वॉट्स असं त्याचं नांव होतं. झालंच तर दोन लठ्ठ बायाहि होत्या. 'एफ. डी. आर.' यांनीं या तिघांनाहि पाण्यांत उतरण्याला प्रवृत्त केलं, पाण्यांत उभं रहायला शिकवलं. पाहतां पाहतां रूझवेल्ट यांना हीं मंडळी डॉक्—डॉक्टर—असं संबोधूं लागली.

परंतु त्या भागांत येऊन राहिलेल्या इतर धडधाकट मंडळींची ओरड काना-

बाहेर टाकण्यापेक्षां वाढली. आणि कोणत्याहि परिस्थितींत " मेरिवेदर इन " या माणसांच्या आश्रयावर अवलंबून होती ! परिणामीं फ्रँकलिन रूझवेल्ट यांनीं आपल्या खर्चानं या रुग्णाईत माणसांसाठीं पोहण्याची एक वेगळी जागा तयार केली. तसेंच खानावळीच्या तळघरांत या माणसांची जेवण्याची वेगळी व्यवस्था केली.

थोड्या दिवसांतच एलिनॉर तिथं आली. बरोबर तिनं एकोणीस वर्षांची ॲना, झालंच तर ॲनाचा कुत्रा ' चीफ ' आणि लुई हौ, यांना आणलं होतं. कमींत कमी एक कुत्रा बरोबर असल्याशिवाय रूझवेल्ट मंडळींना कधीं बरंच वाटत नसे ! ॲनाचे भाऊ त्या वेळीं शाळेंत होते. परंतु पहिल्या सुटीला ते देखील इथं येणार होते.

' एफ. डी. आर. ' यांच्या मनांत या स्थळाला यानंतर कोणतं आणि कसं स्वरूप आणतां येईल याचे अनेक मनसुबे घोळू लागले होते. आणि एलिनॉर आणि लुई हौ यांच्याबरोबर या विषयासंबंधीं त्यांच्या प्रदीर्घ चर्चा होऊं लागल्या.

त्या उन्हाळ्यांत मॅसॅच्युसेटसमधल्या मॅरियन इथं डॉ. मॅक्डोनाल्ड यांच्याकडे जाऊन राहिले. त्यांनीं आरंभलेल्या उपचारांच्या दृष्टीनं तिथलं पाणी फारच थंड होतं. परंतु डॉक्टरांची मदत त्यांना इतर अनेक बाबतींत होत होती. एका चौकोनी जागेंत भोंवतालच्या कुंपणाला धरून धरून आणि पायांत ब्रेसेस न घालतां ' एफ. डी. आर. ' यांना डॉक्टरांनीं चालायलं लावलं. याहिपेक्षां अधिक महत्त्वाची अशी गोष्ट डॉ. मॅक्डोनाल्ड यांनीं त्यांना शिकवली. ही गोष्ट वैयक्तिक सुरक्षिततेच्या दृष्टीनं महत्त्वाची होती. ती म्हणजे हातांच्या मदतीनं रांगत जमिनीवरून वेगानं सरकणं ! समजा, रूझवेल्ट कधीं एकटे असते आणि घराला आग लागती, तर त्या परिस्थितींत स्वतःला कसं वांचवावं तें यामुळें त्यांना समजलं असतं...

१९२५ च्या उन्हाळ्याच्या अखेरीं कुबड्या घेऊन, केवळ डाव्या पायाला ब्रेसेस लावून ' एफ. डी. आर. ' एका वेळीं अनेक पाउलं चालूं शकूं लागले. उजव्या पायांत चलनवलन येऊं लागलं होतं.

हिंवाळा त्यांनीं न्यूयॉर्क शहरांत घालवला. आपल्या नव्या कायद्याच्या फर्मच्या वाढीच्या मागं ' बेसिल ओ कोनर ' यांच्या बरोबरीनें ते झटत होते.

एकीकडे राजकीय नेत्यांशीं त्यांचा संबंध होता. वुड्रो विल्सन फौन्डेशनच्या कामांत ते जमेल ती मदत करीत होते. वॉर्म स्प्रिंग्जच्याउपचार केंद्राचे विचारहि चालूच होते. याबद्दल टॉम लॅयलेस आणि जॉर्ज फॉस्टर पीबॉडी यांना ते सल्ला-मसलत देत. एका वेळीं अनेक कामं चालू होतीं, पण त्यांच्या दृष्टीनं त्यांतहि दोनच महत्त्वाचीं होतीं. जागतिक सरकारद्वारें जागतिक शांतता या उद्दिष्टांसाठीं चळवळ; आणि पोलिओचं मूळ समजून घेऊन त्याचं निर्मूलन करतां यावं या दृष्टीनं चाललेल्या प्रयत्नांना सहाय्य.

वॉर्म स्प्रिंग्ज उपचार केंद्र तोट्यांत होतं. तें तोट्यांत चालविणं फार काळ अशक्य होतं. टॉम लॅयलेस हाहि तसा मोठा कुशल चालक नव्हता. त्याची स्वतःची प्रवृत्ति त्याला धोका देत होती. रूझवेल्ट यांना याची कल्पना होती. आपल्या मनीं या उपचार–केंद्राविषयीं ज्या मोठमोठ्या कल्पना आहेत त्या प्रत्यक्षांत उतरविण्याच्या दृष्टीनं पीबॉडी हा योग्य माणुस नव्हे याची जाणीवहि रूझवेल्ट यांना होत होती. या परिस्थितींत फक्त एकच करणं शक्य होतं. पीबॉडी यांच्याकडून ती जागा विकत घेणं आणि स्वतः उपचार केंद्र चालविणं. त्यांच्या मनांत असं कांहीं आहे हें कळल्यानंतर त्यांच्या कुटुंबाला बसलेला धक्का विलक्षण होता !

“ फ्रॅंकलिन ! यानं तुमच्या जवळचा सारा पैसा-अडका गुंतून पडेल. आणि एकाच गोष्टींत पैसा गुंतवणं शहाणपणाचं ठरणार नाहीं. ”

फ्रॅंकलिन यावर फक्त हंसले.

फेब्रुवारींत फ्लोरिडामध्यें त्यांनीं एक ‘ शिकारा ’ विकत घेतली. त्यांच्या मनांत हें फार दिवसांपासून होतं. त्याचं नांव “ लारूको ”. या शिकाऱ्यांतून मासे मारण्यासाठीं त्यांनीं मोठ्या सहली केल्या. अशाच एका सहलीवर असतांना टॉम लॅयलेस निवर्तल्याचं वृत्त त्यांना कळलं आणि मिसेस लॅयलेस यांना त्यांनीं सांत्वनाचं एक पत्र लागलीच लिहिलं.

‘ की–वेस्ट ’ला त्यांची बोट लागली तशी जॉर्ज पीबॉडी यांचे बंधू चार्लस एस. पीबॉडी, रूझवेल्ट यांचे पाहुणे म्हणून शिकाऱ्यावर चढले. त्यांच्या बरोबर वॉर्म स्प्रिंग्जच्या ‘ हार्ट कॉटेज ’चे धनी विल्यम हार्ट हेहि होते. नंतरच्या सहलींत रूझवेल्ट यांनीं आपल्या मनांतला बेत या दोघांच्या कानीं घातला. शिकारा परत किनाऱ्याला येऊन लागल्यानंतर ‘की–वेस्ट तेव्हां याई’

मध्यें त्यांनीं त्यांना नेलं; युद्धकाळापासून त्यांच्या परिचयाच्या असलेल्या नौदलाच्या अनेक अधिकाऱ्यांशीं त्यांच्या ओळखी करून दिल्या; त्या सर्वांना स्वत: एक मेजवानी दिली; इतकंच नव्हे तर पुढले चार दिवस त्यांचं आदरातिथ्यहि केलं. रूझवेल्ट यांना धन्यवाद देत देतच ही मंडळी पांगली आणि आठवड्याभरांत रूझवेल्ट यांनीं आपल्या आईला पत्रांतून कळवलं, "मीं वॉर्म स्प्रिंग्ज" विकत घेतल्यासारखंच आहे. हें घडलंच तर त्यामध्यें तूं मोठ्या प्रमाणावर लक्ष घालावंस अशीहि माझी इच्छा आहे. तें केंद्र कसं चालवावं, कसं वाढवावं याबद्दल तूंच मला अनेक सूचना करूं शकशील आणि तें सुरळीतपणें चाललं तर केवळ लोकांच्या फायद्याचंच ठरेल असं नव्हे, तर आर्थिकदृष्ट्या आपल्यालादेखील चांगला फायदा होईल."

ऋग्णाइतांना विश्रांतीसाठीं आणि बरं होण्यासाठीं वॉर्म स्प्रिंग्ज हें हक्काचं ठिकाण ठरणार होतं आणि यासाठीं जें जें आवश्यक तें तें सारं रूझवेल्ट करणार होते.

कायद्याच्या धंद्यांतल्या भागीदारानं त्यांना तार केली, "मी येत आहें तोंवर कोणतेहि करारमदार करूं नका. दुपारच्या गाडीनं निघतों."

'बेसिल ओ कोनर' येऊन पोंचले. दोघांनीं मिळून त्या जागेवरून भ्रमंति केली. उपचार केंद्राबद्दल रूझवेल्ट यांनीं केलेला आराखडा ओ कोनरनीं बघितला आणि पुष्कळ वेळपर्यंत दोघांनीं त्याबाबत बोलणीं केलीं. हें सगळं प्रकरण आर्थिकदृष्ट्या फायद्यांत कसं येणार याविषयीं 'ओ कोनर' यांना अद्यापीहि शंका होत्या. परंतु फायदा होणार नाहीं असंच गृहित धरून दोघांनीं मिळून हा उद्योग करण्याचं ठरवलं. त्याला त्यांनीं 'जॉर्जिया वॉर्म स्प्रिंग्ज फौन्डेशन' असं नांव दिलं आणि न्यूयार्कला परततांच त्याबाबतची कायदेशीर करारमदारांची सारी व्यवस्था पुरी करण्याचं 'बेसिस ओ कोनर' यांनीं अभिवचन दिलं.

एफ. डी आर.' यांनीं जें ठिकाण विकत घेतलं होतं त्यांत 'मेरिवेदर इन' होती आणि प्रत्यक्ष झऱ्याचा दोनशें एकरांचा टापूहि त्यांत अंतर्भूत होता. पुढं थोड्या काळांतच नव्या फौंडेशननं हा सारा भाग खरेदी केला. आणि बदल्यांत रूझवेल्ट यांना सुमारें दोन लाख डॉलर्सची प्रॉमिसरी नोट दिली. ही रक्कम त्या जागेच्या मूळ मालकाला हप्त्यानं देण्याचं रूझवेल्ट

यांनीं मान्य केलेलं होतं. फौंडेशननं हे पैसे त्यांना त्यांच्या अखेरपर्यंत देण्याचा प्रश्न उद्‌भवत नव्हता. याच रकमेची विमा पॉलिसी रूझवेल्ट यांनीं काढली होती, आणि ही रक्कम वारसा हक्कानं फौंडेशनला मिळावी अशी व्यवस्था केली होती, आणि प्रत्यक्षांत पुढं त्यांचं निधन झालं तेव्हां या विमा पॉलिसीनंच तें कर्ज फेडलं. ' एफ. डी आर. ' हे तसे स्वच्छ विचारांचे आणि चतुर योजक होते. त्यांची पत्नी, त्यांची आई, आणि खुद्द ' ओ कॉनर' यांना याची जाणीव असायला हवी होती !

आतां हें केंद्र चालविण्याचा प्रश्न होता आणि त्या बाबतींतहि स्वप्नरंजनांत रमण्याची रूझवेल्ट यांची तयारी नव्हती. एक तर ते स्वतः डॉक्टर नव्हते. अमेरिकन ऑर्थोपीडिक असोसिएशन या संस्थेचं वार्षिक अधिवेशन जॉर्जियांतल्या ॲटलांटा शहरीं आहे असं कळतांच, त्या मंडळींशीं पत्रव्यवहार करून या स्थळाबद्दल शास्त्रशुद्ध संशोधन करण्यांत यावं आणि शिफारसी करण्यांत याव्या अशी व्यवस्था त्यांनीं केली. या संस्थेनं तीन स्पेशालिस्ट डॉक्टरांची एक समिति नेमली. त्यानंतर रूझवेल्ट यांनीं न्यूयॉर्कचे सर्जन डॉ. ले–रॉय डब्ल्यू. हबर्ड यांना गांठलं. हे डॉक्टर त्याआधीं जवळ जवळ दहा वर्षांपासून पोलिओच्या रोग्यांवर उपचार करीत होते. मिस हेलिना टी. मॅहोनी या थेरॅपिस्ट आणि ट्रेण्ड नर्स असलेल्या बाईंना त्यांनीं बोलावून घेतलं. या बाई पोहोण्याच्या शिक्षिका देखील होत्या. या दोघांना त्यांनीं त्या उपचार केंद्राचे वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्त करून टाकलं. या केंद्रांतल्या रुग्णाइतांकडे हीं दोघं लक्ष पुरविणार होतीं, रुग्णाइतांच्या बरोबरीनं काम करणार होतीं, आणि त्यांच्या छाननीचे निष्कर्ष वैद्यकीय व्यावसायिकांसाठीं प्रसिद्ध करणार होतीं.

तिथं उभ्या असलेल्या साऱ्या जुनाट अस्ताव्यस्त इमारती एकाच वेळीं खालीं ओढून जमीनदोस्त कराव्यात असं रूझवेल्ट यांना वाटे. या लांकडी इमारती म्हणजे आगीला निमंत्रणच होतं. शक्य होईल तेव्हां या इमारतींच्या जागीं नव्या पद्धतीच्या सुरक्षित आणि सुंदर इमारती बांधायला हव्या होत्या.

हें ठिकाण आपल्या ताब्यांत आलं असं एकदां नक्की ठरल्यानंतर रूझवेल्ट यांच्या उत्साहाला आणि कल्पनेला पार उरला नाहीं. केवळ इमारतीच पक्क्या होऊन चालणार नव्हतं, रस्ते चांगले व्हायला हवे होते; कुबड्या घेऊन चालण्याचा सराव करणाऱ्या रुग्णाइतांसाठीं विशिष्ट प्रकारच्या

पायवाटा व्हायला हव्या होत्या; चाकांच्या खुर्च्यांतून फिरणाऱ्यांकरितां तशा वाटा बांधल्या जाणं आवश्यक होतं. हें सारं लागलीच शक्य नव्हतं. परंतु निदान या साऱ्या जुनाट, रुक्ष इमारतींना रंगाचा एक हात देणं तरी शक्य होतं कीं नाहीं ! प्रत्यहीं नवनव्या योजना ते आंखीत होते, रेखाटनं करीत होते, गमतीनं स्वतःला 'हौशी इंजिनिअर' आणि 'लॅण्डस्केप आर्टिस्ट' म्हणवून घेत होते. आढळेल त्या पैसेवाल्या माणसाला त्या जागेवर पाचारण करण्याचा सपाटा त्यांनीं चालविला.

आतां हें ठिकाण फक्त ऋग्णाइतांसाठीं असणार होतं. तिथला तलाव, भोजन-गृह, राहण्याच्या खोल्या हें सारं ऋग्णाइतांसाठींच असणार होतं. सुटींत आराम करण्यासाठीं येणाऱ्यांना आतां इथं थारा नव्हता. परंतु त्या प्रकारच्या माणसांसाठीं एखादं ठिकाण जसं शोभिवंत केलं जाईल तसंच आणि तितकचं हें ठिकाण शोभिवंत केलं जाणार होतं. कोणत्याहि परिस्थितींत याला इस्पितळाची कळा ते येऊं देणार नव्हते.

१९२६ च्या मे अखेर तिथलं उपचार केंद्र चालू झालं. एग्बर्ट टी. कर्टिस हे तेथील व्यवस्थापक म्हणून नियुक्त झाले होते.

या नव्या, फायद्याची अपेक्षा नसलेल्या संस्थेच्या प्रवर्तकांना आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना एकत्र बोलावून त्यांच्याशीं बोलणीं करण्यासाठीं 'एफ. डी. आर' न्यूयॉर्कला परतले. ह्या नव्या संस्थेचे अध्यक्ष होते फ्रँकलिन रूझवेल्ट; सेक्रेटरी आणि खजिनदार होते 'बेसिल ओ कॉनर.' याशिवाय जॉर्ज फॉस्टर पीबॉडी लुई हौ, आणि इतर मंडळींहि हिच्या चालक मंडळींत होती. ही सारी व्यवस्था पुरी करून रूझवेल्ट आपल्या चाकांच्या खुर्चीवर स्वार होऊन आपल्या मुलीच्या लग्नासाठीं 'कर्टिस डाल'ला गेले. ही ॲना-एलिनॉर त्यांची सर्वांत मोठी आणि एकुलती एक मुलगी. अलीकडे पिता पुत्री या नात्यापेक्षां या दोघांमध्यें एक प्रकारच्या मैत्रीचं नातंहि दृढावलं होतं, आणि म्हणून हा कन्यावियोग त्यांना एक प्रकारें जडच जाणार होता. त्या दोघांचं एकमेकांशीं चांगलं जमत असे. तसेंच भांडणं देखील जोराचीं होत. रूझवेल्ट यांच्या दुखण्याच्या आरंभींच्या काळांत ॲना तिच्या वाढत्या वयाच्या एका नाजुक अवस्थेंत होती, आणि रूझवेल्ट यांच्या उताविळीनं, वेफाट शब्दांनीं कित्येकदां तिला दसादसा रडवलं होतं. परंतु हें सारं झाल्या-गेल्यांत जमा होतं. आतां

मुद्रा प्रसन्न ठेवून कन्यादान करणं प्राप्त होतं. हें लग्न आणि या निमित्तानं होणारा सोहळा ॲनाच्या दृष्टीनं संस्मरणीय ठरावा असा व्हायला हवा होता. त्याचबरोबर याचीहि काळजी त्यांना घ्यावयाची होती कीं, समारंभांतलं मुख्य लक्ष आपण न ठरतां ॲना आणि तिचा वाग्दत्त वरच ठरेल. स्वतःच्या लग्नाचा समारंभ रूझवेल्ट यांना चांगला आठवत होता. त्या वेळीं वधू-वर बाजूला पडून समारंभाला उपस्थित असलेल्या थिओडोर रूझवेल्ट यांनाच सारं महत्त्व मिळालेलं होतं!

त्या उन्हाळ्यांतली या कुटुंबाच्या दृष्टीनं सर्वांत महत्त्वाची घटना म्हणजे त्यांचा मोठा मुलगा जेम्स याचं ग्रोटोनमधलं शिक्षण पूर्ण झालं होतं आणि तो घरीं आला. वडिलांसारखाच तोहि उंच वाढला होता आणि तसाच देखणाहि दिसत होता. त्याच्याकडं पाहून रूझवेल्ट यांना आतां वारंवार असा संभ्रम पडे कीं हा उंच माणूस खरोखर आपला मुलगाच काय!

अधिक उपचार करून घेतां यावेत म्हणून ऑगस्टमध्यें सपत्नीक मॅसेच्युसेटसमधील मॅरियनला डॉक्टर मॅक्डोनाल्ड यांच्याकडे जाऊन राहिले. सप्टेंबरअखेरीं दीड महिन्याच्या मुक्कामासाठीं वॉर्म स्प्रिंग्जला ते परतले. या वेळीं आपल्याबरोबर, या साऱ्या योजनांबद्दल शंका आणि नापसंती बाळगणाऱ्या आपल्या आईलाहि त्यांनीं घेतलं होतं. या ठिकाणीं स्वतःच्या मालकीचं एक छोटं घर त्यांनीं बांधू घातलं होतं आणि हें कसं बांधलं जावं याविषयीं आईच्या सूचना त्यांना हव्या होत्या. किंबहुना, हें सारं ठिकाणच कशा प्रकारें वाढवावं याविषयींच्या आईच्या कल्पना त्यांना जाणून घ्यायच्या होत्या.

१९२७ च्या आरंभीं पुन्हां एकदां ते वॉर्म स्प्रिंग्ज इथं गेले. या वेळीं दीर्घ काळपर्यंत ते तिथं मुक्काम टाकून राहिले. ११ फेब्रुवारी ते १२ मे पर्यंत ते तिथं होते. पुन्हां एकदां मेच्या २५ तारखेपासून ११ जून पर्यंत ते तिथं राहिले. स्वतःच्या घरींच आतां त्यांचा मुक्काम त्यांनीं ठेवला होता. मुक्कामामागची कल्पना, बाजूची आणखी १२०० वारांच्या जागेची खरेदी करणं; अस्तित्वांत असलेलं हॉटेल सुधारून बांधणं, अशी होती. स्वतःवरचे उपचार पुढं चालू ठेवणं हाहि या मुक्कामांतला एक भाग होता. साध्या जमिनीवर दोन बाजूंना हातांनीं आधार घेऊन ते आतां कित्येक मिनिटांपर्यंत ब्रेसेसशिवाय

ताठ पायांनीं उभे राहूं शकत होते आणि हात सोडून देखील तसे राहूं शकत होते.

त्यांच्या आनंदाला पारावार उरला नव्हता. भेटेल त्याला ते याबद्दल सांगत सुटले. हें नवं उपचार–केंद्र कोणत्याहि परिस्थितींत भरभराटीला आलं पाहिजे; वाढलं पाहिजे; इथं अधिकाधिक सोयी झाल्या पाहिजेत, असं आतां त्यांच्या मनानं पक्कं घेतलं. आणि त्यामागं ते कायावाचामनें करून लागले. एखाद्या कामासाठीं, सल्लामसलतीसाठीं, अथवा कांहीं हिताच्या दृष्टीनं माणसं त्यांच्याकडे येत, तेव्हां त्यांना ‘ वॉर्म स्प्रिंग्जचं उपचार केंद्र ’ या विषयावर बरंचसं ऐकावंच लागे. त्यासाठीं शक्य तें करावंच लागे.

●●●

# न्यूयॉर्कचे गव्हर्नर

कारणांकारणांनीं रूझवेल्ट यांच्याकडे येणारीं, त्यांना भेटणारीं कितीतरी माणसं होतीं. परंतु यांत प्रामुख्यानं भरणा असे तो रूझवेल्ट यांच्या राजकीय ज्ञानाचा आणि चातुर्याचा फायदा घेणाऱ्यांचा. एकीकडे नव्या उपचार केंद्रासाठीं झटत असतांना त्याच वेळीं डेमॉक्रॅटिक पक्षांत एकसंघपणा निर्माण करण्यासाठीं, मतभेद मिटवण्यासाठीं, रूझवेल्ट यांचे प्रयत्न चालू होते. १९२४ च्या दृष्टीनं बुजबुजलेल्या, अनेक प्रकारचे तमाशे दाखवणाऱ्या पक्ष मेळाव्यानंतर हें स्वच्छ झालं होतं कीं, पक्षाच्या दृष्टीनं पुष्कळच गोष्टी होणं आवश्यक होतं. पक्षाचं उद्दिष्ट नेमकं काय असावं याविषयीं रूझवेल्ट यांनीं देशभरच्या डेमॉक्रॅटिक नेत्यांशीं पत्रव्यवहार केला, याविषयींच्या आपल्या कल्पना त्यांच्या पुढं मांडल्या, त्यांच्या मतें हा पक्ष एक महान् उदारमतवादी पक्ष होणं आवश्यक होतं. स्वातंत्र्याचा आणि सौंदर्याचा पुरस्कार त्यानं केला पाहिजे होता. अतिजहाल किंवा अतिमवाळ यांतलं कोणतंहि एकांतिक टोंक त्यानं गांठतां कामा नये; त्याची गाडी सदां प्रगतिपथावरच असायला हवी होती; आणि नेतृत्वासाठीं त्यानं एखादा नवा ' थॉमस जेफरसन ' शोधणं हें हिताचं ठरणार होतं. रूझवेल्ट यांनीं आपल्या पत्रांत लिहिलं होतं कीं, सारा पक्ष एकत्र बांधला जावा असं सूत्र मला एकच

दिसतं. ' प्रोग्रेसिव्ह डेमॉक्रसी '—विकासशील लोकशाही. याबद्दल आपणां सर्वांत एकमत होऊं आणि राहूं शकतं. "

आल् स्मिथ यांनाच राष्ट्राध्यक्षपदासाठीं पक्षानं उमेदवार म्हणून निवडावं असा रूझवेल्ट यांचा आग्रह होता आणि त्यासाठीं त्यांनीं जिवापाड प्रयत्न चालवले. हें घडावं म्हणून आपल्या दर्जाचा विचार न करतां मेळाव्यांत स्मिथ यांचे ' फ्लोअर मॅनेजर ' देखील ते बनले.

टेक्सासमधल्या हौस्टनच्या १९२८ मधल्या पक्ष–मेळाव्याला आपल्या बरोबर त्यांनीं आपल्या अठरा वर्षांच्या इलियटला नेलं. चार वर्षांपूर्वी हातीं कुबड्या धरून ते पक्षाच्या मेळाव्यासमोर गेले होते. त्यानंतर चार वर्षांच्या काळांत पाठ आणि पोट एवढ्या स्नायूंवर त्यांचा पुष्कळच काबू आला होता. ब्रेसेस घालून ते आतां आपला तोल सावरूं शकत होते. एका हातांत काठी घेऊन आणि दुसरा हात मुलाच्या खांद्यावर ठेवून ते आतां चालूं शकत होते.

याहि खेपेला आल् स्मिथ यांचं नांव मेळाव्यासमोर ते सुचवणार होते. मागल्या मेळाव्यांत आणि या मेळाव्यांत फरक एकच होता. चार वर्षांपूर्वीच्या मेळाव्याचं कामकाज चौदा वेगवेगळ्या लहान लहान नभोवाणी केंद्रांवरून ध्वनिक्षेपित झालेलं होतं. या वेळीं दोनच मोठ्या ध्वनिक्षेपण संस्था एन. बी. सी. आणि सी. बी. एस. साऱ्या देशभर हा मेळावा पोंचवणार होत्या. या नव्या माध्यमाच्या दृष्टीनं भाषण करण्याच्या पद्धतींत मूलतःच बदल करणं जरूर आहे याची जाणीव ' एफ. डी. आर. ' यांना झालेली होती. केवळ समोर बसलेल्या श्रोतृसमुदायाला लक्षांत घेऊन नव्हे तर नभोवाणीवरून ऐकणाऱ्या अदृश्य अशा प्रचंड श्रोतृसमुदायाचा विचार करून त्यांनीं आपलं भाषण यावेळीं तयार केलं. आणि प्रत्यक्ष भाषण जेव्हां नभोवाणीवरून ठिकठिकाणीं ध्वनिक्षेपित झालं तेव्हां रूझवेल्ट यांच्या प्रसन्न आवाजाचा प्रभाव श्रोत्यांवर फार मोठ्या प्रमाणावर पडला. रूझवेल्ट यांचे शब्दोच्चार ' ग्रोटोन ' आणि ' हार्वर्ड 'च्या संस्कारांनीं तसंच कुटुंबांतल्या वळणामुळं अतिशय निर्दोष आणि कमावलेले वाटत आणि त्यांचा जोरकस आणि भरीव आवाज जणुं ध्वनिक्षेपणासाठींच निर्माण झालेला होता....!

यावेळीं मेळाव्यांत फारसे बिकट पेंचप्रसंग उद्भवले नाहींत. आल् स्मिथ उमेदवार म्हणून झटपट निवडून आले. जूनच्या ३० तारखेपर्यंत रूझवेल्ट

वॉर्म स्प्रिंग्जला परतले. आल् स्मिथ यांच्या वतीनं सुरू करायच्या प्रचार मोहिमेपूर्वी चांगली विश्रांति घ्यावी आणि मगच कामाला लागावं असं त्यांच्या मनांत होतं.

एव्हांना वॉर्म स्प्रिंग्जच्या केंद्राचा व्याप वाढला होता. रूझवेल्ट यांच्या दरबाराचं स्वरूप त्या स्थळाला आतां आलं होतं. आणि एखाद्या सुस्वभावी सुलतानाप्रमाणें या दरबारांत रूझवेल्ट मोठ्या दिलखुलासपणें भाग घेत. रूझवेल्ट यांनीं आपल्या बरोबर खेळांत सहभागी व्हावं असं तिथल्या रुग्णाइतांना वाटे. रूझवेल्ट हे न्यूयॉर्क राज्याच्या गव्हर्नरपदासाठीं निवडणूक लढवणार अशी ऐकलेली वार्ता खरीं कीं खोटी, हें अजमावण्यासाठीं त्यांना आपल्याकडं बोलवावं अशी इच्छा त्यांच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांत असे. पलीकडच्याच घरांत मिस लहॅण्ड रहात होत्या. त्या त्यांच्या पत्रव्यवहाराची व्यवस्था पाहात. त्या प्रकरणीं रूझवेल्ट यांना विचारण्याची त्यांची इच्छा असे. टेक्सासच्या मेळाव्यानंतर रूझवेल्ट यांची तब्येत पुन्हां एकदां तपासावी असं डॉक्टर हबर्ड यांना वाटे. आपल्या पुढल्या उपचारांसाठीं रूझवेल्ट यांनीं तलावावर यावं असं मिस मॅहोनी यांच्या मनांत असे, आणि यांतच स्थानिक वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींना त्यांच्या मुलाखती हव्या असत.

कोणी विचारीत, " मिस्टर रुझवेल्ट, न्यूयॉर्कच्या गव्हर्नरपदाची निवडणूक तुम्हीं लढविणार आहांत अशी अफवा आहे ती कितपत खरी आहे ? "

" साफ चुकीची. कोणतीहि निवडणूक लढवण्याचा साधा विचार करण्यापूर्वी आणखी निदान दोन वर्षं तरी मला माझ्यावर उपचार करून घ्यायला हवेत. " अशा वेळीं ते या लोकांना सांगत, " न्यूयॉर्कच्या गव्हर्नरपदापेक्षां या क्षणीं स्प्रिंग्जच्या खाणावळींतल्या नव्या मध्यवर्ती ' हीटिंग सिस्टिम 'मध्यें मला जास्त रस तूर्त आहे. " आतांपर्यंत वॉर्म स्प्रिंग्जला भेट देऊन गेलेल्या त्यांच्या मित्रांमध्यें ' टडसेल फोर्ड ' दांपत्य देखील होतं आणि सबंध वर्षभर थंडीवाऱ्याची बाधा न होतां रुग्णाइतांना पोहतां यावं यासाठीं पोहण्याचा एक बंद तलाव बांधण्यासाठीं त्यांनीं देणगी दिलेली होती. रूझवेल्ट सांगत कीं, राजकारणापेक्षां या गोष्टीला तूर्त आपल्या दृष्टीनं अधिक महत्व आहे.

इतक्यांतच निवडणूक लढवूं नये असं त्यांना वाटण्याला आणखी एक कारण होतं. यंदाचं वर्ष डेमोक्रॅटिक पक्षाला अनुकूल नाहीं याविषयीं त्यांच,

लुई हौ, आणि एलिनॉर यांचं एकमत होतं. रिपब्लिकन राजवटीखालीं देशाची आर्थिक प्रगति चांगल्या प्रकारें चालू होती; मुबलक रोजगार उपलब्ध होते; खर्च करायला माणसांकडं भरपूर पैसा होता. हें सारं बदलावं असं कोणालाहि वाटण्याचा संभव नव्हता. हें बदलण्याची कल्पनाहि कोणाच्या दृष्टीनं अतर्क्य होती. रिपब्लिकन उमेदवार मिस्टर हर्बर्ट हूवर यांचा पराभव नोव्हेंबरच्या निवडणुकींत आल् स्मिथ यांनीं केला असता तरी तो फारच अल्प मतांनीं होणार होता.

एव्हांना पतीच्या बरोबरीनं मिसेस रूझवेल्ट राजकारणांत जाणत्या बनल्या होत्या आणि आल् स्मिथ यांच्या राष्ट्रीय प्रचार मोहिमेच्या स्त्रीविभागाच्या त्या प्रमुख बनल्या. एका वेळीं अनेक जागीं अनेक गोष्टी सुरळीतपणें घडवून आणण्याच्या दृष्टीनं आपल्यापेक्षां आपली पत्नी अधिक कुशल आहे या विषयीं ' एफ. डी. आर. ' यांची खात्री पटलेली होती. स्त्रियांच्या अनेक संघटनांत एलिनॉर एका वेळीं भाग घेत होत्या; लोकहिताच्या अनेक चळवळींत काम करीत होत्या; जाहीर भाषणं करीत होत्या; आणि हें सारं करून आपल्या चार मुलांचं संगोपन करीत होत्या. यांतला सर्वांत लहान ' जॉन ', नुकतांच ग्रोटोनच्या शाळेंत दाखल झाला होता. मुलांच्या संगोपनाबरोबरीनं हाईड पार्क, न्यूयॉर्क शहर, कॅम्पोबेलो आणि वॉर्म स्प्रिंग्ज इथल्या बिऱ्हाडांची देखभाल देखील त्या करीत, आणि यांतच भरीस भर म्हणून त्या एका शाळेंत शिकवीत. ' टॉल हंडर स्कूल ' या उच्च दर्जाच्या शाळेंत इतिहास आणि साहित्य हे विषय त्या मुलांना शिकवीत.

फ्रॅंकलिन यांनीं सप्टेंबरमध्यें वॉर्म स्प्रिंग्जला जाऊन राहायचं आणि रॉचेस्टरच्या डेमॉक्रॅटिक राज्य मेळाव्याला एलिनॉरनीं हजर रहायचं, असं या दोघांनीं आपापसांत ठरवून टाकलं.

' एफ. डी. आर. ' नीं पत्नीला म्हटलं. " गव्हर्नरपदासाठीं उभं राहण्याबाबत माझ्या मनांत काय आहे त्याची कल्पना तुला आहे असं वाटतं ! "

एव्हांना पक्षांत खुद्द आल् स्मिथ यांच्या खालोखाल रूझवेल्ट यांचं महत्त्व वाढलेलं होतं आणि पक्षाच्या असंख्य मतदारांच्या दृष्टीनं रूझवेल्ट हे फारच मोठे झालेले होते. या संदर्भांत ' गव्हर्नरपदासाठीं इतक्यांत तरी उभं

राहण्याची आपली इच्छा नाहीं, ' ही रूझवेल्ट यांनीं पत्नीला दिलेली जाणीव सुज्ञपणाचीच होती.

पक्षाचे प्रतिनिधि रॉचेस्टर इथं जमूं लागले आणि तेव्हांपासून वॉर्म स्प्रिंग्ज इथं रूझवेल्ट यांच्या घरीं टेलिफोनची घंटा अप्रतिहतपणें खणखणूं लागली. यांनीं गव्हर्नरपदासाठीं उभं राहावं अशी पक्षाची इच्छा होती. अन्य कुणाहि-पेक्षां त्यांनीं अधिक मतं मिळवलीं असतीं. वारंवार ते याला नकार देत होते. आपले उपचार हेच तूर्त महत्त्वाचे आहेत आणि ते कोणत्याहि परिस्थितींत आपणाला थांबवतां येणार नाहींत असं ते परोपरीनं, ठामपणानं सांगत. शेवटीं शेवटीं तर फोन आला म्हणजे तो घेणंदेखील त्यांनीं थांबवलं आणि मिस् ल-हॅण्ड ह्यांच्याकडं तें काम सोपवलं. ह्या वेळेपर्यंत त्यांच्या उजव्या पायाची प्रगति फार चांगली चालू होती. पायांतल्या ब्रेसिसचा खोडा एकदांचा काढून टाकला पाहिजे, त्याशिवाय उभं राहतां, चालतां आलं पाहिजे हें रूझवेल्ट यांचं एकच ध्येय होतं. परंतु शक्य तें सर्व वजन पक्षाच्या कार्यकर्त्यांनीं त्यांच्यावर आणणं चालूंच ठेवलं. इतर कुणी तर राहोच पण खुद्द त्यांच्या मुलीनं तार पाठवून निवडणुकीला उभं राहण्याबद्दल त्यांना गळ घातली. आतां ती चांगली लग्न झालेली पुरंध्री झालेली होती. तरीदेखील या तारेला दिलेल्या उत्तरांत, 'असली गळ घातल्याबद्दल तुला चांगलाच ठोक दिला पाहिजे ' असं त्यांनीं तिला कळवलं होतं. त्यानंतर एका भाषणाच्या निमित्तानं जॉर्जियां-तल्या मॅन्चेस्टर इथं ते निघून गेले. त्या सभेच्या व्यासपीठावर ते स्थाना-पन्न झाले होते. सभागृह श्रोत्यांनीं भरून गेलेलं होतं. आरंभीं एक वक्ता रूझवेल्ट यांचा औपचारिक परिचय सभेला करून देणार होता. परंतु त्यांचं भाषण सुरूं होणार तेवढ्यांत व्यासपीठाखालून एक चिठ्ठी त्यांच्यापर्यंत पोंचती झाली. त्या चिठ्ठींत मजकूर होता कीं, 'मिसेस रूझवेल्ट यांचा ट्रंक कॉल आलेला आहे.' 'तूर्त वेळ नाहीं ' असा रूझवेल्ट यांनीं तिथूनच निरोप दिला.

त्यांनीं आपलं भाषण संपवलं आणि ते फोनकडे गेले. एलिनॉरचा शब्द त्यांनीं ऐकला परंतु तिनं फारसं कांहींच न बोलतां फोन आल स्मिथ यांजकडं दिला. टेलीफोन लाईन इतकी खराब होती कीं नीटसं कांहींच ऐकूं येत नव्हतं. आणि म्हणून हा 'कॉल' रद्द करून वॉर्म स्प्रिंग्जला 'कॉल' द्या, "मी

तिथं चाललों आहे ", असं रूझवेल्ट यांनीं सांगितलं. वॉर्म स्प्रिंग्जला ते परतले आणि नवा 'कॉल' आला.

टेलिफोनवरून स्मिथ आवर्जून सांगत होते, "फ्रॅन्क, गव्हर्नरपदासाठीं तूं उभा राहिलास तर मला स्वतःला फार बरं वाटणार आहे. माझी वैयक्तिक इच्छा म्हणून तूं एवढी गोष्ट मानली पाहिजेस."

रूझवेल्ट यांना समजत होतं. फोनशीं सारे जमलेले असले पाहिजेत. काय वाटेल तें करून रूझवेल्ट यांचा रुकार घ्यायचा असं सर्वांचं ठरलेलं असलं पाहिजे, कारण आल् स्मिथ यांच्या पाठोपाठ हर्बर्ट एच. लेहमर्थ फोनवर आले. ते म्हणाले, "फ्रँकलिन, आपण गव्हर्नरपदाच्या निवडणुकीसाठीं उभे राहाल तर लेफ्टनंट गव्हर्नरपदासाठीं मी उभा राहतों, आणि तुमच्यावरच्या कामाचा जेवढा जमेल तेवढा भार मी माझ्याकडे घेतों."

रूझवेल्ट यांची मुद्रा विरघळूं लागली आहे, ही गोष्ट मिस् ल-हॅंड यांच्या लक्षांत आली असावी. कारण फोननजीकच ती उभी होती. ती खालीं बसली आणि रडूं लागली.

पुन्हां एकदां आल स्मिथ यांनीं फोन घेतला.

त्यांनीं विचारलं, "फ्रॅन्क, समज, आम्हीं सरळ सरळच आमच्या अधिकारांत तुझी निवड उमेदवार म्हणून ठरवून टाकली, तर तूं आम्हांला धोका देणार आहेस काय ?"

रूझवेल्ट यांच्या तोंडून आतां धड शब्द देखील फुटत नव्हता. ते कसंबसं इतकंच म्हणाले, "मला—मला कांहींच समजत नाहीं. मला कांहींच सांगतां येत नाहीं."

रूझवेल्ट यांनीं फोन मिस ल-हॅण्डकडे दिला पण तो देतांना त्यांना तिच्याकडं पाहणंहि अशक्य झालं होतं. कारण त्यांचं त्यांनाच आतां उमजून चुकलं होतं कीं गव्हर्नरपदाच्या निवडणुकीसाठीं आपण उभं राहणं हें आतां अपरिहार्य झालेलं आहे. त्यांतल्या त्यांत सांत्वनाची बाब इतकीच होती की मिस्टर लेहमन यांच्यासारखा अतिशय वाकबगार धंदेवाईक इसम त्यांच्या बरोबरीनं गव्हर्नरपदाच्या कामांत असणार होता.

रॉचेस्टरला मेळाव्यांत रूझवेल्ट यांच्या नांवाच्या घोषणांचा जल्लोष चालू असतांना वॉर्म स्प्रिंग्ज इथं मात्र वातावरण उदास होतं. कुणाच्याहि मुद्रेवर

निसटतं स्मित सुद्धां उमटूं शकत नव्हतं. गव्हर्नरपदाच्या ह्या उमेदवारीच्या निमित्तानं रूझवेल्ट हे केवळ आपल्या उतरत्या प्रकृतीचा बळी देत नव्हते तर जीवनांत त्यांचं सारं भवितव्य उभं ठाकलं होतं. त्या वॉर्म स्प्रिंग्जच्या योजनेचा देखील एकप्रकारें यांत बळी पडण्यासारखा होणार होता.

जनरल मोटेर्स या मोठ्या कंपनीचे एक वरिष्ठ मिस्टर जॉन जे. रास्कॉब, यांनीं याबद्दल रूझवेल्ट यांना लिहिलेल्या पत्रांत म्हटलं होतं, "पक्षहितासाठीं एवढा मोठा त्याग करणारा दुसरा मनुष्य मला तरी ठाऊक नाहीं."

मिस्टर रास्कॉब हे आल स्मिथ यांच्या प्रचार–मोहिमेचे व्यवस्थापक होते.

वॉर्म स्प्रिंग्ज इथं पसरलेलं औदासिन्य 'एफ. डी. आर.' यांनीं किंचित् काळच टिकूं दिलं. मग पाहतां पाहतां त्यांचा उत्साह नव्यानं उसळला, आणि त्यांचा ठेवणींतला ढाल्या आवाज पोहण्याच्या साऱ्या तलावावरून गर्जूं लागला, "अहो, मला गव्हर्नरपदासाठीं उभं रहावं लागणार असलं तरी त्यासाठीं आपण सगळ्यांनींच इतकं हवालदिल होण्याचं कांहींच कारण नाहीं." बघतां बघतां वातावरण हास्यविनोदानं भरून गेलं.

ऑक्टोबरच्या आरंभीं 'एफ. डी. आर.' आपल्या प्रचाराच्या आरंभासाठीं न्यूयॉर्कला परतले. त्यांच्या प्रचाराचं केंद्र असणार होतं न्यूयॉर्क शहरांतलं बाल्टिमोर होटेल. या वेळीं आपल्यासाठीं काम करण्याकरितां म्हणून त्यांनीं नियुक्त केलेलीं कांहीं माणसं पुढं आयुष्यभर त्यांच्याशीं एकनिष्ठ राहिलीं. सेक्रेटरी म्हणून मिस ग्रेस टली हिला त्यांनीं नियुक्त केलं होतं. कारण मिस ल हॅण्ड हिची तब्येत बरी नव्हती आणि तिला वॉर्म स्प्रिंग्ज इथं राहणं भाग होतं. त्यांच्या निवडणुक परिवारांतली दुसरी महत्त्वाची असामी म्हणजे त्यांचं भाषण तयार करण्याच्या कामीं त्यांना अतिशय मदत करणारे वकील सॅम्युअल आय. रोझेनमन. त्यानंतर लौकरच हेन्री मॉर्गेनथाऊ ज्युनियर हेहि रूझवेल्ट यांच्या या परिवारांत येऊन दाखल झाले, आणि हे मॉर्गेनथाऊ झालंच तर रोझेनमन आणि लुई हौ या तीन मुलुखमैदानी तोफा या वेळीं यांच्या प्रचार आघाडीवर समर्थपणें गर्जूं लागल्या.

विरूद्ध पक्षातर्फे अशा वदंता बुद्धयाच पसरविण्यांत येत होत्या कीं, 'एफ. डी. आर.' हे पुष्कळसे लुळेपांगळे झालेले आहेत त्यामुळं त्यांच्या प्रचार-मोहिमेंत ते फारसा भाग घेऊं शकणार नाहींत. परंतु त्यांचं हें म्हणणं

प्रत्यक्षांत खोटं पडलं. साऱ्या राज्यभर आपल्या नेहमींच्या चिकाटीनं रूझवेल्ट प्रचारार्थ हिंडूं लागले. एकीकडे आल स्मित यांच्या प्रचारासाठीं एलिनॉरनं आपलं सारं सामर्थ्य पणाला लावलेलं होतं.

१९२८ च्या नोव्हेंबरांतील ती निवडणूक एकटं न्यूयॉर्क राज्य सोडलं तर डेमॉक्रॅटिक पक्षाला भयंकर महाग पडली. राष्ट्राध्यक्षपदीं रिपब्लिकन उमेदवार हर्बर्ट हूवर एकूण ४४ राज्यांपैकीं ४० राज्यांचा पाठिंबा मिळून दणदणीतपणें निवडून आले. डेमॉक्रॅटिक पक्षाचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या दक्षिणेंतल्या विशिष्ट भागांतूनदेखील रिपब्लिकनांची सरशी झाली आणि कांहीं भागांतला कॅथॉलिकविरोधी पूर्वग्रहदेखील रिपब्लिकनांच्या फायद्याचाच ठरला.

न्यूयॉर्कमध्यें निवडणूक विलक्षण चुरशीची झाली. इतकी चुरशीची की, निकालाच्या दिवशीं सकाळपर्यंत 'एफ्. डी आर.' यांना आपल्या विजया-बद्दल बिल्कूल खात्री नव्हती. ते अतिशय थकलेले होते परंतु समाधानांत होते. तब्बल सात वर्षांच्या निवृत्तीनंतर ते राजकारणाच्या क्षेत्रांत उतरले होते. आतां वय शेहेचाळीस वर्षांचं होतं; म्हणजे आयुष्यांतला कर्तृत्वाचा चढ नुक्तांच कुठं सुरूं झाला होता. अद्याप पुष्कळ आयुष्य बाकी होतं. मुबलक उमेद होती, आणि ही उमेद कायम ठेवणारी श्रद्धा अप्रतिहतपणें काळजांत धगधगत होती.

निवडणूक संपली. रूझवेल्ट वॉर्म स्प्रिंग्ज इथं परतले. तिथून ख्रिसमसच्या सुटीसाठीं सगळ्या परिवारानं एकत्र यावं या प्रथाताला अनुसरून ते हाईड-पार्कच्या बिऱ्हाडीं गेले. एकदां चार छोटीं छोटीं पोरं होतीं त्यांच्या आतां चार उंच्यापुऱ्या, तारुण्यानं मुसमुसणाऱ्या व्यक्ति झालेल्या होत्या. सारे केंस पिकलेल्या रूझवेल्ट यांच्या मातुश्री अभिमानानं निथळणाऱ्या मुद्रेनं घरांतून वावरत होत्या. आतां रूझवेल्ट यांच्या राजकीय कर्तृत्वाला विरोध करणं त्यांनीं खुषीनं सोडून दिलेलं होतं. रूझवेल्ट यांच्या पत्नी एकाच वेळीं हंसत, बडबडत घरभर हिंडत होत्या. घर कसं भरून गेलं होतं.

परंतु १९२९ च्या नव्या वर्षाचा दिवस एका नव्याच प्रकारें साजरा करण्यांत आला. न्यूयॉर्क राज्याच्या गव्हर्नरपदाचीं सूत्रं या दिवशीं रूझवेल्ट हातीं घेणार होते. रूझवेल्ट घराण्यांतलं जुनं बायबल–१६८६ मध्यें छापलेली

ही डच आवृत्ति-हाईडपार्कहून आल्बनीला आणण्यांत आलं आणि तें हातीं घेऊन रूझवेल्ट यांनीं गव्हर्नरपदाची शपथ घेतली.

गव्हर्नरपदाच्या कामांत सर्वस्व एकवटून रूझवेल्ट उतरले. काम करण्याची ही एकमेव पद्धति त्यांना अवगत होती. मुळांत मिस्टर लेहमन यांनीं दुय्यम गव्हर्नर या नात्यानं कामाचा मोठा भार उचलावा ही शर्त त्यांचं तेच आतां पार विसरून गेले होते. ते स्वत: भराभर काम करीत होते आणि राज्यांत मोठमोठ्या अधिकारांवर त्यांनीं नियुक्त केलेलीं माणसं हें जाणून होतीं की, आपल्यालाहि तेंच करायला हवं.

रूझवेल्ट यांनीं या अधिकारपदासाठीं नेमकीं माणसं हुडकून काढलीं आणि चपखलपणें त्यांची योजना केली, याविषयीं त्यांच्या विरोधकांनादेखील प्रशंसेचे दिलखुलास उद्‌गार काढणं भाग पडलं. उदाहरणार्थ, मिस फ्रॅन्सिस पर्कीन्स या बाई. या बाई सामाजिक कार्यकर्त्या म्हणून सुपरिचित होत्या. राज्याच्या मजूर खात्यांत त्या काम करीत होत्या. रूझल्वेट यांनीं त्यांना इंडस्ट्रियल बोर्डाच्या अध्यक्ष म्हणून नियुक्त केलं. हेन्री मॉर्गेथाऊ ज्युनियर यांना त्यांनीं अॅग्रि-कल्चरल अॅडव्हायजरी कमिशनचा अध्यक्ष म्हणून नेमलं. सॅम्युअल रोझेनमन यांना आपलं सल्लागार म्हणून नियुक्त करून घेतलं.

पुढं चार वर्षं 'एफ. डी. आर.' अमेरिकेंतल्या त्या प्रमुख राज्याचे गव्हर्नर होते. गव्हर्नरपदाच्या दोन खेपांत मिळून त्यांनीं सर्व देशभर दौरा केला, अनेक प्रश्नांमध्यें जातीनं लक्ष घालून चौकशा केल्या, शेतकी तज्ज्ञांशीं त्यांनीं वाटाघाटी केल्या, जागोजागच्या स्थानिक स्वराज्यसंस्थांच्या पदाधिकाऱ्यांशीं संबंध राखले. कामगारविषयक आणि व्यापारविषयक प्रश्नांत अगत्यानं लक्ष घातलं. सेंट लॉरेन्स सी–वे या योजनेचा त्यांनीं सक्रिय पुरस्कार केला.

या साऱ्या व्यापांत त्यांना सोबत करणारा आणि आधार देणारा होता युएर्नसे क्रॉस हा. या बाबतींत सर्व वेळ आपल्या मुलांपैकीं कोणीतरी आपल्या बरोबर रहावं अशी अपेक्षा ते करूं शकत नव्हते. कारण त्यांचीं शिक्षणं पूर्ण व्हायला हवीं होतीं आणि त्यांचीं आयुष्यं स्वतंत्रपणें आपआपल्या पद्धतीनं विकसित व्हायला हवीं होतीं. अशीच 'एफ. डी. आर.' यांची इच्छा होती.

गव्हर्नरपदाच्या कारकीर्दींत न्यूयॉर्क राज्याचा विचार देशाच्या विचारा-पासून अलगपणें किंवा स्वतंत्रपणें त्यांना कधींहि करतां आला नाहीं.

१२६२ ... नों: दि: ...



न्यूयॉर्क राज्यांतले शेतकरी आणि पश्चिमेंतले किंवा दक्षिणेंतले शेतकरी यांचे प्रश्न कित्येकदां सारखेच असत. तीच गोष्ट कारखान्यांतल्या कामगारांची आणि इतर धंद्यांतल्या मजुरांची. देशांत इतरत्र या बाबतींत काय काय घडतं आहे, काय काय केलं जात आहे, याच्याशीं रूझवेल्ट यांनीं सातत्यानं संबंध राखले होते आणि आतां तर ते राखणं अतिशय महत्त्वाचं होतं. गव्हर्नरपदीं असतांना त्यांनीं ज्यांच्या ज्यांच्याशीं निमित्तां निमित्तानं पत्रव्यवहार केला, त्या साऱ्याच नांमवंतांचीं नांवं इथं देणं शक्य नाहीं, परंतु यांत अमेरिकेंतले आणि बाहेरदेशचे टेनेसीचे कॉर्डेल हल, व्हर्जिनियाचे रिचर्ड आणि हॅरी बर्ड, हार्वर्डचे प्रोफेसर फ्रॅन्कफुर्टर, टोकिओचे उप आरमार प्रमुख नोमुरा, कॅनडाचे पंतप्रधान विल्यम लिऑन मॅकेन्झी-किंग इत्यादि असामी होत्या.

या साऱ्या माणसांनीं ज्ञान आणि बुद्धि यांची मुक्त देवाण-घेवाण 'एफ. डी. आर.' यांच्याशीं केली, कारण दिलदारपणांत रूझवेल्ट हे नेहमींच सर्वांपुढं असत. अलबनीहून सॅनफ्रॅन्सिस्कोमधल्या एका स्नेह्याला लिहिलेल्या पत्रांत त्यांनीं म्हटलं होतं, "कुटुंबांत नेहमींच्या अडीअडचणी चालू आहेत. जेम्स न्युमोनियांतून नुकतांच कुठं उठत आहे, एलियटचं ऑपरेशन व्हायचं आहे, फ्रँकलिन ज्युनियर याचीं हाताचीं बोटं नुकतींच दोन ठिकाणीं मोडलीं आहेत, आणि जॉनच्या गुडघ्यावर नुकतंच एक ऑपरेशन झालं आहे. ॲन आणि तिचा नवरा कर्टिस डॉल यूरोपच्या प्रवासाला गेले आहेत आणि त्यांचं पोर त्यांनीं आमच्याकडं ठेवलं आहे. एलिनॉर आठवड्यांतून अडीच दिवस न्यूयॉर्कच्या एका शाळेंत शिकविण्यासाठीं जाते आणि मी, इकडं विविध-मंडळांतल्या रिपब्लिकन म्होरक्यांच्या बरोबर जबरदस्त लढाई देण्यांत दिवस-रात्र गुंतून पडलों आहें. यावरून तुम्हांला कल्पना येईल कीं इथं आमचं आयुष्य एकूण गडबडीचं आहे."

पत्रव्यवहार करणाऱ्या माणसांच्या पत्रांतून रूझवेल्ट यांना एक गोष्ट कळून चुकली होती कीं, १९२९ चा तो काळ एकूण फारसा सुखाचा नव्हता. सबंध न्यू-इंग्लंडच्या भागांत आर्थिक घडी विस्कटूं लागली होती. दक्षिणेंत कापसाच्या मालावर स्थानिक स्वरूपाची एक मंदी आलेली होती; पश्चिमेच्या बाजूला आणखी कांहीं वेगळेच प्रश्न निर्माण झाले होते; दारूबंदीचा परिणाम म्हणून मोठमोठ्या शहरांतून दारूचा चोरटा व्यापार आणि गुन्हेगारी मोठ्या

प्रमाणावर वाढलेली होती. खुद्द न्यूयॉर्क राज्यांत वेकारी वाढत आहे असं मिस पर्किन्स यांच्या अहवालांतून वारंवार दिसत होतं. हा प्रश्न रूझवेल्ट यांच्या दृष्टीनं फारच चिंतास्पद होता आणि अखेर १९२९ च्या ऑक्टोबर-मध्यें वायदे बाजारांत मंदीचा आघात होतांच लोकांना कळून चुकलं कीं, सुबत्ता होती ती केवळ आर्थिक सूज होती आणि १९३० च्या अखेरीं नव्यानं निवडून येण्यासाठीं 'एफ. डी. आर.' निवडणुकीला उभे राहिले तेव्हां मंदीची लाट ऐन जोरांत होती. दिवसेंदिवस बेकारीचं आणि नाउमेदीचं प्रमाण सर्वभर वाढत होतं. देशाचा कोणताहि भाग याला अपवाद नव्हता.

निवडणुकीच्या दिवसापूर्वी कित्येक महिने रूझवेल्ट यांनीं या बेकारीच्या प्रश्नाला आपल्या राज्यापुरतं धैर्यानं तोंड दिलं होतं आणि त्याबाबत विधायक स्वरूपाचं असं कांहीं केलंहि होतं. रिपब्लिकनांचा वरचष्मा असलेल्या राज्य-मंडळांत विरोधी पक्षाशीं त्यांनीं दिलेल्या अटीतटीच्या लढतींत बेकारीच्या काळांतल्या विम्याची योजना हीहि एक महत्वाची बाब त्यांनीं हातीं घेतली होती. परंतु या लढतींत त्यांना कळून चुकलं होतं कीं, हा प्रश्न ताबडतोबीनं सुटण्यासारखा नव्हता. वेकारीच्या काळांतली विम्याची ही कल्पना नवी होती, इतकंच नव्हे तर तिचा पुरस्कार करणारे ते पहिलेच गव्हर्नर होते. राज्यांत "टेंपररी मर्सी रिलीफ ॲडमिनिस्ट्रेशन" या नांवाची यंत्रणा निर्माण करण्याचं बिल त्यांनीं यशस्वीपणें मंजूर करून घेतलं. या प्रकारचं बिल प्रथमच मंजूर होत होतं. या योजनेचा आराखडा आर. एच. मेजी ॲंड कंपनी या कंपनीचे वरिष्ठ जेम्स स्ट्रॉस यांनीं तयार केलेला होता आणि हॅरी हॉपकिन्स या तरुण सामाजिक कार्यकर्त्यानं तिचं नेतृत्व केलं.

अशा प्रकारें हॅरी हॉपकिन्स हे 'एफ. डी. आर.' यांच्या जीवनांत प्रथम आले, आणि लुई हौ यांच्याप्रमाणंच पुढं रूझवेल्ट यांच्या अखेरीपर्यंत त्यांच्याशीं एकनिष्ठ राहिले. रूझवेल्ट यांच्या १९२४ च्या निवडणुक-मोहिमेंत हॉपकिन्स यांनीं काम केलं होतं. परंतु या नव्या यंत्रणेचे प्रमुख म्हणून नियुक्त होईपर्यंत रूझवेल्ट आणि त्यांची प्रत्यक्ष अशी पहेचान नव्हती. हॉप-किन्स यांचा जन्म ऑयोवा राज्यांत झालेला होता आणि रूझवेल्ट यांच्यापेक्षां ते सुमारें आठ वर्षांनीं लहान होते. कॉलेज-शिक्षण पुरं केलं तेव्हापासून या ना त्या समाजहिताच्या कार्याशीं त्यांचा संबंध येत गेला होता. आणि १९३०

पर्यंत म्हणजे या नव्या सरकारी यंत्रणेचा प्रमुख म्हणून त्यांची नियुक्ती झाली तोंपर्यंत, देशांतलं दारिद्र्य, गलिच्छ वस्त्या, आणि बेकारी यांच्याशीं हॉपकिन्स यांचा अंतर्बाह्य परिचय झालेला होता. सरकारी मदतीची गरज या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठीं नेमकी केव्हां आणि कुठं आहे, आणि ही मदत कशा प्रकारें केली जाणं आवश्यक आहे, याची कल्पना त्यांना होती. एवढंच नव्हे तर इतर राज्यांनीं देखील आपल्या भागांत बेकारींतून स्वतःची सोडवणून करून घेण्यासाठीं या योजनेचं अनुकरण केलं होतं.

१९३० च्या निवडणुकींत गव्हर्नरपदीं रूझवेल्ट यांची पुनश्च मोठ्या बहुमतानं निवड झाली. याचं एक कारण, त्यांचं या पूर्वीचं कर्तृत्व हें होतं; आणि दुसरं कारण देशांतील लोकमताचा कल आतां पालटत होता हें होतं. आलेल्या मंदीबद्दल अधिकारारूढ पक्षावर ठपका ठेवण्यांत येत होता. वास्तविक आर्थिक मंदी, हें तर पुरातन प्रकरण होतं. इतिहासांत अनेकदां ती येऊन गेली होती आणि केवळ अमेरिकेंतच ती येत होती असं नव्हे तर जगांतल्या इतर देशांतूनहि ती येईच. पुढल्या उन्हाळ्यांत देशांतल्या सर्व राज्यांच्या गव्हर्नरांच्या बैठकीला ‘ एफ. डी. आर. ’ इंडियाना इथं उपस्थित राहिले. तेव्हां १९३२ च्या राष्ट्राध्यक्षपदाच्या उमेदवारीसाठीं त्यांची निवड होण्याची शक्यता अतिशय दाट होती. न्यूयॉर्क राज्यांतल्या मतदारांविषयीं विश्वास दर्शवून या मतदारांचा विश्वास त्यांनीं जिंकला होता. राज्यांतल्या प्रश्नांविषयीं नभोवाणी-वरून इतक्या मोकळेपणानं आणि इतकी वारंवार त्यांच्याशीं चर्चा यापूर्वी एकाहि गव्हर्नरांनीं केलेली नव्हती. निरुपयोगी जुनाट दंडक आणि प्रघात मोडून टाकून राज्यांत सरकारी पातळीवर काय काय चाललं आहे याची माहिती प्रथम तेच जनतेला देऊं लागले. तुरुंगविषयक सुधारणांच्या आपल्या बिलाची माहिती त्यांनीं जनतेला दिली. तुरुंगांतील खेंचाखेंच आणि तिथं मिळणारं भिकार अन्न यांविरुद्ध सुधारणा सुचविणारं त्यांचं हें बिल असणार होतं. विधिमंडळानं हें बिल मंजूर केलं. वृद्धपणींच्या निवृत्तिवेतनाविषयींच्या आपल्या कल्पना; कामगारांना अधिक उजळ्या परिस्थितींत कारखान्यांतून काम करतां यावं याविषयींच्या आपल्या योजना; नव्या रुग्णालयांच्या उभारणीच्या आपल्या योजना, या साऱ्यांविषयीं लोकांना त्यांनीं प्रत्यही माहिती दिली ही विल्सन यांची परंपरा !

कांहीं कांहीं प्रश्नांवर बेधडक बोलून टाकण्याच्या यांच्या वृत्तीनं कांहीं वेळीं पक्षांतल्या नेत्यांत असंतोष माजे. देशांतली दारूबंदी हें याचं उत्तम उदाहरण होतं. हा प्रश्न असा नाजुक होता कीं यावर बाजू घेणं दोन्हीहि पक्ष टाळत होते. अधिकारारूढ पक्षांतदेखील या प्रश्नाबद्दल तीव्र मतभेद होते. 'एफ डी. आर.' दारूबंदीच्या विरुद्ध ठामपणें होते, कारण या दारूबंदीमुळंच दारूचा चोरटा व्यापार आणि पर्यायानं गुन्हेगारी फोफावत होती. गुन्हेगारांच्या हातांत संपत्ति आणि सत्ता जात होती. दारूबंदीचा कायदा रद्द झाला पाहिजे अशी निःसंदिग्ध भूमिका गव्हर्नर रूझवेल्ट यांनीं घेतली होती.

परंतु प्रत्यक्षांत जेव्हां डेमॉक्रॅटिक पक्षांत राष्ट्राध्यक्षपदाच्या उमेदवारीचा सवाल उपस्थित झाला तेव्हां अत्यंत चमत्कारिक परिस्थिति निर्माण झाली. आपल्याला आतां उभं करण्यांत यावं अशी आल् स्मिथ यांची इच्छा होती.

वास्तविक रूझवेल्ट आणि स्मिथ हे स्नेही. परंतु रूझवेल्ट यांच्या गव्हर्नर-पदाच्या कारकीर्दींत या दोघांतल्या मैत्रीला उत्तरोत्तर उतार पडत गेला होता. यांचं एक कारण भूतपूर्व गव्हर्नर आल स्मिथ यांना आपल्या अडीअडचणींविषयीं सल्ला विचारणं रूझवेल्ट यांनीं टाकलं होतं; आणि दुसरं कारण—नभोवाणी-वरील भाषणांतून स्मिथ यांच्या मानानं रूझवेल्ट यांचा प्रभाव उत्तरोतर अधिक पडत होता. लौकरच असं दृश्य दिसूं लागलं कीं, देशांतल्या ठिकठिकाणच्या प्रथमिक निवडणुकींच्या चांचण्यांतून आल् स्मिथ विरुद्ध फ्रॅंकलिन रूझवेल्ट असा सामना रंगत होता. १९३२ च्या २७ जूनला शिकागोमध्यें देशाचा राष्ट्रीय मेळावा भरला, तेव्हां या दोघांत अत्यंत अटीतटीची चुरस लागलेली होती.

याच शहरांत पंधरवड्यामागं रिपब्लिकन पक्षाचा राष्ट्रीय मेळावा, फारसे पेचप्रसंग किंवा संघर्ष न उद्‌भवतां, सुरळीतपणें पार पडला होता. हर्बर्ट हूवर यांची निवड राष्ट्राध्यक्षपदाच्या उमेदवार पदासाठीं पुन्हां एकदां झाली होती. हें अपेक्षितच होतं. हें घडतांना अगर घडल्यानंतर याविषयीं कोणत्याहि प्रकारचा वादंग किंवा गाजावाजा झालेला नव्हता. परंतु आतां मात्र...

आल्बनीच्या एक्झिक्युटीव्ह मॅन्शनमधल्या दिवाणखान्यांत रूझवेल्ट परिवार जमला होता. सोबत पक्षाचे कार्यकर्ते, सेक्रेटरीज, आणि स्नेही मंडळी होती. जॉन आणि एलियट घरीं आलेले होते. मिस, टॉमी, ग्रेसटली, मिसेस

रोझेनमान हेहि तिथं होते. 'एफ. डी. आर.' यांच्या एका बाजूला रेडिओ होता आणि दुसऱ्या बाजूला शिकागोशीं जोडलेलं थेटपर्यंतचं टेलिफोन कनेक्शन होतं. लुई हौ आणि जिम फार्ले प्रत्यक्ष मेळाव्यांतच हजर होते. त्यांच्या बरोबर जेम्स, फ्रँकलिन ज्युनिअर, आणि ॲना हीं तिघं होतीं. आलबनीमध्यें जमलेल्या मंडळींमध्यें वातावरण तंग होतं. प्रतीक्षा करकरून उत्सुकता शिगेला पोहोंचलेली होती. तिकडं मेळावा ऐन भरांत होता. कायम स्वरूपाच्या अध्यक्षांची निवड झाली होती आणि उमेदवारांच्या वतीनं भाषणं चालू झालेलीं होतीं. त्या काळांत उत्कृष्ट रेडिओंतून देखील कर्णकटु यांत्रिक आवाज सतत येत. त्यांनीं एकूण ताणांत भरच पडत होती.

सबंध दिवसभर उमेदवारांचीं नांवं सुचवणं आणि त्या नांवांना दुजोरा देण्यासाठीं भाषणं करणं असा कार्यक्रम मेळाव्यांत चालू होता. रात्रीपर्यंत तोच चालू राहिला. न्यूयॉर्कमध्यें उजाडलं. शिकागोमध्यें पहांटेचे साडेचार वाजले होते आणि मेळाव्यांत नांवं पहिल्या मतदानाला टाकण्यांत आलीं. मतं पडलीं 'एफ. डी. आर.' यांना ६६६·।·, व स्मिथ यांना २०१·।।।·. स्मिथ यांच्या मानानं 'एफ. डी. आर.' निश्चितपणें पुढं होते पण गरज होती दोन-तृतीयांश बहुमताची. धूम्रपान करण्याच्या लांब नळीमध्यें सिगरेटस्मागून सिगरेट अडकवीत आणि जाळत रूझवेल्ट आपल्या निवासस्थानीं हें सारं ऐकत बसून होते. ही नळी लुई हौ यांनीं त्यांना मुद्दाम दिलेली. रूझवेल्ट यांना जास्तींत जास्त मतं कशीं मिळतील एवढ्या एकाच दृष्टीनं आतां मेळाव्यांत फार्ले आणि हौ यांची शिकस्त चाललेली होती.

तिसऱ्या मतदानापर्यंत 'एफ. डी. आर.' यांची मतसंख्या ६८३ पर्यंत गेली आणि स्मिथ १९०·।·पर्यंत उतरले. छान, फारच! छान परंतु हेंहि अपुरंच होतं. अद्याप टेक्सासचे प्रतिनिधि जॉन नान्स गार्नर या तिसऱ्या उमेदवाराच्या वतीनं मतं टाकीत होते. आणि टेक्सासचीं मतं नाहीं म्हटलीं तरी बरींच होतीं. 'एफ. डी. आर.' मनाशीं घोकत होते कीं, 'टेक्सासचीं मतं फार्ले फिरवून आपल्या बाजूला आणूं शकला तर...

एव्हांना मेळाव्यांतील वातावरण गोंधळाचं आणि सीमेचं कर्णकटु होऊन गेलं होतं. कारण कोणीहि आपला आग्रह सोडायला तयार नव्हता, आणि तरीहि मतदारांच्या नजरेंत पक्षाचं वजन उतरवेल असा कोणताहि पेचप्रसंग

निर्माण केला जातां कामां नये असा सर्वांचाच आग्रह दिसत होता. तिकडं शिकागो आणि टेक्सासच्या प्रतिनिधींच्या गुप्त बैठका आणि खलबतं चालली असतांना, एलिनॉर रूझवेल्ट अलबनींतल्या आपल्या स्वयंपाकघरांत गेल्या आणि त्यांनीं गरमागरम उकळलेली कॉफी बाहेर बसलेल्या मंडळींसाठीं तयार केली. टेक्सासचे प्रतिनिधि खलबतं संपवून परतले, त्यांच्या प्रवक्त्यानं मेळाव्यापुढं भाषण केलं आणि जाहीर झालं कीं, टेक्सासनं रूझवेल्ट यांच्या बाजूनं आपला कौल दिला होता.

जयघोषानं आणि गोंधळानं आल्बनीच्या त्या एक्झिक्युटीव्ह मॅन्शनमधला रेडिओ अक्षरशः फुटायला आला. ऐकणारे सारे थकले होते, कंटाळून गेले होते, परंतु पाहतां पाहतां सारा थकवा, कंटाळा ते विसरले होते आणि ताठ बसून, कान टवकारून धडधडत्या आणि उचंबळत्या काळजांनीं रेडिओ-वरचा वृत्तांत ऐकत होते. 'एफ. डी. आर.' यांच्या मुद्रेवर हास्य पसरलं होतं. त्यांचीं मोठालीं बोटं खुर्चीच्या चाकांत रुतलीं होतीं.

कॅलिफोर्नियाचे विल्यम गिब्स मॅकॅडू यांनीं मेळाव्यापुढं भाषण कारण्याची परवानगी मागितली. उत्सुकतेनं शीग गांठली. याचा अर्थ काय होता? मॅकॅडू हे कांहीं स्मिथ यांचे पुरस्कर्ते नव्हते. स्मिथ आणि खुद्द ते यांच्यांत निर्माण झालेल्या पेचप्रसंगामुळं राष्ट्राध्यक्षपदासाठीं त्यांनीं बाळगलेली आकांक्षा त्यांना सोडून द्यावी लागली होती.

मॅकॅडू यांनीं भाषणाला आरंभ केला. मेळाव्याच्या मोठ्या सभागृहांत त्यांचा आवाज घुमूं लागला, "कॅलिफोनर्नियाचे प्रतिनिधी इथं आले ते अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष निवडण्यासाठीं. मेळाव्यांत पेंचप्रसंग निर्माण करावा, अथवा १९२४ प्रमाणें आणखी एक गळेकापूं स्पर्धा निर्माण करावी असा हेतु त्यांनीं इथं येतांना बाळगला नव्हता. म्हणून कॅलिफोर्निया आपलीं ४४ मतं फ्रँकलिन डी. रूझवेल्ट यांच्या बाजूनं टाकीत आहे."

मॅकॅडू यांनीं एकंदरीनं स्मिथ यांच्यावर जुना सूड घेण्याचा क्षण पकडला होता.

या घोषणेसरशीं सभागृहांत जणुं एखादा स्फोट व्हावा तसा गोंधळ माजला. कोंडी फुटली होती.

एक मोठा विजयोद्गार काढून 'एफ. डी. आर.' यांनीं आपल्या खुर्चीचीं

चाकं पिळलीं आणि खुर्चीसकट ते साऱ्या खोलीभर धांवत सुटले. एकसारखे ते ओरडत होते. " गुड ओल्ड मॅकडू ! गुड मॅकडू ! ! "

त्यांच्या मुलांनीं जयघोष केला, कागदांचे तुकडे हवेंत उडवले, मिसेस ' एफ. डी. आर. ' त्यांच्याकडं धांवल्या आणि त्यांनीं त्यांचं चुंबन घेतलं. बाहेर रस्त्यावर मोटारींचे कर्णे जोरजोरानं वाजूं लागले. मित्र, शेजारीपाजारी, वृत्तपत्रांचे वार्ताहर घोळक्या घोळक्यानं घरांत घुसूं लागले. फोटो निघूं लागले, फ्लॅश बल्ब्जचे चकचकाट झडूं लागले.

' एफ. डी. आर. ' यांनीं सॅम्युअल रोजेनमन यांना विचारलं, " उमेदवारी पत्करल्याचं माझं भाषण तुम्हीं पुरं केलं आहे काय ? "

" येस मिस्टर रूझवेल्ट, " रोझेनमन उत्तरले.

" तर मग आतां सारी तयारी झाली. "

पूर्वपरंपरा मोडून ते आपला प्रचाराचा नारळ लागलीच फोडणार होते. उमेदवारी पत्करण्याच्या औपचारिक मेजवानीचा सोहळा घडण्याची वाट न पहातां तत्काळ ते आतां विमानांत चढणार होते आणि मेळावा चालू असतांनाच तिथं पोंचून उमेदवारी पत्करल्याचं जाहीर करणार होते.

त्यांच्याबरोबर एलिनॉर रूझवेल्ट आणि जॉन निघाले. त्या काळचा विमान-प्रवास अतिशय त्रासाचा असे. या प्रवासानं जॉन जर्जर झाला, परंतु ' एफ. डी. आर. ' मात्र थेटपर्यंत आपल्या भाषणावर अखेरचे संस्कार करीत होते. विमानतळावर आनंदभरानं बेहोष झालेले लुई हौ आणि त्यांच्याबरोबर जेम्स, फ्रँकलिन ज्युनियर आणि ॲना हीं त्यांना भेटलीं. मेळाव्याच्या जागीं पोंचेंपर्यंत हौ आणि ' एफ. डी. आर. ' यांच्यांत ' एफ. डी. आर. ' यांनीं करण्याच्या भाषणाबाबत हलक्या आवाजांत लढाई चालू होती. एकीकडं ही लढाई चालू असतांनाच दुतर्फा घोषणा करणाऱ्या जमावाला उद्देशून मोटारीच्या खिडकीवाटें दोघं स्मितपूर्वक अभिवादन करीत होते. अखेर 'एफ. डी. आर.' यांनीं गुरगुरत सांगून टाकलं कीं, " लुई, उमेदवार मी आहें ! " आणि त्यानंतर रूझवेल्ट यांच्या त्या भाषणाचा विषयच लुई हौनीं सोडून दिला.

मेळाव्याचं सभागृह ठरीव गोंधळानं, धुरानं आणि घामट दर्पानं भरून गेलं होतं. प्रतिनिधी सारे थकले होते; गळ्याचे ' टाईज ' लांब होऊन ढिले झाले होते; झोंपेअभावीं नजरा तारवटलेल्या होत्या; सारे रूझवेल्ट यांचीच

प्रतीक्षा करीत होते. अकस्मात जेव्हां सर्वांना कळलं कीं, समोर व्यासपीठावर रूझवेल्ट उभे आहेत. त्यांच्या कुबड्या गेल्या आहेत, त्यांच्या हातीं फक्त एक वेताची छडी आहे, त्यांचा दुसरा हात जेम्सच्या उजव्या हातांत गुंफलेला आहे, त्या क्षणीं जणुं विजेचा धक्का मिळावा तसं सारं वातावरण तडकाफडकीं भारून गेलं. चैतन्यानं रसरसलं. वक्त्याच्या जागेवर जाऊन उभं राहतांच रूझवेल्ट यांच्या काळजाचा ठाव सुटायला आला आणि आपल्या मोहक, आकर्षक आवाजांत त्यांनीं भाषणाला सुरुवात केली.

"सहा दिवसांच्या ओढघस्तीनंतर, जागवलेल्या रात्री आणि गाजवलेले दिवस यांच्यानंतर, आपण माझ्या वतीनं कौल दिलात याविषयीं मी आपल्याला धन्यवाद देतों.... ...अशा प्रकारें एका राष्ट्रीय मेळाव्यासमोर, त्या मेळाव्यानं नुकत्याच निवडलेल्या राष्ट्राध्यक्षपदाच्या उमेदवारानं, औपचारिक संदेशाची वाटहि न पाहतां येऊन उभं राहणं आणि बोलणं हें पूर्वपरंपरेला धरून नाहीं.... "

समोर पसरलेल्या प्रतिनिधींच्या चेहऱ्यांचा समुद्र एकीकडं न्याहाळीत रूझवेल्ट एक एक शब्द उच्चारीत होते. भरतीच्या लाटा एकामागून एक याव्यात तशा स्फूर्तीच्या लाटा समोरच्या मुद्रांवर एकीमागून एक उसळत होत्या.

"सध्यां आपल्यासमोर असलेल्या कोणत्याहि प्रश्नावर माझी भूमिका काय तें सांगतांना मी कोणताहि विकल्प आपल्या मनांत राहूं देणार नाहीं. आणि अत्यंत स्वच्छ आणि निःसंदिग्ध भाषेंत माझी भूमिका मांडीन अशी माझी प्रतिज्ञा आहे."

सर्वांत मोठा प्रश्न होता, तो देशांतल्या भयावह मंदीचा आणि कोट्यावधि बेकारांचा. उपासतापासांनीं जेरीस आलेले, रोजगारांअभावीं आयुष्याची वाताहत होऊं घातलेले हे कोट्यवधि लोक अमेरिकेच्या प्रस्थापित लोकशाहीवरचा विश्वास उडून प्रत्यहीं वेगवेगळ्या अन्य पुरोगामी पंथांचे पुरस्कर्ते बनूं लागले होते. रूझवेल्ट यांनीं आपण याबाबत कोणकोणत्या उपाययोजना करणार आहांत याची रूपरेखा अतिशय काळजीपूर्वक मेळाव्यापुढं मांडली. या मंदीचा सर्वांत मोठा बळी होता अमेरिकेचा शेतकरी. रूझवेल्ट यांनीं सांगितलं, "या देशांतल्या लोकसंख्येंतली निम्मी लोकसंख्या म्हणजे जवळ जवळ पांच कोटि लोक शेतीवर अवलंबून असलेले आहेत, आणि मित्रहो, या पांच कोटि

लोकांच्याकडं पैसा नसला, मोठ्या शहरांतून जें जें उत्पादन होतं तें विकत घेण्याची ताकद नसली तर ह्या मंदीची बाधा शहरांनादेखील तितकीच, किंबहुना त्याहूनहि अधिक होईल."

स्वतःचीं छोटीं छोटीं घरं असलेल्या माणसांना तीं घरं गमवावीं लागूं नयेत, त्याबाबतची कर्जफेड त्यांना करतां यावी अशी रूझवेल्ट यांची इच्छा होती. निर्यात व्यापारावरचे कर कमी करण्याची त्यांची इच्छा होती, कारण त्यामुळं हा व्यापार वाढणार होता. निरुपयोगी जमीन लागवडीखालीं आणून आणि नवे रस्ते बांधायला काढून बेकारांना काम पुरवण्याची त्यांची योजना होती. रूझवेल्ट यांनीं जाहीर केलं, "अमेरिकन जनतेला नव्यानं भरमसाट कामं प्राप्त व्हावीं म्हणून मी आपणाला प्रतिज्ञाबद्ध व्हायला सांगत आहें. मी स्वतः प्रतिज्ञाबद्ध होत आहें."

हें त्यांचं उद्दिष्ट असणार होतं, हा त्यांचा जीवनहेतु असणार होता. या एकाच सेवाकार्याला ते वाहून घेणार होते. निराशा आणि भीति यांत रुतून बसलेल्या अमेरिकन जनतेच्या जीवनांत नवी आशा आणि आत्मविश्वास आणण्याचं कार्य नियतीनं रूझवेल्ट यांच्या शिरीं दिलेलं होतं.

या महान् कार्यानं भारला गेलेला हा माणूस सुखातिशयाच्या आणि आत्यंतिक थकव्याच्या वातावरणांतून तसाच राष्ट्राध्यक्षपदाच्या प्रचाराच्या धूमधडाक्यांत घुसला. प्रचारार्थ घेतलेल्या एका आगगाडींतून सारा देश त्यांनीं विंचरून काढला. 'एफ डी. आर.' यांच्यासोबत या वेळीं होता जेम्स, जेम्सची तरुण पत्नी बेट्सी कुशिंग, 'एफ डी. आर.' यांची कन्या ॲना, आणि वर्तमानपत्रांचे कित्येक प्रतिनिधी.

घरीं एलॅनोर रूझवेल्ट यांनीं मिस मेरी डब्ल्यू. ड्यूसन यांच्याबरोबर प्रचाराच्या महिला आघाडीचं नेतृत्व पत्करलं. प्रचार-मोहिमेची व्यवस्था वॉशिंग्टनचे वर्तमानपत्र-प्रतिनिधि मार्व्हिन एच. मॅकिनटायर ह्यांनीं आपल्याकडं घेतली होती. आणि जिम फार्ले हे पक्षाच्या राष्ट्रीय समितीचे अध्यक्ष बनले.

'एफ. डी. आर.' जिथं जिथं गेले तिथं तिथं भाषण ऐकणाऱ्या सामान्य माणसाच्या मुद्रेवर त्यांनीं आशा उजळतांना पाहिली. 'मे फ्लॉवर" नांवाच्या जहाजांतून विराट सागरावर प्रवासाला निघावं तसं रूझवेल्ट यांना वाटत होतं. पुढं काय वाढून ठेवलं आहे तें कोणालाहि माहीत नव्हतं. वादळ

येणार होतीं, परंतु त्यांच्याशीं झगडण्याला आतां उरांत ईर्षा होती. भविष्य-काळाचं आव्हान तिथं होतं. आणि हें आव्हान पत्करण्याला आतां अर्थ होता. निर्धार होता, इच्छाहि होती. आठवड्याआठवड्याला मतांच्या मोजदादी होऊं लागल्या. तसं त्यांना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना विजयाचं पारडं आपल्या बाजूला झुकूं लागल्याचं दिसूं लागलं.

आपल्या तब्बेतीसाठीं, ती अकस्मिकपणें फार बिघडूं नये यासाठीं, रूझवेल्ट यांनीं हें एवढं मोठं काम आपल्या शिरावर घ्यायला नको होतं असं अनेकांचं म्हणणं होतं, तें आठवून, रूझवेल्ट आतां स्वतःशींच हंसत. आपण स्वतः आपली प्रचार मोहीम चालवली आहे, आपल्या निवडणुकीचीं राजकीय सूत्रं आपल्या स्वतःच्या हातीं आपण धरलीं आहेत, यामुळं पक्षांतील वरीष्ठ अंतर्यामीं दुखावले आहेत, याची कल्पना त्यांना होती. एखाद्या माणसानं स्वतःची निवडणुक–मोहीम स्वतः चालविणं असलं कांहीं कोणी कधीं ऐकलं तरी होतं काय ? परंतु त्यांना हेंहि कबूल करावं लागलं होतं कीं, रूझवेल्ट हा मोठा चतुर राजकारणी पुरुष होता. असा दुसरा मुत्सद्दी त्यांनीं तरी पाहिला नव्हता !

त्या १९३२ सालांत निवडणुक प्रचारांतला प्रश्न ठसठशीत आणि रेखीव होता. परंपरावादी आणि जुन्या मतांचीं माणसं हूवर यांच्या मागं होतीं. नव्या उमेदीचीं आणि उदारमतवादी, धडाडीचीं माणसं रूझवेल्ट यांच्या मागं होतीं. न्यू इंग्लंडसारख्या जुन्या मतांच्या बालेकिल्ल्यांत आपल्याविषयीं लोकांचं मत कितीहि चांगलं झालं तरी त्यांचीं मतं आपल्याला मिळणं मुष्किल आहे हें 'एफ्. डी. आर.' यांना ठाऊक होतं. निवडणुकीच्या दिवसाच्या जरा आधीं रूझवेल्ट यांचे जुने हेडमास्तर एण्डीकॉट पीबॉडी यांनीं एका मित्राला पत्रांतून लिहिलं होतं, "व्यक्तिशः मी हूवर यांना मत देईन म्हणतों कारण माझ्या मतें ते अधिक समर्थ राजकारणी आहेत. देशांतला आर्थिक ताण कमी होईल अशा प्रकारचीं धोरणें त्यांनीं कार्यान्वित केलीं आहेत असं मला स्वतःला वाटतं. राष्ट्राध्यक्षपदासाठीं मत देण्याचा प्रसंग येतो तेव्हां माणसानं वैयक्तिक हितसंबंध नजरेआड केले पाहिजेत असं मला वाटतं. वैयक्तिक स्नेह अगर हितसंबंधांसाठीं आपलं मत एखाद्या माणसाला देणं मी अनैतिक समजतों."

फ्रँकलीन डिलॅनो रूझवेल्ट यांनीं आपल्या प्रचार-मोहिमेंतलं शेवटचं भाषण

न्यूयॉर्क राज्यांत केलें. मॅडिसन स्क्वेअर गार्डन इथं ही शेवटची मोठी सभा भरली होती. त्यानंतर 'पफकीपसी' च्या नभोवाणीवरून आपल्या निवडणूक-प्रचाराची सांगतां त्यांनीं केली.

निवडणुकीच्या दिवशीं हाईड पार्क इथं रूझवेल्ट परिवारानं आपलं मतदान केलं. त्या दिवशीं संध्याकाळीं निकटवर्तीयांसाठीं एक खाजगी स्वरूपाची मेजवानी त्यांनीं दिली. मेजवानीनंतर बाल्टिमोर हॉटेलमधल्या डेमॉक्रॅटिक पक्षाच्या निवडणूक-कचेरीकडे ही मंडळीं गेली आणि ठिकठिकाणचे निकाल त्यांच्या कानीं पडूं लागले.

निकालांचं स्वरूप निर्णायक होतं. ४२ राज्यांतून रूझवेल्ट यांना बहुमत लाभलं होतं. रात्र अर्धी देखील संपली नाहीं तोंवर रूझवेल्ट यांना अंतिम निकाल काय लागणार याची कल्पना आली होती.

या वेळीं विजयाचा उन्माद कोणाला चढण्यासारखा नव्हता, आनंदाचा जल्लोष रूझवेल्ट परिवारांत कोणी करूं इच्छित नव्हतं, कारण निवडणुकींतल्या या विजयानं आपणां सर्वांवर कोणती जबाबदारी येऊन पडत आहे याची जाणीव त्या सर्वांनाच होती. मेजवानीच्या वेळीं या मंडळींना मिळलेले अमेरिकेच्या गुप्त पोलीस दलांतले अधिकारी, राष्ट्राध्यक्षांच्या संरक्षणार्थ यानंतर कायमचेच त्यांच्याबरोबर, त्यांच्या मध्येंच राहणार होते. आतां कुटुंबांतले त्यांचे 'एफ. डी. आर.', त्यांचा 'फ्रॅंक्लिन', त्यांचे 'बाबा' साऱ्या अमेरिकेचे झाले होते. आणि म्हणूनच त्यांची काळजी सर्वतोपरी घेणं यानंतर अत्यावश्यक होतं.

फोटोग्राफर्सच्या इच्छेवरून रूझवेल्ट हॉटेलच्या नृत्याच्या भव्य दालनांत जाऊन उभे राहिले, आणि दूरध्वनिक्षेपकांवरून ते म्हणाले, "मी फार थोडं बोलतां. या माझ्या विजयाला इतर कोणाहिपेक्षां दोन माणसं प्रामुख्यानें जबाबदार आहेत. यांतला एक माझा पूर्वापारचा स्नेही आणि सहकारी कर्नल मॅकहेन्री हौ, आणि दुसरे जिम फार्ले."

आणि त्या पहिल्या मंधीला रूझवेल्ट परिवारानं पक्षाच्या निवडणूक कचेरीं-तून घर गांठलं.

त्या रात्रीं रूझवेल्ट यांचा मुलगा जेम्स त्यांची झोंपायची तयारी करून देत होता. कुणाच्या तरी मदतीशिवाय रूझवेल्ट यांना कपडे बदलतां येत नसत.

त्या निमित्तानें आपल्या वडिलांनीं त्यांचं दुर्धर दुखणं केवढं काबूंत आणलं आहे याची जाणीव जेम्स याला होती. रूझवेल्ट यांच्या खालच्या शरीराचे स्नायू तसेच पाठीचे आणि पोटाचे स्नायू आतां चांगलेच सुधारले होते. मांड्यांमध्येंदेखील बरीच सुधारणा दिसत होती. आतां उभं राहतांना, चालतांना, गुडघेच फक्त लटपटत, दुमडूं पाहात. अन्य उभारी देऊन ते ताठ आणि उभे ठेवावे लागत.

'एफ. डी. आर' बिछान्यांत विसावले, त्यांच्या मुद्रेवर जेम्सला कसली तरी चिंता झांकळून आलेली दिसली.

रूझवेल्ट मुलाला म्हणाले, "जिमी, तुला माहीत नसेल, साऱ्या आयुष्यभर ज्या गोष्टीला मी घाबरत आलों आहें ती गोष्ट म्हणजे 'आग.' आज मात्र वेगळीच भीति वाटते आहे."

"कसली भीति, बाबा!"

"भीति अशी कीं, पत्करलेलं हें नवं काम पार पाडण्याइतकी शक्ति माझ्यांत येणार नाहीं. जिमी, आतां तूं माझा निरोप घेऊन गेलास म्हणजे मी ईश्वराची मनोभावें प्रार्थना करणार आहें. त्याच्या कृपेची याचना करणार आहें. ही नवी जबाबदारी पेलण्यासाठीं, योग्य प्रकारें पार पाडण्यासाठीं, त्यानं मला नवं बळ द्यावं, मार्ग दाखवावा, असं मी त्याला सांगणार आहें. जिमी, माझ्यासाठीं तूं देखील त्याची प्रार्थना करावीस."

यावर कांहींहि म्हणणं अशक्य होऊन जेम्सनं तेथून पाय काढतां घेतला आणि फ्रॅंकलिन डेलॅनो रूझवेल्ट यांनीं डोळे मिटले. कधी नव्हती एवढी आतां त्यांना परमेश्वराच्या कृपेची जरूरी होती, कारण या नव्या कामांत ते एकटेच असणार होते. जबाबदारी एकट्यानंच निभावण्याची जरूरी होती.

● ● ●

# मंदीविरुद्ध झुंज

आतां आपण स्वतःचे राहिलेलो नाहीं तेव्हां आपल्या तब्येतीविषयीं अधिक सावध राहिलं पाहिजे असं रूझवेल्ट यांच्या मनानं घेतलं. त्याप्रमाणं, निवडणुकीच्या निकालाचा दिवस आणि राष्ट्राध्यक्ष म्हणून शपथविधीचा दिवस या दरम्यानच्या काळांत त्यांनीं वॉर्म स्प्रिंग्ज इथं जास्तीत जास्त काळ काढला. त्या वेळीं नव्या राष्ट्राध्यक्षांचा शपथविधि होई, तो मार्च महिन्यांत. 'थॅन्क्स गिव्हिंग डे' च्या सोहळ्याला रूझवेल्ट वॉर्म स्प्रिंग्ज इथं उपस्थित होते. एक मोठी मेजवानी त्या निमित्तानं देण्यांत आली. एका प्रशस्त टेबलाच्या अग्रभागीं तिथले ऋणाईत आणि पाहुणे यांच्यामध्यें रूझवेल्ट मोठ्या प्रसन्नपणें बसलेले होते. बाजूला एलिनॉर होत्या. प्रशंसेनं आणि आदरानं भरलेल्या त्या वातावरणांत, विशेषतः स्त्रियांकडून आपली स्तुति ऐकतांना, रूझवेल्ट कसे उजळून उठत होते तें पाहून एलेनॉरना मोठी गंमत वाटत होती.

आपल्या प्रसन्न वागण्यानं, बोलण्यानं, आणि हंसण्यानं पाहतां पाहतां सभोंवतालचं वातावरण भारून टाकण्याची हातोटी रूझवेल्ट यांच्यापाशीं पूर्वापार होती, आणि आतां तर ते अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झालेले होते. त्यांच्या उपस्थितीनं वॉर्म स्प्रिंग्जचं वातावरण अपरिमित उजळून निघालेलं होतं.

त्या मुक्कामांत त्यांचा सल्ला घेण्यासाठीं मोठमोठीं माणसं तिथं येत होतीं, नवं मंत्रिमंडळ कसं असणार, त्यांत कोण कोण असणार, यांच्या चर्चा या निमित्तानं झडत होत्या. अर्थिक मंदी आणि बेकारीशीं मुकाबला कोणकोणत्या मार्गांनीं, कोणत्या उपायांनीं, कसा करतां येईल याचाहि विचारविनिमय घडत असे.

यापूर्वी रूवेझवेल्ट यांना हें जाणवलं होतं कीं, वॉर्म स्प्रिंग्जचं आपलं घर आतां आपल्याला अपुरं पडूं लागलेलं आहे. १९३१ मध्यें नव्या प्रशस्त घराची योजना त्यांच्या मनांत घर करूं लागली होती, आणि या नव्या घराचा पायादेखील घातला गेला होता. १९३२ मध्यें हें नवं घर तयार झालं. 'लिट्ल व्हाईट हाऊस' हें नांव त्याला लाभलं. फौंडेशन मैदानाच्या मागें, पाईन मौंटनच्या एका उतारावर हें घर उभं आहे. याच्या भिंती आंतून साध्या पाईन लांकडाच्या आहेत आणि कोणतंहि दालन भव्य नाहीं. दिवाणखाना आणि जेवणाचं दालन एका तोकड्या शेकोटीनं एकमेकांना जोडलेलीं आहेत. घराच्या मागच्या पोर्चमध्यें असल्या तलावावरून रूझवेल्ट यांची नौकाविहाराची आवड स्पष्टपणें जाणवते. हा पोर्च अर्धवर्तुळाकृति आहे. बोटीच्या डेकवर उभे आहोंत असं तिथं उभं राहिल्यानंतर वाटतं. इथून समोरच पाईनचं जंगल दिसूं शकतं. रूझवेल्ट यांना या पाईनच्या जंगलांची फार आवड होती. या नव्या घरा-नजीकच पाहुण्यांसाठीं एक नवं घरकुल त्यांनीं बांधलं होतं. पाहुण्यांची स्वतंत्र व्यवस्था तिथं केलेली होती. आणि राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून येतांच या घराच्या परिसरांत गुप्त पोलिसांचा पाहारा बसला; त्यासाठीं लांकडी चौक्या उभ्या राहिल्या.

त्यांच्या संरक्षणासाठीं नेमलेलीं पोलिसदलाचीं माणसं थोड्या काळांतच मोठीं जेर झालीं, कारण या मंडळींला बनवणं, त्यांच्या हातावर तुरी देणं हा रूझ-वेल्ट यांचा स्वतंत्रच छंद झाला होता. त्यांची स्वतःची मुद्दाम बनवून घेतलेली एक फोर्ड मोटारगाडी होती. ही पायांचा उपयोग न करतां केवळ हातांनीं चालवतां येई. रूझवेल्ट स्वतः ती चालवूं शकत. या गाडींतून ते आसपासच्या टापूंत भटकत. आणि गुप्त पोलिस दलाच्या माणसांना कसलाहि पत्ता लागण्याच्या आंत गाडींत बसून सुसाट कुठंतरी निघून जाणं रूझवेल्ट यांना मनस्वीं आवडे. आणि अखेर जेव्हां हीं माणसं त्यांचा माग काढीत येऊन पोहोंचत तेव्हां रूझवेल्ट पोट धरधरून हंसून घेत.

नव्या अधिकारपदामुळं नव्या जबाबदाऱ्या आल्या. नव्या जबाबदाऱ्या आल्यामुळं निवांतपणा गेला. वॉर्म स्प्रिंग्जचं आपलं निवांत घरकूल मोडून सदा गजबजलेल्या नव्या घरांत जातांना मनोमन मात्र रूझवेल्ट व्यथित होते. वॉर्म स्प्रिंग्जचं सारं स्वरूपच या नव्या बदलामुळं पालटून जात होतं. तें सारं ठिकाणच राजकारणी माणसांचं स्थान बनूं पाहात होतं. रूझवेल्ट यांना हें मानवलेलं नव्हतं. इथल्या उपचार केंद्राची जबाबदारी इतरांहातीं सोंपवतांना त्यांच्या मनाला यातना झाल्या होत्या. एकच बरं होतं कीं, या योजनांबाबत त्यांच्याइतकीच आत्मीयता एव्हांना बेसिल ओ कॉनर यांना देखील वाटूं लागली होती. आणि आतां कायद्याच्या फर्ममध्यें ते दोघे भागीदार नसले तरी "पोलिओ विरोधी" मोहिमेंत मात्र ते दोघे जोडीनं काम करणार होते.

या ठिकाणीं आगीचा संभव नसलेल्या विटांच्या प्रशस्त सुंदर इमारती उभ्या रहाव्यात हें 'एफ. डी. आर.' यांचं स्वप्न होतं. या स्वप्नांत मेरी-वेदरची जुनी इमारत बसत नव्हती. हें स्वप्न आतां साकार होऊं लागलं होतं. अपंगांसाठीं उभारण्यांत आलेली "नॉर्मन विल्सन इनफर्मरी"ची पक्की इमारत दोन वर्षांपूर्वीच बांधून पुरी झालेली होती. या जागीं येऊन गेलेल्या रुग्णाइतांच्या आणि त्यांच्या स्नेही मंडळींच्या आर्थिक सहाय्यावरच ही इमारत उभी राहिलेली होती आणि तिला नांव मिळालं होतं तें देखील एका रुग्णाइताचंच. त्यानंतर येथल्या जॉर्जिया सभागृहाची आंखणी देखील चालू होती. जॉर्जिया राज्यांतल्या रहिवाश्यांकडून जमवलेल्या निधीवर हें सभागृह उभं केलं जाणार होतं.

लौकरांत लवकर वॉर्म स्प्रिंग्जला परत येण्याच्या बोलीवरच फ्रँकलिन डेलॅनो रूझवेल्ट नव्या जबाबदारीची शपथ घेण्यासाठीं उत्तरेकडे प्रयाण करते झाले.

१९३३ च्या ४ मार्चला, सकाळीं, दुतर्फा जमलेल्या हितचिंतकांना अभिवादन करीत रूझवेल्ट परिवार राजधानीच्या रस्त्यांतून सिक्स्टीन्थ स्ट्रीट वरच्या सेंट जॉन एपिस्कोपल चर्चकडे निघाला. हें चर्च व्हाईट हाऊसपासून नजीकच आहे.

त्याच दिवशीं, नंतर जिथं वुड्रो विल्सन एकदां उभे राहिले होते त्या जागीं उभं राहून रूझवेल्ट यांनीं नव्या अधिकाराची शपथ वाहिली. या वेळीं त्यांनीं हातीं घेतलेलं बायबल रूझवेल्ट घराण्यांत पूर्वापार चालत आलेलंच डच

छपाईचं होतं. बाहेर हवा कुंद होती. पाऊस पडत होता, आणि एक प्रकारच्या वैफल्यानं, निरुत्साहानं भरलेल्या मुद्रांनीं माणसांचा मोठा समुदाय रूझवेल्ट यांचा शपथविधि न्याहाळत होता. एका मोठ्या आर्थिक क्रांतीच्या तोंडाशीं, उद्योगधंद्यांच्या कांठाशीं, अमेरिका उभी आहे याची जाणीव सर्वांना होती. जमलेल्या माणसांपैकीं कित्येकांच्या पोटांत अन्न नव्हतं आणि तें पुन्हां कधीं तोंडांत पडेल याची खात्री नव्हती. बेकारी अतोनात वाढलेली होती, अजूनहि प्रत्यहीं नवे नवे कारखाने बंद पडत होते, बँकांचीं दिवाळीं निघत होतीं, आशेला जागाच उरलेली नव्हती. फक्त एकच माणूस कदाचित् या बिकट परिस्थितींतून मार्ग काढूं शकत होता, आणि तो माणूस या क्षणीं त्यांच्यासमोर धीरगंभीर शब्दांत आपली प्रतिज्ञा उच्चारीत होता. नंतरच्या भाषणांत त्यांना उद्देशून तो म्हणाला,

" राष्ट्रासमोर वाढून ठेवलेल्या सद्यःस्थितींत दृढ निर्धाराच्या आणि ठाम सुरांत, राष्ट्राध्यक्षपदाचीं सूत्रं हातीं घेतल्यानंतर मीं बोलावं अशी माझ्या अमेरिकन बांधवांची अपेक्षा असणार. सत्य असेल तें निर्भीडपणें आणि निर्भयपणें बोलण्याची ही वेळ आहे. देशापुढें आज असलेल्या परिस्थितीबाबत आपण एकमेकांना फसविण्याची कांहींहि आवश्यकता नाहीं. मी इतकंच म्हणतों कीं, हें आपलं महान् राष्ट्र या सत्त्वपरीक्षेतून आजपर्यंत जसं जात आलं, तसंच यापुढंहि जात राहील, या सत्वपरीक्षेला उतरेल, आणि भरभराट पावेल. म्हणून सर्वप्रथम आणि निर्धारपूर्वक मला आपल्याला हें सांगितलं पाहिजे कीं, फक्त एकाच गोष्टीला आपण भिऊन असलं पाहिजे; आणि ती गोष्ट, भीति......"

पाहतां पाहतां समोरच्या माणसांच्या मुद्रेवरचा उद्वेग ओसरतांना रूझवेल्ट यांना दिसत होता.

" ह्या राष्ट्राची आज एकच मागणी आहे. प्रत्यक्ष कृति पाहिजे. माणसांना कामाला लावणं ही आज आपल्यापुढची सर्वांत महत्त्वाची समस्या आहे. विचारपूर्वक आणि धडाडीनं ही समस्या आपण सोडवायचं ठरवलं तर तें बिलकुल अशक्य नाहीं. आपली घटना इतकी सोपी आणि व्यवहार्य आहे कीं, विशिष्ट प्रकारच्या परिस्थितींत केवळ कांहीं भागांवरचा भार इतर अन्य भागांवर देऊन आपल्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठीं आपण ती यशस्वीपणें

राबवूं शकतों. म्हणूनच आपली घटनात्मक पद्धति आधुनिक जगांत विलक्षण लवचिक आणि टिकाऊ स्वरूपाची राजकीय यंत्रणा म्हणून वाखाणली जाते. "

आतां समोरच्या असंख्य मुद्रांवर हास्य उजळूं लागलं होतं.

" माझ्यावर आपण टाकलेल्या विश्वासाच्या बदल्यांत आजच्या परिस्थितीला अनुसरून मी आपल्याला धैर्य आणि निःस्वार्थ सेवा देईन, एवढंच मी या वेळीं सांगतों. यांत मी कमी पडणार नाहीं......या कार्यांत ईश्वराची कृपा आमच्यावर राहील अशी प्रार्थना आपण करूं या. आपल्यांतल्या प्रत्येकाचं संरक्षण आणि संगोपन तो करो, आणि येत्या काळांत त्याचं मार्गदर्शन मला घडो ! "

त्यांच्या काळांत भाषणांत त्यांनीं कृतीवर जो भर दिला होता, तो जाणीवपूर्वक दिला होता. मंत्रीमंडळाची घडण त्यांनीं आतां निश्चित केली होती. टेनेसीचे कॉर्डेल हल हे या मंत्रीमंडळांत परराष्ट्र खातं सांभाळणार होते; शेतकी खातं हेन्री वॉलेस यांच्या हातीं देण्यांत आलं होतं; मजूर खात्याचीं सूत्रं फ्रॅन्सिस पर्किन्स यांच्याकडे राहाणार होतीं; आणि जिमन फार्ले यांची नियुक्ति पोस्टमास्तर-जनरल म्हणून झालेली होती.

गव्हर्नरपदाच्या आपल्या कारकीर्दींत क्रमशः रूझवेल्ट यांनीं आपल्याभोंवतीं एकनिष्ठ अशा तज्ज्ञ मंडळींचं एक कडं जमवलं होतं. यांतला एक होता फ्रॅन्सिस पर्किन्स; त्यानंतर रेमंड मोले. हे कोलंबिया युनिव्हर्सिटींत प्रोफेसर होते. त्यानंतर त्याच युनिव्हर्सिटींतले आणखी एक शेतकीतज्ज्ञ रेक्सफर्ड जी. टगवेल. कोलंबिया युनिव्हर्सिटीचे ' कॉर्पोरेशन लॉ ' चे प्रोफेसर ॲडॉल्फ ए. बर्ले ( ज्युनियर ) हेहि त्यांत होते. त्याचप्रमाणें सॅम्युअल रोझेमान, हेन्री वॉलेस, बेसिल ओ कॉनर, बर्नार्ड बरूच ही मंडळी यांत होती. याशिवाय हेन्री मॉर्गेन्थॉऊ ज्युनियर आणि डीन ॲचिसन हे वेगळे. ॲचिसन हे ग्रोटोनचे पदवीधर होते. बर्नार्ड बरूच हे अर्थशास्त्राचे नाणावलेले तज्ज्ञ मानले जात.

ही सारी मंडळी सरकारांत ज्यांची हमखास गणना अपेक्षिली जात होती अशी नव्हती. पण अमेरिकेच्या त्या काळांतल्या विशिष्ट विपन्नावस्थेवर रूढ तज्ज्ञ मंडळींकडे योग्य तोडगे नाहींत हें दिसल्यानेंच रूझवेल्ट यांनीं या वेगळ्या माणसांची निवड केली होती. या माणसांना निवडण्यांत रूझवेल्ट यांनीं प्रगल्भता, कल्पकता, त्याप्रमाणें विलक्षण धडाडी देखील दाखवली होती. अध्या-

पनाऱ्या क्षेत्रांतली नाणावलेली मंडळी त्यांनीं या कामीं जोडली. यांत होते अर्थशास्त्रज्ञ, वकील, शेतकीतज्ज्ञ, आणि राज्यशासनाचे व्यासंगी, अभ्यासू. रूझवेल्ट यांच्याभोंवतीं यांची जणुं कायम स्वरूपाची परिषदच भरलेली असे. रूझवेल्ट यांचा 'ब्रेन ट्रस्ट' म्हणूनच ही प्रभावळ ओळखली जाई.

स्वतः 'एफ. डी. आर.', यांचे मंत्रिमंडळ आणि ही त्यांची प्रभावळ तासांमागून तास, प्रहरांमागून प्रहर, दिवसांमागून दिवस, आणि रात्रींमागून रात्रीं, एकत्र बसून खल करूं लागली, निर्णय घेऊं लागली आणि या नव्या राष्ट्राध्यक्षांच्या शपथविधीपाठोपाठ वॉशिंग्टनला जणुं नवं चैतन्य प्राप्त झालं.

'एफ. डी. आर. यांच्या कारकीर्दीचे हे पहिले कांहीं दिवस इतिहासकारांच्या लेखांत 'दी हार्ड डेज' म्हणून नमूद झाले आहेत. ह्या पहिल्या शंभर दिवसांत त्यांनीं आणि त्यांच्या सहकाऱ्यांनीं मिळून पंधरा नवीं 'बिलं' तयार केलीं आणि कॉंग्रेसपुढं मांडलीं. देशापुढच्या निकडीच्या प्रश्नांवरच तीं होतीं. दोनहि गृहांत डेमॉक्रॅटिक पक्षाचं हुकमी बहुमत असल्यानं हीं बिलं मंजूर होण्याच्या कामीं रूझवेल्ट यांना कोणतीहि अडचण आली नाहीं. दोनहि गृहांचं उत्तम सहकार्य त्यांना लाभलं होतं.

यांतलं पहिलं आणि मोठा धक्का देणारं बिल होतं, 'इमर्जन्सी बॅन्किंग अॅक्ट' चं. आर्थिक क्षेत्रांत पसरलेल्या घबराटीनं बॅंकांमागून बॅंकांचीं दिवाळीं निघत आहेत, आणि अर्थव्यवस्था झपाट्यानं मोडून पडत आहे हें जाणून, या बिलान्वयें रूझवेल्ट यांनीं आपल्या हातीं राष्ट्राध्यक्षपदाचीं सूत्रं आल्यापासून दोन दिवसांत एक 'बॅंक हॉलिडे' घोषित केला आणि देशांतल्या साऱ्या बॅंका बंद पाडल्या. आणखी तीनच दिवसांत त्यांनीं नवं बिल मंजूर करून घेतलं आणि या बिलान्वयें अधिक स्थिर आणि भक्कम पायावर या साऱ्या बॅंका नव्यानं उघडल्या जाण्याची व्यवस्था त्यांनीं केली.

मार्चच्या अखेरीस 'सिव्हिलियन कॉन्झर्व्हेशन कोअर' ह्या नांवाचं दल त्यांनीं प्रस्थापित केलं. देशांत बेकार अवस्थेंत दिशाहीन भटकणाऱ्या साऱ्या तरुण मंडळींना त्यांनीं या बिलान्वयें या दलांत एकत्र केलं. वाढत्या बेकारींत हीं तरुण माणसं मालगाड्यांतून चोरून भटकत होतीं. निरुद्योगी राहून मवालीगिरी करीत होतीं. गुन्हेगारांच्या टोळ्यांत सामील होत होतीं. या साऱ्यांना या नव्या दलांमधून रूझवेल्ट यांनीं विधायक कामाला जुंपलं. जुन्या मोठमोठ्या

उपस्थित बागा नव्यानं चांगल्या स्वरूपांत लागवडीला आणणं, एका काळीं जिथं रानं, जंगलं होतीं, ती निरुपयोगी जमीन नव्यानं लागवडीखालीं घेणं, अशीं कामं त्यांनीं या दलाकडे सोंपवलीं. जंगल क्षेत्रांतल्या तज्ज्ञ मंडळींच्या हातीं त्यांनीं हीं माणसं दिलीं आणि लवकरच सुमारें चार लाख तरुण जागों-जाग छावण्या टाकूं लागले, उघड्यावर शारीरिक कष्टांचीं कामं करतांना दिसूं लागले, स्वतःच्या कार्याचे पैसे खिशांत खुळखुळवूं लागले, गांवोगांवच्या आपल्या कुटुंबियांना पैसे पाठवूं लागले. यामुळं त्यांचीं बिघडलेलीं डोकीं ताळ्यावर आलीं; वांयां जाऊं लागलेल्या तब्येती पुन्हां धडधाकट बनूं लागल्या; आणि याहिपेक्षां महत्त्वाचं म्हणजे, त्यांची मोडून पडलेली अस्मिता नव्यानं उभी राहिली. यांतले कित्येक तरुण असे होते कीं, शहरांतल्या दरिद्री वस्त्यांबाहेर आयुष्यांत कधींहि ते पडलेले नव्हते. अमेरिकेंत केवढी जमीन मोकळी पडली आहे याची कल्पना त्यांना नव्हती. या दलांमार्फत जागोजाग मिळून वीस कोटी झाडें लावण्यांत आलीं, मोठमोठे पाटबंधारे बांधण्यांत आले, जुनीं राष्ट्रीय उद्यानं नव्यानं फुलवण्यांत आलीं.

टीकाकारांनीं ओरडा केला, 'ही वेठबिगारी होत आहे!' परंतु ही वेठबिगारी नव्हे याची पक्की जाणीव रूझवेल्ट यांना होती. देशांतली परिस्थिति युद्धपरिस्थितीइतकीच आणीबाणीची आणि गंभीर होती. आणि सैनिक बनून रणांगणावर करतां आलं असतं तितकंच महत्त्वाचं कार्य ती तरुण मंडळी करीत होती.

या पहिल्या शंभर दिवसांतलं आणखी एक महत्त्वाचं बिल 'फेडरल इमर्जन्सी रिलीफ ॲक्ट' हें होतं. राज्याराज्यांतल्या उपाशी-तापाशी माणसांच्या सहाय्यार्थ सरकारचं आर्थिक बळ तातडीनं पोहोंचावं यासाठीं हें बिल मंजूर करून घेण्यांत आलं होतं. या योजनेच्या प्रमुखपदीं 'एफ. डी. आर.' यांनीं हेन्री हॉपकिन्स यांची योजना केली. हॅन्री हॉपकिन्स यांनीं न्यूयॉर्क राज्यांत रूझवेल्ट यांच्या वतीनं याच स्वरूपाचं कार्य यापूर्वी केलं होतं. कुणाचीहि वाखाणणी सहज लाभावी असं हें कार्य नव्हतं. आणि हॉपकिन्स यांना भरपूर अप्रीति आणि दूषणं घ्यावीं लागलीं. परंतु मुळांतच कुणाला न मानवणारी अशी ही कामगिरी असली तरी या राष्ट्रीय महत्त्वाच्या कामगिरींत त्यांनीं फार मोठं यश संपादन केलं होतं.

येऊं घातलेला प्रदीर्घ, कडाक्याचा हिंवाळा हॉपकिन्स यांनीं विचारांत घेतला. गेलीं चार वर्षं हिंवाळा असाच प्रदीर्घ आणि कमालीचा कडक असे. आपल्या कित्येक वर्षांच्या सामाजिक कार्याच्या अनुभवांवरून हॉपकिन्स यांना हें माहीत होतं कीं, उपाशी-तापाशी माणसांना देखील स्वाभिमान असतो. भिकेच्या स्वरूपांत सरकारी मदत स्वीकारणं त्यांना यातनादायक वाटतं. हें लक्षांत घेऊन एक 'सिव्हिल वर्कर्स ॲडमिनिस्ट्रेशन' त्यांनीं निर्माण केली, आणि नोव्हेंबरपर्यंत देशभरचे चाळीस लाख वेकार त्यांनीं या यंत्रणेंत सामील करून घेतले. या संघटनेमार्फत देशभर या माणसांनीं रस्ते बांधले आणि नवीन उद्यानं तयार केलीं. प्रौढ शिक्षणासाठीं या संघटनेनं शिक्षक नेमले, संघराज्यांतल्या प्रत्येक राज्याचा इतिहास लिहिला जावा यासाठीं लेखक नियुक्त केले. अशा इतिहासाची गरजहि फार होती.

आपल्या सभोंवतालीं येणाऱ्या माणसांना स्फूर्ति देणं आणि उत्स्फूर्तपणें त्यांना कामाला प्रवृत्त करणं रूझवेल्ट यांना मुळापासूनच फार चांगलं जमत असे. हीं माणसं त्यांच्यापासून इतकी जबरदस्त प्रेरणा घेत कीं, अन्य कसलाहि विचार न करतां तीं दिवस रात्र आपल्या क्षेत्रांत जिवापाड, आणि कायावाचा मनें करून कष्टत. यापूर्वी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांपुढं कधींहि वाढून ठेवलेली नसेल अशा विलक्षण आणि कसोटीच्या परिस्थितीला तोंड देण्यासाठीं रूझवेल्ट यांनी आपली ही हातोटी पुरेपूर वापरली.

रूझवेल्ट यांनीं मंजूर करून घेतलेल्या 'ॲग्रिकल्चरल ॲडजस्टमेंट ॲक्ट' अन्वयें राष्ट्रव्यापी स्वरूपांत लागवडीखालीं असलेली जमीन संरक्षण्याचे, नवी जमीन लागवडीखाली आणण्याचे, पिकांच्या आणि शेतीमालाच्या योजना आंखण्याचे अधिकार राष्ट्राध्यक्षांना देण्यांत आले होते. या बिलावर पुढें पुष्कळच वादंग माजला.

तथापि सर्वांत वादग्रस्त बिल ठरलं तें 'टेनेसी व्हॅली ॲथॉरिटी ॲक्ट' हें. नेहमींप्रमाणें या बिलाच्या बाबतींत 'एफ. डी. आर.' यांनीं विरोधी पक्षाच्या प्रखर विरोधाची दखल न घेतां आपला मार्ग निश्चयानं आणि धडाडीनं आक्रमिला, कारण वॉर्म स्प्रिंग्जच्या आसमंतांत भटकत असतांना या टापूंतलं दारिद्र्य आणि अन्नान्न दशा त्यांनीं साक्षात् डोळ्यांनीं पाहिली होती.

टेनेसी नदी ग्रेट स्मोकीज भागांतल्या नॉक्सव्हिल येथून उगम पावते,

वायव्येकडं अलाबामामध्यें ती वाहात जाते, त्यानंतर अलाबामाच्या उत्तर टापूंतून पश्चिमेकडे वाहते. आणि पुढं उत्तरेकडे वळून ओहिओ नदीला मिळते. अलाबामाच्या ईशान्य कोपऱ्यांत एका उथळ खडकाळ पात्रांतून ती वाहात होती. 'मसल–शोल्स' असं त्या भागाला म्हणत.

निवडणुकीच्या निकालाचा दिवस, राष्ट्राध्यक्ष म्हणून शपथ घेण्याचा दिवस या दरम्यानच्या काळांत 'एफ. डी. आर.' यांनीं नेब्रास्काचे सीनेटर जॉर्ज नॉरिस यांना लिहिलेल्या एका पत्रांत म्हटलं होतं, "वॉर्म स्प्रिंग्जला जातांना या 'मसल-शोल्स' भागाला भेट देण्याचं आमंत्रण मी तूर्त तरी स्वीकारलं आहे."

नॉरिस हे नेब्रास्काचे उदारमतवादी रिपब्लिकन कार्यकर्ते. या मसल–शोल्स भागांत पुराचं नियंत्रण करण्याची आणि धरणं बांधण्याची एक योजना कॉंग्रेसमध्यें मंजूर करून घेण्यासाठीं कित्येक वर्षांपासून हे गृहस्थ विलक्षण खटपट करीत होते. त्यांनीं ही योजना मांडली तेव्हां प्रेसिडेंट कूलिज यांनीं आपल्या अधिकारांत ती रद्दबादल केली. पाठोपाठ प्रेसिडेंट हूवर यांनींहि या योजनेची अशीच वाट लावली.

दिलेल्या वचनाप्रमाणं 'एफ. डी. आर.' यांनीं या भागाला भेट दिली. एकदांच नव्हे तर कित्येकदां. त्यांना या भागांत दिसलं गलिच्छ दारिद्र्य, भाकड जमीन, जागोजाग खणून नेलेला आणि पुरानं माती धुऊन नेलेला उघडा-वाकडा माळ. हें सारं पाहून तत्काळ सीनेटर नॉरिस यांच्याशीं त्यांनीं वाटा-घाटी केल्या आणि नॉरिस यांच्या योजनेंत अभिप्रेत असलेलीं छोटीं छोटीं धरणं, स्वस्त विद्युत् योजना, जंगलांची नव्यानं उभारणी, नव्यानं लागवडीखालीं आलेली शेतीजमीन, कमींत कमी किंमतींत घरं बांधण्याच्या योजना, स्थानिक स्वरूपाचे छोटे छोटे उद्योगधंदे, नवीं पिकं, या साऱ्यांनीं संपन्न झालेली ही भूमि रूझवेल्ट यांच्या मनःचक्षूपुढं उभी राहिली. नॉरिस यांची योजना मंजूर होणं म्हणजे या भागाला नवं वरदान, नवं जीवन लाभण्यासारखंच होतं...

वास्तविक सीनेटर यांच्या कल्पनेपुढं कांहीं व्यापक आणि मोठं चित्र नव्हतं. रूझवेल्ट यांनीं आपल्या मनींचं या योजनेचं स्वरूप नॉरिस यांच्या कल्पनेपुढं रंगवितांच नुसतेच विस्फारित डोळ्यांनीं तें सारं ऐकत निःस्तब्ध बसून राहिले. त्यांच्या अपेक्षेपेक्षां हें कितीतरी अधिक होतं. अखेर ते म्हणाले, "असं

जर घडलं तर सरकारी पातळीवरचं तें फार फार विलक्षण आणि दूरगामी स्वरूपाचं, महत्त्वाचं, मानवतावादी कृत्य ठरेल.''

परंतु सर्वांचींच मतं सीनेटर नॉरिस यांच्याप्रमाणं नव्हतीं. याच भागांत वीजपुरवठा करणाऱ्या कांहीं खाजगी कंपन्या होत्या. त्यांनीं जोराचा ओरडा केला कीं आमच्या खाजगी उद्योगक्षेत्रांत सरकारनं उतरून आमच्याशीं स्पर्धा करण्याचा हक्क सरकारला नाहीं. तत्त्वतः हें चुकीचं नव्हतं. परंतु वॉर्म स्प्रिंग्ज इथं वीजपुरवठ्याच्या निमित्तानं जे महागडे दर अशा खाजगी वीज कंपन्यांना द्यावे लागत होते त्यांनीं रूझवेल्ट यांचा तळतळाट झालेला होता. या खाजगी कंपन्या मनास येईल त्याप्रमाणं दरवाढ करीत, कारण त्यांच्या क्षेत्रांत स्पर्धा नव्हती. जनतेचे आपण कुणी लागत आहोंत याची जाणीव त्यांना राहिलेली नव्हती.

मसल शोल्स भागांतल्या या नव्या सरकारी योजनांमुळं ज्यांचं तथाकथित नुकसान होणार होतं त्या खाजगी कंपन्यांनीं सरकारी योजनेशीं कायदेशीर झुंज घेण्यासाठीं आपला एक वकील नियुक्त केला. वक्तृत्वसंपन्न आणि नाट्य-पूर्ण व्यक्तिमत्त्व असलेले अत्यंत बुद्धिमान्, असे हे वकील होते, वेंडेल विल्की. विल्की हे स्वतः त्यावेळीं टेनेसी व्हॅलीमध्यें कांहीं मालमत्ता असलेल्या 'कॉमनवेल्थ अँण्ड सदर्न कॉर्पोरेशन' नांवाच्या कंपनीचे अध्यक्ष होते. हे गृहस्थ एके काळीं डेमॉक्रॅटिक पक्षाचे सदस्य होते. कित्येक बाबतींत 'एफ. डी. आर.' यांच्याशीं यांचं साम्य होतं. एक तर हे उदारमतवादी होते. दुसरं म्हणजे अत्यंत मोहक आणि आकर्षक वक्तृत्वासाठीं हे प्रसिद्ध होते. तिसरी गोष्ट-अर्ध्यामुर्ध्या स्वरूपाचं कांहींहि यांना मान्य होत नसे. 'एक घाव आणि दोन तुकडे' असा यांचा बाणा होता. जणूं तोडीस तोड अशीं हीं दोन माणसं होतीं–रूझवेल्ट आणि विल्की. आपल्या शोल्स कंपनीच्या वतीनं विल्की यांनीं ही कायदेशीर झुंज अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयांपर्यंत लढवीत नेली आणि या निमित्तानं ते इतके प्रसिद्धीस आले, इतके लोकप्रिय झाले, कीं अखेरीस राष्ट्राध्यक्षपदासाठीं 'एफ. डी. आर.' यांचे प्रतिस्पर्धी म्हणून त्यांनीं निवडणूक लढविली. मात्र टेनेसी व्हॅलीमधल्या या तंट्यांत बाजी 'एफ. डी. आर.' यांनींच जिंकली आणि त्यांची योजना अंमलांत आली. टेनेसी व्हॅलीचं स्वरूप या योजनेनं पालटून टाकलं.

आणखी आठ वर्षांनीं आपल्या पतीच्या वतीनं प्रवास आणि निरीक्षण करणाऱ्या एलिनॉर रूझवेल्ट यांनीं या भागाला भेट दिली आणि त्यांनीं आपल्या अहवालांत असं नमूद केलं कीं, ' असा संपन्न भाग दुसरा सांपडणं कठीण आहे. '

जून मध्यें रूझवेल्ट यांनीं आणखी एक बँकिंगविषयक बिल मंजूर करून घेतलं. या बिलान्वयें त्यांनीं ' फेडरल बॅन्क डिपॉझिट इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ' या नावाची यंत्रणा निर्माण केली. पांच हजार डॉलर्सपर्यंतच्या बॅन्कांमधल्या वैयक्तिक ठेवींची हमी ही कॉर्पोरेशन देऊं लागली.

या पहिल्या शंभर दिवसांत रूझवेल्ट यांनीं मार्गी लावलेल्या पंधरा योजनांमध्यें कांहीं काळ अतिशय गाजलेली योजना ' एन. आर. ए. ' ची होती. ' नॅशनल रिकव्हरी ॲडमिनिस्ट्रेशन ' हें हिचं संपूर्ण नांव. इतर योजनांमध्यें ज्यांचा समावेश होऊं शकत नव्हता असं या योजनेंत समाविष्ट झालं होतं. आणि इतर योजनांमध्यें समाविष्ट असलेलंसुद्धां या योजनेंत स्वतंत्रपणें अंतर्भूत करण्यांत आलेलं होतं.

भरपूर प्रसिद्धि आणि गाजावाजा करून, मोठमोठीं ' पोस्टर्स ' लावून, पताका फडकावून ही योजना कार्यान्वित करण्यांत आली. ' ब्ल्यू ईगल '— निळा गरूड पक्षी हें हिचं चिन्ह होतं. कारखान्यांतून कामाचे मर्यादित तास, अधिक मोठीं किमान वेतनं, कारखान्यांत कोवळ्या मुलांचा वापर होण्याला मनाई, अशा प्रकारच्या अनेक गोष्टी या योजनेमध्यें समाविष्ट होत्या. या योजनेनें पूर्ण वेळ कारखान्यांत काम करणाऱ्या माणसांना असं आवाहन केलेलं होतं कीं, ' आठवड्यांतून एक दोन दिवस आपल्याऐवजीं आपण एखाद्या बेकार माणसाला निदान अर्धा वेळ काम करण्याची संधि द्या. ' या योजनेंत सामील होणाऱ्या सर्व कारखान्यांना आपल्या खिडक्यांवर लावण्यासाठीं निळ्या गरूड पक्षाचीं चिन्हं देण्यांत आलीं. हीं चिन्हं धारण करणाऱ्या माणसांना जनतेनं आश्रय द्यावा असंहि आवाहन करण्यांत आलं. अधिक प्रमाणांत नोकऱ्या आणि काम निर्माण करण्यासाठीं या योजनेअन्वयें कार्यक्रम आंखण्यांत आला.

अमेरिकन जनतेनं या नव्या योजनेवर विलक्षण जीव लावला. तिच्याबाबत फार मोठा उत्साह दाखवला; आणि इतर सरकारी योजनांना देखील या उत्साहाचा आणि या प्रेमाचा लाभ मिळाला. मंदीच्या खाईतून अमेरिकेची

आर्थिक व्यवस्था पुन्हां नव्यानं वर येण्याला यानं फार मोठी मदत झाली. आपल्या प्रचार-मोहिमेच्या काळांत रूझवेल्ट यांनीं आपल्या कारकीर्दीविषयीं ज्या अपेक्षा देशांत निर्माण केल्या होत्या त्या प्रत्यक्ष कारकीर्दीत आतां वाढूं लागल्या.

आपल्या पतीचे पाय बनून एलिनॉर साऱ्या देशभर भ्रमंति करीत होत्या; ज्या ज्या राज्यांत उपाययोजना व्यवस्थित झाली नाहीं अशा राज्यांतून फिरत होत्या, जागोजागची दारिद्र्यावस्था स्वत: जाऊन पाहात होत्या, आणि व्यवस्थित उपाययोजनांचे जागोजागचे परिणामदेखील न्याहाळीत होत्या; व त्याविषयीं सरकारला अहवाल सादर करीत होत्या. कुठलंहि ठिकाण त्यांना वर्ज्य नव्हतं. त्यांची प्रतिष्ठा, त्यांचं मोठेपण चुकूनहि या गोष्टींआड येत नव्हतं. गलिच्छ वस्त्या, कोळशाची घाण, शेती, मच्छीमारीच्या नावा, यांपैकीं कुठेंहि ही बाई नि:संकोचपणें, मोकळ्या मनानं पोंचत होती. 'मेन' भागांतल्या एका कोळ्यानं त्यांच्याविषयीं प्रदर्शित केलेला अभिप्राय मोठा उद्‌बोधक होता. तो म्हणाला होता, "ही बाई उच्च म्हणून पोषाखी नाहीं; आणि वाटेल तें बोलण्याला तिला भीति म्हणून वाटत नाहीं."

राष्ट्राध्यक्ष म्हणून रूझवेल्ट यांनीं जेवढ्या जुनाट आणि कुचकामाच्या प्रथा मोडल्या, तेवढ्याच एलिनॉर रूझवेल्ट यांनीं देखील राष्ट्राध्यक्षांची पत्नी या नात्यानं मोडल्या. व्हाईट हाऊसचं औपचारिक स्वरूप त्यांनीं मोडून काढलं, आणि जिथं नातवंडं आणि कुत्रीं मोकाटपणानें इतस्तत: भटकत आहेत असं त्याचं एक घर बनवलं. तिथं येणाऱ्या पाहुण्यांना घरीं आल्याप्रमाणं वाटावं असं त्या सरकारी घराचं स्वरूप त्यांनीं केलं. अनौपचारिक आणि स्नेहानं भरलेलं या साऱ्या अनौपचारिक पद्धतींनीं व्हाईट हाऊसवरचा नोकरवर्ग गोंधळून, बावरून गेला. असलं कांहींच त्यांनीं कधीं पाहिलं नव्हतं. या सरकारी घरांतून 'एफ. डी. आर.' आपलं घर दणाणून टाकणारं हास्य करीत वावरत. एखाद्या गृहकृत्यदक्ष गृहिणीप्रमाणं पोषाखीपणा सोडून, सरकारी रीतीभातींना रजा देऊन एलिनॉर स्वत: ह्या घरांतून फिरत. "मिसेस रूझवेल्ट, राष्ट्राध्यक्षांच्या पत्नीनं असं वागण्याचा प्रघात नाहीं." असं कोणी नोकर-माणसं सांगूं लागलीं कीं त्या तत्काळ उत्तर देत, "आजपासून तो प्रघात सुरू झाला आहे."

व्हाईट हाऊसवर त्यांच्या बरोबरीनं त्यांचे निकटवर्ती आणि अत्यंत विश्वासू सहकारी देखील राहात होते. उदाहरणार्थ, मालव्हिना थॉम्पसन. या तिथं मिसेस रूझवेल्ट यांच्या पर्सनल सेक्रेटरी म्हणून काम पाहात होत्या; लुई हौ हे अजून राष्ट्राध्यक्षांचे पर्सनल सेक्रेटरी आणि अत्यंत विश्वासू मित्र होते; मिसी ल-हॅण्ड आणि ग्रेस टली या अजूनहि राष्ट्राध्यक्षांचा पत्रव्यवहार सांभाळीत. पैकीं मिस टली या पत्रं लिहून घेत; आणि आलेल्या पत्रांची वर्गवारी आणि लिहायच्या पत्रांची आंखणी मिसी ल-हॅण्ड या करीत. स्टिफन अर्ली हे 'एफ. डी आर.' यांचा वृत्तपत्रांशीं चालणारा व्यवहार सांभाळीत आणि मार्व्हिन मॅकिण्टायर त्यांच्या भेटीगांठी ठरवीत. या साऱ्या मंडळींचा मुक्काम व्हाईट हाऊसवरच असे.

रोस सकाळीं दहा वाजतां रूझवेल्ट कामाला आरंभ करीत. बैठका, वाटाघाटी, खलबतं, यांत सारा दिवस निघून जाई. आपण एका पांगळ्या माणसाबरोबर काम करीत आहोंत असं मानून चालणाऱ्या माणसाची दमछाक होई आणि तरीहि राष्ट्राध्यक्षांच्या कामाची उमेद मात्र कायमच असे. संध्याकाळपर्यंत इतर कामांचा फडशा पाडल्यानंतर राष्ट्राध्याक्ष मिस टली हिला बोलावीत आणि पत्रांचा ढिगारा घेऊन ती त्यांच्यासमोर येऊन बसे. त्या साऱ्या ढिगाकडे पाहात रूझवेल्ट तिला विचारीत. "आज आपल्याला एवढंच काम ना?" आणि तिचं उत्तर असे, "नाहीं, सर, माझ्या दोन हातांनीं मी एवढींच पत्रं घेऊन येऊं शकलें. आणखी मागोमाग येतच आहेत." संध्याकाळ उलटून जाई, रात्रींचीं जेवणं होत. पुन्हां रूझवेल्ट कामाला बसत, आणि अखेर अखेरचीं कांहीं कामं तर ते बिछान्यांत पडल्या पडल्या करीत. आणि काम करतां करतांच ते स्वतःच्या नकळत झोंपीं जात.

राष्ट्राध्यक्षांचे पर्सनल अॅटेण्डण्ट म्हणून व्हाईस अॅडमिरल रॉस टी. मॅकिन-टायर यांची नियुक्ति झालेली होती. हे राष्ट्राध्यक्षांचे वैद्यकीय तज्ञ होते. रोज सकाळीं व संध्याकाळीं ते रूझवेल्ट यांची प्रकृति तपाशीत. रूझवेल्ट जिथं जात तिथं त्यांच्याबरोबर हेहि असत. देशांत, इतकंच नव्हे तर बाहेरदेशीं देखील रूझवेल्ट यांच्या बरोबरीनं ते फिरत. 'एफ. डी. आर.' यांच्या उत्तम तब्येतीविषयीं इतरांप्रमाणें यांना देखील वेळोंवेळीं अचंबा वाटे. पायामधल्या

लुळेपणाव्यतिरिक्त आतां रूझवेल्ट यांची तब्येत विलक्षण निरोगी आणि धडधाकट झालेली होती.

तसं म्हटलं तर अमेरिकेच्या इतर भूतपूर्व राष्ट्राध्यक्षांच्या मानानं फ्रँक-लिन डेलॉनो रूझवेल्ट हे तसे तरुणच होते. व्हाईट हाऊसवर त्यांचा पहिला वाढदिवस साजरा झाला तो बावन्नावा. आपल्या या वाढदिवसानिमित्तानं अधू आणि पांगळ्या मुलांच्यासाठीं आपल्या हातून कांहीं कार्य व्हावं या हेतूनं १९३४ च्या ३० जानेवारीला आपल्या वाढदिवसाचा एक मोठा नृत्य-सोहळा त्यांनीं घडवला. त्या निमित्तानं वॉर्म स्प्रिंग्ज फौंडेशनसाठीं त्यांनीं निधि जमवला, अमेरिकेभर शहरांशहरांतून आणि गांवागांवांतून या दिवशीं असा सोहळा साजरा झाला. असे सहा हजार सोहळे झाले आणि या सहा हजार सोहळ्यांच्या निमित्तानें असे निधि जमवले गेले. यांतल्या व्हाईट हाऊसवरच्या प्रमुख सोहळ्याच्या निमित्तानें 'एफ. डी. आर.' यांनीं अमेरिकन जनतेला उद्देशून नभोवाणीवर एक भाषण केलं. त्यांत ते म्हणाले,

" आपल्याकडील अधू आणि पांगळ्या मुलांच्या प्रश्नांची, त्याच्या पुऱ्या स्वरूपांतल्या आणि संपूर्ण गांभीर्याची गेल्या कांहीं वर्षांतच आपल्याला जाणीव होऊं लागली आहे. आपली कल्पना असेल त्यापेक्षां अशीं अभागी मुलं आपल्या देशांत पुष्कळच अधिक आहेत. कित्येक भागांतून हजारों अधू आणि पांगळ्या मुलांना कोणत्याहि स्वरूपाचं साहाय्य लाभत नाहीं. हीं मुलं अधू आहेत त्यांची दखल देखील डॉक्टरमंडळींना आणि रुग्णोपचार केंद्र चालवणाऱ्या संस्थांना नाहीं... आपल्याला माहीतच आहे की वॉर्म स्प्रिंग्जचं या बाबतींतलं कार्य हें आमचं अत्यंत जिव्हाळ्याचं कार्य आहे. आतांपर्यंत इन्फन्टाईल पॅरॅलिसिसच्या शेंकडों रोग्यांवर इथं यशस्वीरीत्या उपचार करण्यांत आलेले आहेत. आणखी कोणत्याहि व्याधीपेक्षां या इन्फन्टाईल पॅरॅलिसिसच्या रोगानं अधिक प्रमाणांत मुलं आणि मोठीं माणसं अधू आणि पांगळीं होतात ही वस्तुस्थिति आहे. अशा अभागी, व्याधिग्रस्त माणसांना दयार्द्र भावनेनं आणि चिकाटीनं, त्याप्रमाणं कौशल्यपूर्वक जिथं उपचाराचं साह्य दिलं जातं अशा अनेक स्थळांपैकीं वॉर्म स्प्रिंग्ज हें एक प्रमुख स्थळ आहे....आज रात्रीं जम-विण्यांत येत असलेल्या निधीच्या योगानं वॉर्म स्प्रिंग्जला आपलं राष्ट्रीय स्वरूपाचं कार्य पुष्कळच वाढवतां देईल. विशेष करून इन्फन्टाईल पॅरॅलिसिसच्या

क्षेत्रांत हें कार्य वाढवण्याला अजून पुष्कळच वाव आहे...आज रात्रीं आमचा वाढदिवस ज्याप्रकारें देशभर आपण सर्व साजरा करीत आहांत त्याहून संस्मरणीय आणि उजव्या प्रकारें कोणाचाहि वाढदिवस साजरा झाला नसेल. या वाढदिवसाच्या निमित्तानं आम्हांला ही जी वाढदिवसाची भेट आपण देत आहांत तशी भेट कोणालाहि मिळाली नसेल. कृतज्ञतेनं ओथंबणाऱ्या अंतः-करणानं या भेटीचा स्वीकार आम्ही करतों. या भेटीचा लाभ ज्या असंख्य ऋग्णाइतांना होणार आहे. त्यांच्या वतीनें आम्ही आज आपल्यापुढें कृतज्ञ आहोंत. आपल्याविषयींची ही कृतज्ञता व्यक्त करण्यास आमच्याकडं शब्द नाहींत. आम्ही इतकंच सांगतों कीं, हा आमचा वाढदिवस अतीव सुखाचा ठरणार असून आम्हीं तो कधींहि विसरणार नाहीं."

राष्ट्राध्यक्ष झाल्यापासूनचं तें त्यांचं नमोवाणीवरचं पहिलंच भाषण होतं असं मुळींच नव्हे. राष्ट्राध्यक्षपदाची शपथ घेतल्याक्षणापासून, न्यूयॉर्क राज्याच्या गव्हर्नरपदीं असतांनाची त्यांची जुनी पद्धत त्यांनीं नव्यानं अमलांत आणली होती. लोकांपुढच्या एक प्रश्नाविषयीं त्यांच्याशीं प्रत्यक्षपणें बोलणाऱ्या नमोवाणीवरच्या या भाषणांना त्यांनीं संबोधन दिलं, 'शेकोटीपासच्या गप्पा.' राष्ट्राध्यक्षपदाचीं सूत्रें हातीं घेतांच त्यांनीं पहिलं भाषण केलं तें बँकिंगच्या क्षेत्रांतल्या समस्यांविषयीं. हा अत्यंत अवघड विषय त्यांनीं अतिशय सोप्या भाषेत मांडला होता. जुलैमध्यें 'एन. आर. ए.' ची आपली योजना त्यांनीं लोकांना समजावून दिली. १९३४ च्या जानेवारीमध्यें अधू आणि पांगळ्या मुलांच्या साहाय्यासाठीं त्यांनीं राष्ट्राला हांक दिली. आणि हें वर्ष संपण्याच्या-पूर्वीच वॉर्म स्प्रिंग्जची 'मेरीवेदर इन' ची लांकडी इमारत पाडण्यांत येऊन तिथं मुलांसाठीं वसतिगृहाच्या नव्या पक्क्या इमारती बांधण्यांत आल्या. या इमा-रतींना नांवें देण्यांत आलीं. 'क्रेस हॉल' आणि 'बिल्डर्स हॉल'. आतां आगीची भीति संपली, नोकरवर्ग वाढविण्यांत आला, अधिक ऋग्णाइतांची सोय करण्यांत आली.

पोलिओ प्रतिबंधक लस तयार करण्याच्या कामीं संशोधकांनीं एव्हांना बऱ्या-पैकीं प्रगति चालवली होती. विशिष्ट जंतूंमुळें पोलिओ होतो याविषयीं आतां त्यांची खात्री पटली होती. मात्र हे जंतू मायक्रोस्कोपखालीं अद्यापीहि त्यांना दिसूं शकलेले नव्हते. त्याचप्रमाणें एका माणसापासून दुसऱ्या माणसापर्यंत ते

पोंचतात कसे हेंहि अद्यापि कळलेलं नव्हतं. न्यूयॉर्क युनिव्हर्सिटीच्या डॉ. मॅरिस ब्रॉडी यांनीं या रोगाचे जंतू मारणारी लस तयार केली. फिलाडेल्फियाच्या टेंपल युनिव्हर्सिटीचे डॉ. जॉन कोल्मर यांनीं अशाच प्रकारची एक लस तयार केली. तिच्यांत या रोगाचे जिवंत जंतू होते. या क्षेत्रांत संशोधन करणाऱ्या वैद्यकीय तज्ज्ञांमध्यें मेलेल्या जंतूंची लस आणि जिवंत जंतूंची लस या प्रश्नावर मोठा वाद माजून राहिला आणि पुढें कित्येक वर्षें तो चालू होता. परंतु १९३४ आणि १९३५ मध्यें या दोनहि लसींचा चांचणी स्वरूपाचा वापर करून पाहिल्यावर वैद्यकीय व्यावसायिकांनीं असा एकच निष्कर्ष काढला कीं या दोनहि लसी अद्याप उपयोग करण्यायोग्य नव्हत्या. अधिक संशोधनाची गरज होती.

या रोगाची पुरेशी माहिती आपल्याला नाहीं यामुळं या रोगाला बळी पडणाऱ्या मुलांसाठीं आपण कांहींहि करूं शकत नाहीं याची एखाद्या डॉक्टरला किती व्यथा वाटत असेल, त्याची अवस्था केवढी भग्नमनस्क होत असेल, याची पूर्ण जाणीव आपल्याला चाकांच्या खुर्चींत बसून 'एफ. डी आर' यांना येऊं शकत होती. पोलिओचे जंतू आपल्याला दिसूं शकत नाहींत याविषयीं प्रयोगशाळांतल्या संशोधकांना येणारा उद्वेग त्यांना जाणवणारा होता.

ते स्वतः देखील भग्नमनस्कच होते. मंदी कांहीं प्रमाणांत दूर होत होती परंतु तिचा वेग त्यांना हवा होता तसा नव्हता. जागतिक शांततेसाठीं राष्ट्रसंघाच्या जागतिक संघटनेंत अमेरिकेनं सामील होण्याआड अद्यापहि देशांतल्या अलिप्ततावादी शक्ती बऱ्याच प्रबळपणें येत होत्या. जें कांहीं थोडं यश इथं-तिथं मिळत होतं तेवढंच. प्रयोगशाळेंतल्या डॉक्टरांप्रमाणें राष्ट्राध्यक्ष म्हणून आपल्याला देखील समाधान मानून प्रयत्न करीत राहिलं पाहिजे, हें रूझवेल्ट यांना कळून चुकलं होतं.

कारकीर्दीचे कांहीं दिवस उलटतात न उलटतात तोंच अमेरिकेच्या वसाहती आणि इंग्लंड यांच्या दरम्यान शांततेचा तह जाहीर करणाऱ्या जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या न्यूबुकच्या जाहीरनाम्याच्या स्मरणार्थ, त्यांच्या १५० व्या स्मृतिदिनीं, रूझवेल्ट यांनीं विशेष स्वरूपाचीं टपालाचीं तिकिटं घोषित केलीं.

आपण नियुक्त केलेले पोस्ट मास्तर जनरल झिम फार्ले यांना एका पत्रांत त्यांनीं लिहिलं होतं, "माझ्या टपाल तिकिटांच्या मौल्यवान् संग्रहांत माझ्या

पुरतं सर्वांत महत्त्वाचं ऐतिहासिक स्वरूपाचं टपाल तिकिट ' न्यूब्रूक कॉमेमोरेटिव्ह स्टॅम्प ' हेंच असणार आहे. ''

राष्ट्राध्यक्षपदाच्या या पहिल्या कारकीर्दींत त्यांचं अत्यंत गाजलेलं भाषण ' आर्मिस्टिस डे ' च्या निमित्तानं ' आर्लिंगटन नॅशनल सेमेटरी ' इथं केलेलं होतं. स्मशानभूमींत केलेल्या या भाषणांत त्यांनीं म्हटलं होतं. " आपल्या-भोंवतीं मोठमोठ्या भिंती उभारून, वाळूंत डोकं खुपसून राहणाऱ्या शहामृगा-प्रमाणं आपल्याला जगतां येणार नाहीं आणि तसं जगून चालणार नाहीं. जागतिक शांततेसाठीं झगडण्याच्या कामीं आपलं सारं बळ एकवटून आपण पुढं राहिलं पाहिजे.......राष्ट्रांराष्ट्रांत मत्सर आणि हेवेदावे चालूंच आहेत. शस्त्रा-स्त्रांचं उत्पादन वाढत आहे, जागतिक शांततेपेक्षां राष्ट्राच्या आक्रमक महत्वा-कांक्षेला महत्त्व मिळत आहे. '' परंतु या भाषणांत त्यांनींच श्रोत्यांना एक अत्यंत आशादायक बातमी दिली. ही बातमी होती, कॅनडा आणि अमेरिका यांच्या दरम्यान व्यापारविषयक झालेल्या नव्या कराराची. या कराराविषयीं त्यांनीं ह्या भाषणांत म्हटलं होतं. " आम्हीं घालून दिलेलं उदाहरण साऱ्या जगांत एक ना एक दिवशीं पोहोंचेल अशी आम्ही आशा करतों....आम्हीं स्वतः राष्ट्राराष्ट्रांच्या शांततापूर्ण सहजीवनाच्या दृष्टीनं आमच्यापुरता आदर्श निर्माण करून जगाला धडा घालून दिला तर गेल्या कित्येक वर्षांतला महान् देश म्हणून आमचं जें अस्तित्व आहे तें सार्थकीं लागल्यासारखं होईल. ''

● ● ●

# विरोध

जागतिक शांततेची चिंता प्रेसिडेंट रूझवेल्ट यांना लागून राहावी हें अगदीं सहाजिक होतं. युरोपला पुन्हां एकदां मोठ्या शस्त्रागाराचं स्वरूप येऊं लागलं होतं. १९३३ पासून जर्मनीचा चान्सेलर असलेला ॲडॉल्फ हिटलर दिवसागणिक अधिक शक्तिशाली, निर्घृण, आणि लष्करी खाक्याचा बनत होता. तिकडे इटालियन राजेशाहीला बेनिटो मुसोलिनी यांनीं धीम्मेपणानं परंतु निश्चितपणें हुकूमशाहीचं स्वरूप देणं चालवलं होतं. जगाच्या दुसऱ्या बाजूला जपाननं १९३२ पासून चीनविरुद्ध एक मोठी लढाई चालवली होती, चीनचा मॅन्चुरिआ नांवाचा मोठा प्रदेश एव्हांना त्यानं बळकावून देखील टाकला होता. आणि त्याला 'मांचुको' असं नांव दिलं होतं.

१९३३ मध्यें ५४ राष्ट्रांच्या सरकारांना प्रेसिडेंट रूझवेल्ट यांनीं आपला वैयक्तिक संदेश धाडून अनाक्रमणाचा करार करण्याची आणि शस्त्रनिर्मिति कमी करण्याची आवर्जून विनंती केली. जिनेव्हा इथं भरलेल्या साठ राष्ट्रांच्या निःशस्त्रीकरण परिषदेंतून कांहींदेखील निष्पन्न झालं नव्हतं. १९३४ मध्यें अमेरिकेच्या काँग्रेसला पाठवलेल्या संदेशांत 'एफ. डी. आर.' यांनीं जागतिक न्यायालयांत अमेरिकेनंदेखील सहभागी व्हावं असं प्रतिपादलं होतं. परंतु, सीनेटनं हा आदेश धुडकावला. स्वतः 'एफ. डी. आर.' आणि सेक्रेटरी

कॉर्डेल हल यांनीं प्रयत्नांची पराकाष्ठा केली तरीदेखील अमेरिका जागतिक न्यायालयांत सहभागी होऊं शकली नाहीं.

१९३५ मध्यें जर्मनीनं व्हर्सेल्सचा तह उघड उघड पायदळीं तुडवला आणि नवं मोठं सैन्य उभारण्याच्या दृष्टीनं देशांतल्या तरुण माणसांचं सैनिकीकरण आरंभलं. त्याच वर्षी इटालीनं युथोपियांत कांहींतरी खुसपट काढून लष्करी आक्रमण सुरू केलं. पुढल्या कांहीं दिवसांतच युथोपिया इटालीच्या भक्ष्यस्थानीं पडला आणि इटालीची वसाहत बनला.

हें सारंच दृश्य वृत्ती झांकोळून टाकणारं होतं. देशांतली परिस्थितीदेखील असावी तितकी आशादायक अद्याप नव्हती. मंदी अद्यापीहि आटोक्यांत आलेली नव्हती. अद्याप देशांत लाखों बेकारांचे तांडे अन्नाविना फिरत होतेच.

१९३५ च्या आरंभीं प्रेसिडेंट रूझवेल्ट, त्यांचे मंत्री आणि त्यांच्या भोंवतालच्या तज्ज्ञांची प्रभावळ यांनीं मिळून या बेकारीवर उपाययोजना करणारं एक बिल तयार केलं आणि काँग्रेसनं तें मंजूर केलं. या बिलाच्या अंमलबजाणीनं जवळ जवळ ४५ लाख लोकांना रोजगार उपलब्ध होणार होते. एकूण पन्नास वेगवेगळ्या यंत्रणांमार्फत ही योजना कार्यान्वित होणार होती. आणि यांतली पुढं नांवारूपाला आलेली 'वर्क्स प्रोग्रेस ॲडमिनिस्ट्रेशन' ही होय. हिचं नेतृत्व हॅरी हॉपकिन्स यांच्याकडं होतं. हिच्याइतकीच नांवारूपाला आलेली दुसरी यंत्रणा 'पब्लिक वर्क्स ॲडमिनिस्ट्रेशन'. हिच्या नेतृत्वपदीं हॅरोल्ड आइक्स होते. तितक्याच लोकप्रिय झालेल्या आणखी दोन यंत्रणा म्हणजे 'नॅशनल यूथ ॲडमिनिस्ट्रेशन' आणि 'रूरल इलेक्ट्रिफिकेशन ॲडमिनिस्ट्रेशन.'

यांपैकीं यूथ ॲडमिनिस्ट्रेशनच्याद्वारें ऑब्रे विल्यम्स यांच्या नेतृत्वाखालीं दुय्यम शाळांतल्या आणि कॉलेजांतल्या विद्यार्थ्यांना अर्धवेळचे रोजगार उपलब्ध करून देण्यांत येत होते. यामुळें या विद्यार्थ्यांना आपलीं शिक्षणं चालू ठेवतां येणार होतीं, त्याचप्रमाणं शाळां कॉलेजांत जाणाऱ्या निरुद्योगी तरुणांना या योजनेअन्वयें वेगवेगळ्या व्यवसायांचं शिक्षण आणि तें पूर्ण झाल्यावर त्या व्यवसायांत रोजगार पुरवण्यांत येणार होता. वंश अगर वर्ण यांचा विचार न करतां प्रत्येकाला साहाय्य मिळेल अशा प्रकारेंच सरकारी मदतीचा कार्यक्रम आंखण्यांत यावा हा रूझवेल्ट यांचा सतत आग्रह होता. नॅशनल यूथ ॲड

मिनिस्ट्रेशन या संघटनेच्या नीग्रो विभागाच्या प्रमुखपदीं अत्यंत चैतन्यदायी व्यक्तिमत्त्वाच्या मेरी मॅकलिऑड वेथ्यून यांची नियुक्ति रूझवेल्ट यांनीं केली.

१९३५ च्या ११ मेला, वॉर्म स्प्रिंग्जच्या आपल्या 'लिट्ल व्हाइट हाऊस' मध्यें टेबलाशीं बसून रूझवेल्ट यांनीं खेडोंपाडीं वीज नेणाऱ्या ७०३७ क्रमांकाच्या आज्ञेवर सही केली. या योजनेनं बेकारांना केवळ उद्योग लाभणार होते एवढेंच नव्हे, तर खेड्यापाड्यांतील विजेची महागाई कमी होणार होती. आणि अद्याप वीज उपलब्ध नसलेल्या जागीं वीज पोंचणार होती.

त्याच वर्षाच्या उन्हाळ्यांत वॅग्नर लेबर रिलेशन्स ॲक्ट हा मजूरसंबंधविषयक कायदा, आणि सोशल सिक्युरिटी ॲक्ट कायदा अशा दोन कायद्यांच्यावर रूझवेल्ट यांनीं सह्या केल्या.

आपण कार्यान्वित करीत असलेल्या अनेक योजनांनीं आणि प्रयोगांनीं अमेरिकेची आर्थिक घडी सुधारत आहे असं लक्षांत येऊं लागतांच अधिकाधिक उत्तेजित होऊन अश्वगतीनं आतां राष्ट्राध्यक्ष रूझवेल्ट आणि त्यांची काँग्रेस यांनीं एक उपाययोजना निर्माण करण्याचा आणि तिची अंमलबजावणी करण्याचा सपाटा लावला. आणि मध्येंच बेफाम अश्वाला लगाम लावावा त्याप्रमाणं या गतीला एकाएकीं करकचून लगाम बसला. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयानं 'नॅशनल यूथ ॲडमिनिस्ट्रेशन' ही यंत्रणाच एकमतानं घटनाबाह्य ठरवली! त्यापूर्वीं कांहीं दिवसच या यंत्रणेच्या एका विभागाबाबत न्यायालयाने या प्रकारचा निर्णय दिलेला होता, परंतु या नव्या निर्णयानं ही सारी योजनाच संपुष्टांत आली. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयानं असं जाहीर केलं कीं, राष्ट्राध्यक्षाला एवढे अधिकार सुपूर्द करण्याचा हक्क काँग्रेसला नाहीं. त्याचप्रमाणें उद्योगधंद्यांचं नियंत्रण करण्याचा एवढा मोठा अधिकार फेडरल सरकारलादेखील नाहीं.

'एफ. डी आर.' यांना मनस्वीं धक्का बसला. या एका निर्णयानं त्यांच्या न्यू डीलच्या कार्यक्रमाचा सर्वांत महत्त्वाचा भागच जमीनदोस्त झाला होता. बेकारी घालवावी, कामाच्या तासांवर नियंत्रण यावं, आणि कारखान्यांमधून लहान मुलांचा वापर नाहींसा व्हावा यासाठीं सदिच्छापूर्वक त्यांनीं अमलांत आणलेल्या योजना मातीमोल झाल्या.

अमेरिकेची राज्ययंत्रणा तिहेरी स्वरूपाची असल्याचं सर्वोच्च न्यायालयानं

त्यांना बजावलं होतं. या राज्ययंत्रणेचा कायदा करणारा विभाग होता काँग्रेस हा. हे कायदे कार्यान्वित करणारा विभाग होता राष्ट्राध्यक्ष आणि त्यांचं राज्य-यंत्र हा त्याचा तिसरा महत्त्वाचा विभाग होता न्यायालयं. करण्यांत आलेल्या कायद्यांची इष्टता आणि त्यांचा भंग याविषयीं निर्णय देण्याचा अधिकार या विभागाला होता. यांतल्या प्रत्येक विभागाची योजना इतर दोन दोन विभागांच्या कार्यावर नियंत्रण ठेवण्यासाठीं होती. या तिघांचा मिळून एक समतोल अपेक्षित होता. यांतल्या कोणत्याहि एका विभागानं अगर व्यक्तीनं राज्याचं शासन पूर्णतया आपल्या हातीं घेऊं नये या दृष्टीनं ही व्यवस्था होती.

अमेरिकेला 'एफ. डी. आर.' यांच्यापूर्वी इतका धडाडीचा आणि आक्रमक व्यक्तिमत्त्वाचा शासक बहुश: लाभलेला नव्हता. राष्ट्राध्यक्षपदावरच्या व्यक्तीला पूर्वी कधींहि प्राप्त झालेलं नव्हतं असं महत्त्व रूझवेल्ट यांच्या कार-कीर्दीत त्यांना प्राप्त झालं होतं. रूझवेल्ट हे जरूर त्याहून अधिक प्रमाणांत आपल्या वैयक्तिक सामर्थ्याचं प्रदर्शन करीत आहेत असा त्यांच्यावर कांहींचा आरोपदेखील होता.

वृत्तपत्र-प्रतिनिधींच्या परिषदांत या मंडळींना 'एफ. डी. आर.' हे मोठे मनमिळाऊ, दिलदार, खेळकर, आणि विनोदी वाटत आले होते. उत्तर द्यायचं नसे असे प्रश्न ते जागच्या जागीं एखाद्या विनोदपूर्ण उद्गारानं हलकेंच वाटेला लावीत. 'एन्. आर. ए.' विषयींचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आपल्याला कसा काय वाटला ?" या एका पत्रप्रतिनिधीच्या प्रश्नावर त्यांनीं उत्तर केलं, "काय सांगावं ! हे लोक अद्याप गाडीघोड्याच्या युगां-तच जगत आहेत !" हें खरंच होतं कीं या न्यायमूर्तींपैकीं बहुतेक सारे आयुष्याची सत्तरी ओलांडलेले होते. परंतु यांतले न्यायमूर्ति ओवेन जे. रॉबर्टस हे मात्र फक्त साठीच्या वयाचे होते. त्याचप्रमाणं म्हातारपण आणि प्रतिगामी विचार किंवा कल्पना यांची पक्की सांगड घालणं देखील कांहींसं अन्यायाचं होतं. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींत सर्वांत उदारमतवादी होते ते न्यायमूर्ति लुई ब्रॅंटिस आणि वयानं बरोबरीच्या सर्वांत ते वृद्ध होते.

सर्वोच्च न्यायालयांत आतां सरकारी कायद्यांना आव्हान देणाऱ्या अधिका-धिक 'टेस्ट केसेस' येऊं लागल्या आणि रूझवेल्ट यांच्या 'न्यूडील' च्या कार्यक्रमाविरुद्ध वारंवार न्यायालयांचा कौल जाऊं लागला. अत्यंत वादाचा

विषय ठरलेल्या ‘ए. ए. ए.’ सरकारी यंत्रणेविरुद्ध न्यायालयानं निर्णय दिला, परंतु त्याचबरोबर या निर्णयाच्या पाठोपाठ ‘टी. व्ही. ए.’ योजनेचा पुरस्कार करणारा निर्णय न्यायालयाकडून आला आणि या एका योजनेविरुद्ध वेंडेल विल्की यांनीं दिलेली प्रदीर्घ झुंज संपुष्टांत आली.

या दोन न्यायालयीन निर्णयांमुळं कॉंग्रेसनं अधिकाधिक स्वतंत्र दृष्टिकोन घेण्याला आरंभ केला. विरोधकांनीं मारलेला “रबर स्टॅम्प कॉंग्रेस” हा शिक्का आपल्याला अमान्य आहे असं या कॉंग्रेसनं आतां निश्चितपणें सिद्ध करण्याला आरंभ केला. यानंतर आपला कार्यक्रम पुढं रेटणं सोपं नाहीं, त्या मार्गांत आतां पदोपदीं विरोध येणार हें ‘एफ. डी. आर.’ यांना समजून चुकलं. त्यांच्या दृष्टीनं १९३६ सालांतली निवडणूक आणि तिच्यासाठीं व्हायचा प्रचार हेंहि फार महत्त्वाचं कार्य होतं. आजपर्यंत या कामीं त्यांचा उजवा हात म्हणून काम करणारा त्यांचा स्नेही, लुई हौ, या खेपेला असणार नव्हता. प्रदीर्घ आजारानंतर नुकतंच त्याचं निधन घडलं होतं आणि त्याची जागा घेऊं शकेल असा अन्य कोणीही दृष्टिपथांत नव्हता.

पक्षानं रूझवेल्ट यांचीच निवड पुन्हां एकदां केली. जिम फार्ले यांची नियुक्ति प्रचाराच्या आघाडीवर झाली आणि राष्ट्राच्या कानाकोपऱ्यांपर्यंत रूझवेल्ट आणि त्यांचे पुरस्कर्ते धूमधडाक्यानं पोंचूं लागले. श्रोत्यांना लुब्ध करणारीं, हलवून टाकणारीं अनेक भाषणं या निमित्तानं ‘एफ. डी. आर.’ यांनीं नभोवाणीवरून केलीं. यांतल्या एका भाषणांत त्यांनीं म्हटलं होतं, “राष्ट्राच्या या धांवत्या दौऱ्यांत आम्ही शेतकऱ्यांबरोबर बोललों, खाणकामगारांशीं गोष्टी केल्या, कारखान्यांतल्या कामगारांशीं हितगुज केलं, आणि या बोलण्यांतून एकच सत्य आम्हांला सातत्यानं प्रतीत झालेलं आहे कीं, हीं सारीं माणसं म्हणजे एकाच एकसंध मोठ्या गोष्टींचे घटक आहेत, आणि या गोष्टीच्या एखाद्या घटकाला आर्थिक स्थैर्याच्या बाबतींत अपयश येत असतांना उरलेले घटक या बाबतींत यशस्वी होतील असं मला वाटत नाहीं...बँकांमध्यें आपली ठेव आहे काय? इतिहासांत कधींहि नव्हती इतकी तिथं ती सुरक्षित आहे...आपण उद्योगधंद्यांत पैसे गुंतवीत आहांत काय? त्यांची हमी आणि त्यावरल्या पुरेशा कायद्याची हमी आपल्याला आज मिळूं शकते. आपण व्यापारी आहांत काय? आपल्या ग्राहकांची क्रयशक्ति आज वाढलेली आहे.

खेडोंपाडींचे आणि शेतीवाड्यांवरचे आपले ग्राहक आर्थिकदृष्ट्या आज अधिक स्थिर आणि कमी कर्जबाजारी आहेत. आपल्या शहरांतल्या ग्राहकांना आज अधिक प्रमाणांत आणि अधिक स्थिर स्वरूपाचे रोजगार उपलब्ध आहेत... आपण उद्योगधंद्यांत काम करतां काय ? या क्षेत्रांतल्या आजच्या मिळकती गेल्या चार, सहा किंवा सात देखील वर्षांत झाल्या नसतील एवढ्या मोठ्या आहेत. आज दिवाळीं निघण्याचं प्रमाण आणखी कमी झालेलं आढळतं."

रिपब्लिकन पक्षानं 'एफ. डी. आर.' यांच्याविरुद्ध उमेदवार म्हणून गव्हर्नर आल्फ्रेड एफ. लॅन्डन यांची निवड केली होती. हे कॅन्सासचे. रूझवेल्ट यांच्या न्यू डीलच्या कार्यक्रमांविरुद्ध रिपब्लिकनांनीं आपल्या प्रचारांत धडाकून तोफा डागायला सुरुवात केली. रूझवेल्ट यांनीं निर्माण केलेल्या यंत्रणांना सी. डब्ल्यू. ए., सी. टी. व्ही. ए., एन. आर. ए., ए. ए. ए., पी. डब्ल्यू. ए., डब्ल्यू. पी. ए., एन. वाय. ए. 'आल्फाबेट सूप,' 'मुळाक्षरांचा रस्सा,' असं कुत्सित संबोधन त्यांनी दिलं. या योजना म्हणजे एक मोठा पायघोळ घोळ होय असं त्यांनीं जाहीर केलं. या यंत्रणांचा गैरफायदा घेण्याची प्रवृत्ति देशभर अमेरिकनांमध्यें निर्माण होत असल्याचं त्यांनीं सांगण्याला सुरुवात केली. आणि वस्तुस्थिति अशी नव्हतीच असं नव्हे. केवळ पगारावर लक्ष ठेवून या योजनांमध्यें अधिकारपदं व्यापणारीं आणि कामाचा बहाणा करणारीं कामचुकार माणसं जाणवण्याइतपत होतीं. या यंत्रणान्वयें अशा अनेक योजना सुरू करण्यांत आल्या होत्या कीं ज्या कधीं पुऱ्या करण्यांत आल्याच नाहींत. या यंत्रणांचा दुरुपयोग करून घेण्याची प्रवृत्ति वाढत होती. उधळपट्टी आणि सावळागोंधळ यांचाहि आढळ कुठं कुठं होत होता.

परंतु एकंदरीनं या योजना देशाच्या हिताच्याच ठरल्या होत्या हें सत्य, लॅन्डन यांना नाकारतां आलं नाहीं. देशभरच्या मतदारांतल्या 'एफ. डी. आर.' यांच्या तुफान लोकप्रियतेशीं त्यांची बरोबरी होऊं शकली नाहीं. ऑक्टोबरच्या मध्याला 'एफ. डी. आर.' यांची प्रचारगाडी शिकागोला पोंचली तेव्हां रेल्वे स्टेशनांत हजारोंचा जमाव स्वागतार्थ खेंचाखेंच करून जमलेला होता. शहरांतल्या क्रीडांगणावर त्यांचं भाषण ऐकण्याला जवळ जवळ पांच लाख लोकांची गर्दी उसळली होती.

न्यूयॉर्कला ते परतले आणि प्रचार मोहिमेंतलं आपलं अखेरचं सर्वांत संस्मरणीय असं भाषण त्यांनीं मॅडिसन स्क्वेअर गार्डन इथं केलं.

या भाषणासंबंधानं त्यांचा सहकारी असलेला सॅम्युअल रोझेनमान याला ते अगाऊ म्हणाले होते, " या अखेरच्या भाषणांत मोकळ्या हातांनीं हल्ला चढवतोंय. "

याचा अर्थ काय तें मिस्टर रोझेनमान यांना समजलं होतं.

त्या रात्रीं व्यासपीठावर ' एफ. डी. आर. ' यांनीं झटक्यानं पायाचे टेकू सरळ करून स्वतःला उभं केलं, भाषणाच्या जागेपर्यंत ते थेट चालत गेले आणि मस्तक उन्नत, हनुवटी आक्रमकपणें वर, अशा पवित्र्यांत त्यांनीं बोलण्याला सुरुवात केली. त्यांच्या वक्तृत्वाला अशी धार यापूर्वी कधींच चढली नव्हती. ते म्हणाले, " गेलीं चार वर्षें हें सरकार आपल्यापुढं आहे. बोटं मोडण्यापेक्षां त्यानं बाह्या वर सारल्या आणि प्रत्यक्ष काम केलं. या वर सारलेल्या बाह्या यानंतरहि आम्ही तशाच ठेवणार आहोंत....कारखान्यांतल्या कामाच्या परिस्थितींत सुधारणा करण्यासाठीं आम्ही यानंतरहि प्रयत्न करूंच करूं–कामगारांचे कामाचे तास कमी झाले पाहिजेत, उपासमार करणाऱ्या त्यांच्या मजुरीचे दर वाढले पाहिजेत. कारखान्यांत काम करणारीं कोवळीं मुलं कारखान्यांतून नाहींशीं झालीं पाहिजेत. व्यापारधंदे मूठभरांच्या हातांत जाऊं देण्याविरुद्ध आम्ही यानंतरहि निर्धारानं झगडतच राहूं. यासाठीं व्यापार-क्षेत्रांत ' कलेक्टिव्ह बारगेनिंग ' चा पुरस्कार आम्ही करूं, गळेकापू स्पर्धा थांबविण्याचा आम्ही प्रयत्न करूं. कोणत्याहि धंद्याला आणि माणुसकीला काळीमा लावणाऱ्या व्यापारधंद्यांतल्या प्रवृत्ती मोडून काढण्यासाठीं आम्ही आमची शिकस्त करूं. ही आमची लढाई आतां तर केवळ सुरू झाली आहे. आतांच तिला तोंड लागलं आहे. "

मॅडिसन स्क्वेअर गार्डन इथं प्रचाराचं शेवटचं भाषण करून ' एफ. डी. आर. ' मतदानासाठीं हाईड पार्कला परतले. त्यानंतर आपला परिवार आणि आपले शेजारी यांच्यांत राहून निवडणुकीच्या निकालाची प्रतीक्षा ते करूं लागले. घरीं या निमित्तानं सुमारें पन्नास आप्त जमले होते. या सर्वांसाठीं एलेनॉर रूझवेल्ट यांनीं थाटाची मेजवानी योजली होती. मतदानांचे आरंभीचे निकाल जाहीर होऊं लागल्यापासूनच ' एफ. डी. आर. ' यांना कळून चुकलं

होतं कीं दणदणीत बहुमतानंच आपण निवडून येणार. क्रमशः त्यांचं बहुमत वाढू लागलं. इतकं वाढत गेलं कीं, त्यांचं त्यांनाच तें स्वप्न वाटत होतं. यांत अखेरच्या निकालांत अमेरिकेच्या इतिहासांत कोणालाहि लाभलं नसेल असं प्रचंड बहुमत मिळवून ते निवडून आले. मेन आणि व्हरमॉन्ट एवढींच राज्यं सोडून बाकी साऱ्या राज्यांतून त्यांची प्रचंड सरशी झाली होती. अखेरीचा निकाल ऐकून, सिगारेटच्या धुराचा एक मोठा भपकारा हवेंत सोडून ते गरजले " वॉ–व् ! "

वृत्तपत्र-प्रतिनिधींनीं या विजयाला संबोधन दिलं, " १९३६ चा अपूर्व झंझावात. "

बाकी कोणाचं तर सोडाच पण या खेपेला रूझवेल्ट यांचे भूतपूर्व गुरुजी, ग्रोटोनचे एण्डिकॉट पीबॉडी यांनींदेखील या आपल्या शिष्याच्या बाजूनं प्रथमच आपलं मत टाकलं होतं.

सूत्रं हातीं घेण्याच्या वेळच्या आपल्या भाषणांत रूझवेल्ट म्हणाले, ' अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष म्हणून पुन्हां एकदां शपथ घेतांना', मला निवडून देऊन अमेरिकन जनतेनं ज्या कार्यक्रमाला एक प्रकारें मान्यता दिली आहे, तो कार्यक्रम पुढं रेटण्यासाठीं मी शिकस्त करीन, अशी प्रतिज्ञा मी घेतों. "

झालं एकच कीं, आत्मविश्वासांतून आत्मविश्वासाचा अतिरेक निर्माण झाला. आणि या भाषणानंतर अल्प काळांतच रूझवेल्ट यांनीं त्यांच्या ' न्यू डील 'च्या कार्यक्रमांतले अनेक विभाग एकापाठोपाठ रद्दबादल ठरविण्याऱ्या सर्वोच्च न्यायालयाविरुद्ध आपली नापसंती उघड उघड दाखवण्याला सुरुवात केली.

तसं म्हटलं तर प्रत्येक माणसांत दोन प्रवृत्ती एकाच वेळी नांदत असतात. एक प्रवृत्ति सुंदर असते तर दुसरी कुरूप असते. ' एफ. डी. आर. , याला अपवाद नव्हते. त्यांच्या शारीरिक लुळेपणानं त्यांची सुंदर प्रवृत्ति अधिकच सुंदर बनली होती; त्याचप्रमाणं कुरुप प्रवृत्ति अधिक कुरूप झालेली होती. या प्रवृत्तींना विरोध म्हणून खपत नव्हता. विरोधाचं, अडथळ्यांचं, तिला वावडं होतं. आपल्या पांगळेपणानं आपल्याला चालतां येत नाहीं, आपल्याला कित्येक गोष्टींसाठीं इतरांवर अवलंबून रहावं लागतं, या बोचणाऱ्या जाणिवांतून कामगारांतला असंतोष आणि देशांतली मंदी यांविषयीं आपण मनांतलं सारं

करूं शकत नाहीं या वस्तुस्थितीविषयींची तीव्र चीड जन्माला आली. खरं म्हणजे नुकतांच सर्वोच्च न्यायालयानें रूझवेल्ट यांच्या कारकीर्दीला ' सोशल सिक्युरिटी ॲक्ट ' उचलून धरला होता, परंतु रूझवेल्ट यांचं समाधान यानं झालेलं नव्हतं.

आतां कोणाचाहि सल्ला न घेतां अत्यंत गुप्तपणानं कॉंग्रेसला उद्देशून एक आदेश त्यांनीं तयार केला. तो कॉंग्रेसपुढं सादर व्हायचा त्या दिवशींच सकाळीं आपल्या मंत्रिमंडळाची एक बैठक त्यांनीं बोलावली. दोनहि गृहांच्या म्होरक्यांना त्यांनीं त्या बैठकीला बोलावून आणलं आणि त्या सर्वांपुढं तो आदेश वाचून दाखवला. अमेरिकेच्या वरिष्ठ न्यायालयांत पुनर्रचना आणि सुधारणा करण्याचा मनसुबा त्यांनीं या आदेशांत व्यक्त केला होता. परंतु या आदेशाचा मुख्य रोख सर्वोच्च न्यायालयावरच होता. सर्वोच्च न्यायालयांतल्या सर्व न्यायमूर्तींनीं सत्तराव्या वर्षानंतर सहा महिन्यांच्या आंत निवृत्त झालं पाहिजे असं या आदेशांत सुचवण्यांत आलं होतं. सत्तरी ओलांडलेल्या न्यायमूर्तींनीं निवृत्त झालं पाहिजे एवढंच म्हणून रूझवेल्ट थांबले नाहींत. अशा निवृत्त्या एका वेळीं झाल्यास, नवे न्यायमूर्ति—एका वेळीं जास्तींत जास्त सहा न्यायमूर्ती—नियुक्त करण्याचा अधिकार राष्ट्राध्यक्षांना असावा, असहि या आदेशांत म्हटलं होतं. याप्रकारें कायदा होतांच, एका वेळीं आपल्याला अनुकूल असे सहा न्यायमूर्ति सर्वोच्च न्यायालयांत नेऊन बसवणं रूझवेल्ट यांना शक्य होणार होतं, कारण आतांच्या या न्यायालयांतील नऊ न्यायमूर्तींपैकीं किमान सहा न्यायमूर्ती सत्तरी ओलांडलेलेच होते.

जमलेल्या मंडळींतले सारे सुन्न होऊन हें ऐकत राहिले. राष्ट्राध्यक्षांचा हा आदेश म्हणजे एका मोठ्या हुकूमशाहीची तर सूचना नव्हती ? आपण मांडतों आहोंत तें बिल केवढं धोक्याचे आहे हें वास्तविक त्यांना कळायला हवं होतं. या एवढ्या महत्त्वाच्या सूचनासंबंधानं अधिक काळ घेऊन आणि अधिक काळजीपूर्वक खल करण्याची संधि त्यांना राष्ट्राध्यक्षांनीं कां बरं नाकारली ?

थोड्या काळांतच झाडून साऱ्या वर्तमानपत्रांतून या आदेशाला प्रसिद्धि मिळाली. ' सर्वोच्च न्यायालयांत सुधारणा करण्याच्या अधिकाराची राष्ट्राध्यक्षांची मागणी, ' अशीं शीर्षकं या बातमीला देण्यांत आलीं. आणि वृत्तपत्र-प्रतिनिधींनीं हर्बर्ट हूवर यांची मुलाखत जेव्हां या संबंधांत घेतली, तेव्हां त्यांनीं

या योजनेचं वर्णन ' न्यायालयांचा गाशा गुंडाळण्याची योजना ' असं केलं. परराष्ट्र खात्याचे मंत्री कॉर्डेल हल आणि मजूर खात्याचे मंत्री फ्रॅन्सिस पर्किन्स या दोघांचाहि या योजनेला विरोध होता; परंतु जाहीरपणें राष्ट्राध्यक्षांविरुद्ध कांहीं म्हणून अवघड परिस्थिति निर्माण करण्याची त्यांची इच्छा नव्हती. त्यांची अवस्था या प्रकारानं फारच बिकट करून टाकली होती. आणि न्यूयॉर्क राज्याचे गव्हर्नर हर्बर्ट लेहमन यांनीं तर या योजनेविरुध्द उघड पुकाराच केला.

क्रमशः देशभर या योजनेविरुध्द वादळ उभं राहिलं. देशांतील सर्वांत माननीय यंत्रणा हें सर्वोच्च न्यायालयाचं अमेरिकेंतलं तोंवरचं स्थान. घटनेचं संरक्षण करण्याची जबाबदारी या न्यायासनावर. अशा परिस्थितींत राष्ट्राध्यक्षांची ही योजना भयावह होती. कायदेविषयक तज्ज्ञ, इतिहास-संशोधक, सरकारी प्रवक्ते, अशा सर्वांनीं या योजनेबाबत नभोवाणीवरून भाषणं केलीं, लेख लिहिले, हजारों मतदारांचीं या योजनेला प्रखर विरोध दाखवणारीं पत्रं कॉन्ग्रेस प्रतिनिधीकडं दररोज येऊं लागलीं.

या योजनेमागच्या आपल्या सदिच्छा लोकांना समजावून सांगण्यासाठीं नभोवाणीवरचं एक भाषण राष्ट्राध्यक्षांनीं खर्चीं घातलं. त्यांत ते म्हणाले, " मंदी अद्याप आटोक्यांत आलेली नाहीं. राष्ट्राचा जवळ जवळ एक तृतियांश भाग अद्यापीहि अन्न, वस्त्र, आणि निवारा या बाबतींत दुरावस्थेंत खितपत आहे. हे प्रश्न सोडवायाचे तर राष्ट्रीय स्वरूपाचे अधिकाधिक कायदे मंजूर करून घेणं आवश्यक आहे. या आमच्या योजनेंत नवीन किंवा अपूर्व असं कांहींहि नाहीं. अनेक राज्यांतल्या कायद्यांतून, सिव्हिल सर्व्हिसच्या नियमांतून, लष्कराच्या आणि आरमाराच्या दंडकांमध्यें, इतकंच नव्हे तर विश्वविद्यालयांमध्यें देखील सत्तरावं वर्ष किंवा त्याहूनहि कमी वयोमान हें निवृत्तीचं मानलं आहे. मोठमोठाल्या खाजगी उद्योगधंद्यांनादेखील निवृत्तीची वयोमर्यादा अभिप्रेत आहे. "

राष्ट्राध्यक्षांनीं मांडलेलं हें बिल प्रत्येक गृहाच्या कायदेविषयक समितीपुढं मांडण्यांत आलं आणि सीनेटच्या अशा समितीनं या बिलाबाबतचं आपलं कामकाज मार्च महिन्यांत जाहीर स्वरूपांत सुरू केलं. कित्येक वकील, न्यायाधीश, कॉंग्रेसचे प्रतिनिधि, कामगारनेते, व्यापारी क्षेत्रांतील मोठमोठीं माणसं,

यांच्या साक्षी कित्येक आठवडेपर्यंत या समितीसमोर चालू होत्या. 'एफ. डी. आर.' यांच्याशीं आजवर एकनिष्ठ राहिलेलीं कित्येक माणसं या योजनेमुळं त्यांना दुरावलीं, त्यांच्याविरुद्ध दंड ठोकून उभीं झालीं. रेमंड मोले, हे त्यांतले एक. त्यांनीं जाहीरपणें या बिलाला आपला विरोध बोलून दाखवला. त्यांच्या-प्रमाणेंच मॉण्टानाचे बर्टन के. व्हीलर आणि व्हर्जिनियाचे कार्टर ग्लास यांनींहि आपला विरोध जाहीर केला. चीफ जस्टीस ह्यूजे यांनीं या बिलाबाबत निषेध व्यक्त करणारं एक पत्र समितीकडे पाठवलं.

पुढें कित्येक महिनेंपर्यंत ही सुनावणी चालली होती. या बिलाच्या निमित्तानें जेवढी चर्चा, जेवढा विचार आणि जेवढा वाद अमेरिकेंत झाला तेवढा अन्य कोणत्याहि राष्ट्रीय प्रश्नावरून झाला नसेल. पुन्हां पुन्हां या बिलासंबंधानं तडजोडीच्या योजना राष्ट्राध्यक्षांपुढें मांडण्यांत आल्या. क्रमशः परंतु निश्चितपणें या बिलाविरुद्ध दोनहि ग्रहांमधून बहुमत वाढत होतं.

तिकडे सर्वोच्च न्यायालयानें आपलं कामकाज नेहमींप्रमाणें चालूच ठेवलं होतं. एप्रिलमध्यें रूझवेल्ट यांच्या कार्यक्रमांतल्या 'वॅग्नर लेबर रिलेशन्स ॲक्ट' चा त्यांनीं पुरस्कार केला. याचा अर्थ उघडपणें असा होता कीं, रूझवेल्ट यांच्या 'न्यू डीलच्या' कार्यक्रमाविरुद्ध या न्यायालयाचा कोणताहि आकस नव्हता. जुलैमध्यें या न्यायालयाचे सर्वांत वयोवृद्ध जस्टिस विलिस व्हॅन डिव्हँटर हे अष्ठ्याहत्तर वर्षांचे झाले होते आणि आपण होऊन त्यांनीं आपली निवृत्ति जाहीर केली. यामुळें आपल्याला अनुकूल अशा नव्या न्याय-मूर्तींची नियुक्ति त्यांच्या जागीं करण्याला राष्ट्राध्यक्षांना त्या वेळीं आपोआपच संधि लाभली. याप्रकारच्या आणखीहि संधी त्यांना मिळणार होत्या. ऑगस्ट-मध्यें कॉंग्रेसचं अधिवेशन स्थगित झालं आणि या बिलाच्या निमित्तानें देशभर उभ्या राहिलेल्या एका मोठ्या वादंगाचा शेवट झाला.

पुढं डोकीं थंड झालीं. उलट सुलट आरोपांचा धुराळा खालीं बसला, आणि या बिलाच्या विरोधकांना हळूहळू असं वाटूं लागलं कीं, एकंदरीनं प्रेसिडेंट रूझवेल्ट यांचा अमेरिकेच्या सरकारचं लोकशाही स्वरूप नष्ट करण्याचा हेतु होता असं नव्हे, तर पुढच्या एखाद्या राष्ट्राध्यक्षाला अशा प्रकारचं कांहीं करतां येईल अशा प्रकारचा वाव निर्माण करण्याचा असमंजसपणा मात्र त्यांच्या हातून घडत गेला.

इतर अधिक महत्त्वाच्या प्रश्नांनीं जनतेचं मन व्यापून टाकलं. कामगारांचे मोठमोठे संप चालू होते, असंतोष वाढत होता. या निमित्तानं कांहीं दंगे देखील झाले.

या सुमाराला आपल्या 'एन्. आर. ए.' च्या यंत्रणंत अभिप्रेत असलेलीं किमान वेतनं, कामाचे मर्यादित तास, इत्यादिविषयक उपाययोजना वेगळ्या पद्धतीनं अमलांत आणण्याची खटपट 'एफ. डी. आर.' यांनीं चालवली होती. परंतु त्या वेळींच कॉंग्रेसचं अधिवेशन संपत होतं आणि त्यांना ती मंजूर करून घेतां आली नाहीं.

तथापि, प्रयत्न सोडून देण्याची त्यांची तिळमात्र इच्छा नव्हती. देशभर या संबंधीं काय परिस्थिति आहे याचा अभ्यास जातीनं करण्यासाठीं त्यांनीं अमेरिकेचा एक दौरा केला. १९३७ मध्यें व्यापारांत मंदी आली आणि वॉशिंग्टनमध्यें परतल्याबरोबर 'एफ. डी. आर.' यांनीं कॉंग्रेसचं विशेष अधिवेशन बोलावून या संबंधांत काय केलं पाहिजे त्याची आपण आंखलेली रूपरेखा कॉंग्रेससमोर मांडली. वेतन आणि कामाचे तासविषयक बिल हा या उपाययोजनेचा एक भाग होता. दुसरा भाग धान्याचे सांठे वाढवल्यानं धान्याच्या किंमती खालीं येऊं नयेत यासाठीं पीकनियंत्रणविषयक कायदा संमत करणं, बेकारीची संख्या वाढली होती त्याचाहि विचार व्हायला हवा होता. त्याचप्रमाणें मोठमोठे व्यापारी ट्रस्टस् आणि कंपन्या यांच्या व्यवहारांवर सरकारची अधिक देखरेख राहण्याची आवश्यकता भासत होती. त्याहि दृष्टीनें सरकारनं कांहीं करावं अशी त्यांची अपेक्षा होती.

अद्यापीहि एका वेळीं अनेक कामं सांभाळूं शकेल, अनेक विचार करूं शकेल असा प्रेसिडेंट रूझवेल्ट यांचा वकूब होता. जागतिक परिस्थितीचं ते निरीक्षण करीत होते आणि शिकागोच्या "औटर ड्राइव्ह ब्रिज" च्या उद्घाटनप्रसंगी भाषण करण्यासाठीं त्यांना पाचारण करण्यांत आलं तेव्हां या भाषणांत आक्रमक राष्ट्रांवर बहिष्कार टाकण्यांत यावा अशी मागणी त्यांनी केली. ते म्हणाले, "आंतरराष्ट्रीय कायद्याचा आणि सुव्यवस्थेचा भंग करूं बघणाऱ्या दहा टक्के राष्ट्रांकडून उरलेल्या नव्वद टक्के राष्ट्रांतल्यांतल्या माणसांना कायद्याच्या राज्यांत शांततेनं जगायचं आहे. शतकानुशतकं जगन्मान्य पावलेल्या नैतिक मूल्यांवर निष्ठा ठेवून आपली भरभराट साधायची आहे.

त्यांना एक ना एक मार्गानं हें साध्य करण्यांत आलं पाहिजे. अशा पद्धतीनं जाण्याचा या सर्वांना हक्क आहे. जगांतल्या प्रत्येक माणसानं याचा विचार करायला हवा, याविषयीं फिकीर बाळगायला हवी."

बोलत असतांना समोर असलेल्या श्रोतृसमुदायाची नाडी अचूक हेरणं आणि धरून ठेवणं याची 'एफ. डी. आर.' यांना चांगली संवय झालेली होती, आणि वारंवार अमेरिकन जनतेसमोर भाषण करतांना 'एफ. डी. आर.' यांना आपल्या या गुणांची जाणीवहि झालेली होती. जगापासून अलिप्त राहून आणि जगांत जें कांहीं घडत आहे त्याकडं दुर्लक्ष करून आपल्याला यानंतर जगतां येणार नाहीं याची जाणीव अमेरिकन जनतेला हळू हळू होत होती.

आपल्या या भाषणांत ते पुढं म्हणाले, "दुर्दैवानं जगांत कायदा धुडकावणाऱ्या आणि सुव्यवस्था मोडून टाकणाऱ्या प्रवृत्तींची सांथ वाढत आहे. युद्ध, मग तें घोषित असो, वा बिनघोषित असो, तें एक संसर्गजन्य दुखणं आहे. तें पाहतां पाहतां पसरतं. राज्येंच्या राज्यें त्यानं निपटून निघतात. मुळांतल्या युद्धाच्या स्थळापासून दूरदूरच्या जनतेला देखील या दुखण्याला, या रोगाला बळी पडावं लागतं. युद्धापासून अलिप्त राहण्याचा आमचा निर्धार आहे, तथापि युद्धापासून होणाऱ्या भयंकर परिणामांपासून आणि युद्धांत गुंतलं जाण्याच्या संभवापासून आम्ही अलिप्त राहूं शकत नाही.... ज्यांना शांततेनं जगायचं आहे अशा राष्ट्राची ही इच्छा इतक्या मोठ्या आणि संघटित प्रमाणांत व्यक्त झाली पाहिजे कीं इतरांशीं केलेले करार-मदार आणि त्यांचे मूलभूत हक्क धुडकावणाऱ्या उद्दाम राष्ट्रांना या इच्छेची आणि या इच्छेमागल्या बळाची धास्ती बसली पाहिजे. शांततेच्या रक्षणार्थ प्रत्यक्ष अनेक प्रयत्न झाले पाहिजेत. अमेरिकेला युद्धाविषयीं किळस आहे. अमेरिकेला शांतता हवी आहे, म्हणून शांततेचा शोध आणि शांततेचं संरक्षण या कामीं अमेरिकेनं स्वतःला कृतीनं जुंपून घेतलं पाहिजे.

राष्ट्रसंघाच्या कल्पनेसाठीं विल्सन यांनीं राष्ट्राला आणि जगाला दिलेल्या धडाडीच्या हांकेनंतर आतां कित्येक वर्षें लोटलीं होतीं.

तथापि 'एफ. डी. आर.' यांच्या मनांत देखील एक युद्ध घोषित करण्याचं होतं. हें युद्ध होतं पोलिओविरुद्ध! १९३७ मध्यें त्यांनीं आणि 'बेसिल ओ कॉनर' यांनीं मिळून एक 'नॅशनल फौन्डेशन' म्हणून ओळखली

जाणारी यंत्रणा निर्माण करण्यासाठीं प्रयत्न चालवले. या रोगाचा प्रतिबंध, त्यावर उपचार, आणि त्या रोगाच्या परिणामांना बळी पडलेल्यांना सर्वतोपरी साह्य, अशा तीन मार्गांनीं ही एक नवी यंत्रणा 'इन्फन्टाईल पॅरॅलिसिस' विरुद्ध लढेल असं 'एफ. डी. आर.' यांनीं वृत्तपत्र प्रतिनिधींना उद्देशून जाहीर केलं होतं. या रोगाचं मूळ समजावून घेण्यासाठीं झगडणाऱ्या संशोधनाच्या क्षेत्रांतील संशोधकांना आणि संस्थांना ही यंत्रणा आर्थिक सहाय्य देईल; या रोगाला बळी पडलेल्यांना अधिक चांगले उपचार उपलब्ध व्हावेत म्हणून ही यंत्रणा रुग्णालयांना मदत करील, आणि वॉर्म स्प्रिंग्जच्या उपचार-केंद्राचं काम अधिक मोठ्या प्रमाणांत चालवीत राहील. त्याचप्रमाणं देश-भरच्या या प्रकारच्या उपचारकेंद्रांना देखील ही साह्य देईल, असं त्यांनीं घोषित केलं.

१९३८ च्या ३ जानेवारीला ही यंत्रणा अस्तित्वांत आली. बेसिल ओ कॉनर हे तिचे अध्यक्ष होते आणि वॉर्म स्प्रिंग्जशीं आधींपासून संबंध असलेल्या केथ मॉर्गन या तिच्या कार्यकारी समितीच्या अध्यक्ष बनल्या. न्यूयॉर्क शहरां-तल्या या यंत्रणेच्या प्रमुख शाखेच्या नियंत्रणाखालीं देशभर या यंत्रणेच्या शाखोपशाखा निघून सुनियंत्रितपणें काम करतील अशी या मंडळींना आशा होती.

आपला वाढदिवस पोलिओ–विरोधाच्या मोहिमेसाठीं कामीं लावावा अशी 'एफ. डी. आर.' यांची अजूनहि इच्छा होती, आणि या वाढदिवसाच्या निमित्तानं छोट्या छोट्या देणग्यांसाठीं आवाहन करण्याचं त्यांनीं ठरवलं. मंदीच्या काळांत मोठ्या देणग्या दुर्मिळ झाल्या होत्या. लोक छोट्या छोट्या रकमा पाठवीत होते. कांहीं वेळा ही रक्कम एका पेनीचीहि असे. यासाठीं देशभर प्रचार करण्याचं काम ज्या मंडळींकडे सोपविण्यांत आलं त्यांत सर्वभरच्या मुलांचा आवडता नट 'एडी कॅन्टर' हा होता. त्यांनीं नभोवाणीवरून देशाला हांक दिली. केवळ तीस सेकंदांच्या नभोवाणीवरच्या आपल्या एका आवा-हनानें या नटानें पोलिओग्रस्तांसाठीं फार मोठी रक्कम जमवली होती.

आपल्या या नव्या नभोवाणीवरील भाषणांत तो म्हणाला, 'हॉली–वुडमधून ध्वनिक्षेपित केल्या जाणाऱ्या साऱ्या राष्ट्रीय स्वरूपाच्या नभोवाणी

कार्यक्रमांतले केवळ तीस सेकंद या मोलाच्या कार्यासाठीं मी मागत आहें. या निधीसाठीं लोकांनीं आपल्या देणग्या सरळ व्हाईट हाऊसवर पाठवाव्या.

या निधीच्या पुरस्कारार्थ आणखीहि पुष्कळ कांहीं केलं जाणं आवश्यक होतं. कांही विशेष स्वरूपाच्या कल्पना आणि योजना निघणं आवश्यक होतं. एडी कॅन्टर यांनीं या दृष्टीनें कोशीस चालविली, आणि या निधीसाठीं त्यांनीं उस्फूर्तपणें नांव निर्माण केलं, "दी मार्च ऑफ डाइम्स !"

या योजनेच्या नियोजकांनीं या नव्या नांवाचा वापर तत्काळ मोठ्या प्रमाणावर आरंभला आणि 'एफ. डी. आर.' यांना देखील हें नांव विलक्षण आवडलं. १९३८ च्या ३० जानेवारीला 'मार्च ऑफ डाइम्स' ची ही नवी मोहीम सुरू करण्यांत आली.

सर्वसाधारणपणे, दिवशीं पांच हजार पत्र व्हाईट हाऊसवर येत. परंतु या नव्या मोहिमेच्या सलामीच्या आवाहनानंतर दिवशींच तीस हजार पत्र आलीं. पत्रांचा ढिगारा घेऊन येणाऱ्या पोस्टाच्या मोटारगाड्यांची रीघ व्हाईट हाऊसकडे लागली. लवकरच व्हाईट हाऊसच्या परिसरांत एक विनोद वारंवार केला जाऊं लागला. 'या नव्या पत्रव्यवहारांत सरकारी पत्रव्यवहाराचा कांहीं पत्ताच लागत नाहीं' असं म्हटलं जाऊं लागलं.

या वर्षभरांत टीकेचा भडिमार सातत्यानें अंगावर घेतल्यानंतर या नव्या निधीला देशांतून मिळालेली उत्साहाची प्रतिसाद रूझवेल्ट यांना फार फार सुखाची वाटली. त्यांची उमेद वाढली.

त्याच उन्हाळ्यांत अनेक विश्वविद्यालयं, रुग्णालयं, आणि व्यावसायिक संस्था यांना पोलिओविरुद्धच्या संशोधनासाठीं आर्थिक देणग्या रवाना झाल्या. पोलिओविरुद्धच्या युद्धाला आता तोंड लागलं होतं.

तिकडे प्रत्यक्ष युद्धाचा वणवा जगाच्या नव्या नव्या भागांत पसरत चालला होता. आक्रमक राष्ट्रांचं औद्धत्य दिवसेंदिवस वाढतच होतं. आधींच्या डिसेंबरांतच अमेरिकेची 'पॅने' ही युध्द-नौका जपानीं बॉम्बर विमानांनीं बुडवली होती. १९३८ च्या मार्चमध्यें जर्मनीने ऑस्ट्रियावर आक्रमण केलं आणि त्या देशाचा घांस घेतला. त्यापाठोपाठ झेकोस्लोव्हाकियाच्या बाबतींत हिटलरनें मोठा पेचप्रसंग निर्माण केला, आणि या देशाचा 'सुडेटन' नांवाचा उत्तरेकडचा भाग तो उघड उघडपणें खंडणीसारखा मागूं लागला. ब्रिटनचे त्या

वेळचे पंतप्रधान चेंबरलेन जातीनं हिटलरला भेटायला बर्चटेसगॅडेट इथं गेले. त्यानंतर हिटलर, चेंबरलेन, मुसोलिनी, फ्रान्सचे एडुअर्ड दलादिए यांचीं एक संयुक्त बैठक म्युनिक येथें झाली. जागतिक शांतता राखण्यासाठीं झेकोस्लोव्हाकियाला सुडेटनचा टापू जर्मनीला देऊन टाकण्याचं आवाहन या सर्वांनीं मिळून केलं.

१९३९ च्या जानेवारीमध्यें कॉंग्रेसला आपला वार्षिक संदेश 'एफ. डी. आर.' यांनीं पाठवला तेव्हां जागतिक युद्धाला जवळ जवळ आरंभ झाल्यासारखाच होता. आपल्या भाषणांत सर्व भर रूझवेल्ट यांनीं दिला होता तो एकाच इशाऱ्यावर. तो इशारा असा कीं, "जुलूम जबरदस्तीच्या नव्या विचारप्रणाली जगाच्या इतर विभागांवर झेपा टाकूं लागल्या आहेत; आणि आपल्यावर देखील त्यांचं आक्रमण होईल अशी शक्यता सदैव आहे." युद्धांत गुंतलेल्या राष्ट्रांना कर्ज देणं अगर शस्त्रास्त्रांचा पुरवठा करणं या गोष्टींना मनाई करणारा कायदा कॉंग्रेसनं मंजूर केलेला होता. परंतु रूझवेल्ट यांचं समाधान एवढ्यानं झालेलं नव्हतं. अमेरिकेनं आपल्या स्वतःच्या संरक्षणाचा विचार देखील जोरानं केला पाहिजे असं रूझवेल्ट यांना वाटत होतं आणि हा विचार करायचा तर करआकारणी वाढणार होती.

म्यूनिक-करारापुरती हिटलरनं दिलेलीं वचनं कवडीकिंमतीचीं ठरलीं. आपल्याला अधिक प्रदेश व्यापण्याची इच्छा नाहीं असं वारंवार सांगत असतांना त्यानं पुरा झेकोस्लोव्हाकिया गिळंकृत केला. भयानं ताठरून सारं जग पुढं काय घडतं तें पाहात होतं. आतां यानंतर पाळी होती पोलंडची. ऑस्ट्रियानं तर प्रतिकार केलाच नव्हता. झेकोस्लोव्हाकियानं हात उगारला नव्हता. परंतु पोलंडनं दंड ठोकले. प्रत्यक्ष युद्ध करण्याला हिटलरला ही संधि मिळाली. आणि जर्मन विमानांनीं वॉरसॉ शहरावर बॉम्बफेक करण्याला सुरुवात केली. 'पोलंडवर आक्रमण झाल्यास आपण त्याच्या मदतीला धांवून जाऊं', अशा वचनांत ग्रेट ब्रिटन आणि फ्रान्स गुंतलीं होतीं, त्यामुळं त्यांनींदेखील जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारलं. अशा प्रकारें दुसऱ्या जागतिक युद्धाला तोंड लागलं.

१९३९ च्या सप्टेंबरच्या ३ तारखेला प्रेसिडेंट फ्रॅंकलिन डिलॅनो रूझवेल्ट यांनीं नभोवाणीवरून जनतेला उद्देशून भाषण केलं.

...ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ...

४००११२...... दि: ......

"आज पहांटे साडेचार वाजेपर्यंत मनाशीं आम्हीं परोपरीनं इच्छा करीत होतों कीं, कांहीं चमत्कार घडून युरोपवर ओढवूं घातलेलं महाभयानक युध्दाचं संकट टळेल; जर्मनीनं पोलंडविरुध्द चालविलेलं आक्रमण संपुष्टांत येईल. परंतु आमच्या इच्छा फलद्रूप झाल्या नाहींत, त्या फोल ठरल्या आहेत." याच भाषणांत अमेरिकन जनतेला त्यांनीं शांत आणि स्थिर बुद्धि राहण्याला सांगितलं. "प्रत्यक्ष वार्ता' आणि 'अफवा' यांतला फरक चोखंदळपणें पारखून घ्या असं आवाहन त्यांनीं राष्ट्राला उद्देशून केलं. ते पुढं म्हणाले, "युरोपियन रणांगणांवर अमेरिकेनं आपलं सैन्य पाठवावं, असं अविचारानं कोणाहि स्त्री पुरुषानं बोलतां कामा नये. या क्षणाला अमेरिकेच्या तटस्थ धोरणाचा पुकारा करणारा एक जाहीरनामा तयार करण्यांत येत आहे... एकदांच नव्हे तर अनेकदां आम्हीं यापूर्वी असं निःसंदिग्धपणं सांगितलं आहे कीं, आम्ही युध्द पाहिलं आहे आणि युध्दाचा आम्हांला तिरस्कार आहे. हेंच आम्ही पुनः पुन्हा सांगत आहोंत. अमेरिका युध्दाबाहेर राहील अशी आशा आम्हांला अद्यापि वाटत आहे, असा विश्वास आम्ही बाळगून आहोंत. आणि याच उद्दिष्टासाठीं आपलं हें सरकार अप्रतिहतपणें प्रयत्न करीत राहील अशी हमी आम्ही आपल्याला देत आहोंत. अमेरिका शांततेचा पुरस्कार करीत राहील."

वुड्रो विल्सन यांच्या काळजांतली वेदना काय होती, कोणत्या जखमांनीं ते त्यांच्या उत्तर आयुष्यांत अखंडपणें झुरत आणि जळत होते, त्याची साक्षात् जाणीव आतां रूझवेल्ट यांना होत होती.

• • •

# जागतिक युद्ध

पुढल्या वर्षभरांत एकाहून एक भयंकर आणि काळ-जाचं पाणी पाणी करणाऱ्या घटनांनीं सारा युरोप ढवळून निघाला. पोलंडवर आक्रमण करण्यापूर्वीं जर्मनीनं रशियाशीं अनाक्रमणाचा करार केला होता. आपल्या पूर्वेकडील सरहद्दीवर या काळांत कोणयाहि प्रकारें गडबड होऊं नये हेंच या भागाचं धोरण होतं. फ्रान्स आणि इंग्लंड हे देश येऊं घातलेल्या धोक्यापासून स्वतःचा बचाव करण्याच्या घाईत, जास्तींत जास्त लष्करीकरण करण्यांत आणि युद्धसज्ज होण्यांत गर्क होते. तथापि, हिटलरचं लष्करी बळ अजेय वाटावं इतकं प्रचंड होतं. त्याच्या लष्करानं पाहतां पाहतां नॉर्वे, डेन्मार्क, बेलजियम आणि नेदर्लॅण्डस इतकी सारी भूमि टोळधाडीसारखी व्यापून टाकली. स्वित्झर्लंन्ड ते बेलजियम अशा आपल्या सरहद्दीवर फ्रेन्चांनीं ' मॅजिनॉल लाईन ' नांवाची संरक्षक फळी उभी केली होती; तथापि, जर्मन फौजांनीं ही सारी फळी मोडून फ्रान्सच्या उत्तरेकडं एखादा महापूर लोटावा त्याप्रमाणं प्रवेश केला. जवळ जवळ चार लाख फौजांची—यांत प्रामुख्यानं ब्रिटिश फौजाच होत्या—त्यांनीं कोंडी केली. डंकर्डच्या किनारपट्टीच्या या फौजा होत्या, पुढें आठवडाभर सभोंवतालीं शत्रूंच्या तोफांचा आणि बॉम्ब-गोळ्यांचा भडिमार चालू असतांना ब्रिटिश विमानदलाच्या उपलब्ध असलेल्या

संरक्षणाखातीं त्या भागांतील प्रत्येक होडी, मचवा, मच्छीमारी बोट, आणि जें जें कांहीं माणसं समुद्रांतून घेऊन जाऊं शकेल तें तें सारं एकत्र करून, त्यांतून या फौजांनीं इंग्लिश खाडी ओलांडण्याची पराकाष्ठा चालवली. जूनच्या मध्यापर्यंत फ्रान्स शरण गेला. नाझी फौजा पॅरिसमध्यें पोंचल्या. आणि पुढं फ्रान्सच्या कानाकोपऱ्यांत त्यांनीं आपलीं मुळं रोवलीं. याच सुमाराला इटालीनं जर्मनीच्या बाजूनं युद्धांत प्रवेश केला. आणि हें युद्ध उत्तर आफ्रिकेंत पसरलं. ब्रिटनची प्रत्यक्ष कसोटी लागण्याची वेळ आली आणि रोज रात्रीं जर्मन विमानांचे मोठमोठे ताफे ब्रिटनवर जाऊन नियमितपणें शब्दशः आग ओकूं लागले. जपान दोस्त राष्ट्रांविरुद्ध युद्धांत उतरला.

मिळतील ते उत्तमोत्तम सल्लागार या काळांत 'एफ. डी. आर.' स्वतः भोंवतीं जमवीत होते. औद्योगिक आणि व्यापार क्षेत्रांतील मोठमोठे तज्ज्ञ सालींना एक डॉलर या वेतनावर सरकारसाठीं काम करूं लागले. पहिल्या जागतिक युद्धांत युद्धखातं सांभाळलेले हेन्री एल. स्टिमसन यांची युद्धखात्याचे मंत्री म्हणून रूझवेल्ट यांनीं पुन्हां नेमणूक केली. एका काळचे 'न्यू डील' च्या कार्यक्रमाचे खंदे विरोधक फ्रॅन्क नॉक्स यांना त्यांनीं 'नौ-दलाचे मंत्री म्हणून नियुक्त केलं. कित्येक वर्षांपासून हेन्री मॉर्गेन्थाऊ ज्युनियर हे अर्थ-खातं सांभाळीत होते आणि रूझवेल्ट यांच्या जवळ जवळ साऱ्या कारकीर्दींत कॉर्डेल हल परराष्ट्रीय खात्याचे मंत्री म्हणून काम पहात होते.

जवळ जवळ त्याच काळांत नेव्हिल चेंबरलेन यांच्या जागीं ब्रिटनचे पंत-प्रधान म्हणून विन्स्टन चर्चिल हे निवडून आले. जागतिक पटावर क्षणाक्षणाला होऊं लागलेल्या एकाहून एक अनपेक्षित घडामोडींच्या या साऱ्या ताणांतच १९४० साल उजाडलं. अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीचं हें वर्ष. डंकर्कचा पराभव आणि फ्रान्सचा पाडाव थोडासा ताजाच होता. अशा परिस्थितीमध्यें अमेरिकेच्या दोनहि पक्षांचे मेळावे अत्यंत महत्त्वाचे ठरणार होते.

जूनच्या तिसऱ्या आठवड्यांत रिपब्लिकन पक्षाचा मेळावा फिलाडेल्फिया इथं भरला. राष्ट्राध्यक्षपदासाठीं चार उमेदवारांत खरी स्पर्धा होती. न्यूयॉर्कचे थॉमस ई. ड्यूई. ओहिओचे सेनेटर रॉबर्ट ए. टॅफ्ट, इंडियानाचे वेन्डेल एफ. विल्की, आणि मिशिगनचे सेनेटर आर्थर, एच. व्हॅन्डेन्बर्ग. पहिल्या मतदानांत

या क्रमानं यांना मतं पडलीं. ड्यूई यांना ३६० मतं होतीं, तर विल्की यांना १०५ होतीं.

रूझवेल्ट यांच्या 'न्यू डील' कार्यक्रमांपैकीं टेनेसी व्हॅलीविषयक यंत्रणे-बाबत झुंज घेतल्यापासून यांची लोकप्रियता वाढलेली होती. मोठमोठ्या सभांतून आणि नभोवाणी केंद्रावरून त्यांचीं भाषणं एकसारखीं होत होतीं. एखाद्या राष्ट्रीय प्रश्नांवर वाद खेळतांना आपल्या प्रतिस्पर्ध्याला ते केव्हांच निरुत्तर करून टाकीत. निर्विवादपणें ते एक अतिशय बुद्धिमान आणि कर्तृत्वसंपन्न गृहस्थ होते शिवाय त्यांच्याकडे अमाप धडाडी होती, व्यापक जागतिक दृष्टिकोण होता, आणि ह्या मेळाव्यांत त्यांची लोकप्रियता वाढतच राहिली. प्रत्येक मतदानासरशीं त्यांचीं मतं वाढत होतीं. आणि अखेरीस उमेदवारांच्या यादींत अग्रभागीं ते चमकूं लागले. पांचव्या मतदानांत त्यांना ४२९ मतं पडलीं, आणि सहाव्या मतदानांत पक्षाचे उमेदवार म्हणून ते निवडून आले.

डेमॉक्रॅटिक पक्षाचा मेळावा जुलैमध्यें शिकागो इथं भरला. या मेळाव्यापूर्वी कित्येक दिवसांपासून 'एफ. डी. आर.' राष्ट्राध्यक्षपदाठीं तिसऱ्यांदा उभे राहणार किंवा काय याविषयीं बऱ्याच वार्ता आणि वावड्या उठलेल्या होत्या. यापूर्वीचा एखादा राष्ट्राध्यक्ष रांगेनं तीन वेळां या पदावर राहिलेला नव्हता. तिसऱ्या वेळीं राष्ट्राध्यक्षपदीं निवडून येण्याचं नाकारून जॉर्ज वॉशिंग्टन यांनींच या बाबतींत एक पायंडा पाडलेला होता. परंतु विल्कीचा पराभव करणं हें येरा गबाळ्याचं काम नव्हतं; आणि यासाठीं पक्षाकडे रूझवेल्ट यांच्या ताकदीचा दुसरा उमेदवार नव्हता. मोठ्या झपाट्यानं 'एफ. डी. आर.' जागतिक ख्यातीचे नेते बनले होते. इतर जागतिक नेत्यांवर त्यांचा प्रभाव वाढत्या प्रमाणांत पडत होता; आणि इकडे दुसऱ्या महायुद्धाच्या खाईशीं अमेरिका कशीबशी आपली अलिप्तता सांभाळत उभी होती.

उमेदवारीबाबत स्वतः रूझवेल्ट मुग्ध होते. कारण राष्ट्राध्यक्षपदावरून निवृत्त होऊन हाईड पार्क आणि हडसन रिव्हर व्हॅलीला परतणं त्यांना जमलं तर हवंच होतं. तथापि पक्षानं उमेदवारीची सूचना केल्यास ते उभं राहण्याला नकार देणार नाहींत याची कल्पना मिसेस रूझवेल्टना होती. पुढल्या कांहीं वर्षांत ज्याप्रकारच्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कर्तृत्वाची आवश्यकता अमेरिकेला होती त्या प्रकारचं कर्तृत्व असलेला दुसरा कोटला उमेदवार

डेमॉक्रॅटिक पक्ष उभा करूं शकत होता ? रूझवेल्ट यांच्या मतें या प्रकारचा आणखी एक उमेदवार म्हणजे परराष्ट्र मंत्री कॉर्डेल हल हे होते. तथापि, 'एफ. डी. आर.' या बाबतींत हल यांना भेटतांच त्यांनीं या गोष्टीला साफ साफ नकार देऊन टाकला. "आपण उपराष्ट्राध्यक्षपदासाठीं देखील उभं राहणार नाहीं.' असं त्यांनीं स्वच्छ सांगून टाकलं. त्यांचं म्हणणं असं होतं कीं, 'आपण ज्या पदावर आहोंत, त्या पदावरून अधिक देशसेवा आपण करूं शकूं. विशेषतः या वेळीं आपण पक्षीय स्पर्धेपासून अलिप्त राहणं अत्यावश्यक आहे. याचा अर्थ एकच होता. राष्ट्राध्यक्षांकडून, आपण पुन्हां निवडणुकीला उभे राहूं इच्छित नाहीं असा संदेश मिळाला असतांनासुध्दां डेमॉक्रॅटिक राष्ट्रीय मेळाव्यानं उमेदवारपदासाठीं त्यांचं नांव पत्करलं. आणखीहि माणसांचीं नांवं पुढें आलीं. यांत होतं जिम फार्ले आणि कॉर्डेल हल. परंतु पहिल्याच मतदानांत 'एफ डी. आर.' यांना ९४६॥ मतं पडलीं आणि तावडतोब जिम फार्ले यांनीं अशी सूचना केलीं कीं, निवडणूक अविरोध व्हावी आणि पुनश्च एकदां एकमतानं 'एफ. डी. आर.' डेमॉक्रॅटिक पक्षाचे राष्ट्राध्यक्षपदाकरितां उमेदवार म्हणून निवडून आले.

त्यानंतर १९४० च्या त्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या निमित्तानं रूझवेल्ट आणि विल्की यांनीं जो धूमधडाक्याचा प्रचार देशभर केला, तसा प्रचार त्यापूर्वीं अमेरिकेनं कधींहि पाहिला, ऐकला नसेल. दोनहि उमेदवारांच्या बाजूनं अक्षरशः हजारों कार्यकर्ते काम करीत होते. यांतले शेकडों, ज्यांनीं पूर्वीं कधींहि राजकीय कार्य केलेलं नव्हतं असे होते. तरुण माणसांचा भरणा या प्रचारकांमध्यें मोठ्या संख्येनें होता. काळ मोठा आणीबाणीचा होता, देशापुढचे प्रश्न अत्यंत अवघड स्वरूपाचे होते. मतदारांनीं घ्यायचा निर्णय फार विचारपूर्वक घ्यायचा होता आणि तो दूरगामी स्वरूपाचा ठरणार होता. दोनहि उमेदवार उदारमतवादी, आंतरराष्ट्रीय दृष्टिकोण पत्करलेले, आणि कांहींशा सारख्याच मतांचे देखील होते. खरं म्हणजे दोन मतप्रणालींतल्या लढतीपेक्षां दोन असामींमधली ही लढत होती. निवडणुकीच्या दिवशीं जवळ जवळ पन्नास कोटि मतदारांनीं मतदान केलं. इतक्या मोठ्या प्रमाणावर मतदान अमेरिकेच्या राष्ट्रीय निवडणुकींत यापूर्वीं कधींहि झालेलं नव्हतं. आणि 'एफ. डी. आर.' यांनीं पुन्हां एकदां बाजी जिंकली. विल्की यांच्यापेक्षां ५० लाख

अधिक मतं मिळवून, आणि केवळ दहा राज्यें सोडलीं तर इतर सर्व राज्यांतून दणदणीत बहुमत मिळवून ते निवडून आले.

निवडणुकीचे निकाल ऐकत हाईड पार्कच्या आपल्या घरीं मिसेस रूझवेल्ट यांच्यासोबत ते बसले होते. आणि मनोमन त्यांना उमजून चुकलं कीं, राष्ट्राध्यक्षपदाच्या पूर्ण झालेल्या या वर्षांत या कामीं त्यांची पुष्कळशी ताकद खर्ची पडली होती. खरं म्हणजे या पदावर लागोपाठ आठ वर्षं माणसानं काढलीं म्हणजे त्यानं पुरेशी देशसेवा केली, आणि भरपूर कर्तृत्व त्याच्या हातून घडलं असं समजायला हरकत नव्हती. विशेषतः या आठ वर्षांत रूझवेल्ट यांना तोंड द्यावं लागलं होतं ते सारे एकाहून एक बिकट प्रश्न पाहतां हें कर्तृत्व अधिकच घवघवीत होतं. तथापि, याहून बिकट प्रश्नांना यानंतर तोंड द्यावं लागणार होतं आणि अमेरिकन जनतेची इच्छा आणखी चार वर्षं रूझवेल्ट यांनींच या पदावर राहावं अशी होती. युद्धामुळं अभद्राचं सांवट जणुं साऱ्या युरोपवर दाटून आलं होतं.

या युद्धाच्या सांवटांत काळीकुट्ट अशी आणखी एक नवी भर रूझवेल्ट परिवारांत निवडणुकीच्या दिवसांनंतर लौकरच पडली. आणि वर्णानं काळाकुट्ट असला तरी या नवागतानं रूझवेल्ट परिवारांत नवा आनंद आणि नवी प्रसन्नता आणली. या नवागताचं नांव होतं ' मरे—दि औटलॉ ऑफ फॅला हिल. ' हा होता आठ महिन्यांचा स्कॉटिश कुत्रा. ' एफ. डी. आर. ' यांच्या दूर आप्त मिसेस मार्गारेट सक्ले यांनीं हा रूझवेल्ट यांना आवर्जून भेट म्हणून पाठवला होता त्यांचा जीव या कुत्र्यावर बसला. ' एफ. डी. आर. ' यांनीं या कुत्र्याला सुटसुटीत नांव देऊन टाकलं, ' फेला. ' यानंतर राष्ट्राध्यक्षांचं छायाचित्र कुठंहि येई तेव्हां त्यांच्या बरोबरीनं त्यांचा ' फेला ' त्यांत असे. कारण दिवसाचे बहुतेक क्षण दोघे एकत्रच असत.

व्हाईट हाऊसवरचं वातावरण एकंदरीनें ' फेला ' ला आवडूं लागलं. रोज सकाळीं फेरफटका मारून आल्यावर तो राष्ट्राध्यक्षांच्या शयनगृहांत घुसे, त्यांच्या बिछान्यांत उडी मारे, आणि त्यांच्या न्याहरीच्या ' ट्रे ' वरचं आपल्यासाठीं ठेवून दिलेलं बिस्किट तो शोधूं लागे. दिवसभर कितीहि काम पडलेलं असो, थकवा आलेला असो, राष्ट्राध्यक्ष विश्रांतीसाठीं जाण्यापूर्वी रोज संध्याकाळचा कांहीं वेळ नियमानं ' फेला ' च्या सहवासांत घालवीत. रूझवेल्ट यांच्या या मुक्या

मित्रानं त्यांच्या बरोबरीनं संरक्षण–साहित्याच्या कारखान्यांना भेटी दिल्या, ऐतिहासिक महत्त्वाच्या परिषदांना तो उपस्थित होता. राष्ट्राध्यक्षांच्या विशेष गाडींतून त्याचा वावर असे, आणि त्यांच्या बरोबरीनं तो वृत्तपत्रप्रतिनिधींच्या परिषदांना देखील उपस्थित राही !

डिसेंबरमध्यें रूझवेल्ट यांना अत्यंत आवश्यक असलेल्या विश्रांतीसाठीं ते वॉर्म स्प्रिंग्जला जाऊन राहिलें आणि अर्थातच ‘ फेला ’ त्यांच्या समवेत होता.

‘ एफ. डी. आर. ’ यांच्या अगणित उदार स्नेह्यांच्या कृपेनं आणि ‘ मार्च ऑफ टाइम्स ’ या मोहिमेच्या यशामुळं वॉर्म स्प्रिंग्जचं उपचार-केंद्र एकसारखं भरभराटतच होतं, वाढत होतं. १९३७ मध्यें मुख्यत: मिसेस जॉर्जिया विल्किन्स यांनीं दिलेल्या देणगीच्या जोरावर इथं एक चर्च बांधण्यांत आलं. उपचार केंद्रावरील कॅथॉलिक, प्रॉटेस्टंट आणि ज्यू रुग्णांसाठीं इथं प्रार्थना घेण्यांत येत. चाकांच्या खुर्च्या आणि स्ट्रेचर्ससकट रुग्णांना इथं उपस्थित राहतां येई. पुढल्याचवर्षी पंगू रुग्णांना धडधाकटपणें वावरतां येण्याच्या दृष्टीनं आवश्यक तीं साधनं विकण्याचं एक दुकान या केंद्रावर थाटण्यांत आलं. इथं या प्रकारचीं नवीन नवीन साधनें बनविण्यांत येत आणि तीं वापरून पाहण्यांत येत. ‘ एफ. डी. आर. ’ यांनीं प्रथमच पायांच्या ब्रेसेस वापरल्या. त्यांचं वजन चाळीस पौंड होतं. आतां या नव्या ब्रेसेसचं वजन फक्त २० पौंड होतं. अशा प्रकारची एकेक सुधारणा या साधनांमध्यें करण्यांत येत होती. आदल्याचवर्षी इथं एक प्रयोगशाळा आणि ग्रंथालय बांधण्यांत आलं होतं. मिसेस एस. पिंकने टक यांच्या औदार्यामुळं हें शक्य झालं होतं. आणि उपचारार्थ वॉर्म स्प्रिंग्ज इथं राहिल्यानंतर देखील मुलांना आणि तरुण रुग्णांना आपलं शिक्षण यामुळं चालू ठेवतां येणार होतं. त्याचप्रमाणें एक वैद्यकीय इमारत देखील बांधण्यांत आली. पंगू रुग्णांना अधिक सुलभपणें शरिराच्या हालचाली करतां याव्यात या दृष्टीनं या ठिकाणीं विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया करण्यांत येत.

त्याचप्रमाणं अत्यंत प्रभावी असा इलेक्ट्रॉस्कोप देखील रोगजंतूच्या चिकित्सेसाठीं बनवण्यांत आलेला होता आणि या मायक्रॉस्कोपच्या सहाय्यानं, आजवर जे दिसू शकत नव्हते असे कांहीं प्रकारचे रोगजंतू तपासण्यांत आलेले होते आणि त्यांचीं छायाचित्रेंदेखील घेण्यांत आलेलीं होतीं. म्हणजे पोलिओचे

रोगजंतू देखील आतां शास्त्रज्ञांना दिसणं फार दूर राहिलेलं नव्हतं. एकीकडं युरोपांत आणि आशियांत मानवी जीवित आणि सुख उध्वस्त करण्याच्या योजना आणि कारस्थानं रचलीं जात असतांना कुठं तरी हें जीवित अधिक सुखाचं आणि अधिक स्थिर करण्यासाठीं असं कांहीं केलं जात होतं, ही फार आशादायक गोष्ट नव्हती काय ?

पुरेशी विश्रांति घेऊन प्रेसिडेंट रूझवेल्ट वॉशिंग्टनला परतले. कॉंग्रेसच्या दोनहि गृहांच्या संयुक्त बैठकीपुढं त्यांनीं आपलं चार प्रकारच्या स्वातंत्र्यांवरचं सुप्रसिद्ध भाषण केलं. हीं चार प्रकारचीं स्वातंत्र्यं होतीं, लेखन आणि भाषण स्वातंत्र्य, उणिवांपासून स्वातंत्र्य आणि भीतीपासून स्वातंत्र्य. हीं चार स्वातंत्र्यं नष्ट होण्याचा एवढा मोठा धोका यापूर्वी कधींहि निर्माण झालेला नव्हता हें त्यांनीं या भाषणांत विशद केलं. त्यांच्या भाषणाचं गांभीर्य त्यांना पुरेपूर जाणवलेलं होतं. खुद्द त्यांचे चार मुलगे लष्करामध्यें भरती झालेले होते. वयाच्या तिशीला पोहोंचलेला जेम्स ‘मरीन कोअर (रिझर्व्ह)’ मध्यें दाखल होऊन जवळ जवळ चार वर्षं लोटलीं होतीं. एलियट ‘आर्मी एअर कोअर’ मध्यें दाखल झालेला होता; फ्रँकलिन ज्यूनिअर नौ-दलांत गेला होता, आणि सर्वांत धाकटा जॉन भरती होण्याच्या मार्गावर होता.

चार प्रकारच्या स्वातंत्र्यांवरील कॉन्ग्रेसपुढच्या या भाषणनंतर सुमारें महिन्याभरांतच दोस्त-राष्ट्रांना आर्थिक बळ आणि युध्दोपयोगी साहित्य पुरवण्याची मुभा अमेरिकेला देणारा ‘उधार-उसनवार कायदा’ कॉंग्रेसनं मंजूर केला.

हिटलरचं अरिष्ट अद्याप दिवसेन्दिवस नवे प्रदेश व्यापत होतं. जूनमध्यें रशियाशीं केलेला तह सोयिस्करपणें विसरून त्या देशाविरुध्द त्यानं लष्करी आक्रमण उभारलं.

या प्रकरणीं तांतडीचा निर्णय घेण्यासाठीं प्रेसिडेंट रूझवेल्ट आणि ब्रिटनचे पंतप्रधान चर्चिल यांनीं एकत्र येण्याचं ठरवलं. खरं म्हणजे, यापूर्वीपासूनच एकदां आपली भेट व विचारविनिमय होणं आवश्यक आहे अशी गरज त्यांना वाटूं लागलेली होती. तथापि युध्दविषयक जबाबदाऱ्यांमुळें अशी भेट तोंवर अशक्य झालेली होती. परंतु १९४१ च्या ऑगस्टमध्यें अत्यंत गुप्तपणें ते अखेर एकत्र आले आणि तीन दिवस त्यांनीं चर्चा आणि खलबतं

केलीं. पंतप्रधान चार्चिल 'प्रिन्स ऑफ वेल्स' या युध्द-नौकेवरून आणि प्रेसिडेंट रूझवेल्ट 'ऑगस्ट' या युध्द-नौकेवरून प्लॅसेन्शिया सामुद्रधुनींतल्या न्यू फौंडलंडच्या किनाऱ्यावरच्या अर्जेन्टिना या बंदरांत एकत्र आले. दोघांनाहि बऱ्याच युध्द-नौकांचं, लढाऊ विमानांचं, किनाऱ्यावरील लष्कराचं, त्याचप्रमाणें दाट धुक्याचं संरक्षण होतं.

प्रेसिडेंट रूझवेल्ट यांच्या परिवारांत होते परराष्ट्र खात्याचे उपमंत्री सम्नर वेल्थ. अत्यंत महत्त्वाचे कागदपत्र घेऊन ते रूझवेल्ट यांच्याबरोबर आले होते. या परिवारांत अनेक सेनानी होते. यांत होते चीफ ऑफ स्टाफ जनरल जॉर्ज, सी. मार्शल. त्याचप्रमाणें नौदलाचे सेनानी आणि इंग्लंडमध्यें युद्धकार्यासाठीं जाऊन आलेले हॅरी हॉपकिन्स, रुझवेल्ट यांचे पुत्र एलियट आणि फ्रँकलिन त्या वेळीं याच विभागांत कामगिरीसाठीं होते, तेहि या निमित्तानं वडिलां-पाशी आले.

सलामीच्याच औपचारिक स्वरूपाच्या मेजवानीच्या समारंभांत आणि त्या निमित्तानं झालेल्या संभाषणांत चार्चिल यांनीं या सर्व मंडळींवर फारच मोठा प्रभाव टाकला. रूझवेल्ट अधून मधून केवळ एखादाच प्रश्न करीत होते, आणि संभाषणाची गाडी एकटे चार्चिल अप्रतिहतपणें पुढें दौडवीत होते. या वाटाघाटींचा वृत्तांत पुढं एलियट रूझवेल्ट यांनीं अत्यंत काळजीपूर्वक लिहून काढला, त्यांत त्यांनीं चर्चिल यांच्याविषयीं लिहिलं होतं, "बोलतांना ते तोंडांतला चिरूट एकसारखा या गालांतून त्या गालांत फिरवीत होते. हा चिरूट सतत तिरका ओंठांत धरलेला होता. लढतीच्या बैलाप्रमाणं त्यांनीं आपले खांदे पुढं झुकवले होते, बोलतांना त्यांचे दोनहि हात या बोलकेपणानं हवा कांपीत फिरत होते, आणि त्यांचे डोळे तळपत होते."

या वाटाघाटींतून उत्तरोत्तर असं दिसून आलं की, अमेरिकेनं युध्दांत प्रवेश करावा या दृष्टीनं पराकाष्ठा करण्यासाठींच चर्चिल आलेले होते. प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांच्या आगमनापाठीमागचा उद्देश मात्र युध्दानंतर प्रस्थापित करायच्या जागतिक शांततेचीं बोलणीं करणं हा होता. धीमेपणानं परंतु निश्चितपणें या वाटाघाटींत रूझवेल्ट यांनीं महत्त्व प्राप्त करून घेतलं.

यावेळीं काढलेल्या अधिकृत पत्रकांत 'एफ. डी. आर.' यांनीं म्हटलं होतं, "स्थायी स्वरूपाची शांतता आपल्याला हवी असेल तर मागासलेल्या

देशांचा विकास ही एक अत्यावश्यक गोष्ट होय असं मला ठामपणें वाटूं लागलं आहे. हें कसं साधायचं ? अठराव्या शतकांतल्या जुन्यापुराण्या पद्धतींनीं हें जमणार नाहीं हें उघड आहे."

यांत त्यांना ब्रिटिश साम्राज्यांतल्या अनेक वसाहतीच अभिप्रेत होत्या हें चर्चिल यांनादेखील कळून चुकलं होतं.

दोनहि नेते संभाषणकुशल होते, खमके होते, परंतु अखेर दिसून आलं तें असं कीं, 'एफ. डी. आर.' यांच्या दृष्टिकोनाची सरशी होत होती.

चिरशांतता निर्माण व्हायची तर साम्राज्यवाद आणि झोटिंगशाही तिच्यांत चालणार नाहीं यावरच त्यांचा भर होता. नव्या शांततेंत जगांतल्या साऱ्या माणसांमध्यें समानता पायाभूत ठरेल असं त्यांना ठामपणें वाटत होतं.

दोघांचं सर्वच बाबतींत एकमत झालं नाहीं तरी एकमेकांविषयीं मात्र दोघांच्या मनांत कमालीचा आदर आणि कदर निर्माण झाली, आणि हीं बोलणीं संपण्यापूर्वींच त्यांनीं एकमेकांना एकेरी नांवानं संबोधण्याला सुरुवात देखील केली होती ! या बाटाघाटींपाठीमागचं प्रमुख उदिष्ट होतं तें, मिस्टर वेल्स यांनीं स्वतःबरोबर आणलेला महत्वाचा तर्जुमा मंजूर करणं, हें. हाच तर्जुमा पुढं 'ॲटलांटिक चार्टर' म्हणून प्रसिद्धि पावला. हे दोनहि नेते सुखरूपपणें आपआपल्या देशांच्या राजधानींत पोंचतांच हा जाहीरनामा, परिषदेच्या कामकाजाच्या वृत्तांताबरोबर प्रसिद्ध करण्यांत आला.

या जाहीरनाम्यांत असं घोषित करण्यांत आलं होतं कीं, यावर सह्या करणाऱ्या राष्ट्रांची स्वतःसाठीं कोणताहि नवा प्रदेश बळकावण्याची इच्छा नाहीं. जगांतल्या साऱ्या जनतेचा, आपल्याला मानवेल त्या प्रकारचं सरकार निवडण्याचा हक्क या दोन राष्ट्रांनीं या जाहीरनाम्यांत मान्य केला होता. युद्धानंतर, या युद्धांत पिळून निघालेल्या इतर लहान मोठ्या राष्ट्रांना मदत करण्यासाठीं आपण झटूं, तीं भरभराटीस यावींत, त्यांचा आर्थिक दर्जा सुधारावा, यासाठीं सर्वतोपरी प्रयत्न करूं असं या जाहीरनाम्यांत या दोन राष्ट्रांनीं जाहीर केलं होतं. जगांतल्या साऱ्या राष्ट्रांना आपापल्या सीमांच्या आंत सुरक्षितपणें जगतां यावं, सर्व देशांतल्या सर्व माणसांना निर्भयपणें आणि आपल्या महत्त्वाच्या गरजा भागवून जगतां यावं या दृष्टीनं जगांत शांतता

प्रस्थापित होईल आणि ती चिरकाल टिकून राहील अशी आशा या दोन राष्ट्रांनीं या जाहीरनाम्यांत व्यक्त केली होती.

अध्यक्षपदावर प्रथम निवडून येतांच ' एफ. डी. आर. ' यांनीं परमेश्वराकडं आपल्याला ही नवी जबाबदारी पेलण्याचं सामर्थ्य लाभो अशी प्रार्थना केली होती. आतां देखील या जाहीरनाम्यांत व्यक्त झालेल्या आशा सफल व्हाव्यात यासाठीं बल आणि बुद्धि ते ईश्वराकडे मागत होते. आपल्या उच्चाधिकारावर कधीं नव्हतं एवढं एकटेपण त्यांना जाणवत होतं. आपला जुना सहकारी लुई हौ या वेळीं आपल्या सोबत असायला हवा होता ही रुखरुख मनाचा पिच्छा सोडीत नव्हती. मागल्या उन्हाळ्यांत मिसि ल हॅण्ड या देखील फार आजारी पडल्या होत्या, आणि आतां त्या पुन्हां मदतीला येतील ही आशा राहिलेली नव्हती. मुलं आपापल्या कर्तव्यांत गढलीं होतीं, आणि चर्चिल यांच्याशीं झालेल्या या भेटीनंतर लौकरच रूझवेल्ट यांच्या मातोश्री ' सारा रूझवेल्ट ' निवर्तल्या. निधनसमयीं त्यांचं वय ८६ वर्षांचं होतं; परंतु अखेरपर्यंत त्यांची उभारी आणि कार्यतत्परता कायम होती. न्यूयॉर्कमध्यें त्या रहात आणि वारंवार ' व्हाईट हाऊस 'वर त्यांच्या फेऱ्या घडत. यानंतर आतां ही हक्काची सांवली देखील हरपली होती.

एकीकडे जबाबदाऱ्या सारख्या वाढत होत्या, आणि त्या पेलतांना प्रकृतीची काळजी घेणं, अंगची ताकद राखून ठेवणं, वारंवार डॉक्टरांचा सल्ला मिळविणं रूझवेल्ट यांना बिलकुल जमेनासं झालं होतं. युरोपांत युद्ध सुरू होऊन तीन वर्षं लोटलीं होतीं. गेल्या महायुद्धांत झाल्या होत्या तशा जर्मन पाणबुड्या पुन्हां धीट झाल्या होत्या, त्यांचा संचार दूर दूर पर्यंत चालू होता, आणि पूर्वीपेक्षां अचूकपणें, हुषारीनं त्या आपल्या शिकारी साधीत होत्या. ' उधार–उसनवारी ' चं अमेरिकेचं धोरण अधिक मोठ्या प्रमाणांत अंमलांत आणण्यांत येत होतं, अमेरिकेच्या व्यापारी जहाजांना देखील शस्त्रास्त्र पुरवण्यांत आलीं होतीं. याच वेळीं पॅसिफिक महासागरांतलं युद्ध टाळावं यासाठीं जपानी वकील आणि जपानचे इतर मुत्सद्दी यांच्याबरोबर स्वत: ' एफ. डी. आर. ' आणि परराष्ट्र मंत्री हल् हे बोलणीं करीत होते. आणि हें युद्ध टाळण्याची अमेरिकेइतकीच जपानची देखील इच्छा आहे असं या बोलण्यांतून प्रतीत होत होतं.

परंतु सर्व अंदाज साफ साफ फसला.

१९४१ च्या ७ डिसेंबरला दुपारीं—हा रविवार होता—प्रेसिडेंट रूझवेल्ट यांना सेक्रेटरी नॉक्स यांची तार आली. या तारेंत एक भयंकर वार्ता नमूद केली होती. हवाई बेटावरच्या पर्ल हार्बरवर जपानी विमानांनीं जबर बॉम्बफेक केली होती. तिथल्या अमेरिकन नौदलाचा ' न भूतो न भविष्यति ' असा विध्वंस चालवला होता.

या विश्वासघातानं उबगलेले, संतापलेले, धक्का बसलेले, ' एफ. डी. आर. ' आपल्या आप्त-सुहृदांना तात्काळ आपल्यापाशीं बोलावते झाले. यांत होत्या एलेनॉर रूझवेल्ट. व्हाइट हाऊसच्या एका पलीकडच्या दालनांत त्या क्षणीं त्या कोण्या पाहुण्याचं आगतस्वागत करण्यांत गुंतल्या होत्या. झालंच तर हॅरी हॉपकिन्स, सेक्रेटरी हल, सेक्रेटरी नॉक्स, सेक्रेटरी स्टिमसन, जनरल मार्शल, ग्रेस टली. ही सारी मंडळी रूझवेल्ट यांच्याभोंवतीं जमली. प्रत्येकाच्या चेहेऱ्यावर काळजी दाटून आलेली होती. प्रत्येकजण जणुं त्या एका वार्तेनं क्षणांत पांचपन्नास वर्षांनीं वयस्क झालेला होता. सर्वांच्या मुद्रा पांढऱ्या फटफटीत पडल्या होत्या. एका मागून एक खलिते व्हाइट हाऊसवर येऊन धडकत होते, वाचले जात होते, पॅसिफिकमधलं अमेरिकन जहाज न् जहाज मोडतोड करून निकालांत काढण्यांत आलेलं होतं. त्यांतलीं पांच बुडवूनसुद्धां टाकण्यांत आलेलीं होतीं. क्रूझर्स, डिस्ट्रॉयर्स, सब-मरीन्स, यांचं अतोनात नुकसान झालेलं होतं, आणि दोन हजारांहून अधिक माणसं ठार झालीं होतीं.

जेम्स रूझवेल्ट तिथं येऊन पोहोंचले आणि ' एफ. डी. आर. ' यांनीं त्यांच्याकडं पाहून कसंबसं म्हटलं, " हॅलो जिमी, शेवटीं तें घडलं. "

त्याच संध्याकाळीं राजाध्यक्षांनीं आपल्या मंत्रीमंडळाची बैठक बोलावली आणि पांच वाजेपर्यंत कॉंग्रेसला उद्देशून पाठवण्याचा संदेश त्यांनीं तयार केला. ग्रेस टली यांना ते म्हणाले, " ग्रेस, बैस. उद्यां कॉंग्रेसस पुढं आम्हीं बोलणार आहोंत. आमचा संदेश लिहून घे. तो फार थोडक्यांत असणार. "

ग्रेसनं लेखणी सरसावली.

" काल स्वल्पविराम, डिसेंबर सात स्वल्पविराम; एकोणिसशें एकेचाळीस डॅश हा दिवस इतिहासांत अभद्र दिवस म्हणून कायमचा नमूद होईल. डॅश-युनायटेड स्टेटस ऑफ अमेरिकेवर आकस्मिकपणें आणि जाणीवपूर्वक जपानी साम्राज्याच्या आरमारानं आणि विमानदलानं हल्ला केला. पॅरा... "

...ग्रंथालय, ठाणे. स्थळप्रत
८००९१८ वि: ... चारि...

प्रस्थापित होईल आणि ती चिरकाल टिकून राहील अशी आशा या दोन राष्ट्रांनीं या जाहीरनाम्यांत व्यक्त केली होती.

अध्यक्षपदावर प्रथम निवडून येतांच ' एफ. डी. आर. ' यांनीं परमेश्वराकडं आपल्याला ही नवी जबाबदारी पेलण्याचं सामर्थ्य लाभों अशी प्रार्थना केली होती. आतां देखील या जाहीरनाम्यांत व्यक्त झालेल्या आशा सफल व्हाव्यात यासाठीं बल आणि बुद्धि ते ईश्वराकडे मागत होते. आपल्या उच्चाधिकारावर कधीं नव्हतं एवढं एकटेपण त्यांना जाणवत होतं. आपला जुना सहकारी लुई हौ या वेळीं आपल्या सोबत असायला हवा होता ही रुखरुख मनाचा पिच्छा सोडीत नव्हती. मागल्या उन्हाळ्यांत मिसि ल हॅण्ड या देखील फार आजारी पडल्या होत्या, आणि आतां त्या पुन्हां मदतीला येतील ही आशा राहिलेली नव्हती. मुलं आपापल्या कर्तव्यांत गढलीं होतीं, आणि चर्चिल यांच्याशीं झालेल्या या भेटीनंतर लौकरच रूझवेल्ट यांच्या मातोश्री ' सारा रूझवेल्ट ' निवर्तल्या. निधनसमयीं त्यांचं वय ८६ वर्षांचं होतं; परंतु अखेरपर्यंत त्यांची उभारी आणि कार्यतत्परता कायम होती. न्यूयॉर्कमध्यें त्या रहात आणि वारंवार ' व्हाईट हाऊस 'वर त्यांच्या फेऱ्या घडत. यानंतर आतां ही हक्काची सांवली देखील हरपली होती.

एकीकडे जबाबदाऱ्या सारख्या वाढत होत्या, आणि त्या पेलतांना प्रकृतीची काळजी घेणं, अंगची ताकद राखून ठेवणं, वारंवार डॉक्टरांचा सल्ला मिळविणं रूझवेल्ट यांना बिलकुल जमेनासं झालं होतं. युरोपांत युद्ध सुरू होऊन तीन वर्षं लोटलीं होतीं. गेल्या महायुद्धांत झाल्या होत्या तशा जर्मन पाणबुड्या पुन्हां धीट झाल्या होत्या, त्यांचा संचार दूर दूर पर्यंत चालू होता, आणि पूर्वीपेक्षां अचूकपणें, हुषारीनं त्या आपल्या शिकारी साधीत होत्या. ' उधार–उसनवारी ' चं अमेरिकेचं धोरण अधिक मोठ्या प्रमाणांत अंमलांत आणण्यांत येत होतं, अमेरिकेच्या व्यापारी जहाजांना देखील शस्त्रास्त्र पुरवण्यांत आलीं होतीं. याच वेळीं पॅसिफिक महासागरांतलं युद्ध टाळावं यासाठीं जपानी वकील आणि जपानचे इतर मुत्सद्दी यांच्याबरोबर स्वत: ' एफ. डी. आर. ' आणि परराष्ट्र मंत्री हल् हे बोलणीं करीत होते. आणि हें युद्ध टाळण्याची अमेरिकेइतकीच जपानची देखील इच्छा आहे असं या बोलण्यांतून प्रतीत होत होतं.

परंतु सर्व अंदाज साफ साफ फसला.

१९४१ च्या ४ डिसेंबरला दुपारीं—हा रविवार होता––प्रेसिडेंट रूझवेल्ट यांना सेक्रेटरी नॉक्स यांची तार आली. या तारेंत एक भयंकर वार्ता नमूद केली होती. हवाई बेटावरच्या पर्ल हार्बरवर जपानी विमानांनीं जबर बॉम्बफेक केली होती. तिथल्या अमेरिकन नौदलाचा 'न भूतो न भविष्यति' असा विध्वंस चालवला होता.

या विश्वासघातानं उबगलेले, संतापलेले, धक्का बसलेले, 'एफ. डी. आर.' आपल्या आप्त-सुहृदांना तात्काळ आपल्यापाशीं बोलावते झाले. यांत होत्या एलेनॉर रूझवेल्ट. व्हाईट हाऊसच्या एका पलीकडच्या दालनांत त्या क्षणीं त्या कोण्या पाहुण्याचं आगतस्वागत करण्यांत गुंतल्या होत्या. झालंच तर हॅरी हॉपकिन्स, सेक्रेटरी हल, सेक्रेटरी नॉक्स, सेक्रेटरी स्टिमसन, जनरल मार्शल, ग्रेस टली. ही सारी मंडळी रूझवेल्ट यांच्याभोंवतीं जमली. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर काळजी दाटून आलेली होती. प्रत्येकजण जणुं त्या एका वार्तेनं क्षणांत पांचपन्नास वर्षांनीं वयस्क झालेला होता. सर्वांच्या मुद्रा पांढऱ्या फटफटीत पडल्या होत्या. एका मागून एक खलिते व्हाईट हाऊसवर येऊन धडकत होते, वाचले जात होते, पॅसिफिकमधलं अमेरिकन जहाज न् जहाज मोडतोड करून निकालांत काढण्यांत आलेलं होतं. त्यांतलीं पांच बुडवूनसुद्धां टाकण्यांत आलेलीं होतीं. क्रूझर्स, डिस्ट्रॉयर्स, सब-मरीन्स, यांचं अतोनात नुकसान झालेलं होतं, आणि दोन हजारांहून अधिक माणसं ठार झालीं होतीं.

जेम्स रूझवेल्ट तिथं येऊन पोहोंचले आणि 'एफ. डी. आर.' यांनीं त्यांच्याकडं पाहून कसंबसं म्हटलं, "हॅलो जिमी, शेवटीं तें घडलं."

त्याच संध्याकाळीं राजाध्यक्षांनीं आपल्या मंत्रीमंडळाची बैठक बोलावली आणि पांच वाजेपर्यंत कॉंग्रेसला उद्देशून पाठवण्याचा संदेश त्यांनीं तयार केला. ग्रेस टली यांना ते म्हणाले, "ग्रेस, बैस. उद्यां कॉंग्रेसस पुढं आम्हीं बोलणार आहोंत. आमचा संदेश लिहून घे. तो फार थोडक्यांत असणार."

ग्रेसनं लेखणी सरसावली.

"काल स्वल्पविराम, डिसेंबर सात स्वल्पविराम; एकोणिसशें एकेचाळीस डॅश हा दिवस इतिहासांत अभद्र दिवस म्हणून कायमचा नमूद होईल. डॅश-युनायटेड स्टेटस ऑफ अमेरिकेवर आकस्मिकपणें आणि जाणीवपूर्वक जपानी साम्राज्याच्या आरमारानं आणि विमानदलानं हल्ला केला. पॅरा..."

...ालय, ठाणे. स्थळप्रत
४००९९ दि: ...

संदेश मोजकाच होता, नेमका होता, आणि कॉंग्रेसपुढं तो दुसऱ्या दिवशीं वाचण्यांत आला तेव्हां त्याला फक्त सहा मिनिटं पुरलीं.

युद्धपरिस्थिति निर्माण झाली आहे. आमचीं माणसं, आमचा प्रदेश आणि आमचे हितसंबंध भयावह अशा धोक्यांत आहेत याकडं डोळेझाक करणं अशक्य आहे. ७ डिसेंबरच्या रविवारीं जपाननं केलेल्या आमच्यावरील अकारण आणि अधम अक्रमणानंतर युनायटेड स्टेटस् आणि जपानी साम्राज्य यांच्यांत युद्धपरिस्थिति निर्माण झाली आहे असं कॉंग्रेसनं घोषित करावं अशी मागणी आम्हीं करीत आहोंत."

हा संदेश ग्रेस टलींना सांगून होईतोंवर जपान्यांनीं मलाया, हॉन्कॉन्ग, ग्वाम, फिलीपाईन्स, वेक, आणि मिड्वे इतक्या भागांवर हल्ला केला होता.

त्यानंतर कॉंग्रेसनं केलेल्या युद्धघोषणेनं साऱ्या राष्ट्राची लष्करी पद्धतीनं नवी रचना होणं अपरिहार्य होतं. शेती, उद्योगधंदे, स्त्रीपुरुष, साऱ्यांचं लष्करीकरण अपरिहार्य झालं होतं, सर्व प्रकारचं व्यक्तिस्वातंत्र्य तात्पुरतं रद्द झालं होतं, आणि खुद्द राष्ट्राध्यक्षांच्याकडं सर सेनापतींची भूमिका आली होती. स्वतंत्र लोकशाही समाजरचनेला सोडून असं हें सारं घडत होतं. युद्ध संपतांच या साऱ्याला रजा मिळती आणि जनतेला तिचीं सारीं स्वातंत्र्य आणि तिचे हक्क परत देण्यांत येते तर त्याचं श्रेय प्रत्यक्षांत युद्धकाळांत अधिकारावर असलेल्या स्त्रीपुरुषांच्या सत्वशीलतेलाच द्यावं लागलं असतं.

१९४२ चं वर्ष अमेरिकेच्या इतिहासांतलं काळंकुट्ट वर्ष ठरलं. सबंध दुसऱ्या महायुद्धांत इतकं चिंताजनक वर्ष दुसरं उजाडलं नाहीं. परंतु याचवर्षी आणि यानंतरच्या काळांत फ्रँकलिन डिलॅनो रूझवेल्ट अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून अधिकाधिक कर्तृत्व करते झाले, जागतिक मान्यता पावले. जगांतल्या सर्वश्रेष्ठ तीन नेत्यांत त्यांची गणना होऊं लागली. ते स्वतः, पंतप्रधान चर्चिल आणि रशियाचे जोसेफ स्टॅलीन या तिघांना मिळून 'दि बिग थ्री' असं संबोधन प्राप्त झालं.

या काळांत आपली दूरदृष्टि 'एफ. डी. आर.' यांनीं कधींहि ढळूं दिली नाहीं. लांबच्या उद्दिष्टांवरून त्यांची नजर तिळमात्रहि ढळली नाहीं. त्या वर्षाच्या पहिल्या दिवशीं जगांतल्या सव्वीस राष्ट्रांचे प्रतिनिधी वॉशिंग्टनमध्यें जमले आणि त्यांनीं युनायटेड नेशन्सच्या जाहीरनाम्यावर सह्या केल्या,

ॲटलांटिक जाहीरनाम्याला मान्यता दिली, आणि ‘ शत्रूराष्ट्रांशीं स्वतंत्रपणें आम्हीं तह करणार नाहीं ’ अशी हमी दिली. या सोहळ्याच्या निमित्तानं स्वतः चर्चिल वॉशिंग्टनमध्यें आलेले होते. पुन्हां एकदां जूनमध्यें ते कांहीं संयुक्त योजना आंखण्यासाठीं वॉशिंग्टनला आले. तोंवर जपान्यांनीं वेक, सिंगापूर, न्यूगिनी, फिलिपाईन्स, ॲलुशियन्स आणि मिडवे इतके नवे प्रदेश घशाखालीं घातले होते. तिकडे उत्तर आफ्रिकेंत जर्मन आणि इटालियन फौजा ब्रिटिश आठव्या सेनेला एकसारख्या मागें रेटीत होत्या.

तथापि, त्याच वर्षांत एक विलक्षण घटना घडली. फार थोड्या लोकांना तिची कल्पना आली आणि वर्तमानपत्रांनून तर ती प्रसिद्ध करण्याला संपादकांकडे जागाच नव्हती. ही घटना अशी :– न्यूयॉर्क शहरांतल्या मोन्ट सिनाई हॉस्पिटलमधल्या एका होतकरू तरुण डॉक्टरला नॅशनल फौन्डेशनकडून एक शिष्यवृत्ति मिळाली. मिशिगन युनिव्हर्सिटीमध्यें संसर्गजन्य रोग आणि त्यावरच्या लसी यांबद्दल संशोधन करण्यासाठीं ही शिष्यवृत्ति होती. या तरुण होतकरू डॉक्टराचं नांव होतं, डॉ. जोन्स ई. साल्क.

त्याच वर्षी युध्दकाळांतल्या आपल्या पहिल्या प्रवासाला एलेनॉर रूझवेल्ट गेल्या, इंग्लंडला त्या गेल्या. नागरी संरक्षणाच्या योजनेबद्दल ब्रिटिश सरकारबरोबर त्यांनीं विचारांची आणि कल्पनांची देवाणघेवाण केली. खरं म्हणजे त्या युध्दकाळांत कामाच्या भराखालीं आधींच चिरडून गेल्या होत्या; त्यांतच या प्रवासाची भर पडली. याशिवाय एका वर्तमानपत्रांत एक स्तंभ त्या नियमितपणें लिहीत आणि या लेखनापासून मिळणारी मिळकत अर्धी रेडक्रॉसला आणि अर्धी अमेरिकन फ्रेण्डस सर्व्हिस कमिटीला त्या देणगी म्हणून देत. पॅसिफिक टापूंतल्या त्यांच्या प्रवासांत कित्येक जखमी तरुणांच्या भेटी त्यांनीं घेतल्या, युध्दांतल्या अनुभवांनीं बुध्दिभ्रंश झालेले असंख्य तरुण त्यांनीं पाहिले, आणि या प्रवासाहून परततेवेळीं एकच एक प्रश्न त्यांच्या मनांत एकसारखा घोळत होता. ‘ हें सारं काय म्हणून ? ’

याच प्रश्नानं प्रेसिडेंट रूझवेल्ट देखील झपाटलेले होते. १९४३ च्या जानेवारीमध्यें ते जातीनं उत्तर आफ्रिकेंत गेले. तिथं कॅसाब्लॅन्का इथ दहा दिवस राहून त्यांनीं चर्चिल, झालंच तर फ्रान्सचे जनरल चार्लस द–गॉल त्याचप्रमाणं जनरल ड्वाइट आयसेनहॉवर आणि जनरल मार्शल, ॲडमिरल

...१४

अर्नेस्ट किंग आणि कांहीं वरिष्ठ लष्करी अधिकारी यांच्यासमवेत बसून पुढील धोरणाच्या वाटाघाटी केल्या.

उत्तर आफ्रिकेकडं निघण्यापूर्वी कॉंग्रेसपुढं केलेल्या भाषणांत त्यांनीं म्हटलं, "आम्हांला आणि युनोमध्यें सामील झालेल्या साऱ्या राष्ट्रांना खरोखरी शांतता, टिकाऊ शांतता हवी आहे." आणि कॅसाब्लॉन्का इथं बोलणीं करितांना युध्दोत्तर संघटनेचाच विचार ते वारंवार घोळत होते.

एव्हांना चर्चिल आणि रूझवेल्ट यांच्यामध्यें वैयक्तिक स्वरूपाच्या आणि दृढ अशा कांहीं खुणगांठी बसल्या होत्या. परंतु जनरल द गॉल हे मात्र कांहीं वेगळेच निघाले. वृत्तीनं ते पुष्कळसे अलिप्त आणि आंतल्या गांठीचे होते.

एव्हांना 'एफ. डी आर.' यांचे चारहि मुलगे रणक्षेत्रावर गेलेले होते आणि कॅसाब्लान्काला यांतले दोघे म्हणजे एलियट आणि फ्रॅंकलिन ज्यूनियर भेटले तेव्हां रूझवेल्ट यांना फार फार बरं वाटलं. एलियट वैमानिक झालेला होता, आणि फ्रॅंकलिन ज्यूनियर मेडिटरेनियन भागांत 'मेरॅण्ट' या विना-शिकेवर अधिकारी होता. जॉन विमानवाहू बोटीवरून 'कुठं तरी' गेलेला होता. जेम्स पॅसिफिकमध्यें लढत होता. मुलगी ॲना हिचे पतिराजदेखील सैन्यांत दाखल झालेले होते.

उत्तर आफ्रिकेंतल्या वास्तव्यांत रणक्षेत्राचं जेवढं म्हणून दर्शन घडेल तेवढं घडवून घेण्यावर रूझवेल्ट यांचा भर होता. जाळून काढणारं ऊन आणि धोरणविषयक प्रदीर्घ वाटाघाटी यांतून सवड काढून जीपमध्यें बसून रूझवेल्ट सैन्याची पाहणी करीत फिरत होते, उध्वस्त प्रदेशांवरून विमानांतून परिभ्रमण करीत होते.

दोस्त राष्ट्रांच्या म्होरक्यांची पुढची मोठी परिषद १९४३ च्या डिसेंबरला तेहरान इथं झाली. तेहरान ही तटस्थ इराणची राजधानी. या परिषदेंत आणखी एका मातबर व्यक्तींशी रूझवेल्ट यांची चांगली जानपहेचान झाली. ही व्यक्ति जोसेफ स्टॅलीन. रूझवेल्ट यांना स्टॅलीन हे फार उंच नव्हेत असे आडव्या हाडाचे, दणकट व्यक्तित्वाचे गृहस्थ वाटले. त्यांची इच्छाशक्ति भरभक्कम, वृत्ति संशयी आणि अतिसावध असल्याचा त्यांचा ग्रह झाला. युद्धानंतर राष्ट्रांच्या एखाद्या संघांत आपल्या राष्ट्रला गोऊन घेण्याला ते तितकेसे राजी वाटत नव्हते.

अशा चित्रविचित्र व्यक्तिमत्त्वांना आणि राष्ट्रांना त्यांच्या हितार्थ म्हणून कां होईना एकत्र जुंपून ठेवणं ही सोपी गोष्ट नव्हती आणि या कामाचा बव्हंशीं मोठा भार 'एफ. डी. आर.' यांच्यावरच येऊन पडला होता. हें काम केवढं कर्मकठीण आहे याची कल्पना युद्धानंतर पुन्हां एकदां प्रत्येक राष्ट्राला आपल्या अस्तित्वाची हमी वाटूं लागली तेव्हां आली !

उत्तर आफ्रिकेंत जयाचं पारडं दोस्तांच्या बाजूला आतां झुकलं होतं. रशियन आघाडीवर जर्मनीची ससेहोलपट चालू होती. ब्रह्मदेशांत जपान्यांना माघारींमागून माघारी घ्याव्या लागत होत्या, इटाली जवळ जवळ सारा दोस्तांच्या हातीं आला होता, आणि १९४४ च्या ३ जूनला युरोपांतली चढाई नॉर्मण्डीच्या किनाऱ्यावर उतरून दोस्तांच्या सैन्यानं चालू केली. तेहरान इथं या लढाईची मसलत शिजलेली होती.

जुलैच्या मध्याला 'एफ. डी. आर.' हवाईला गेले. तिथं जनरल डग्लस मॅक्आर्थर आणि ॲडमिरल चेस्टर मिनिटस यांच्याशीं त्यांनीं बोलणीं केलीं. पॅसिफिक भागांत असतांना त्यांनीं जातीनं त्या भागांतल्या जखमी सैनिकांच्या गांठीभेटी घेतल्या, त्यांच्याशीं बातचीत केली, त्यांची विचारपूस केली. आपला उत्साह त्यांनीं दिला. आपल्या भेटीला साक्षात् रूझवेल्ट आले याच्यावर कित्येकांचा विश्वासच बसेना. बिछान्यांत लुळंपांगळं होऊन लोळावं लागणं म्हणजे काय असतं याची कल्पना रूझवेल्ट यांना पूर्णपणें होती. त्यामुळं या माणसांशीं काय बोलावं, कसं बोलावं, त्यांना कशा प्रकारचा धीर आणि उत्तेजन द्यावं हें त्यांना माहीत होतं. आपला एखादा हातपाय किंवा शरिराचा एखादा महत्त्वाचा भाग निकामी झाला आहे हें कळल्यानंतर माणसाला काय वाटतं आणि किती वाटतं याची चांगली जाणीव त्यांना होती. आपल्या गदगदत्या हास्यानं वातावरण उजळून टाकीत, विनोदांनीं हास्याचे कल्लोळ उठवीत रूझवेल्ट रुग्णालयांमागून रुग्णालयांना भेटी देत फिरले. आपल्या येण्यानं घायाळ माणसं देखील उत्तेजित होत आहेत, त्यांच्या वेदनाग्रस्त मुद्रांवर हास्य उजळत आहे हें पाहून रूझवेल्ट यांचं काळीज पदोंपदीं भरून येत होतं.

अमेरिकेला परत आल्यावर त्यांना अधिकृतपणें असं कळविण्यांत आलं कीं, डेमॉक्रॅटिक पक्षाच्या राष्ट्रीय मेळाव्यानं चवथ्या वेळीं राष्ट्राध्यक्षपदाचे उमेदवार म्हणून त्यांना निवडून दिलं होतं, आणि आगामी निवडणुकींत

त्यांना प्रचंड विजय मिळेल अशी पक्षाची अपेक्षा होती. लोकशाही समाजरचनेला अत्यावश्यक अशा खुल्या निवडणुकी अमेरिकेंत युद्धपरिस्थितींत देखील स्थगित करण्यांत आलेल्या नव्हत्या.

पाश्चिमात्य जगांतली फ्रॅंकलिन डिलॅनो रूझवेल्ट ही एक अत्यंत प्रभावी असामी झाली होती. त्यांच्याच मुत्सद्देगिरीनं द–गॉल यांचं सहकार्य दोस्तांना लाभलं होतं, चर्चिल आणि स्टॅलीन या दोघांची मोट दोस्तांच्या दावणींत यशस्वीपणें बांधली गेली होती, आणि येऊं घातलेल्या शांततेच्या काळांतील धोके आगाऊच हेरून त्यांच्यावर उपाय–योजनांचा विचार चालू झाला होता. रूझवेल्ट हवाईमध्यें असतांना न्यू हॅम्पशायरमधल्या ब्रेटन वुड्स इथं यूनोच्या चव्वेचाळीस सदस्यांची प्राथमिक परिषद चालू होती. युद्धोत्तर जगांतले आर्थिक प्रश्न या परिषदेंत सोडवले जात होते. ब्रेटन वुड्स इथंच या परिषदेंत आंतरराष्ट्रीय बॅंकेची योजना आंखण्यांत आली. पुनश्च एकदां जागतिक व्यापार सुरू करण्याच्या दृष्टीनं पहिला टप्पा म्हणून अशा प्रकारची बॅंक उपयुक्त ठरणार होती. 'एफ. डी. आर.' यांच्यामुळंच हें शक्य झालं होतं.

युद्धोत्तर आर्थिक घडीच्या दृष्टीनं दुसरा टप्पा ठरला, डार्ट ओक्स इथं. चीन, रशिया, ग्रेट ब्रिटन आणि अमेरिका यांच्या मुत्सद्यांची झालेली परिषद ब्रेटन वुड्सच्या परिषदेनंतर पुढच्याच महिन्यांत झाली. यूनोच्या जाहीरनाम्याचा प्राथमिक स्वरूपाचा खर्डा तयार करण्याच्या दृष्टीनं ही परिषद भरली होती. सारे मतभेद अजून मिटलेले नव्हते. तथापि, प्रेसिडेंट रूझवेल्ट यांच्या अंदाजानं नव्वद टक्के एकमत झालेलं होतं.

डार्ट ओक्स नंतर विन्स्टन चर्चिल यांच्याबरोबर पुनश्च बोलणीं करण्याकरितां रूझवेल्ट घाईनं क्वेबेक्‌कडे गेले.

नोव्हेंबरमध्यें अमेरिकन जनतेनं न भूतो न भविष्यति अशा बहुमतानं त्यांना निवडून देऊन त्यांच्यावरचा आपला अतीव विश्वास पुन्हां एकवार व्यक्त केला. निवडणुकीच्या दिवसानंतर थोड्याच काळांत रूझवेल्ट विश्रांतीसाठीं वॉर्म स्प्रिंग्ज इथं गेले. आतां ते खूप थकले होते. कित्येक पौंडांनीं त्यांचं वजन उतरलं होतं. परंतु ॲडमिरल मॅकिण्टायर आणि इतर पांच तज्ज्ञ डॉक्टरांनीं त्यांच्या तब्येतीच्या केलेल्या बारीक तपासणींत रूझवेल्ट यांची तब्येत अत्युत्तम असल्याचं त्यांना दिसून आलं. अमेरिका युद्धांत पडली आणि

रूझवेल्ट यांच्या वॉर्म स्प्रिंग्जच्या फेऱ्या जवळ जवळ बंद पडल्या होत्या. सबंध १९४२ सालांत ते वॉर्म स्प्रिंग्जला गेलेच नव्हते. नंतरच्या १९४३–४४ सालीं फक्त एकदांच ते तिथं गेले होते.

डॉक्टरांना रूझवेल्ट यांची तब्येत अत्युत्तम आढळली, परंतु रूझवेल्ट कुटुंबियांचं म्हणणं वेगळं होतं. डॉक्टरांइतका आशावाद त्यांना ठेववत नव्हता. शपथविधीच्या सोहाळ्यासाठीं रूझवेल्ट यांचा मुलगा जेम्स घरीं वडिलांपाशीं येऊन राहिला. तेव्हा वडिलांच्या उतरलेल्या तब्बेतीनं त्याला धक्काच बसला आणि चिंता वाटूं लागली. आपल्या या ज्येष्ठ मुलाच्या हातावर हात ठेवून 'एफ डी. आर.' यांनीं त्याच्यापाशीं कबूली दिली कीं नंतरच्या एकेक सोहाळ्यांतून पार पडणं त्यांना फार कठीण जाणार होतं. परंतु तरीहि पिता-पुत्रांच्या त्या मनमोकळ्या बोलण्यांत रूझवेल्ट यांची प्रमुख चिंता होती ती 'बड्या तिघां' च्या येत्या परिषदेबद्दलचीच. न्याय्य आणि टिकाऊ शांतता प्रस्थापित होण्याच्या दृष्टीनं जें जें कांहीं शक्य होतं तें तें करण्यासाठीं या परिषदेला जाण्याचं रूझवेल्ट यांच्या मनानं फार घेतलं होतं.

राष्ट्राला आणि कॉंग्रेसला उद्देशून राष्ट्राध्यक्षपदावरून चवथ्यांदां केलेल्या उद्‌घाटनाच्या भाषणांत रूझवेल्ट म्हणाले, "अशा प्रकारची शांतता आपल्याला प्रस्थापित करतां येईल आणि ती आपण प्रस्थापित करूंच. अनुभवानं आम्हांला असं कळून चुकलं आहे कीं, ही शांतता फक्त आमच्यापुरती असूंच शकत नाहीं. शांततापूर्ण जगांत आम्ही आमच्यापुरतं नांदूंच शकत नाहीं. आमचं हित इतर राष्ट्रांच्या हिताशीं दृढपणें निगडीत झालेलं आहे. केवळ निकटच्या राष्ट्रांशींच नव्हे तर अगदीं दूरदूरच्या राष्ट्रांशीं देखील. आम्हांला जगायचं असेल आणि सुबत्तेंत जगायचं असेल तर तें शहामृग किंवा गवाणींतलं कुत्रं बनून जगतां येणार नाहीं तर माणूस म्हणूनच जगतां येईल. त्यासाठीं आम्ही साऱ्या जगाचे प्रजाजन, उभ्या मानवजातीपैकीं कोणी, म्हणूनच जगायला शिकलं पाहिजे, हें अगदीं साधंसुधं सत्य आम्हांला कळून चुकलं आहे."

पुढली 'तिघा बड्यां'ची परिषद याल्टाला भरली. हें याल्टा रशियाच्या दक्षिणेला काळ्या समुद्राच्या किनाऱ्यावर वसलेलं गांव. १९४५ च्या फेब्रुवारींत इथं ही 'तिघां'ची परिषद झाली. या परिषदेंत रूझवेल्ट, चर्चिल आणि स्टॅलीन यांनीं तहाच्या शर्ती आणि आपल्यांतले प्रदेशविषयक मतभेद यांचा

विचार केला आणि एकमत साधलं. यूनोच्या कामाबातींत असलेले आपल्यांतले आणखी कांहीं मतभेद मिटवले. आणि यूनोची रीतसर प्रस्थापना करण्यासाठीं सॅनफ्रॅन्सिस्को इथं एप्रिलमध्यें भरू घातलेल्या परिषदेला आपापले प्रतिनिधी पाठवण्याचा निर्णय त्यांनीं घेतला.

'एफ. डी. आर.' यांनीं पत्नीला लिहिलेल्या एका पत्रांत म्हटलं होतं, "लाडक्या बॅब्ज, परिषदेचं सूप वाजलं—परिषद यशस्वी होऊन तें वाजलं असं आम्हांला वाटतं, आणि हें पत्र एवढ्यासाठींच कीं, सुएझ कालव्याकडं आम्हीं निघालों आहोंत हें तुला कळवावं. सुएझ मार्गानं आम्हीं तिकडं घरीं पोंचत आहोंत. परंतु २८ तारखेपर्यंत आम्हांला तिथं पोंचतां येईल कीं काय याविषयीं मी साशंक आहें. थोडासा थकलों आहें परंतु तसा ठीक आहें." पत्रांतल्या 'आम्हीं'चा अर्थ या वेळीं खुद्द ते आणि त्यांची कन्या ॲना असा होता.

मार्चच्या १ तारखेला, याल्टामध्यें कोणते कोणते निर्णय घेण्यांत आले त्याविषयीं प्रेसिडेंड रूझवेल्ट यांनीं कॉंग्रेसपुढं एक निवेदन केलं. पूर्वीं कधींहि त्यांनीं केलं नाहीं तें या वेळीं त्यांनीं केलं. ब्रेसेस लावलेल्या आपल्या पाया-निशीं उभं राहण्याचा ताण टाळण्यासाठीं ते खुर्चीत बसून बोलले.

सॅनफ्रान्सिस्कोची परिषद जवळ आली होती. तिच्यांत पुष्कळ श्रम पडणार होते आणि तिच्यासाठीं ताकदीचा कण अन् कण वांचवणं आणि सांठवणं आवश्यक होतं. हें मनांत बाळगून कॉंग्रेसपुढच्या भाषणानंतर अगदीं अनधिकृत स्वरूपांत रूझवेल्ट यांनीं कांहीं दिवसांची रजा घेतली आणि ते वॉर्म स्प्रिंग्जला जाऊन राहिले. वॉर्म स्प्रिंग्ज इथं ते मार्चच्या ३० तारखेला पोंचले. त्यांच्या बरोबर त्यांचा लाडका 'फेला' होताच. वॉर्म स्प्रिंग्जच्या त्यांच्या आप्तपरिचितांनीं गेल्या कांहीं दिवसांत त्यांना पाहिलेलं नव्हतं. आतां इतक्या दिवसांनंतर प्रथमच त्यांना पाहतांच त्यांच्या तब्येतीं-तल्या उतारानंहि सर्वजण थोडेसे स्तंभित झाले. त्यांच्या मतें रूझवेल्ट हे फारच गळून गेल्यासारखे दिसत होते. तथापि, वॉर्म स्प्रिंग्जची खुली हवा, ताजं ताजं उन्हं, आणि गरम पाण्यांतलं पोहणं यांनीं रूझवेल्ट यांची तब्येत पुन्हां एकदां चांगली झपाट्यानं सुधारूं लागली.

एप्रिलची १ तारीख. हा ईस्टरचा रविवार होता. वॉर्म स्प्रिंग्जच्या नव्या चर्चमध्यें त्या दिवशीं सकाळीं रूझवेल्ट मोठ्या खुषीनं उपस्थित झाले. त्यानंतरच्या आठवड्याभरांत त्यांचे भरगच्च कार्यक्रम अत्यंत उत्साहानं आणि उमेदीनं चालू होते. ते जातीनं साऱ्या पत्रांना उत्तरं देत होते, भेटण्यासाठीं येणाऱ्यांच्या भेटी घेत होते, सॅनफ्रॅन्सिस्कोच्या येत्या परिषदेच्या दृष्टीनं मनांत योजिलेल्या अनेक योजना बोलत होते. पुढच्या बुधवारीं ११ तारीख होती. त्या दिवशीं दोन प्रहरीं बसून येत्या शुक्रवारीं जेफरसनदिनानिमित्त करायच्या भाषणाचा कच्चा तर्जुमा त्यांनीं लिहून काढला.

आणि एप्रिलची १२ तारीख. दुपारची वेळ. रूझवेल्ट शेकोटीपुढं बसले होते. भोंवतालीं सरकारी कागदपत्रं पसरलीं होतीं. रूझवेल्ट यांचं वाचन आणि काम नेहमींप्रमाणें चालूं होतं. तिकडं खोलीच्या दुसऱ्या टोकाशीं प्रसिद्ध चित्रकर्त्या मॅडम एलिझबेथ शाऊमॅटॉव्हफ या एका मोठ्या कॅनव्हसपुढं उभ्या राहून रूझवेल्ट यांच्या तैलचित्राला आरंभ करीत होत्या. रूझवेल्ट यांना त्यांनीं एक सुंदर निळा झगा परिधान करायला लावला होता. अधूनमधून त्या त्यांच्याशीं संभाषण करीत होत्या आणि त्यानिमित्तानं रूझवेल्ट यांच्या मुद्रेवर उमटणाऱ्या विविध संवेदना टिपीत होत्या.

खोलींत आणखीहि माणसं होतीं. परंतु त्यांचे सारे व्यवहार रूझवेल्ट यांच्या अगर त्या चित्रकार बाईच्या कामांत व्यत्यय न येतील अशा बेतानंच चाललेले होते. पलीकडेच रूझवेल्ट यांना त्यांचा लाडका कुत्रा 'फेला' देणारी त्यांची पुतणी मिस मार्गारेट सक्ली एका कोचांत बसली होती. बसल्या बसल्या तिचं विणकाम चालूंच होतं. आणखी एक पुतणी, मिस लॉरा डेलॅनो, खोलीं-तल्या पुष्पपात्रांमध्यें फुलं रचीत होती. एक नोकराणी दुपारच्या जेवणासाठीं टेबल मांडीत होती.

आणि अचानक राष्ट्राध्यक्षांनीं आपला एक हात कपाळावर दाबून धरला. त्यानंतर मानेचा पाठीमागचा भाग ते जोराजोरानं चोळूं लागले.

ते उद्गारले, "माझं डोकं मनस्वी दुखूं लागलंय."

मिस सक्ली यांनीं तें ऐकलं आणि त्यांनीं वर पाहिलं.

रूझवेल्ट यांचा डावा बाहू लुळा पडूं लागल्यासारखं त्यांना दिसूं लागलं.

त्यांचं मस्तक बघतां बघतां छातीवर लोंबूं लागलं आणि त्यांचा सारा देह खुर्चीतल्या खुर्चीत पाहतां पाहतां खचला. ते बेशुद्ध झाले होते.

झपाट्यानं त्यांच्या दोनहि पुतण्या त्यांना सांवरून धरण्यासाठीं पुढं धांवल्या.

मिस् सक्लींनीं समोरच्या चित्रकार बाईंना म्हटलं, "बाहेरच्या गुप्त पोलिसांच्या माणसांना लौकरांत लौकर डॉक्टरांना आणायला सांगा बरं." आणि वायुवेगानं त्या बाई दाराकडं धांवल्या.

तेवढ्यांत मिस् सक्लींनीं स्वतःच नजीकचा फोन उचलला आणि, "डॉक्टरना बोलवा." असं ऑपरेटला सांगितलं. पुढच्या कांहीं मिनिटांतच डॉक्टर हॉवर्ड ब्रुएन त्यांच्या दवाखान्यांतून होते तशा स्थितींत धांवत पळत येऊन पोंचले.

प्रेसिडेंटसाहेबांचा 'व्हॅले' आणि इतरांनीं मिळून त्यांना उचललं, बिछान्यावर नेलं. डॉक्टरांनीं घाईघाईनं त्यांचे कपडे काढून त्यांना उघडं केलं. करतां आले ते सारे उपचार त्यांनीं भराभर केले. भोंवतालच्या भयग्रस्त मुद्रा त्यांच्यावर रोंखलेल्या होत्या. त्यांना उद्देशून ते म्हणाले, "हा मेंदूंतला रक्तस्राव आहे."

प्रेसिडेंट रूझवेल्ट यांना पुन्हां शुद्ध आलीच नाहीं. या पहिल्या झटक्यानंतर बरोबर एक तास आणि वीस मिनिटांनीं त्यांचं प्राणोत्क्रमण घडलं.

हें सारंच इतकं आकस्मिक होतं, यानं प्रत्येकाला बसलेला धक्का इतका मनस्वी होता कीं, पुढचे कांहीं क्षण जिवंत असलेलेच मेल्यासारखे झालेले होते. घडलं होतं त्याचं गांभीर्य नंतर प्रत्येकाला जाणवलं. मग भराभर व्हाईट हाऊस, स्टेट डिपार्टमेंट, वर्तमानपत्रं यांना फोन गेले.

वॉर्म स्प्रिंग्जला येण्यासाठीं विमानांत बसण्यापूर्वी एलिनॉर रूझवेल्ट यांनीं आपल्या प्रत्येक मुलाला उद्देशून एक तार केली, कीं "लाडक्यानों, तुमच्या वडिलांनी आज दुपारीं चिरनिद्रा घेतली. अखेरपर्यंत त्यांनीं आपली कामगिरी बजावली आणि तेंच तुम्हीहि करावं अशी अपेक्षा ते असते तर त्यांनीं केली असती. स्वतःला जपा. आई."

फ्रॅंकलिन डेलॅनो रूझवेल्ट यांची शवयात्रा आणि त्यांचं दफन कित्येक वर्षांपूर्वी त्यांनीं व्यक्त केलेल्या इच्छेनुरूप करण्यांत आलं. प्रथम व्हाईट हाऊस आणि नंतर हाईड पार्क इथं घडलेले धार्मिक विधी अगदी साधेसुधेच होते.

त्यांच्या स्वतःच्या हडसन रिव्हर व्हॅली इथल्या घरामागल्या हिरवळीच्या अगदीं मधोमध झाडांच्या छायेंत, अगदीं निवांत जागीं त्यांचं दफन करण्यांत आलं.

ते गेले तेव्हां वॉर्म स्प्रिंग्जच्या त्यांच्या निवासस्थानीं त्यांच्या टेबलावर असलल्या कागदपत्रांत जेफरसन-दिनानिमित्त त्यांनीं लिहून काढलेल्या भाषणाचा कच्चा तर्जुमा होता. त्या भाषणांतले निरोपाचे शब्द होते, " टिकाऊ स्वरूपाची शांतता निर्माण करण्यासाठीं आमच्या बरोबरीनं जे स्वतःला वाहून घेणार आहेत त्या साऱ्या अमेरिकन बांधवांना उद्देशून आम्ही म्हणतों, ' आपल्या मनांतला ' उद्यां ' उजाडण्याच्या बाबतींत अडचण फक्त एकच आहे आणि ती म्हणजे ' आज ' आपल्या मनांत आपण बाळगतों आहोंत ते संशय. हे संशय टाकूं या, आणि अत्यंत प्रबल नि कृतिशील अशा नितांत निष्ठेनं पुढची वाटचाल आपण करूं या. "

● ● ●

## साकार होऊं घातलेलीं दोन महान स्वप्नें

रूझवेल्ट यांच्या निधनानंतर तीन दिवसांनीं अमेरिकेच्या वेगवेगळ्या बंदरांतून आणि शहरांतून खास आगगाड्या सॅनफ्रॅन्सिस्कोकडं पोंचल्या. 'यूनो'च्या स्थापनेच्या परिषदेसाठीं येणारे प्रतिनिधी आणि नोकरवर्ग मिळून एकूण पांच हजार लोक या आगगाड्यांतून सॅनफ्रॅन्सिस्कोला आले. एकूण ४६ राष्ट्रांतलीं हीं वेंचीव माणसं होतीं. 'बड्या तिघां'च्या मनांतली यूनोची कल्पना साकार करण्यासाठीं सॅनफ्रॅन्सिस्को इथं ही इतिहास घडवणारी परिषद भरत होती.

'बड्या तिघांचे' आतां 'बडे पांच' झाले होते. यापैकीं अमेरिकेचं प्रतिनिधित्व केलं परराष्ट्रमंत्री एडवर्ड आर. स्टॅटीनिअस ज्यूनिअर यांनीं. ब्रिटनच्यावतीनें ब्रिटनचे परराष्ट्र-मंत्री सर अँथनी ईडन हे या परिषदेला उपस्थित होते. सोव्हियट रशियानं आपले परराष्ट्रमंत्री व्याचेस्लाव्ह एम. मोलोटोव्ह यांना पाठवलं होतं. चीनचे परराष्ट्रमंत्री डॉ. पी. व्ही. सुंग हे आपल्या देशाच्या वतीनं आले होते, आणि फ्रान्सचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते त्या देशाचे परराष्ट्रमंत्री जॉर्जिस बिदो. १९४४ अखेरीं कॉर्डेल हल यांना प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळं परराष्ट्रमंत्री-पदावरून निवृत्त व्हावं लागलं तेव्हां या खात्याचे उपमंत्री असलेले स्टॅटीनिअस मंत्री झाले. सॅनफ्रॅन्सिस्कोच्या या

परिषदेंत अध्यक्ष म्हणून त्यांना निवडण्यांत आलं. १९४५ मधला २५ एप्रिल हा दिवस या परिषदेच्या उद्‌घाटनचा दिवस होता. व्हाईट हाऊसवरून टेलिफोननं नवे राष्ट्राध्यक्ष हॅरी एस. ट्रूमन यांनीं परिषदेच्या प्रतिनिधींना उद्देशून भाषण केलं. कॉर्डेल हल यांनीं या परिषदेला पाठवलेल्या संदेशांत "माणसं नुकत्याच संपलेल्या महायुद्धापासून आवश्यक तो धडा शिकलीं आहेत कीं नाही हें या परिषदेंत ठरणार आहे," असं म्हटलं होतं.

परिषदेचं कामकाज सतत दोन महिने चालू होतं. एकेक मतभेद मिटवण्यांत येत होते. डंबार्टन-ओक्स इथं या दृष्टीनं झालेल्या बोलण्यांवर आधारलेला यूनोचा जाहीरनामा हे मतभेद मिटवल्यानंतरच तयार होऊं शकणार होता. अखेर हा जाहीरनामा तयार करण्यांत आला आणि जमलेल्या सार्‍या राष्ट्रांनीं एकमतानं तो मंजूर केला. या जाहीरनाम्यानं यूनोची एक जनरल असेम्ब्ली निर्माण केली होती. इथं सारीं सदस्य राष्ट्रं एकत्र येणार होतीं, जागतिक घडामोडींच्या बाबतींत निर्णय घेणार होतीं. त्याचप्रमाणं न्यायदान करणारं एक आंतरराष्ट्रीय न्यायालय आणि एक सुरक्षा मंडळ या जाहीरनाम्यानं निर्माण केलं. बड्या पांच राष्ट्रांना या सुरक्षा मंडळाचं कायमचं सदस्यत्व देण्यांत आलं होतं, आणि उरलेले सहा सदस्य इतर राष्ट्रांतून पाळीपाळीनं निवडून देण्यांत येणार होते. हें सुरक्षा मंडळ ही अत्यंत महत्वाचे निर्णय घेण्याच्या बाबतींत आणि योजना आंखण्याच्या बाबतींत यूनोची सर्वोच्च कार्यकारी यंत्रणा असणार होती.

न्यायालय, असेम्ब्ली, आणि सुरक्षा मंडळ अशा प्रमुख तीन विभागांच्या अखत्यारांत पुन्हां अनेक विशेष स्वरूपाचीं मंडळं ( आंकडेवारी-विषयक, मानवी हक्क विषयक, रोजगार विषयक, मादक द्रव्यांचं नियंत्रणविषयक, दळणवळण आणि वहातूकविषयक, इत्यादि. त्याचप्रमाणं विशेष स्वरूपाच्या एजन्सीज–जागतिक आरोग्य संघटना, आंतरराष्ट्रीय निर्वासित संघटना, आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना, यूनोचं आर्थिक आणि सामाजिक प्रश्नांबाबतचं कौन्सिल अथवा 'यूनेस्को'; झालंच तर, आंतरराष्ट्रीय मजूर संघटना ) होतीं. जाहीरनाम्यांतलं सर्वांत महत्वाचं तत्त्व हें होतं कीं, संघटना जसजशी वाढत जाईल तसतसं त्या त्या परिस्थितींत आणि त्या परिस्थितींतल्या त्या त्या गरजा भागवण्याच्या दृष्टीनं या संघटनेनं आपलं स्वरूप बदलतं ठेवावं.

१९४५ च्या ७ मे ला सॅनफ्रॅन्सिस्कोची ही परिषद चालू असतांनाच युरोपांत जर्मनी शरण आला आणि जागतिक महायुद्धाचा शेवट झाला. पाठोपाठ पॅसिफिकमधलं युद्ध देखील संपुष्टांत आलं. बड्या पांच राष्ट्रांच्या परराष्ट्रीय मंत्र्यांचा अंतर्भाव असलेल्या एका मंडळानं शांतता-तह तयार करण्याचं काम चालवलं.

फ्रँकलिन डिलॅनो रूझवेल्ट यांच्या कार्याचा अत्यंत मोठा सन्मान ठरावा अशी घटना १९४६ च्या जानेवारींत घडली. त्या महिन्यांत संयुक्त राष्ट्रसंघाचं पहिलं रीतसर अधिवेशन सुरू झालं. १० तारखेला जनरल ॲसेम्ब्लीची बैठक सुरू झाली आणि १७ तारखेला सुरक्षा मंडळाची बैठक लंडनमध्यें भरली. आपल्या पतीच्या स्मृतीला आपली आदरांजली म्हणून एलिनॉर रूझवेल्ट यूनोच्या अमेरिकन प्रतिनिधीमंडळाच्या सदस्या बनल्या. यूनोच्या मानवी हक्क-विषयक मंडळाचं अध्यक्षपद देखील त्यांनीं स्वीकारलं. १९५२ पर्यंत यूनोचं कार्य या ना त्या स्वरूपांत त्या करीतच होत्या. पुन्हां एकदां १९६१ च्या मार्चमध्यें यूनोच्या जनरल ॲसेम्ब्लीसाठीं जाणाऱ्या अमेरिकेच्या प्रतिनिधीमंडळाच्या सदस्या म्हणून त्यांना निवडण्यांत आलं.

या नव्या जागतिक संघटनेपुढचा पहिला आणि निकडीचा प्रश्न होता तो युद्धानं उध्वस्त झालेल्या देशांतल्या आसन्नमरण, उपाशी तापाशी, बेघर, अशा सहस्रावधी माणसांना तांतडीनं मदत पोंचविणं, हा. त्याचप्रमाणं नाश पावलेले रस्ते, पूल, घरं, आणि दळणवळणाचीं साधनं पुनश्च उभीं करणं हें देखील अत्यंत निकडीचं काम होतं.

आपल्या कारकीर्दींत या संघटनेनं यशस्वीरीत्या अधिकाधिक जबाबदारी पेलली आणि जगांतल्या जनतेचा अधिकाधिक विश्वास आणि आदर संपादन केला, असं तिच्याविषयीं म्हणतां येईल. किती तरी आंतरराष्ट्रीय तंट्यांत या संघटनेनं मध्यस्थी केली आणि अशी मध्यस्थी इतक्या प्रभावीपणं न घडती तर या तंट्यांनून युद्धं भडकलीं असतीं. उदाहरणार्थ, पॅलेस्टाईनचा प्रश्न, भारत-पाकिस्तान यांच्या दरम्यानचा काश्मीरविषयक तंटा. झालंच तर बर्लिनची नाकेबंदी, उत्तर कोरियाचं दक्षिण कोरियावर आक्रमण, त्याचप्रमाणं कांगोंतला पेंचप्रसंग.

तथापि, अशा प्रकारच्या आंतरराष्ट्रीय तंट्यांत मध्यस्थी ही या संघटनेची

केवळ एकच कामगिरी झाली. कोणताहि तंटा किंवा संघर्ष हा कोणत्या तरी गोष्टीचा परिपाक असतो, हें कारण नसून अनेक कारणांचा तो परिपाक असतो हें हेरून यूनोच्या अनेक विशेष स्वरूपाच्या यंत्रणा आजकाल युद्धाचीं कारणं मुळांतच निपटून टाकण्यासाठीं सतत झटत आहेत. दारिद्य, अन्याय, दडपशाही, रोगराई, आणि राष्ट्राराष्ट्रांतले गैरसमज, हीं या यूनोचं लक्ष्य ठरलेलीं अशीं कांहीं कारण होत. जगांतल्या विविध भागांत तेथल्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करून तेथलं जीवनमान वाढवण्यासाठीं काय करतां येईल हें ठरवण्याकरितां यूनोनं जागोजाग विशेष स्वरूपाच्या यंत्रणा नेमल्या आहेत. शस्त्रास्त्रांच्या विसर्जनासाठीं दहा राष्ट्रांची एक समिति या संघटनेच्या छायेंत आज काम करते आहे. त्याचप्रमाणं अणुशक्तीचा शांततापूर्ण उपयोग करण्यासाठीं एक आंतरराष्ट्रीय स्वरूपाची परिषद या संघटनेच्यावतीनं भरवण्यांत येत असते. याशिवाय, अवकाशाच्या शांततापूर्ण उपयोगाचा विचार करण्यासाठीं देखील या संघटनेनं एक समिति नेमली आहे.

तथापि रूझवेल्ट यांना अत्यंत प्रिय ठरली असती अशी या संघटनेची यंत्रणा म्हणजे 'युनिसेफ' ( युनायटेड नेशन्स इंटरनॅशनल चिल्ड्रेन्स फंड ) ही होय. युद्धोत्तर काळांत एक तात्पुरत्या स्वरूपाची यंत्रणा म्हणून ही संघटना आरंभीं सुरू करण्यांत आली आणि लौकरच तिला सध्यांचं स्वरूप देण्यांत आलं. १९६१ च्या डिसेंबर महिन्यांत तिचीं पंधरा वर्षं पुरीं झालीं. जगभरच्या मुलांना या संघटनेच्या वतीनं दूध, व्हिटॅमिन्स आणि रोगांचा प्रतिबंध करणाऱ्या लसी पुरवण्यांत येतात. मुलांच्या आरोग्याविषयक प्रश्नांचा अभ्यास या यंत्रणेच्या वतीनं चालू असतो आणि जिथं जिथं आवश्यक तिथं तिथं ही यंत्रणा आपले डॉक्टर्स आणि नर्सेस धाडीत असते. मुलांविषयीं 'एफ. डी. आर.' यांना आयुष्यभर उदंड प्रेम वाटत आलं होतं. आपलींच नव्हे, तर कोणाचींहि आणि कुठलींहि मुलं, हालअपेष्टांत जगत आहेत, उपाशी तापाशी आहेत, रोगानं ग्रासलेलीं आहेत असं त्यांना कळलं तर त्यांच्या काळजाचं पाणी पाणी होई. आणि जगभरच्या असंख्य मुलांना झपाटणाऱ्या पोलिओच्या व्याधीनंच त्यांना देखील आयुष्यांत झपाटल्यानं जगभरच्या मुलांच्या आरोग्याविषयीं त्यांना सतत जिव्हाळा वाटत आला होता.

रूझवेल्ट यांचं दुसरं स्वप्न उमललं तें त्यांच्या स्वतःच्या व्याधींतूनच. तें

स्वप्न होतं, अत्यंत यातनादायक आणि माणसाला पांगळं बनवणाऱ्या रोगांचा राजा अशा पोलिओवर माणसानं विजय मिळवणं हें. रूझवेल्ट यांनींच दिलेल्या स्फूर्तीमुळं या क्षेत्रांत वॉर्म स्प्रिंग्जच्या संघटनेनं आणि या रोगाच्या प्रतिबंधासाठीं स्थापन झालेल्या राष्ट्रीय स्वरूपाच्या यंत्रणेनं पुष्कळच कार्य केलं.

वॉर्म स्प्रिंग्जच्या इथं नव्या अद्ययावत् इमारती उभ्या करण्याची योजना साकार झाली आहे. १९५३ मध्यें इथं 'रूझवेल्ट सभागृह' बांधण्यांत आलं आणि १९५५ मध्यें मुलांसाठीं आणखी एक सभागृह बांधण्यांत आलं. रूझवेल्ट सभागृहांत दर्शनींच दोन चित्रं लावलेलीं आहेत. प्रवेशद्वाराच्या डावीकडं आंधळ्या आणि मुक्या हेलन केलर आणि त्यांच्या शिक्षिका ॲन सुलिव्हन मेसी यांचं मिळून एक मोठं चित्र दिसतं. त्याच्या खालीं लिहिलं आहे, 'एकमेकींना सांगत आल्या कीं, तें घडणं शक्य नाहीं आणि तें घडविण्यांत आलं.' प्रवेशद्वाराच्या उजवीकडं प्रेसिडेंट रूझवेल्ट यांचं चित्र लावलं आहे. त्यांत ते आपल्या चाकाच्या खुर्चीत बसले आहेत. आणि कुबड्या घेतलेल्या एका कोवळ्या मुलाशीं बातचीत करीत आहेत. या चित्राखालीं शब्द आहेत, "भीति एवढी एक गोष्ट सोडली तर या जगांत भिण्यासारखं दुसरं कांहींसुद्धां नाहीं."

वॉर्म स्प्रिंग्जच्या केंद्राचं काम आतां टापूंत पसरलं आहे. जन्मस्थ स्वरूपाचे अनेक शरीर-दोष, त्याचप्रमाणं आर्थिटिस, अपघातांत घडलेल्या शारीरिक स्वरूपाच्या मोठ्या इजा यांच्यावर देखील या जागीं उपचार केले जातात. जगभरचे नैसर्गिक उपचारतज्ज्ञ आणि या शास्त्रांतले विद्वान वॉर्म स्प्रिंग्जला दरसाल येत असतात आणि इथल्या नव्या नव्या उपचार-पद्धती, नव्या नव्या युक्त्या आपल्याबरोबर आपल्या देशांत नेत असतात. साऱ्या जगांत जॉर्जियाचं वॉर्म स्प्रिंग्ज फौंडेशन हें या प्रकारचं एकमेव स्थान आहे.

या स्थानीं येणाऱ्या जगभरच्या माणसांसाठीं आणखी एक आकर्षण म्हणूनच की काय रूझवेल्ट यांचं 'लिट्ल व्हाईट हाऊस' त्याच्या मूळ स्वरूपांत इथं जपण्यांत आलेलं आहे. हें इथलं एक यात्रास्थानच बनलं आहे. या घराच्या दिवाणखान्यांत, लांकडाच्या घोड्यावर अडकवून ठेवलेलं मॅडाम शाऊ-मॅटॉफ यांच्या कुंचल्यांतून उतरतां उतरतां तसंच अपुरं राहिलेलं रूझवेल्ट यांचं

तैलचित्र देखील, तें सुरू केलं त्या दिवशीं होतं तसं ठेवण्यांत आलेलं आहे. मॅडाम शाऊमॅटॉफ यांनीं पुरं केलेलं रूझवेल्ट यांचं आणखी एक तैलचित्र— रूझवेल्ट यांच्या मृत्यूनंतर या बाईनीं जें चित्र केलं तें इथं ठेवलं आहे. रूझवेल्ट यांच्या वैयक्तिक उपयोगाच्या वस्तू, त्यांना जगभरच्या अनेक ठिकाणांहून आणि असंख्य ज्ञात आणि अज्ञात माणसांकडून आलेल्या भेटी, वेळोवेळीं त्यांना नजर करण्यांत आलेल्या सुंदर सुंदर बनावटीच्या हातीं धरावयाच्या कांठ्या, इथं आपल्याला पहायला मिळतात. हें वस्तुसंग्रहालय आणि ' लिट्ल व्हाईट हाऊस ' आज जॉर्जिया सरकारच्या आधिपत्याखालीं आहे.

न्यूयॉर्क नॅशनल फौन्डेशनच्या अमेरिकाभर मिळून एकूण ३१०० शाखा आहेत. वीस वर्षं या देशांत आणि जगांत पोलिओ नष्ट करण्यासाठीं निर्माण झालेल्या शास्त्रीय उपाययोजनांचं श्रेय बहुतांशीं या फौन्डेशनलाच आहे. या क्षेत्रांतलं संशोधन, शिक्षण, साधनांची निर्मिती, वैद्यकीय उपचार आणि विनामूल्य टोंचतां येणारी लस वगैरे गोष्टींसाठीं हें फौन्डेशन आर्थिक सहाय्य देतं. आतां पोलिओ पूर्वीइतका दुर्धर आणि भयावह राहिलेला नाहीं. तेव्हां या फौन्डेशननं आर्थ्रिटिससारख्या अन्य व्याधींच्या क्षेत्रांत आपलं कार्य चालविलं आहे.

या फौन्डेशनच्या अध्यक्षपदीं त्याच्या स्थापनेपासून बेसिल ओ कॉनर हे आहेत. “ पोलिओविरुद्धच्या लढाईचे प्रणेते ” असा किताब त्यांना लाभलेला आहे. ' एफ. डी. आर. ' यांच्याइतकीच त्यांची दृष्टि व्यापक आणि दूरगामी ठरली आहे. रूझवेल्ट यांच्या निधनानंतर तीन वर्षांनीं न्यूयॉर्क शहरीं ओ ' कॉनर यांनीं आपली आंतरराष्ट्रीय. पोलिओविषयक परिषद भरवून आणली. आपलं सारं ज्ञान आणि अनुभव एकत्र करून, त्यांचं मंथन करून, अधिक प्रगत स्वरूपाचं निष्कर्ष काढण्यासाठीं एकून ४३ राष्ट्रांचे शास्त्रज्ञ या परिषदेला आले होते. दर तीन वर्षांनीं ही जागतिक परिषद भरत असते. आजवर कोपनहॅगन, रोम, जिनिव्हा इत्यादि शहरीं ही परिषद झाली. या प्रकारच्या पहिल्या परिषदेनंतर सहा महिन्यांनीं नॅशनल फौन्डेशनच्या आर्थिक पाठबळानं बोस्टनच्या बॅबे इथल्या मुलांच्या रुग्णालयांत काम करणाऱ्या शास्त्रज्ञांनीं एक नवा शोध प्रसिद्ध केला. नॉनगर्व्हस अशा कांतडींत पोलिओचे जंतू योजनापूर्वक वाढवतां आणि जोपासतां येतात अशा

प्रकारचा तो शोध होता. हा शोध फारच महत्त्वाचा ठरला. या शोधासाठींच डॉक्टर जॉन एन्डर्स, डॉक्टर थॉमस वेलर आणि डॉक्टर फ्रेड्रिक रॉबिन्स यांना 'नोबेल पारितोषिकं' बहाल करण्यांत आलीं. १९५२ मध्यें पिटसबर्गच्या युनिव्हर्सिटीचे डॉक्टर विल्यम मॅकडी हॅमन यांनीं अंग लुळं पाडणाऱ्या पोलिओच्या जातीपासून तात्पुरतं संरक्षण कांहीं प्रमाणांत देणारं 'गॅमा ग्लोब्युलिन' शोधून काढलं. आणखी वर्षभरांत त्याच युनिव्हर्सिटींतल्या डॉक्टर जॉनास ई. साल्क यांनीं मेल्या रोगजंतूंपासून एक लस प्राथमिक स्वरूपांत बनवली आणि हिनं या रोगाचा बऱ्याच मोठ्या स्वरूपांत प्रतिबंध होऊं शकेल असा त्यांचा विश्वास होता. १९५४ मध्यें या लसीच्या व्यापक स्वरूपाच्या चांचण्या घेण्यांत आल्या. २० लाख शाळकरी मुलांवर ही लस वापरण्यांत आली. ती ६० ते ९० टक्क्यांपर्यंत परिणामकारक ठरली आणि नॅशनल फौन्डेशननं शाळांशाळांतून पहिल्या आणि दुसऱ्या इयत्तेंतल्या लक्षावधी मुलांना ही लस विनामूल्य टोंचली.

डॉक्टर साल्क यांचं संशोधन इथंच थांबलं नाहीं. यालसीची परिणाम-कारकता आणखी वाढवण्यासाठीं ते संशोधन आणि प्रयोग करीतच राहिले. इतर शास्त्रज्ञांनीं देखील आपापल्या परीनं हें कार्य पुढें चालवलं होतंच. यापूर्वी कित्येक वर्षं या मंडळीला हें कळून आलं होतं कीं, पोलिओच्या रोगजंतूंचे एकूण तीन प्रकार आहेत आणि या रोगावर लस तयार करायची तर तिच्यांत हे तीनहि प्रकारचे रोगजंतू असणं आवश्यक आहे. नंतर बऱ्याच वर्षांनीं म्हणजे १९५५मध्यें पोलिओचे हे अत्यंत सूक्ष्म रोगजंतू ओळखून काढण्यांत आले. नव्या प्रकारची इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोप निर्माण झाल्यानंच हें शक्य झालं. पोलिओचं मूळच आता शास्त्रज्ञांच्या दृष्टिपथांत आलेलं होतं. या क्षेत्रां-तलं काम अजून चालूंच आहे. जिवंत रोगजंतूंची नवी लस तयार करण्यांत येत आहे. ती लस तोंडानं गिळतां येण्याजोग्या गोळ्यांच्या स्वरूपांत अगर द्रव स्वरूपांत बनविण्यांत येत आहे. या क्षेत्रांत नजरेंत भरण्यासारखी कामगिरी आहे ती सिनसिनाटी युनिव्हर्सितल्या वैद्यकीय विभागांतले डॉक्टर अल्बर्ट साबिन यांची. 'साबिन व्हॅक्सिन' म्हणून आतां एका प्रकारची लस नॅशनल फौन्डे शनच्या आर्थिक पाठिंब्यावर त्यांनीं तयार केली आहे. या लसीच्या चांचण्या घेण्यांत आलेल्या आहेत. अमेरिकन मेडिकल ॲसोसिएशननं तिला मान्या

मान्यता दिली आहे आणि पब्लिक हेल्थ सर्व्हिसचे पदाधिकारी आणि अमेरिकेच्या सर्जन जनरलनीं तिला परवानाहि दिला आहे.

पोलिओच्याविरुद्ध उघडण्यांत आलेल्या आघाडीला बरंच यश येत चाललं आहे परंतु सर्वच्या सर्व लोकांना ती लस टोचल्याशिवाय ती आघाडी संपूर्ण यशस्वी झाली आहे असं मानतां येणार नाहीं. अद्यापहि अर्ध्याहून अधिक अमेरिकनांना पोलिओप्रतिबंधक लस टोचण्यांत आलेली नाहीं. सर्वसामान्यत्वें पोलिओ हा लहान मुलांना जरी होत असला तरी ४५ वर्षांच्यावरच्या कुठल्याहि माणसाला तो होऊं शकतो.

ह्या लसीचा शोध लागण्यापूर्वीं अमेरिकेंत दरसाल साधारणपणें ४० हजार लोकांना पोलिओ होत असे. १९६० सालीं ही संख्या फक्त तीन हजारांवर आली. येत्या कांहीं वर्षांत ती शून्यापर्यंतहि निश्चित येऊं शकेल. सर्व जगांतून पोलिओचा समूळ नाश होईल.

'एफ. डी. आर.' यांचीं हीं दोन स्वप्नें अशा रीतीनं साकार होत आहेत. एक—जागतिक शांततेसाठीं एका जागतिक संघटनेची स्थापना आणि दोन—पोलिओचें पूर्ण उच्चाटण.

" प्रबल आणि कार्यान्वित आत्मविश्वासानं आपण पुढं पुढं जाऊया..."

REFBK-0014480

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
क्र. ९९६०

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ८०००२१८ वि: चरित्र
क्रमांक ९२६२ नों दि: २८-४-६५